२५
दा०क्र
(१७६९२)
धार्मिक

[ काव्येतिहास-संग्रह. ]

( २५. )

श्रीरामदासस्वामीकृत

# रामायण

व

# इतर कांहीं प्रकरणें.

सार्वजनिक ...
दाखल क्रमांक : १७६९२
वर्गांक : ६११

हा ग्रंथ

जनार्दन बाळाजी मोडक बी. ए. ( डेक्कनकॉलेज. )

यांनीं

यथामति शुद्ध करून प्रकाशित केला

तो

पुणें एथें ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिला.

शके १८०९.

ग्रंथ परिगणना ०६१०७
ग्रंथ परिगणना 02/03

# RAMADASA'S RAMAYANA

AND

A FEW MISCELLANEOUS PIECES

EDITED BY

**JANARDAN BALAJI MODAK** B. A.

AND

*Printed at the " Dnyan Prakash " Press*

POONA

1888 A. D.

# श्रीरामदासस्वामीकृत कविता.

## अनुक्रमणिका.


| प्रकरण. | पृष्ठ. |
|---|---|
| १ चरित्र. | १ |
| २ सुंदरकाण्ड | १ |
| ३ युद्धकाण्ड | ९ |
| ४ किष्किंधाकांड | १०५ |
| ५ भीमरूपी स्तोत्रें | ११७ |
| ६ पद | १३० |
| ७ अष्टकें | १३१ |
| ८ आर्ती | १३६ |
| ९ पंचीकरण | १३७ |
| १० भुपाळी | १४४ |
| ११ अभंग | १४४ |
| १२ अज्ञान बालबोध | १५० |
| १३ पदें | १५० |
| १४ आरती | १५२ |


समाप्त.

श्री.

# श्रीरामदासस्वामींचें चरित्र.

अकिंचनवरेण्योऽपि समर्थपदवीं गतः ।
दासोऽपि यः किल स्वामी स साधुः कोऽपि राजते ॥ ३३२ ॥

पंतविठ्ठलकृते सुश्लोकलाघवे.

श्रीरामदासस्वामींचे २२ वे पूर्वज कृष्णाजीपंत ठोंसर, जामदग्न्य गोत्री आश्वलायन देशस्थ ब्राह्मण, हे बेदर येथें राहत असत. ते शा० श० ८८४ या वर्षी गोदेच्या उत्तरतीरीं मौंजे हिवरें तर्फ तालखेड प्रांत बीड येथें सहकुटुंब येऊन राहिले. यांस पांच पुत्र होते. पैकीं ४ बेदर एथें झाले होते व पांचवा दशरथपंत ऊर्फ दादोपंत हा हिवरें एथें जन्मला. चवघां वडील पुत्रांनीं गोदेच्या उभय तीरीं राक्षस भुवनादि ४८ गांवची वसाहात करून तेथील कुळकर्ण व ज्योतिष या वृत्ति मिळविल्या. दशरथपंत हे प्रौढ झाल्यावर त्यांनीं आंबेड प्रांतापैकीं वडगाव म्हणून एक गांव हिवऱ्यांपासून तीन कोसांवर होतें तेथें वसाहात करून त्या गांवास जांब असें नांव देऊन त्या गांवा सुद्धां बारा गांवची कुळकर्ण व जोसपण यांची वृत्ति संपादिली. हे दशरथपंत शा० श० ९१० सवधारीनाम संवत्सरीं जांबेस येऊन राहिले. यांस सहा पुत्र झाले. त्यांत वडील रामाजीपंत म्हणून होते. प्रत्येकानें दोन दोन गांव आपल्या हिशास घेऊन तेथील वृत्ति चालविली. कृष्णाजीपंतांपासून नववे पुरुष गणेशपंत यांचे कार-कीर्दींत विद्यानगरचे अधिपति रामराजे यांचें राज्य बुडालें. नंतर २२ वे पुरुष सूर्याजीपंत यांची स्त्री सौ० राणूबाई हिचे पोटीं शा० श० १५२७ विश्वावसुनामसंवत्सरीं मार्गशीर्ष शु० १३ गुरुवारीं एक पुत्र जन्मला त्याचें नांव गंगाधर ठेविलें व दुसरा शा० श० १५३० कीलकनामसंवत्सरीं चैत्र शुद्ध ९ रविवारीं दोन प्रहरीं जन्मला त्याचें नांव नारायण असें ठेविलें. हाच पुढें रामदासस्वामी या नांवानें प्रसिद्धीस आला. वडील भावास श्रेष्ठ ऊर्फ रामीराम-दास असें पुढें म्हणूं लागले व धाकट्यास समर्थ असें म्हणूं लागले. रामदासस्वामींचे मामा भानजी गोसावी बोधलापूरकर हे पैठणचे एकनाथस्वामी यांचे शिष्य होते. भानजी गोसाव्यांची बहीण सौ० राणूबाई ही उभयतां पुत्रांस पैठण येथें नाथांचे पायांवर घालण्याकरितां गेली तेव्हां त्यांस पाहून नाथांस मोठा संतोष वाटला. नंतर शा० श० १५२१ फाल्गुन वद्य ६ स नाथ परलोकवासी झाले. गंगाधराचा व्रतबंध ५ वे वर्षी झाला व लग्न सातवे वर्षी झालें. नंतर शा०

१. इ० स० १५२५ ला० शा० श० १४८७

शा० १५३७ राक्षसनामसंवत्सरीं मार्गशीर्ष शु० ९ मीस रामदासस्वामींचा पिता हा परलोकवासी झाला. पुढें भानजी गोसावी बोधलापूरकर यांची कन्या नारायण यास देण्याचें ठरून सर्व तयारी होऊन ब्राह्मणांनीं अंतःपट धरून मंगलाष्टकें म्हणतांना "सावधान" या शब्दाचा उच्चार करतांच नारायण हा पळून गेला. लग्नाचे पूर्वी एकदां नारायण यानें झाडा वरून पाण्याचे डोहांत उडी टाकिली होती त्यामुळें खडकावर कपाळ आपटून एक टेंगूळ आलें तें आमरण तसेंच होतें. लग्नांतून पळून गेल्यावर शा० श० १५४२ रौद्रनामसंवत्सरीं माघ शु० ७ चे दिवशीं रामभजनांत काळ घालविण्याचा नारायण यानें निश्चय करून त्याप्रमाणें वर्तल्यामुळें त्यास रामदास असें म्हणूं लागले.

नाशकाजवळच्या टाकळी गांवापासून एका कोसावरच्या दशकपंचक नामक गांवचा कुळकर्णी यानें आपला पहिला मुलगा स्वामींस दिला त्याचें नांव उद्धव असें त्यांनीं ठेविलें. शा० श० १५४९ त प्रभवनामसंवत्सरीं वैशाख शुद्ध २ स स्वामींचे भावी शिष्य शिवाजीमहाराज जन्मले. नंतर शा० श० १५५४ या वर्षीं फाल्गुन शुद्धपक्षीं स्वामी उद्धवास टाकळीस ठेवून पृथ्वी प्रदक्षिणेस गेले. काशी, अयोध्या, गोकुल, मथुरा, वृंदावन, द्वारका, पिंडार्क, प्रभास, श्रीनगर, केदार, बदरीनारायण, उत्तर मानस सरोवर जगंनाथ, रामेश्वर, सेतुबंध, सिंहलद्वीप, गोकर्ण, मल्लिकार्जुन, कार्तिकस्वामी, करवीर. परशुराम क्षेत्र, महाबळेश्वर, पंढरी, भीमाशंकर, त्र्यंबकेश्वर, पंचवटी, गोदाप्रदक्षिणा वगैरे तीर्थें करून स्वामी बारा वर्षां नंतर परत जांबेस येऊन मातोश्रीस व ज्येष्ठ बंधूस भेटले. नंतर शा० श० १५६६ त स्वामी कृष्णातीरीं रहाण्याकरितां आले. जयराँमस्वामी वडगांवकर, तुकारामबावा देहूकर, रंगनाथस्वामी निगडीकर, रघुनाथस्वामी नासिककर, आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर मोरया देव चिंचवडकर, धरणीधर देव, केशवस्वामी भागानगरकर, वामन पंडित कोरेगांवकुमठेकर, विठ्ठल कवि बीडकर, शिवरामस्वामी कल्याणीकर, व अनंत कवि हे स्वामींचे समकालीन होते. नरसोमलनाथ अंबारखाने मामलेदार, व आनंदराव देशपांडे यांनीं समर्थांस चांफळांत मठ करून दिला. मसूर येथें श्रीरामनवमीचे उत्सवास शा० श० १५६७ त पार्थिवनामसंवत्सरीं स्वामींनीं आरंभ केला. चांफळ येथें रामाची स्थापना होऊन शा० श० १५७० त सर्वनामधारीसंवत्सरीं उत्सवास आरंभ झाला. याच वर्षीं चिंचवडकर देव, तुकोबा, व स्वामी यांची एकपंगत झाली. शिवाजीमहाराज माहुलीस असतांना त्यांस स्वामींनीं

---

* यापैकीं जयराम स्वामी, रंगनाथस्वामी, आनंदमूर्ती, केशवस्वामी, व रामदासस्वामी मिळून रामदासपंचायतन मानीत असत.

एक पत्र³ पाठविलें. त्याचें उत्तर परत गेल्यावर शा० श० १५७१ विकारीनामसंवत्सरीं वैशाख शु० ९ गुरुवारीं शिंगणवाडीस स्वामींचें साक्षात् दर्शन शिवाजीमहाराजांस झालें. ते वेळीं त्यांचें वय २२ वर्षांचें होतें. बरोबर बाळाजी आवजी चिटणीस व निळो सोनदेव होते. स्वामींनीं शिवाजीमहाराजांस बोध केला तो दासबोधाचे तेरावे दशकांत सहावे समासांत आहे. त्यास लघुबोध⁴ म्हणतात. नंतर स्वामींनीं राजास एक नारळ, मूठभर माती, दोन मुठी लीद, व चार मुठी खडे असा प्रसाद दिला. पुढें शिवाजीमहाराज राज्य सोडूं लागले तेव्हां राजधर्म व क्षात्रधर्म⁵ त्यांस सांगून तिकडून त्यांचें मन त्यांनीं वळविलें. नंतर बाळाजी आवजी व निळो सोनदेव यांस सेवकधर्म⁶ सांगितला. मग तीन दिवस जवळ ठेवून घेऊन चवथे दिवशीं शिवाजी महाराजांस स्वामींनीं निरोप दिला. वामन पंडितांवर अनुग्रह स्वामींनीं केला तेव्हां त्यांनीं स्वामींवर एक संस्कृत स्तोत्र केलें. त्याच वर्षीं आषाढांत पंढरीस स्वामी गेले. तेथें जांब येथील मंडळी यात्रेस आली होती त्यांज बरोबर मातोश्री व ज्येष्ठ बंधू यांस पत्रें त्यांनीं पाठविलीं. पुढें कांहीं दिवसांनीं शा० श० १५७२ त शिवाजीमहाराजांचे विनंती वरून स्वामी परळीचे किल्ल्यावर राहूं लागले तेव्हां त्यास सज्जनगड असें नांव त्यांनीं ठेविलें. तेथें राहते समयीं स्वामींनीं त्या किल्ल्याचे नैऋत्य कोनास मारुतीची व दक्षिण दरवाजांत अंगाई देवीची स्थापना केली. त्या ठिकाणीं स्वामींचा नित्यभोजनखर्च चालावा म्हणून मौजे वावरदेर या गांवचा वसूल त्या कामाकडे महाराजांनीं लावून दिला व स्वामींच्या विड्याच्या खर्चाकडे मेढेखोरें येथील जकातीचें उत्पन्न लावून दिलें. नंतर शिवाजी महाराजांस स्वामींनीं बाग⁷ कसा तयार करावा हें सांगितलें. त्याच वर्षीं कर्नाटकांतील सामनगड किल्ला शिवाजी महाराज बांधीत असतां किल्ला कसा बांधावा याविषयीं स्वामींनीं त्यांस बोध⁸ केला. पुढें शा० श० १५७३ त ज्येष्ठ बंधूंकडून जांब येथून पत्र आलें त्याचें उत्तर स्वामींनीं ओवीबद्ध⁹ पाठविलें. त्याच वर्षीं स्वामींचे आज्ञेवरून शिवाजीमहाराजांनीं श्रावणमासीं कोटिलिंगें करविणें, ब्राह्म-

---

२. ठाणें येथें सूर्योदय छापखान्यांत सन १८७० त छापलेलें चरित्र पृ० ८३–८४ पहा.
३. ठाणें येथें सूर्योदय छापखान्यांत ,, ,, ८८–९० पहा.
४. ठाणें येथें सूर्योदय छापखान्यांत ,, ,, ९२–९४ पहा.
५. ठाणें येथें सूर्योदय छापखान्यांत सन ,, ,, ९६–१०१ पहा.
६. ठाणें येथें सूर्योदय छापखान्यांत सन ,, ,, १०६–१०७ पहा.
७. ठाणें येथें सूर्योदय छापखान्यांत सन ,, ,, १२६–१२७ पहा.
८. ठाणें येथें सूर्योदय छापखान्यांत सन ,, ,, १३३–१३५ पहा.
९. ठाणें येथें सूर्योदय छापखान्यांत सन ,, ,, १३८–१४२ पहा.
१०. ठाणें येथें सूर्योदय छापखान्यांत सन ,, ,, १४३–१४४ पहा.

णांस दक्षिणा देणें, आणि जोहाराचे ऐवजीं रामराम म्हणणें या तीन गोष्टी सुरू केल्या. नंतर स्वामींनीं मातोश्रीस ओवीबद्ध पत्र[11] पाठविलें. मग शिवाजी महाराजांचे वडील शहाजी, मातोश्री जिजाबाई, बंधू व्यंकाजी व बंधूंची मातोश्री तुकाबाई हीं सर्व महाराजांसह सज्जनगडीं स्वामींचें दर्शन घेऊन परत गेलीं. पुढें शके १५७४ त जांबेस मातोश्री व श्रेष्ठ यांचे दर्शनार्थ स्वामी गेले. तेथें रामनवमीचा उत्सव झाल्यावर उभयतांची आज्ञा घेऊन मातापुरीं देवीचे दर्शनास स्वामी गेले. मातापुराहून स्वामी इंदुरास गेले. तेथें त्यांनीं मठ स्थापिला व त्यांत उद्धवास ठेविलें. नंतर शा० शके १५७७ त चैत्र वद्यपक्षीं शिवाजीमहाराजांनीं सर्व राज्य स्वामींस अर्पण केलें. तेव्हां तें मजकरितां तूंच चालव असें स्वामींनीं सांगून परत दिलें व पुनरपि राजधर्म सांगितला[12]. नंतर चिकोडीस स्वामी गेले व तेथें तिमाजीपंत देशपांडे यांस त्यांनीं अनुग्रह दिला. तेथून निघाल्यावर शिवकांची, विष्णुकांची, कुंभकोण इत्यादि स्थानें स्वामींनीं पाहिलीं. त्या प्रांतीं आपय्या दीक्षित कावेरीचे उत्तरेस आडपळें गांवीं राहत होते त्यांची भेट घेऊन पुढें व्यंकोजी राजे यांचे निमंत्रणावरून तंजावरास गेले. तेथें ज्येष्ठ वद्य तृतीयेस (शा० श० १५७७) व्यंकोजी राजे यांस त्यांनीं अनुग्रह दिला. परत जाते समयीं तेथें भिकाजी गोसावी व मौनी गोसावी यांस ठेविलें. तेथून मंचाळ क्षेत्रीं श्रीराघवेंद्र स्वामींची भेट घेऊन उडपी सुब्रह्मण्य येथें मध्वाचार्यांस भेटले आणि परत चांफळास आले. नंतर शा० श० १५७७ त कार्तिक शु० १ रोजीं स्वामींची मातोश्री परलोकवासी झाली तेव्हां स्वामी जांबेस होते. शा० श० १५७८ त स्वामी मिरजेस गेले व तेथें मठ करून त्यांत वेणूबाईची स्थापना त्यांनीं केली. त्याच सालीं उद्धवाचें इंदुराहून पत्र आल्यामुळें त्यास परत येण्याविषयीं पत्र[13] पाठविलें. तेव्हां तेथें महादेव गोसावी या नांवाचे शिष्याची स्थापना करून उद्धव गोसावी चांफळास परत आले. त्याच वर्षी स्वामी पाटणा जवळ कोयना नदींत बुडत होते परंतु कल्याणानें त्यांचा बचाव केला. शके १५७९ त शिवाजी महाराजांनीं स्वामींस एक घोडा नजर केला त्याचा स्वीकार करून त्याचें नांव रामबाण असें त्यांनीं ठेविलें. साताऱ्या जवळच्या देवगांवच्या पाटलानें स्वामींच्या शिष्यांनीं हुर्डा खाल्ल्याबद्दल स्वामींस नोंधळ्याच्या तांटांनीं मारिलें होतें त्याचे अपराधाची क्षमा करून शिवाजी महाराजांकडून त्या पाटलास स्वामींनीं शा० श० १५८० माघ वद्य १० स

११. ठाणें येथें सूर्योदय छापखान्यांत सन १८७० त छापलेलें चरित्र पृ० ११५–११७ पहा.
१२. ठाणें येथें सूर्योदय छापखान्यांत सन ,, ,, १८८–१८९ पहा.
१३. ठाणें येथें सूर्योदय छापखान्यांत सन ,, ,, १०७–१०८ पहा.

शेलापागोटें देवविलें. त्याच वर्षी माघ शु० १ स वासुदेव गोसावी यांची स्थापना कण्हेर गांवच्या मठीं केली होती. शा० श० १५८१ त मार्गशीर्ष शु० ५ स अबदुल्लाखान विजापूरचा सरदार यास मारिल्यानंतर शिवाजीमहाराज स्वामींचे भेटीस गेले तेव्हां त्यांजकडे पाहून दासबोधांतील उत्तमपुरुषलक्षण वर्णनाचा समास स्वामींनीं संमाप्त केला व शिवाजीमहाराजांस परमार्थाच्या चार गोष्टी सांगितल्या. त्याच सालीं माघमासीं वद्य ५ स वेडयाचें मिष करून स्वामींनीं सर्व शिष्यांची परीक्षा पाहिली तींत एकटा कल्याण मात्र कसोटीस उतरला. शा० श० १५८२ त शिवाजीमहाराज कांहीं कामानिमित्त राक्षसभुवनास गेले होते तेव्हां तेथून समर्थांचे बंधु श्रेष्ठ ऊर्फ रामीरामदास † हे २० कोसांवर जांबेस आहेत असें समजून त्यांचें दर्शन घेऊन महाराज परत साताऱ्यास आले. पुढें भागानगरीं केशव स्वामींस भेटून परत येत असतां वाटेंत कल्याणी येथें शिवराम गोसावी यांची भेट समर्थांनीं शा० श० १५८३ त घेतली व त्यांनीं केलेल्या बालबोधपंचीकरण नामक ग्रंथाचे शेवटीं आपल्या पांच ओव्या शिवराम स्वामींचे आग्रहावरून घातल्या. त्याच सालीं प्राकृत ग्रंथद्वारें धर्माचा सुगम उपाय सर्वांस सांगत नावें असा बोध वासुदेव गोसाव्यांस समर्थांनीं केला. शा० श० १५८४ त समर्थांनीं गारूड्याचा खेळ करवून त्या मिषानें शिष्यांस ब्रह्मज्ञान सांगितलें. शा० श० १५८५ त समर्थांनीं जेजूरीचे खंडोबाचें दर्शन चिंचवडाहून परत येत असतां घेतलें. शा० श० १५८६ त रंगनाथ स्वामींचे वडील निजानंद स्वामी यांचे पुण्यतिथीस कऱ्हाडास जाऊन नंतर निगडीस कांहीं दिवस राहून समर्थ पौष व० १३ स चांफळास परत आले. शा० श० १५८८ त समर्थांनीं जयराम स्वामी वडगांवकर यांस असा बोध केला कीं, साधूंनीं मृत प्राणी उठविण्याचा आव कधींही घालूं नये. त्याच वर्षीं समर्थांनीं शिवाजी महाराजांची भक्ति आपणावर कितपत आहे हें एक युक्ति योजून पाहिलें. शके १५८९ त आनंदमूर्तीची भेट समर्थांनीं ब्रह्मनाळीं घेतली. शा० श० १५८३ त शिवाजीमहाराज चांफळ संस्थाच्या खर्चाची व्यवस्था चांगली करवून मग कर्नाटकांत स्वारीस गेले. समर्थांचा एक आवडता बोका होता त्याचें नांव त्यांनीं रामा असें ठेविलें होतें. शा० श० १५९६ त आनंदनाम संवत्सरीं ज्येष्ठ शु० ९ मंदवारीं समर्थांचे आज्ञेवरून शिवाजीमहाराजांस राज्याभिषेक झाला. त्याच वर्षीं कपिला षष्ठीचें पर्व आलें ते समयीं समर्थ माहुलीस कृष्णास्नानास गेले. शा० श० १५९८ त फाल्गुनवद्यपक्षीं जांबेस श्रेष्ठांस भेटण्याकरितां समर्थ गेले. नंतर शेवली येथील देशमूख यांचे घरून

१४. शा० श० १५८१. † याचा भक्तिरहस्य म्हणून एक ग्रंथ आहे. * निजाम हैदराबाद.

लग्नकार्याहून परत येत असतां मौजे दहीलवाडा येथें शा० श० १५९९ फाल्गुन वद्य १३ सह १४ रोजीं श्रेष्ठ परलोकवासी झाले. त्यांस रामचंद्र व श्यामजी असे दोन पुत्र होते. त्यांची पत्नी पार्वतीबाई व० ३० स सती गेली त्या वेळीं रामचंद्रपंतांचें वय १२ वर्षांचें होतें व श्यामजीबावांचें १० वर्षांचें होतें. शा० श० १६०० चैत्र शु० १३ स उद्धव गोसावी यांजबरोबर समर्थांनीं उभयतां मुलांस श्लोकबद्ध पत्र[१५] पाठविलें. पुढें त्याच वर्षीं प्रतापगडचे देवीस आईनें पुत्र व्हावा म्हणून केलेला नवस फेडण्याकरितां समर्थ गेले तेव्हां देवीचे मस्तकीं सोन्याचें फूल वाहून त्यांनीं देवीवर अनुष्टुभ् छंदांत स्तोत्र[१६] रचिलें. नंतर शिवाजीमहाराजांचे आग्रहावरून समर्थ मुलांसह प्रतापगडास जाऊन परत आले. त्याच वर्षीं चैत्र व० १४ सह ३० स वेणूबाई[१७] परलोकीं गेली व उद्धव गोसावी उभयतां मुलांस जांबेस पोंचवून माघ व० १ स परत आले. त्याच वर्षीं शिवाजीमहाराजांनीं ३३ गांव इनाम, कांहीं गांवीं जमीन, व १२१ खंडी गल्ला इतकी नेमणूक चांफळ संस्थानाकडे करून दिली. पुढें शा० श० १६०१ त समर्थ तंजावर प्रांतीं व्यंकोजी राजे यांचे आमंत्रणावरून गेले तेव्हां अरणीकर कारागिरास श्रीराम, लक्ष्मण, सीता, व मारुती अशा चार मूर्ति उत्तम करण्याविषयीं त्यांनीं सांगितलें. नंतर तिकडून परत आल्यावर डोमगांवीं[१८] मठ करून त्यांत कल्याण गोसावी यांची स्थापना स्वामींनीं केली. पुढें शा० श० १६०२ रौद्रनामसंवत्सरीं चैत्र शु० १५ रविवारीं शिवाजीमहाराज परलोकीं गेले. नंतर संभाजी राजे अविचारानें वागूं लागले हें पाहून समर्थांनीं त्यांस शा० श० १६०३ या वर्षीं एक बोधपर ओवीबद्ध पत्र[१९] लिहिलें. त्याच वर्षीं माघ व० ५ स चंदावराहून मूर्ति आल्या. नंतर व० ९ मंदवारीं समर्थ परलोकीं गेले. आपल्या पश्चात् श्रेष्ठांच्या मुलांस अधिष्ठानीं स्थापावें अशी आका व उद्धव यांस पूर्वींच आज्ञा स्वामींनीं केली होती. स्वामींच्या देहाचें बिल्वकाष्ठें व तुलसीकाष्ठें यांचे योगानें शिष्यांनीं दहन केलें.

स्वामींनीं शहापूर, मसूर, चांफळ, उंब्रज, माजगांव, शिराळें, पाडळें, पारगांव,

---

१५. ठाणें येथें सूर्योदय छापखान्यांत सन १८७१ त छापलेलें चरित्र पृ० ३२३ पहा.

१६. कित्ता पृष्ठ ३३६–३३७ पहा.

१७. ह्या बाईच्या निवृत्ति रामनामक ओवीबद्ध ग्रंथाचा कांहीं अंश आमचेकडे छापण्याकरितां आला आहे.

१८. हें गांव सोलापूर जिल्ह्यांत सीनानदीचे कांठीं आहे.

१९. ठाणें येथें सूर्योदय छापखान्यांत सन १८७१ त छापलेलें चरित्र पृष्ठ ३४८–३४९ पहा.

शिंगणवाडी, व बाहें या ठिकाणीं अकरा मारुतींची स्थापना करून त्यांनवर भीमरूपी स्तोत्रें[२०] रचिलीं.

१ दासबोध, २ श्लोकबद्ध रामायण, ३ मनोबोध, ४ सगुणध्यान, ५ निर्गुणध्यान, ६ मानसपूजा, ७ एकवीस समासी, ८ आत्माराम, ९ पूर्वारंभ १० जुनाट पुरुष, ११ गोसावी, १२ करुणाष्टकें, १३ षड्रिपु, १४ अंतर्भाव, १५ भीमरूपी स्तोत्रें, १६ पंचमाने, १७ सप्तपंचचतुः १८ अभंग-१९ पंचसमासी, २० कौल इत्यादि ग्रंथें स्वामींनीं केलें. त्यांपैकीं पहिले दोन मोठे आहेत. दासबोध ग्रंथ स्वामींनीं गतकलि वर्ष ४७६० म्ह० शा० श० १५८१ या वर्षीं केला, याविषयीं त्याच ग्रंथांत पुढील वचन आहे:—

चार सहस्र सातशें साठी, इतुकी कलियुगाची रहाटी ।
उरल्या कलियुगाची गोष्टी, ऐशी असे ॥ ७ ॥
चारी लक्ष सत्तावीस सहस्र, दोनशें चाळीस संवत्सर ।
पुढें पुढें अन्योन्य वर्णसंकर, होणार आहे ॥ ८ ॥

दशक ६ समास ४.

रामायणाचीं जितकीं कांडें आम्हांस मिळालीं तितकीं या पुस्तकांत छापिलीं आहेत. बाकीचीं मिळाल्यास छापूं. आत्माराम ग्रंथ स्वामींनीं दासबोधानंतर केला असा त्याच ग्रंथांत एका ठिकाणीं उल्लेख आहे:—

दासबोधींचे समासीं, निर्मूल केलें मीपणासी ।
त्या निरूपणें वृत्तीसी, पालट दिसेना ॥ २० ॥

आत्माराम समास १.

स्वामींच्या शिष्यवर्गांत अक्का, वेणू, बहिणाबाई व सतीबाई या स्त्रिया प्रसिद्ध आहेत. तत्कालीन कुटिल लोक या स्त्रिया बरोबर ठेविल्यामुळें स्वामींस क्वचित् दूषण देत. परंतु एकंदरीनें पहातां त्यांचें साधुत्व ढळल्याचें ऐकिवांत नाहीं.

स्वामींनीं अनेक अद्भुत चमत्कार केले असें त्यांच्या चरित्राच्या छापील बखरींत आढळतें. ते हल्लींच्या पिढीस सत्य वाटणारे नाहींत. तथापि येथें कांहीं चमत्कारांची एक यादी मासल्याकरितां देतों.:—

१. दशपुत्री बाईचा नवरा जिवंत केला. २. काशी येथील विश्वेश्वराचें लिंग कांहीं वेळ अदृश्य केलें. ३. पैठणांत मृत घार उठविली. ४. मातोश्रीचे गेलेले नेत्र सिद्धाईचे योगानें परत आणिले. ५. सती बाईस जाळीखालीं अन्नसामग्री

२०. ठाणें येथें सूर्योदय छापखान्यांत सन १८७१ छापलेलें चरित्र पृष्ट ७६ पहा.

२१. यांपैकीं दासबोध ग्रंथ वेगळा छापून प्रसिद्ध झालेला आहे. आणि ७, १३, १६, १७, खेरीज बाकीचे नित्यनैमित्तिक विधिसंग्रह सोपान नामक शा० श० १८०१ त ज्ञानप्रकाशांत छापलेल्या पुस्तकांत छापिले आहेत.

दाखविली. ६. अंबाजी ऊर्फ कल्याण हा विहिरींत पडला असतां त्यास वांचविलें ७. अंगापूरच्या रानांतल्या मूर्ति नेण्यास लोकांनीं हरकत केल्यामुळें त्या अति जड केल्या. ८. शिवाजी महाराजांस स्वप्नांत खराखुरा नारळ दिला शा० श० १५७१. ९. तुऱ्याच्या मोगरीच्या कळ्यांचीं मोत्यें केलीं. १०. शिवाजीमहाराजांच्या २००० सैन्यास सिद्धाईच्या बळानें जेऊं घातलें. ११. पंढरीची अयोध्या केली. १२. कुबडीनें पाण्याचा झरा उत्पन्न केला. १३. कल्याणा करितां कित्ता घळींत उत्पन्न केला. १४. स्वामींस कोप आल्यामुळें पाडळीस आग लागली. १५. तो शांत होतांच ती विझाली. १६. मातापूर येथें ब्राह्मणांस दत्ताचें साक्षात् दर्शन करविलें. १७. इंदुरास पर्जन्य वृष्टि पाडली. १८. तंजावर येथें वीर्य पात्रांत सोडिलें व परत घेतलें. १९. मिरजेच्या किल्याचे बारीक जंगींतून गेले. २०. आंगांतलें हींव छाटींत ठेवलें. २१. अंत्यजास ब्राह्मण बनवून त्याजकडून सदाशिवशास्त्र्याचा गर्व परिहार केला. २२. राजापूरकर मुंजे यांस समुद्रांत वांचविलें. २३. ब्राह्मणांस दक्षिणा दगड दिले होते त्यांचें सोनें केलें. २४. पाण्यानें भरलेल्या घागरींत तूप उत्पन्न केलें. २५. अरणी येथील अंध कारागिरास डोळे दिले.

स्वामींच्या चरित्रांच्या दोन गद्य बखरी आमच्या पहाण्यांत आल्या आहेत. त्यांपैकीं एक गणपतकृष्णाजीचे छापखान्यांत शा० श० १७९२ त छापलेली आहे व दुसरी सन १८७१ त ठाणें येथें सूर्योदयांत छापलेली आहे. या खेरीज संतविजयाचे पहिले २५ अध्यायांत ताहराबादकर कवि महीपति यानें स्वामींचें ओवीबद्ध चरित्र सविस्तर लिहिलें आहे. तसेंच भक्तविजयाच्या ४७ व्या अध्यायांत संक्षेपानें महीपतीनें स्वामींचें चरित्र लिहिलें आहे. मोरोपंत पराडकर यांनींही रामदासगुणवर्णन ह्मणून एक आर्याबद्ध प्रकरण लहानसें लिहिलें आहे तें माधवचंद्रोबाचे सर्व संग्रहांत छापलेलें आहे. विठोबा अण्णा कऱ्हाडकर यांनींही सुश्लोक लाघवांत ३३२ श्लोकापासून ३५२ श्लोकापर्यंत स्वामींचें संस्कृत भाषेंत सुरस चरित्र लिहिलें आहे, तेंही या काव्येतिहास संग्रहांत प्रसिद्ध झालेंच आहे. आम्ही वर जें चरित्र लिहिलें आहे तें ठाणें येथें छापलेल्या विस्तृत बखरीच्या आधारें मुख्यत्वें करून लिहिलें आहे. * अनंतकवीनें रामदासस्तुतीवर साहा श्लोक केले आहेत ते अजून पर्यंत कोठें छापून प्रसिद्ध न झाल्यामुळें येथें देतों:—

## रामदासस्तुति.

निर्माणस्थळ गौतमी परि महा कृष्णातिरीं जो वसे ।

---

* मिलंगाबादेस अनंत गोसावी या नांवानें प्रसिद्ध असा रामदासस्वामींचा शिष्य स्वामींचे आज्ञेवरून मठ बांधून रहात असे. याविषयीं अशी आख्यायिका आहे कीं, त्या

कांतासंग नसे प्रपंच हि नसे आशा दुराशा नसे ॥
ज्याला उत्तम रामदास म्हणती त्रैलोक्य वंदीतसे ।
ऐसा सद्गुरू हा अनंतकविचा बद्धास तारीतसे ॥ १ ॥
वस्त्रें हुर्मुजि भर्जरी पट कुळें मार्था चिरा ही असे ।
काया सुंदर गौर वर्ण विलसे भाळीं अवाळू असे ॥
स्वामींची कविता समुद्र अवघा कल्याण लीहीतसे ।
ऐसा सद्गुरू हा अनंतकविचा बद्धास तारीतसे ॥ २ ॥
ज्याची पूर्ण समाधि सज्जनगडीं गुप्त प्रकारें असे ।
पादूकांवरि शेष शोभत असे दोन्हींकडे आरसे ॥
ज्याची पुण्यतिथी सुदीन नवमी उत्साह होतो असे ।
ऐसा सद्गुरू हा अनंतकविचा बद्धास तारीतसे ॥ ३ ॥
जेणें सात्विकराजसादि हि तिन्ही आत्मस्थिती आटले ।
ॐकारादि करूनि अष्ट दे ह वीदेहें निराकर्णिले ॥
विज्ञानी भवसिंधुपार तरले जिंकोनि साही धरा ।
ऐसा सद्गुरू हा अनंतकविचा बद्धास तारीतसे ॥ ४ ॥
ज्याची गाढ उपासना जरि असे जाणे अयोध्यापती ।
नेणे त्याहुनि अन्य दैवत असे ऐशी जयाची स्थिती ॥
ज्याचा गुप्त विचार ही परि असे नारीनरां लेंकुरां ।
ऐसा सद्गुरू हा अनंतकविचा बद्धास तारीतसे ॥ ५ ॥
सह्याद्रीगिरिचा विभाग विलसे मंदारशृंगापरी ।
नामें सज्जन जो नृपें वसविला उर्वाशियेचे † तिरीं ॥
आयोध्याधिपती कपी भगवती हे देव ज्याचे शिरीं ।
तेथें जागृत रामदास विलसे जो या जना उद्धरी ॥ ६ ॥

---

गांवीं कोणी गोविंद भट नांवाचा गृहस्थ आपल्या कनिष्ट बंधूचे विधवे बरोबर रत झाला तेणेंकरून तीस गर्भ राहिला. ही वार्ता गांवांत कळतांच ग्रामाधिकाऱ्यानें गोविंदभटास बोलावून विचारिलें. परंतु गोविंदभटानें त्या अधिकाऱ्यास कांहीं लांच देऊन हें कृत्य अनंत गोसाव्यावर घातलें व त्यास धरून सुळावर देण्यास नेऊं लागले तेव्हां त्यानें स्वामींचें चिंतन करतांच तेथें एक वानर उत्पन्न होऊन त्यानें शिपायांस व अधिकाऱ्यांस मार दिला. नंतर स्वामी प्रकट होऊन स्वामींनीं सर्व वृत्तांत ऐकून घेतला व त्या बाईस विचारिलें कीं, तुला गर्भ कोणाचा राहिला ? तेव्हां ती उगी राहिली व खालीं पाहूं लागली, तेव्हां स्वामी बोलले कीं, जर तूं बोलत नाहींस तर आम्हीं गर्भास विचारूं. नंतर गर्भास प्रश्न केला तेव्हां त्या गर्भानें खरा वृत्तांत कळविला त्यावरून अनंत गोसाव्याची सुटका झाली व स्वामी तेथें अदृश्य होऊन टाकळीस गेले. कदाचित् तो हा अनंत कवि असावा. † हिला उरमोडी नदी म्हणतात.

## वंशावळ.

कृष्णाजीपंत ठोंसर

केसोपंत | राघोपंत | हरिपंत | आत्मारामपंत | दशरथपंत ऊर्फ दासोपंत

दशरथपंत ऊर्फ दासोपंत:

रामाजीपंत | लक्ष्मणपंत | भरतपंत | शत्रुघ्नपंत | हनुमंतपंत | वासुदेवपंत ऊ॰ व्यास.

रामाजीपंत
|
हरिपंत
|
निराजीपंत ऊर्फ निरंजनपंत
|
शिवाजीपंत
|
विष्णुपंत
|
बाबाजीपंत ऊर्फ ब्रह्माजीपंत
|
गणेशपंत
|
धोंडोपंत
|
आत्मारामपंत ऊ॰ आलक्षपंत
|
गुंडोपंत
|
निराजीपंत
|
आत्मारामपंत
|
शिवाजीपंत
|
विष्णुपंत
|
केसोपंत
|
रामाजीपंत
|
भानजीपंत
|
सूर्याजीपंत

त्रिंबकपंत

सूर्याजीपंत × राणूबाई

- गंगाधरपंत × पार्वतीबाई ( १५२७–१५९९ )
  - रामचंद्र ( १५८७–१६३१ )
    - गंगाधर मृ० १६५६
      - कन्या
    - श्यामजी मृ० १६८४
      - लक्ष्मण मृ० १७०५
        - हनुमंतस्वामी ज० १६९०
      - रामचंद्र आबा मृ० १६९३
  - श्यामजी ( १५८९–१६१५ )
- नारायण ऊ० रामदास १५३०–१६०३ )

वरील चरित्रांत ज्या मुख्य गोष्टी व पुरुष यांचा उल्लेख आला आहे त्यांचे शकः—

शा० श० ८८४ कृष्णाजीपंत ठोसर हिवऱ्यास आले.
„ „ ९१० दशरथपंत ठोसर जांबेस गेले.
„ „ १५२७ गंगाधर ऊर्फ श्रेष्ठ ( रामीरामदास ) यांचें जन्म.
„ „ १५३० नारायण ऊर्फ समर्थ यांचें जन्म.
„ „ १५३७ सूर्याजीपंतमरण.
„ „ १५४२ समर्थलग्नविच्छेद.
„ „ १५४९ शिवाजीमहाराजजन्म.
„ „ १५५४ तीर्थयात्रागमन.
„ „ १५६६ कृष्णातीरीं गमन.
„ „ १५७० चांफळ येथील उत्सवास आरंभ.
„ „ १५७१ शिवाजीमहाराजांस उपदेश.
„ „ „ पंढरीस गमन.
„ „ „ तुकाराममरण.
„ „ १५७७ रामेश्वरीं गमन.
„ „ १५७७ राणूबाईमरण कार्तिक शु० १

शा० श० १५८१ दासबोधसमाप्ति.
" " १५९४ जयरामस्वामीमरण भाद्रपद व० ११
" " १५९५ वामनपंडितमरण वैशाख शु० ६.
" " १५९६ शिवाजीमहाराजराज्याभिषेक ज्येष्ठ शु० १३.
" " १५९९ श्रेष्ठनिर्याण फाल्गुन व० १३
" " १६०० वेणूबाईमरण चैत्र व० १४।३०
" " १६०१ डोमगावीं कल्याणगोसावीस्थापन.
" " १६०२ शिवाजीमहाराजमरण चैत्र शु० १५
" " १६०३ संभाजीमहाराजांस पत्र पौष.
" " " दासनिर्याण माघ व० ९
" " १६०६ रंगनाथ निर्याण मार्गशीर्ष वद्य १०.
" " १६०६ रंगनाथाग्रजयादवरावमरण पौष शु० १५.
" " १६०८ रंगनाथानुजविठ्ठलआत्यामरण कार्तिक शु० १४
" " " आनंदमूर्तिमरण कार्तिक शु० १४.
" " १६१० संभाजीमहाराजमरण.
" " १६३२ गंगाधरस्वामी यांचें सज्जनगडीं आगमन.
" " १६३२ उद्धवगोसावीमरण फाल्गुन व० १.
" " १६४० गंगाधर स्वामींनीं सज्जनगडीं समर्थांचें चरित्र शिष्यमंडळीस सांगितलें ज्येष्ठ शु० ५.
" " १६४३ आकाबाईमरण कार्तिक शु० १.
" " १६५६ गंगाधरस्वामीमरण मार्गशीर्ष शु० १२.
" " १६८२ जांबेच्या मूर्ति ( रामादिकांच्या ) नष्ट झाल्या मार्गशीर्ष शु० ८.
" " १७१५ हनुमंत स्वामींनीं सज्जनगडीं समर्थांचें चरित्र शिष्यांस सांगितलें.

समाप्त.

॥ श्री ॥

# रामदासस्वामीकृत,

## सुंदरकांड. *

नमूं सर्वकर्त्ता चि तो विश्वभर्ता । गुणी शोकहर्ता चि हर्ता विर्वर्ता ॥
परेहूंनि पर्ता चि पर्त्ता विवर्त्ता । भुतें भूतधर्ता चि धर्ता उधर्त्ता ॥ १ ॥
महीमंडळींचे कपी रीसँराजे । तयांमध्यभागीं महावीर साजे ॥
महारुद्र आज्ञेप्रमाणें निघाला । सितौशुद्धि आणावया सिद्ध जाला ॥ २ ॥
सवें मंडळी चालिल्या वानरांच्या । नभोमंडळामाजि फौजा विरांच्या ॥
गिरीकंदरें देश नाना परीचे । तटाकें नद्या ओघ जाती नदींचे ॥ ३ ॥
पुरें पट्टणें अट्टणें धुंडिताती । कपी वीर दाही दिशा हिंडताती ॥
सिता शोधितां शुद्धि कोठें न लागे । बळें धुंडितां ते विरे वीरु भागे ॥ ४ ॥
वनें भूवनें रम्य नाना परीचीं । बरीं शोधिलीं तीं गिरीकंदरींचीं ॥
दरे शृंग पौठार मैदान दौरी । कपाटें गव्या वीवरें तीं भुयेरीं ॥ ५ ॥
कपी शोधितां शोधितां सुस्त जाले । नव्हे कार्य तैं दैन्यवाणे मिळाले ॥
समुद्रातिरीं ते उदासीन जाती । गळाल्या तनू थोर उद्वेगँ चित्तीं ॥ ६ ॥
कपी बोलती काय आतां करावें । न लागे सिताशुद्धि तेव्हां मरावें ॥
म्हणे मारुती वीर हो स्थीर बैसा । तिन्ही लोक पाहून येतों तमासा ॥ ७ ॥
भयासूर तो भीम सिंधू उडाला । त्रिकूटाचळाहून पैलाड गेला ॥
पुढें सर्व ही पाणजंजाळ पाहे । हनूमंत विस्मीत होऊनि राहे ॥ ८ ॥
समुद्रा मधें भेटला तो अतीतू । म्हणे रे अरे रे अरे कोण रे तूं ॥
हनूमंत घाली नमस्कार त्याला । मनामाजि तो थोर संतुष्ट जाला ॥ ९ ॥
मुनी तो त्रिकूटाचळीं शुद्धि सांगे । किंराणें उडे तो कपी वीर मागें ॥
अकल्पीत लंकापुरी कांचनाची । पुढें देखिली सौख्यदाती मनाची ॥ १० ॥

---

* ह्या कांडाच्या दोन प्रती आह्मांस मिळाल्या. एक रा० कृष्णाजीपंत कालगांवकर, मु० सातारा, यांजकडून व दुसरी रा० एकनाथ महादेव पुराणीक मु० पुणें, यांजकडून. दोन्ही बऱ्याच शुद्ध आहेत. दोहींत फरक दिसेल तो पुढें देऊं.

या कांडांत मारुती लंकेंत जाऊन, सीतेचा शोध लावून, नंतर लंकेची होळी करून परत रामाला सीताशुद्धि सांगण्यास येईपर्यंत कथा आहे.

१ विवर्त=भोंवरा. २ परा=वाणीची एक जाती. (परा, पश्यंती, मध्यमा, व वैखरी ह्या चोहांतून पहिली). ३ रीस=आस्वल (ऋक्ष). ४ सिताशुद्धि=सीता कोठें आहे ह्या विषयीं तपास. ५ पाठार=पर्वताच्या माथ्यावरचें मैदान ज्याला इंग्रजींत *Platean* अथवा Table-land ह्मणतात तो. ६ दारी 'दरी' करितां? ७ उद्वेग=दुःख. ८ किराणें=उड्डाणें.

गुढ्या गोपुरें देउळें तीं अपारें । हुंडे[९] कोठ जाळांधरें थोरथोरें ॥
सुवर्णाचळामाजि तें तेज फांके । तया पाहतां कीरणीं दृष्टि झांके ॥ ११ ॥
कपाटें लोंहो अँर्गळा[१०] पंथ मोठे । बळी बैसले थोर आश्चर्य वाटे ॥
बहूसाल वाद्यें दडाडां धडाडां । खुसी हाल आवाज होती भडाडां ॥ १२ ॥
पुढें पाहतां जावया रीग नाहीं । न सूचे मनीं मानसीं यत्न कांहीं ॥
पुढें भीम तो अंतराळें उडाला । लघूरूप लंकेंत होऊनि गेला ॥ १३ ॥
गृहां गोपुरांचा बहू दाट खेटा । सदां सर्वदां वाहती सर्व वाटा ॥
बिदी[११] हाट[१२] बाजार कुंचे दुकानें । सदां मस्त ते हस्ति जाती गुमानें ॥ १४ ॥
सिलेभार सज्जीत ते राउतांचे । बरे फार संगीत होती बिरांचे ॥
दिसेना तयालागि झुंजार कोणी । बळें जिंकिले पीडिले लोक तीन्ही ॥ १५ ॥
बहू सज्ज तें राज्य लंकापुरीचें । पुरीमाजि तें सैन्य मोठ्या बळाचें ॥
उफाळें चि जाती भुजा फुर्फुरीती । तयां देखतां देव ते थर्थरीती ॥ १६ ॥
त्रिकूटाचळीं* ख्याति केली भिमानें । लघूरूप तो हिंडताहे धिरानें ॥
गृहें गोपुरें पाहिल्या धर्मशाळा । अकस्मात त्या देखिल्या बंदिशाळा ॥ १७ ॥
हिनासारिखे देव ते दीन झाले । नसे शक्ति ना युक्ति पोटीं गळाले ॥
भयाभीत ते कांपती दीनवाणे । बहू गांजिले दुःख तें कोण जाणें ॥ १८ ॥
सुरांकारणें कोप भीमासि आला । मनामाजि आवेश तो थर्थरीला ॥
रुपें भर्भरीला तसें गर्गरीला । प्रसंगीं तये मारुती गुप्त जाला ॥ १९ ॥
मनामाजि आवांकिलें सर्व कांहीं । सिमा सांडिली तूळणा त्यासि नाहीं ॥
बहू मातले गर्व मोठ्या बळाचा । तयां झोडितों दास मी राघवाचा ॥ २० ॥
त्रिकूटाचळीं ख्याति केली भिमानें । पुढें पात्रिका धाडिली ब्रह्मयानें ॥
तिये§ वाचितां वाचितां राम हांसे । क्रिडाकौतुकें अंतरामाजि तोषे ॥ २१ ॥
नटे नाटकू त्रीकुटामाजि कैसा । महा कांड सुंदर्य जाला तमासा ॥
देहे आपुलें सर्व ही गुप्त केलें । प्रसंगीं तयें पुच्छ तें वाढवीलें ॥ २२ ॥
बहू व्यापिली वेढिली सर्व लंका । कितेका मनीं वाटली थोर शंका ॥
गृहांतूनि अंतर्गृहीं पुच्छ घाली । बहू पाडितां फोडितां हांक जाली ॥ २३ ॥
बळें लांगुळें[१३] रुंधिल्या सर्व वाटा । बहू तुंबला लोक तो दाट खेटा ॥
तयाभोंवतें पुच्छ बांधोनि भारे । नभी पोकळीमाजि नेटें उभारे ॥ २४ ॥
बहू भार ते स्वार मध्यें चि खंडी । महामस्त ते हस्ति नेटें उलंडी ॥

---

९ हुडे=बुरूज. १० अर्गळा=अडसर, खिळी ११ बिदी=रस्ते, गल्ल्या. १२ हाट=बाजार
* 'त्रिकूटाचळा मारुती सर्व पाहे। लघूरूप होवोनियां हिंडताहे ' पाठभेद. § 'तया ' असा मूळांत पाठ आहे. १३ लांगुळें=शेंपटें.

गुरें शाँकटें राक्षसालागिं पाडी । पदीं पुच्छ बांधोनि पाडी पछाडी ॥ २५ ॥
पडों लागले दैत्य नेटें बदांदा । कितीएक ते दीर्घदेही भदादां ॥
बळाचीं दळें पाडिलीं पुच्छमारें । दिसेना परी गर्जतो भूभुकारें ॥ २६ ॥
धरी पंथ कोण्हास ही जाउं देना । पुरींमाजि पाणी कदां येउं देना ॥
चुली पेटल्या वन्हि तेथें विदारी । बळी धांवती त्यांसि तेथेंच मारी ॥ २७ ॥
गळे पाय बांधी किती हात बांधे । पुरीमाजि हांकेस ते हांक सांदे ॥
महावीर चौताळले तें धरेना । बळें वावरे पुच्छ तें आवरेना ॥ २८ ॥
जना ओढितां पाडितां आपटीतां । समस्ता जना लागिं पाडूनि जातां *॥
पशूराक्षसीं सर्व ही हाक केली । कितीएक तीं चीर्डचिर्डोनि मेलीं ॥ २९ ॥
कितीएक तीं राक्षसें हाकलीती । कितीएक तीं राक्षसें बोंबलीती ॥
कितीएक तीं थोर जालीं रुदंतीं । कितीएक तीं राक्षसें चर्फडीतीं ॥ ३० ॥
असंभाव्य † तें पुच्छ झाडी § उलंडी । कडाफोडि होतां चि येतां चि झोडी ॥
पुरीमाजि सर्वांस ही आट केला । विरें वीर राक्षेस सर्वें बुडाला ॥ ३१ ॥
नसे अन्नपाणी मुखामाजी घाणी । कितीएक ते जाहले दैन्यवाणी ॥
पुरीमाजि नानापरि ‡ घोळ केला । पुढें अस्तमानासि तो दीन गेला ॥ ३२ ॥
उदासें घरें मंदिरें थोरथोरें । महापुच्छ तें वावरे अंधकारें ॥
भुजंगापरी सर्व वेंटाळिताहे । विरें वीर चाकाटला सर्व पाहे ॥ ३३ ॥
मुलां लेंकुरां माजि तें खेळताहे । निजेल्यांमधें पुच्छ तें लोळताहे ॥
कुमारी कुमारा गळां हार घाली । भयाभीत अंतःपुरीं हांक जाली ॥ ३४ ॥
त्रिकूटाचळीं सर्व ऊदंड आले । भयाभीत ते सर्व ही लोक जाले ॥
कळेना बरें सर्पकीं काय आहे । करी तें महामार त्याचा न साहे ॥ ३५ ॥
अकस्मात तें काय होतें कळेना । कळेना वळेना कदां आकळेना ॥
सभेमाजि रायापुढें हाक गेली । अहो पाहतां काय लंका बुडाली ॥ ३६ ॥
उगा लोळसा घोळ मोठा करीतो । करारूनि बांधोनि सर्वां धरीतो ॥
बहूतां परी सांगती रावणाला । बहूतांजणांचा घरीं कोंड झाला ॥ ३७ ॥
नव्हे जी नव्हे सर्व सामान्य मातू । महाघोर हा थोरला पुच्छकेतू[१५] ॥
सभामंडपीं कोप रायासि आला । म्हणे सांगती त्यांस मारून घाला ॥ ३८ ॥
तया मारितां पुच्छ तेथें चि आलें । सभामंडपामाजि नेटें निघालें ॥
दिवे पाडिले दीवटे आपटीले । अकस्मात हीलाल हीरोनि नेले ॥ ३९ ॥
मुखें बोलती दीप रे दीप आणा । दिवे आणितां मूकती दैत्य प्राणां ॥

१४ शाकटें=गाडया, छकडे. * "नेतां" असाही पाठ आहे. † "असंख्यात" असाही पाठ आहे. § "सोडी" पाठभेद. ‡ "घात" पाठभेद. १५ केतू=धूमकेतु, उत्पात.

असंभाव्य त्या दीवट्या दीपथावे । बळें लागवेगें समूदाय धांवे ॥ ४० ॥
पुन्हा मागुती दीप घेऊनि आले । बळें धांवतां पुच्छमारें विझाले ॥
तया लांगुळें रुंधिलीं सर्व दारें । कपी वीर तो वावरे अंधकारें ॥ ४१ ॥
सभामंडपीं गुद्गुल्या तो करीतो । मुखें नासिकें कर्ण छेदून नेतो ॥
बळें गाल सर्वांग ही वर्बडीतो । [१६]चिरें *फाडितो ओढितो गुर्गुरीतो ॥ ४२ ॥
बळाचे महावीर तेथें मिळाले । परी अंधकारें चि कांहीं न चाले ॥
किती लोटिले कूटिले चूर केले । भयाभीत कोणास कोणी न बोले ॥ ४३ ॥
कपी वीर तो थोर लहान होतो । धरीतां बळें हात मोडोनि जातो ॥
बुक्या मारितो पांपरा वज्रथापा । असंभाव्य तो कोपला राव कोपा ॥ ४४ ॥
म्हणे वीर हो काय रे काय झालें । कळेना मुखें बोलती काय आलें ॥
भयासूर तें गुर्गुरीतें कळेना । करूं काय आम्हांसि तें +आकळेना ॥ ४५ ॥
कपी वीर रायाकडे शीघ्र गेला । बळें थाप मारून मूगूट नेला ॥
बरे ठोंसरे मारिले रावणाला । म्हणे मारितों रे तुझ्या [१७]आखयाला ॥ ४६ ॥
चिरें सुंदरें फाडिलीं रावणाचीं । करी भूषणें चूर मुक्ताफळांचीं ॥
कपीनें सभा सर्व ही नग्न केली । त्रिकूटाचळीं ख्याति ऊदंड जाली ॥ ४७ ॥
हॉहाकार जाला सभेमाजि मोठा । बळें मारुती मारिताहे चपेटा ॥
सभामंडपीं फार आकांत झाला । कपीनें पुढें मोकळा मार्ग केला ॥ ४८ ॥
लपाला कपी पुच्छ ओढूनि नेलें । लघू मश्यकाचे परी रूप केलें ॥
असंभाव्य त्या दीवट्या चंद्रज्योती । असंख्यात राक्षेस धांवूनि येती ॥ ४९ ॥
सभामंडपामाजि धांवोनि आले । तेणें नागवे लोक लज्जीत जाले ॥
महावीर मागें पुढें हात देती । कपीनें बहूसाळ केली फजीती ॥ ५० ॥
सभामंडपीं वस्त्र कोठें दिसेना । भुतासारिखे नागवे लोक नाना ॥
चिरें आणिलीं नेसले स्वस्थ झाले । मनामाजि लज्जीत कोणी न बोले ॥ ५१ ॥
कपीवीर तेथूनि वेगें उडाला । अशोकावनामाजि वृक्षीं दडाला ॥
अधोमूख तो जानकीलागिं पाहे । कपी राममुद्रा पुढें टाकिताहे ॥ ५२ ॥
सितेनें पुढें मुद्रिका ओळखीली । बहूतां परी शब्द कारुण्य बोली ॥
पुढें मारुती भेटला जानकीला । समाचार सांगोनि आनंद केला ॥ ५३ ॥
क्षुधाक्रांत मी जाहलों फार माते । तनू चालतां चांचरी सर्व जाते ॥
बहूतांपरी बोलिला जानकीला । समाचार † सांगोनि आनंद केला ॥ ५४ ॥
अशोकीं बहू लागले वृक्षनाना । पाहतां असंख्यात संख्या असेना ॥

---

१६ चिरें=वस्त्रें. * "फेडितो" पाठभेद. + "आवरेना" पाठभेद. १७ आखया=रावणपुत्र "अक्ष". † "निरोपचि आज्ञेप्रमाणें निघाला" पाठभेद.

नव्हाटें जुनाटें वनें दाट थाटें । वनें मोडिता जाहला कडूकडाटें ॥ ५५ ॥
फळें भक्षिलीं सर्व नाना परीचीं । बहू स्वाद वर्णू कळाकूसरीचीं ॥
कपी वीर तो तृप्त जाला निवाला । पुढें वृक्ष मोडावया सिद्ध जाला ॥ ५६ ॥
तरू मोडिले पाडिले ऊपटीले । किती झोडिले झाडिले चूर केले ॥
गिरी सारिखे ढीग सांडूनि टाकी । तयाला असंभाव्य राक्षेस हांकी ॥ ५७ ॥
वनें मोडितां मोडितां हांक जाली । कितीएक ते दैत्य[18]मांदी मिळाली ॥
गलोली[19] कमाना[20] करीं भिंडमाळा । बळें हांकितां नाद गेला भुगोळा ॥ ५८ ॥
बहूता बळाचे बहू लोक आले । कितीएक ते धिंग मोठे मिळाले ॥
वनें वेढिलीं धांवले काळ जैसे । भुतां खेचरां[21] थोर कल्पांत भासे ॥ ५९ ॥
कपी वीर चौताळला वेग केला । कितीएक राक्षेस भंगोनि गेला ॥
त्रिकूटाचळीं रावणा जाणवीलें । वनीं वानरें थोर अद्भूत केलें ॥ ६० ॥
बळें धांविला कूमरू रावणाचा । सदां अक्षयी वीर मोठ्या बळाचा ॥
असंभाव्य राक्षेस धांवोनि आले । कपीलागिं मारावया सिद्ध जाले ॥ ६१ ॥
बळें आगळा आखया लक्षे[22] भेदी । चुकावी कपी वीर लागों च नेदी ॥
बहू भागले मारितां भग्न जाले । कितीएक ते दैत्य पोटीं गळाले ॥ ६२ ॥
पहा हो कपी धीट मोठा पळेना । सदां सर्वदां लक्षे[22] याचें चळेना ॥
पुन्हा मागुते वीर ते सिद्ध जाले । कितीएक ते पाश घेऊनि आले ॥ ६३ ॥
मुखें बोलती मर्कटा बैसलेंसी । समारंगणामाजि युद्धा न येसी ॥
कपी वीर तो गर्जला भूभुकारें । समारंगणीं चालिला घोर मारें ॥ ६४ ॥
रिपू झोडिले पाडिले वृक्षघातें । भुमी लोळती दैत्य होऊनि प्रेतें ॥
पुढें देखिलें जंबुमाळ्या कुटीला । बळें आखया आपटीला पिटीला ॥ ६५ ॥
पळाले फळी फूटली राक्षसांची । पुढें हाक गेली तया आखयाची ॥
त्रिकूटाचळीं शोकआरंभ जाला । प्रितीचा बहू आखया तो निमाला[23] ॥ ६६ ॥
पुरीमाजि अंतःपुरीं घोष जाले । सुखानंद मंदोनि गेले विझाले ॥
बहू दुःख जालें च मंदोदरीला । तिनें कूमरालागिं आकांत केला ॥ ६७ ॥
पुसे रावणू काय रे काय झालें । तुम्हालागिं मारावया कोण आलें ॥
कपी येकला बैसला तो पळेना । चळेना ढळेना कदा आकळेना ॥ ६८ ॥
तया टाकितां पाश मोठा चि होतो । लघूरूप होऊनि नीघूनि जातो ॥
कदां ही पडेना कदां सांपडेना । तेणें मारिली दैत्य ऊदंड सेना ॥ ६९ ॥
विधीलागिं बोलाविलें रावणानें । कठीणोत्तरीं गांजिलें दुर्जनानें ॥

---

१८ मांदी=समुदाय. १९ गलोल=गोफण. २० कमान=धनुष्य. २१ खेचर=पक्षी.
२२ लक्ष=निशाण. २३ निमाला=मेला.

म्हणे जाइं रे आणि वेगें कपीला । तया नाणितां शीघ्र ताडीन तूला ॥ ७० ॥
विरंची[24] पुढें घातला चालवीला । असंभाव्य तो लोकमेळा मिळाला ॥
वनामाजि येतां नमस्कार घाली । तया मारुतीची बहू स्तूति केली ॥ ७१ ॥
बहूतांपरी कीर्तिचें येश घ्यावें । दयाळा कपी ये घडी शांत व्हावें ॥
न होतां मला मारिती ब्राह्मणाला । बहूसाल कल्याण व्हावें तुम्हांला ॥ ७२ ॥
कपी वीर तो थोर कोपें कडाडी । करी गर्जना मेघ जैसा गडाडी ॥
परी सांकडीमाजि[25] कांहीं न चाले । मिळाले कपीलागिं घेऊनि आले ॥ ७३ ॥
अरे मर्कटा थोर अन्याय केला । म्हणे रावणू मारितों शीघ्र तूला ॥
तुझा मृत्यु कोठें खरें सांग आतां । मुढा कश्मळा[26] मारितों जातजातां ॥ ७४ ॥
म्हणे मारुती काळ मारूं शकेना । कृपाळूपणें तोषला रामराणा ॥
न वाटे खरें सांगतां रावणाला । म्हणे वानरूलांगुळीं अग्नि घाला ॥ ७५ ॥
म्हणे रावणू पाहतां काय आतां । चिरें आणवा सांगताहे समस्तां ॥
असंभाव्य ते वीर धांवोनि गेले । त्रिकूटाचळीं लोक ते नग्न केले ॥ ७६ ॥
पुढें पुच्छ ओढोनि गुंडाळिताती । सिमा सांडली वीर गुंडाळितासी* ॥
तया वेढितां तें असंभाव्य लांबे । विरेंवीर त्या लांगुळालागिं झोंबे ॥ ७७ ॥
कितीएक तीं आणिलीं आज्य[27] तेलें । कितीएक तीं मोगरेलें फुलेलें ॥
महापुच्छ तें सर्व ही भीजविलें । पहा हो कपी बापुडें व्यर्थ मेलें ॥ ७८ ॥
तया लावितां वन्हि तेथें न लागे । बळें फुंकितां तो विरे वीरु भागे ॥
तया देखतां रावणू शीघ्र आला । बळें फुंकितां फुंकितां तो गळाला ॥ ७९ ॥
पुढें रावणू थोर कोपें कडाडी । बळें फुंकितां जाळ नेटें धडाडी ॥
जळालीं मुखें भस्मल्या खांड मीशा । बहू साल लंबीत होत्या विशेषा ॥ ८० ॥
बळें चेतला वन्हि नेटें तडाडी । कडाडीत ज्वाला दडाडी धडाडी ॥
कपी वीर तो वोंड[28] जाला उडाला । पुढें जाळिता जाहला त्रीकुटाला ॥ ८१ ॥
गृहां गोपुरांमाजि तें पुच्छ घाली । त्रिकूटाचळीं आगि नेटें निघाली ॥
बिदी हाट बाजार चौबार कुंचे । बळें बोंबली नागवा लोक नाचे ॥ ८२ ॥
बहूतां परीची बहू हांक जाली । पळारे पळारे पळा आगि आली ॥
गुरें वांसुरें शिंगरें लेंकरें तीं । शुनीं[29] मार्जरें तैं खरें[30] येसरें तीं ॥ ८३ ॥
किती शेरडें मेंढरें तीं अचाटें । पळालीं† किती राक्षसें वल्कलाटें‡ ॥
किती शाकटें कुंजरें दिव्य घोडे । मही मंडळीं त्यासिं नाहींत जोडे ॥ ८४ ॥

---

२४ विरंची=ब्रह्मा. २५ सांकडी=संकट. २६ कश्मल=पापी. * "वेंटाळिताती" पा० भे०. २७ आज्य=(शेळीचें) तूप, (अजा=शेळी). २८ वाड=पुष्कळ किंवा मोठा. २९ शुनीं=कुत्रीं. ३० खर=गाढव. † "जळालीं" पाठ भेद. ‡ 'कल्कलाटें' तर नव्हे ?

बहूतां परीचीं बहू रम्य यानें । बहूसाल छत्रें विचित्रें निशाणें ॥
बहूतां परीच्या बहू साल शाळा । जळाल्या विवीधा विचित्रा विशाळा ॥ ८५ ॥
बळे लोक तेथें बळें पुच्छ घाली । बहूतां विरांची बहू शांति जाली ॥
महा पुच्छ तें जाळ बंबाळ जाला । बहू साक्षपें वन्हि तो चेतवीला ॥ ८६ ॥
पळाले [31]भयासूर ते दरि थावे । कपी वीर लांगूळ घेऊनि धांवे ॥
बहू भोंवताहे बहू धांवताहे । उठे वन्हिचें चक्र लांगूळ पाहे ॥ ८७ ॥
फिरे गर्गराटें कपी चक्र जैसा । विधी[32] [33]शक्र अव्यग्र पाहे तमासा ॥
विरां खेचरां भूचरां अंत झाला । त्रिकूटाचळा थोर कल्पांत आला ॥ ८८ ॥
बहूसाल दारूमधें पुच्छ घाली । उसाळे नभामाजि दारू निघाली ॥
तडाडी थडाडी दडाडी धडाडी । शशी सूर्य नक्षत्रमाळा कडाडी ॥ ८९ ॥
बहू धूम्र तेणें कदां ही दिसेना । बहूसाळ वर्दाणि † ते सोसवेना ॥
बहू घोष तो शब्द कानीं पडेना । कपी रोषला झाडतां ही झडेना ॥ ९० ॥
पुढें धूम्रत्यागी धगागीत आगी । महावन्हि कोपें चि जाला विभागी ॥
त्रिकूटाचळू कांचनाचा तखाकी । सतेजकि तेजें झकाकी लखाकी ॥ ९१ ॥
महा वज्र लांगूळ कल्लोळ जाला । परी पाहतां रोम[34] नाहीं जळाला ॥
गदादीत काया समुद्रांत घाली ॥ निवाला कपी पुच्छज्वाळा विझाली ॥ ९२ ॥
समुद्रीं [35]शुचिष्मंत होऊनि आला ॥ नमस्कार घाली तये जानकीला ॥
म्हणे जानकी येकला तूं विदेशी[36] । कपी रे बहूतां परी कष्टलाशी ॥ ९३ ॥
म्हणे मारुती धन्य हे दीस आले । तुम्हां देखतां सर्वही कष्ट गेले ॥
प्रभू वाट पाहील तो रामराजा । [37]निरूपा चि मी शीघ्र जाईन काजा* ॥ ९४ ॥
सिते मारुती योग वीयोग जाला । बहूसाल नेत्रोदकीं पूर आला ॥
म्हणे ‡ मारुती लोभ आतां असावा । सुरांचा बळें राम येतो कुडावा ॥९५॥
कपी मागुती मागुती वाट पाहे । उदासीन जातां [38]गळीं दाटताहे ॥
विवेकें जिवामाजि तो धीर केला । पुढें मारुती शीघ्र सिंधू उडाला ॥ ९६ ॥
कपीलागीं सांगे सिताशुद्धि जाली । सुखें ऐकतां मंडळी ते निवाली ॥
समस्तां जणांलागीं आनंद जाला । कपी मारुती राम भेटी निघाला ॥ ९७ ॥
दळेंशीं बळें राहिला रामराजा । कपीरीस ते वीर वेष्टीत फौजा ॥
स्फुरद्रूप ऊभारिला दिव्य बाहो । रघुनायकें देखिला भीम देहो ॥ ९८ ॥

---

३१ भयासूर=भयंकर. ३२ विधी=ब्रह्मा. ३३ शक्र=इंद्र. † वर्दाणी=घाण. ३४ रोम=केंस. ३५ शुचिष्मंत=स्वच्छ. ३६ विदेश=परदेश. ३७ निरूपा=सांगा, आज्ञा द्या.
* “ वोजा ” पाठभेद. ‡ ‘ जननी ’ पाठभेद. ३८ ‘ग्रिवा’ पाठभेद

कपी लागवेगें मुखें बोलताहे । अशोकीं ३९जगन्मात कल्याण आहे ॥
पुढें मारुती तो नमस्कार घाली । मनोवृत्ति* ते राघवाची निवाली ॥ ९९ ॥
समस्तांसि देखोनि आनंद जाला । सिताशुद्धि घेऊनियां रुद्र आला ॥
बहूतां बहू सांगती येकमेकां । सिता शोधितां सौख्य जालें अनेकां ॥ १०० ॥
सभामंडपीं राम सन्मूख पाहे । उभा दास साकल्य तो सांगताहे ॥
महत्कृत्य व्हावें§ जनीं येश यावें । प्रभूसी समस्तांसि कल्याण व्हावें ॥ १०१ ॥

सुंदरकांड समाप्त.

---

३९ जगन्मात=जगाची माता, सीता. * 'चितवृत्ति' पा० § 'होवो' असा मूळांत पाठ आहे.

## युद्धकांड.*

नमूं विघ्नहर्ता मुळीं सैन्यभर्ता ॥ मुढां धूर्तकर्ता विभांडी विवर्ता ॥
चतुर्भूज मत्तानन्[४०] शोभताहे ॥ तया चिंतितां भ्रांति कोठें न राहे ॥ १ ॥
सदां भेदहंती महंती महंतां । सदा ज्ञानवंती नियंती नियंता ॥
सुविद्या-कळा-स्फूर्ति-रूपा [a] अमूपा । नमस्कारिली शारदा मोक्षरूपा ॥ २ ॥
नये बोलतां चालतां रूप कांहीं ॥ नये भावितां दावितां सर्वथा ही ॥
सदा संत आनंदरूपीं भरावें । पदीं लागतां सद्गुरूचे तरावें ॥ ३ ॥
नमस्कारिला राम कोदंडपाणी । पुढें गावया रामरामेति वाणी ॥
भविष्योत्तरें बोलिलीं तीं पुराणीं । उमाकांत ध्यातो सदा शूळपाणी[४१] ॥ ४ ॥
कथा शंकराची कथा कार्तिकाची[४२] ॥ कथा चंडिकेची कथा मोरयाची ॥
कथा वेंकटाची कथा विठ्ठलाची । कथा मल्ल याची कथा भैरवाची ॥ ५ ॥
कथा नृसिंहा वामना भार्गवाची । कथा कौरवा पांडवा माधवाची ॥
कथा देव इंद्रादिब्रह्मादिकांची । समस्तामध्यें श्रेष्ठ या राघवाची ॥ ६ ॥
जेणें फेडिला पांग ब्रह्मादिकांचा । बळें तोडिला बंध त्या त्रीदशांचा[४३] ॥
ह्मणोनी कथा थोर या राघवाची । जनीं ऐकतां शांति होते भवाची ॥ ७ ॥
कथा थोर रामायणी सार आहे । दुजी ऊपमा या कथेला न साहे ॥
तिन्ही लोक गाती सदां आवडीनें । भविष्योत्तरें वानिलीं शंकरानें ॥ ८ ॥
ऋषी माजि श्रेष्ठू विचारें वरिष्ठू । सदा येकनिष्ठू सगूणीं प्रविष्टू ॥
चरित्रें विचित्रें वनामाजि वस्तां । मुखें बोलिला राम नस्तां समस्तां ॥ ९ ॥
कथा राघवाची सदाशीव पाहे । तळीं ऐकतां शेष थक्कीत राहे ॥
कथा श्रेष्ठ हे ऐकतां दोष जाती । [b]महासूकृती ऐकती धन्य होती ॥ १० ॥
कथा संपली कांड सुंदर्य मागें । प्रवाहो पुढें चालिला लागवेगें ॥
स्वयें श्रोतयांतें कवी प्रार्थिताहे । पुढें युद्धकांडीं कथा रम्य आहे ॥ ११ ॥
ऋषीपर्वतीं[४४] रामसौमित्र होते । अकस्मात आला हनूमंत तेथें ॥

---

* ह्या कांडाच्या दोन प्रती आम्हांस मिळाल्या. एक रा० पुराणीक यांजकडून मिळाली ती. दुसरी रा० बाळकृष्ण विठ्ठल पोतनीस यांणीं कोल्हापूर प्रांतांतून आम्हांकरितां आणविली ती. ही दुसरी बरेच ठिकाणीं अशुद्ध आहे, तथापि तिचा उपयोग बहुत होईल. दोहींतील फरक पुढें दिला जाईल.

४० मत्तानन्=गजवदन. a. अरूपा (पाठभेद). ४१ शूळपाणी=शंकर. ४२ कार्तिक=कृत्तिकांचा पुत्र कार्तिकस्वामी. ४३ त्रिदश=तीस, तीन दशक, देव. b. जनीं (पा० भे०). ४४ ऋषीपर्वत=ऋष्यमूक पर्वत.

ह्मणे जानकी देखिली रामचंद्रा । क्षमा[४५]रूप लंकेसि आहे नरेंद्रा ॥ १२ ॥
सिता रावणें रक्षिली वाटिकेसी[४६] । प्रभू पाहिली म्यां स्वयें निश्चयेशीं ॥
तये घोर नीशा[४७]चरी रक्षणेसी । बळें ठेविल्या कर्कशा गर्वराशी ॥ १३ ॥
पुढें राघवें सुग्रिवाचे निमित्तें । विचारूनियां सर्व ही वानरांतें ॥
दळेंशीं बळें दक्षिणे चा!लि केली । विरांची असंभाव्य सेना मिळाली ॥ १४ ॥
कपी सुग्रिवें सर्व भूमंडळींचे । बहू आणिले वीर मेरू बळाचे ॥
विरा पाठिशीं भार कोटयानुकोटी । रिसां[४८]वानरांची असंभाव्य दाटी ॥ १५ ॥
अती आदरें स्कंधभागीं विरानें । रघुनायका घेतलें मारुतीनें ॥
सुमीत्रासुता लागिं त्या अंगदानें । प्रभू चालिले ते बळी थोर मानें ॥ १६ ॥
सिता शोधिली भीमराजें विशाळें । दळें लोटिलीं वांनरांचीं ढिसाळें ॥
गिरीतुल्य झेंपावती वायुवेगें । करा पल्लवीं झेलिती शैलशृंगें ॥ १७ ॥
अपारें कुरें वानरें सैर मेळा । कठोरें करें फोडिती चंड शीळा ॥
रिसें कर्कशें भीस *भिंगोळवाणी । मध्यें सांवळा रामकोदंडपाणी ॥ १८ ॥
पुढें चालतां भार गोलां[४९]गुळांचे । कडे लागले थोर विंध्याचळाचे ॥
तया पर्वता माजि चंडें उदंडे । विशाळें बहू लागलीं झाँ[५०]डँखंडें ॥ १९ ॥
कपी भार विंध्याचळा माजि आले । असंभाव्य ते झाडँखंडीं निघाले ॥
वरी वा[५१]डें झाडें तळीं दाट छाया । कपी सर्व ही सिद्ध जाले उडाया २० ॥
तळीं पोटळे उंच शाखा फुलांचे । वरी लोंबती घोंस नाना फळांचे ॥
बहुतां परींच्या बहू पक्षियां[५२]ती । बहू श्वापदें तीं फळें भक्षिताती ॥ २१
तया माजि ते भार कोटयानुकोटी । रिसां वांनरांची असंभाव्य दाटी ॥
झडा घालिती एकमेकां पुढारें । खडडां बळें वृक्षवल्ली विदारे २२ ॥
कितीएक ते बैसले वृक्ष अग्रीं । वरी [c]वाइं[५३]ली वक्र पुच्छें समग्रीं ॥
कितीएक मध्येंच ते गुप्त जाले । कितीएक ते वृक्ष[d]माथां मिळाले ॥ २३ ॥
स्वइच्छा फळे भक्षिती आदरेंशीं । बहू वांटिती येक मेकां त्वरेशीं ॥
फळें तोडिती टाकिती ते अपारें । वनामाजि ते क्रीडती भूभुकारें ॥ २४ ॥
कितीएक हेलाविती वृक्ष आंगें । कितीएक ऊफाळती लागवेगें ॥
कितीएक ते झोंबती आंग व्यस्तें । कितीएक ते लोंबती एक हस्तें ॥ २५ ॥
कितीयेक पोटाळिती वाड झाडें । किती मोडिती आंग भारें कडाडें ॥
बहू मांडिली झाडखंडीं धुमाळी । कितीयेक झेंपावती अंतराळीं ॥ २६ ॥

---

४५ क्षमारूप=सुखरूप. ४६ वाटिका=वाडी, बाग. ४७ निशाचरी=राक्षसी. ४८ रीस=आस्वल. * भिंगोलवाणी=पांढरा. ४९ गोलांगूल=वानर. ५० खड=षंड=जमाव. ५१ वाड=पुष्कळ. ५२ याती=जाती. ५३ वाइलीं=वेतलीं. c. पाहिलीं (पा० भे०). d. अग्रीं (पा० भे०).

वनें व्यापिलीं वानरें गर्जताती । दिशा लंघिली श्वापदें पक्षियाती ॥
भुतें खेचरें थोर धाकें पळालीं । चळीं कांपती दैन्यवाणी गळालीं ॥ २७ ॥
कपींचीं पुढें चालिलीं दाट थाटें । वनें चालतां सर्व होती सपाटें ॥
महा थोर विंध्याचळा लागवेगें । पुढें चालिले सर्व सांडूनि मागें ॥ २८॥
तयां चालतांचालतां दक्षणेसी । बहूसालआवेश माहा विरांसी ॥
पुढें देखिलें शृंग मैळाचळाचें । तयामस्तकीं भार गोळांगुळांचे ॥ २९ ॥
गिरी-शृंग-पाठार पाहोनि वेगीं । बळें चालिले भार ते दक्षणांगीं ॥
पुढें चालतां चालतां अस्तमाना । समुद्रातिरीं लोटली भीम सेना ॥ ३० ॥
कपी-सैन्य सिंधूतिरामाजि आलें । असंभाव्य देखोनि चक्रीत जालें ॥
जळें मातला सिंधुलाटे धडाडी । करी गर्जना मेघ जैसा घडाडी ॥ ३१ ॥
दिसे पाहतां सर्व आकाश जैसें । कळेना सिमा दाटलें तोय तैसें ॥
बहूपाण-जंजाळ देखोनि डोळां । भयासूर त्यां कंप सूटे चळाळां ॥ ३२ ॥
समुद्रातिरीं राहिली चंड सेना । असंभाव्य तें सैन्य भूमी दिसेना ॥
गिरी-वृक्ष देखोनि येती फुराणें । बळें साधिती अंतराळीं किरांणें ॥ ३३ ॥
कपीभार ते सर्वही स्वस्थ जाले । महापर्वतांचे परी ते मिळाले ॥
समुद्रातिरीं राहिलें सैन्य जैसें । पुढें वर्तलें त्रीकुटा माजि कैसें ॥ ३४ ॥
सिताशुद्धि घेऊनियां ८ रुद्र गेला । तयीं आखयातें क्षयो प्राप्त जाला ॥
बहू मानसीं दुःख मंदोदरीला । तिनें शीघ्र पाचारिलें देवरांला ॥ ३५ ॥
म्हणे देवरालागिं बीभीषणा हो । तुम्हीं आजि वेगीं सभेमाजि जा हो ॥
मदोन्मत्त तो अंकुशें आंवरावा । विवेकें बळें राव तैसा वळावा ॥ ३६ ॥
म्हणे धन्य हो धन्य तूं राजकांते । मनीं माझिया हीत ऐसें चि होतें ॥
बरी अंतरीं मातघेऊनि पुर्ती । निघाला सभेमाजि तो धर्ममूर्ती ॥ ३७ ॥
तया रावणाच्या गृहामाजि गेला । बहूतांपरी रावणू शीकवीला ॥
पुढें दोघे ही ते सभेमाजि आले । महावीर राक्षेस सर्वै मिळाले ॥ ३८ ॥
सभे श्रेष्ठ तो रावणू कुंभकर्णू । सभेमाजि बीभीषणू अग्रगण्यू ॥
सभे सर्व ही पुत्र मंत्री मिळाले । तयांलागिं तो रावणू काय बोले ॥ ३९ ॥
तया रावणें सर्व सांडूनि शुद्धी । पुढें प्रेरिता जाहला पाप-बुद्धी ॥
म्हणे ऐक गा बुद्धिवंता प्रहेस्ता । करीं रे मला वश्य ते रामकांता ॥ ४० ॥
सिते कारणें म्या बहू कष्ट केले । परी पाहतां सर्व ही व्यर्थ गेले ॥
मनीं चिंतिलें कोडँ कांहीं पुरेना । उरे शीण तो शोक पोटीं धरेना ॥ ४१ ॥

---

५४ किराणें=उड्या. ८. भीम (पा० भे०). ५५ देवर=दीर, नवऱ्याचा भाऊ. ५६ प्रहस्त=रावणाच्या एका प्रधानाचें नांव. ५७ कोड=इच्छा.

सिते सुंदरी लागिं संभोग द्यावा । समूळें बळें रामशत्रू वधावा ॥
न हें इतुकें सर्व ही कृत्य जालें । सुखें सर्वदां चित्त माझें निवालें ॥ ४२ ॥
अहंकारला रावणू कोटिगूणें । मनीं मानिलें सर्व ब्रह्मांड ऊणें ॥
समस्तांमध्यें आगळा मेघवर्णू । पुढें बोलता जाहला कुंभकर्णू ॥ ४३ ॥
वदे कुंभकर्णू तया रावणाला । मदें सर्व ही नीतिधर्मू बुडाला ॥
अकस्मात लंकापती बुद्धि नासे । पुढें सर्व ही सूख तेणें विनाशे ॥ ४४ ॥
जगें निंदिलें तेंचि टाकून येतां । पुढें वेळ नाहीं तया दुःख होतां ॥
विषें घोळिलें ठेवितां प्रीति तेथें । पुढें सत्वरा जाइजे मृत्युपंथें ॥ ४५ ॥
म्हणे कुंभकर्णू असें काय केलें । सिता आणितां सर्व ही राज्य गेलें ॥
पुढें भंगलें चित्त जाणूनि जीवें । f मनासारिखें बोलिला तो स्वभावें ॥ ४६ ॥
शुभाशूभ जें मानलें तूजलागीं । घडो तें चि आतां भलें या प्रसंगीं ॥
बळें माझिया सर्व सूखें रहावें । पुढें काय होईल तैसें पहावें ॥ ४७ ॥
कपी मानवी सर्व कैसे मिळाले । क्षुधे कारणें माझिये प्राप्त जाले ॥
रिपू घालितों ऊदरामाजि सांठा । नरें वानरें घांस घेतों घटाटा ॥ ४८ ॥
उदेल्या महा घोर माझेनि कोपें । पुढें देखतां तो चळी काळ कांपे ॥
रिसें मर्कटें बापुडीं दैन्य वाणीं । रिपू आमुचे थोर वाटे शिराणी ॥ ४९ ॥
तया बोलतां रावणा सूख जालें । स्तुतीउत्तरें आदरें गौरवीलें ॥
महावीर पारश्व ऊदीत वेगीं । पुढें बोलता जाहला ते प्रसंगीं ॥ ५० ॥
अहो कायसा मंत्रें पूसा रिपूचा । जनीं कोण लेखीं तयां मर्कटांचा ॥
समर्थापुढें दूसरा कोण कैचा । करूं येकला सर्व संहार त्यांचा ॥ ५१ ॥
सितेची बहू प्रार्थना कां करावी । प्रभू सांगतों बुद्धि पोटीं धरावी ॥
म्हणे वीर पारश्व त्या रावणाला । बळात्कार राया करावा सितेला ॥ ५२ ॥
म्हणे रावणू धन्य गा बुद्धिवंता । तुझें बोलणे मानलें दृढ चित्ता ॥
परी शाप आहे मला ब्रह्मयाचा । करींना बळात्कार हे सत्य वाचा ॥ ५३ ॥
तया बोलतां दुःख बीभीषणाला । बहूसाल संतापला क्रोध आला ॥
म्हणे रे रघूनाथ पूर्ण प्रतापी । दुरात्मे तुह्मी नष्ट चांडाळ पापी ॥ ५४ ॥
तुम्ही राक्षसें निर्बळें बुद्धि-हीने । मती मंदली पातकाचेनि गूणें ॥
सुरां कारणें राम आला कळेना । मदें मातला रावणू ओळखेना ॥ ५५ ॥
कपी वीर ते दूरि टाकूनि शंका । मिळाले करायास निर्मूळ लंका ॥
त्रिकूटाचळू दृश्य नाहीं तयांला । तवं जानकी भेटवा राघवाला ॥ ५६ ॥
रूपें कर्कशें कोपला वीर गाढा । रणामंडळीं राम वाईल मेढा ॥

---

f. तया ( पा० भे० ). ४९ शिराणी=आवड. ५१ मंत्र=मसलत. ६० लेखा=हिशेब.

तया देखतां काळ भीडूं शकेना । तुम्ही मश्यकें राक्षसें सर्व सेना ॥ ५७ ॥
रणीं तीव्र त्या राघवाचेनि बाणीं । तुटों लागले तूमचे पादपाणी ॥
धडें मस्तकें मेद[६१]मांसें चिडाणी । न होतां सिता भेटवा चाप[६२]पाणी[६३] ॥ ५८ ॥
तया बोलतां ते सभा तप्त जाली । सुता मंत्रियांचे मुखीं तीव्र बोली ॥
असंभाव्य तो रावणा कोप आला । कुशब्दें बहू त्रास बीभीषणाला ॥ ५९ ॥
सभेमाजि धिक्कारिलें रावणानें । उठोनी पदें ताडिलें दुर्जनानें ॥
बहूतां मधें येकला धर्ममूर्ती । मनीं खोंचला तो उदासीन चित्तीं ॥ ६० ॥
मनू[६४] भंगला हो तया धार्मिकाचा । पुढें त्याग तात्काळ केला सभेचा ॥
उडाला नभोमंडळामाजि वेगीं । पुरोहीत चत्वारि ते पृष्टभागीं ॥ ६१ ॥
झळंबे मनीं लोभ त्या सांडि केली । अकस्मात ते वृत्ति भंगूनि गेली ॥
पुढें वाक्य बोलोनियां रावणातें । उदासीन तो चालिला व्योम[६५] पंथें[६६] ॥ ६२ ॥
पुरोहीतें[६७] चत्वारि ते पृष्ठभागीं । त्वरें उत्तरे चालिले लागवेगीं ॥
समुद्रासि लंघूनि पैलाड गेले । नभीं[६८] पारखे[६९] सुग्रिवें ओळखीले ॥ ६३ ॥
कपींद्रू ह्मणे पैल पाहे विशाळू । नभीं येतसे कोण हा पंच-मेळू ॥
अकस्मात खालावला व्योम-पंथें । भिडों पाहती वानरें त्या अनर्थें ॥ ६४ ॥
मिळाले कपी बोलती त्यासि वाचा । अकस्मात आलास तूं कोण कैंचा ॥
ह्मणे बंधु मी होय लंकापतीचा । g परी दास अंकीत या राघवाचा ॥ ६५ ॥
पुरी त्यागिली सर्व येका जिवेंशीं । करा हो तुम्हीं भेटि या राघवाची ॥
ह्मणे सत्य बीभीषणू नाम माझें । नव्हे अन्यथा सर्वथा वाक्य दूजें ॥ ६६ ॥
कपी सर्व ही जुत्पती धर्म-मूर्ती । बहूतां परी ऐकिली वाड कीर्ती ॥
समस्तीं तुम्हीं हीत माझें करावें । कृपाळू-पणें राघवा भेटवावें ॥ ६७ ॥
ह्मणे वीर सुग्रीव नावेक[७०] बैसा । त्वरें मात हे जाणवीतों सुरेशा ॥
कपीराज तो लागवेगें निघाला । अती आदरें भेटला राघवाला ॥ ६८ ॥
समाचार साकल्य तो सांगताहे । ह्मणे भेटि नीशाचरू इच्छिताहे ॥
परी अंतरीं कोण कैसा कळेना । तया ठेवितां राजनीती मिळेना ॥ ६९ ॥
समस्ताकडे पाहिलें राघवानें । बहूतांपरी बोलिलें तें सभेनें ॥
मनीं पाहतां देखिला दैन्यवाणा । कृपाळूपणें आणवी रामराणा ॥ ७० ॥
उभें राहिलें भाग्य बीभीषणाचें । करी अंतरीं ध्यान पादांबुजांचें[७१] ॥
भिजे दिव्य सर्वांग त्या अश्रुबिंदीं । मिठी घातली राम पादारविंदीं[७२] ॥ ७१ ॥

---

६१ मेद=चरबी. ६२ चाप=तीरकमठा. ६३ पाणी=हात. ६४ मनू=मन. ६५ व्योम=आकाश. ६६ पंथ=वाट. ६७ पुरोहित=उपाध्याय. ६८ नभ=आकाश. ६९ पारखे=परके. g. पुरा (पा. भे.). ७० नावेक=क्षणभर. ७१ अंबुज=पाण्यांत उगवलेलें (कमळ). ७२ अरविंद=कमल.

कृपा-सागरें ठेविला हस्त माथां । चिरंजीव लंकापती होय आतां ॥
मधूरे गिरे राघवें ऊठवीला । पुढें तिष्ठतू हात जोडोनि ठेला ॥ ७२ ॥
बहू स्तूति केली रघूनायकाची । करी आदिनारायणाची विरिंची[७३] ॥
तयाचे परी शब्द कारुण्य बोले । पुढें पाउलें लक्षितां अश्रु आले ॥ ७३ ॥
म्हणे राम बीभीषणा बैस आतां । पुरे स्तूति सांडीं तुझी सर्व चिंता ॥
सुमित्रें[७४]सुतालागिं संकेत केला । दिजे मंगळ-स्नान बीभीषणाला ॥ ७४ ॥
त्वरें ऊठला बंधु त्या राघवाचा । घटू आणिला पूर्ण h सिंधूदकाचा ॥
पुढें शीघ्र बीभीषणालागिं शेषें[७५] । विशेषें दिलें सौख्य राज्याभिषेकें ॥ ७५ ॥
म्हणे राम बीभीषणा सत्य वाचा । प्रतापें वधू जालिया वैरियाचा ॥
तुला दीधलें राज्य लंकापुरीचें । चळेना चिरंजीव जैसें ध्रुवाचें[७६] ॥ ७६ ॥
वरू दीधला रामचंद्रें दयाळें । कृपा-सागरें दासपाळें नृपाळें ॥
प्रसंगीं तये थोर आनंद जाला । दिल्हें अक्षयी राज्य बीभीषणाला ॥ ७७ ॥
कपी सुग्रिवादीक मांदी[७७] मिळाली । समस्तीं विरीं आदरें स्तूति केली ॥
जगीं धन्य हें भाग्य बीभीषणाचें । प्रितीपात्र जाला रघूनायकाचें ॥ ७८ ॥
रघूनायका देखतां सूख जालें । बहू दुःख मागील सर्वै निमालें ॥
जगीं धन्य गा धन्य बीभीषणा तूं । तुला जाहला प्रसन्न श्रीअनंतू ॥ ७९ ॥
समस्तांसि सन्मानिलें आदरेंशीं । नमस्कार केला रघूनायकासी ॥
पुढें मंत्रियांमाजि तो बैसवीला । तेणें थोर आनंद बीभीषणाला ॥ ८० ॥
म्हणे राम बीभीषणा बैस आप्ता । त्रिकूटाचळू सांग साकल्य वार्ता ॥
वदे राज्य लंकापुरी सर्व सेना । मनामाजि i संतोषला रामराणा ॥ ८१ ॥
पुढें राम बीभीषणा मंत्रें[७८] पूसे । कपी-भार पैलीकडे जाति कैसे ॥
विचारूनियां सुग्रिवाचे j निमित्तें । म्हणे हो क्षमा मागिजे मार्ग यातें ॥ ८२ ॥
समुद्रासि देऊनियां श्रेष्ठ मानू । करावा अती आदरें सुप्रसन्नू ॥
मनीं बोलणें सत्य मानूनि देवें । समुद्रातिरीं बैसिजे शुद्ध भावें ॥ ८३ ॥
त्रिकूटाचळाहून तो हेर आला । पुढें सर्व पाहूनि शार्दूळ गेला ॥
समाचार सांगे तया रावणाला । म्हणे वानरेंशीं बळें राम आला ॥ ८४ ॥
समाचार हा सत्य हो जी भुपाळा । नव्हे मिथ्य हें देखिलें म्यां चि डोळां ॥
मिळाले कपी रीस कोट्यानुकोटी । समुद्रातिरीं जाहली थोर दाटी ॥ ८५ ॥
बळें राहिली ते असंभाव्य सेना । विरांची असंख्यात संख्या असेना ॥

---

७३ विरिंची=ब्रह्मदेव. ७४ सुमित्रा=लक्ष्मणाची आई. h. शुद्धोदकाचा (पा० भे०). ७५ शेष=शेषाचा अवतार लक्ष्मण. ७६ ध्रुव=उत्तानपाद राजाचा मुलगा. ७७ मांदी=जमाव. i. संतापला (पा० भे०). ७८ मंत्र=मसलत. j. नि मत्तें (पा० भे०).

शिळा-शीखरें झेलिती वृक्षपाणी [७९] । सदा सर्वदां गर्जती घोर वाणी ॥ ८६ ॥
तयामाजि ते मानवी वेषधारी । रूपें रम्य लावण्य कामावतारी [८०] ॥
असंख्यात मेळा रिसांवानरांचा । कपिश्रेष्ठ सुग्रीव राजा तयांचा ॥ ८७ ॥
प्रभू सांगतों सिद्ध आतां असोंव । पुरीमाजि दुश्चीत कांहीं नसावें ॥
तयें सांगतां थोर उद्वेग जीवा । म्हणे मागुता कोण रे पाठवावा ॥ ८८ ॥
पुढें शूक बोलाविला आदरेंशीं । म्हणे जाय रे बोल त्या सुग्रिवासी ॥
म्हणावें कपी तूं सखा आमुचा रे । अनुचीत हें वावगें कासया रे ॥ ८९ ॥
बहूतां परी शूक तो शीकवीला । अळंकार देऊनियां तोषवीला ॥
नमस्कार केला तयें रावणासी । निघाला बळें हेर तैसा त्वरेंशीं ॥ ९० ॥
नभोमंडळीं शीघ्र उड्डाण केलें । देहें आपुलें सर्व ही पालटीलें ॥
रूपें सुंदरू जाहला शुद्ध पक्षी । निराळा नभामाजि तो सैन्य लक्षी ॥ ९१ ॥
म्हणे सुग्रिवा ऐक रे येक भावें । कपी व्यर्थ आलासि मागें फिरावें ॥
त्वरें आपुल्या भूवना माजि जावें । समारंगणीं वाउगें कां मरावें ॥ ९२ ॥
त्रिकूटाचळा रामकांतेसि नेलें । कपी सांगपां रे तुझें काय गेलें ॥
तया मानवा साह्य जालासि कैसा । मनीं नेणतां चालिला मूर्ख जैसा ॥ ९३ ॥
बळें हीन झुंजासि त्याच्या न जावें । कदा कृपणाचे वऱ्हाडी न व्हावें ॥
महा मूर्ख रे सख्य याचें नसावें । स्वयें हीत तें ज्ञान पोटीं वसावें ॥ ९४ ॥
त्रिकूटाचळू लभ्य नाहीं सुरेशा । नरां वानरां प्राप्त होईल कैसा ॥
कपी-पुंगवा [८१] व्यर्थ आलासि वांयां । समारंगणीं बाण-घातें मराया ॥ ९५ ॥
समस्तीं रणामाजि जीवें मरावें । तये मैत्रिकेचें जनीं काय घ्यावें ॥
बहूतां परी हें चि आतां करावें । तुवां आपुल्या भूवनामाजि जावें ॥ ९६ ॥
शुकें निंदिलें सर्व ही वानरांतें । बहूसाल धिःकारिलें हो तयांतें ॥
तिहीं पाडिला ताडिला कुस्त केला । k पुन्हा सोडिला तो नभामाजि गेला ॥ ९७ ॥
म्हणे शूक ऐका रिसें वानरें हो । तुम्हा रावणें रक्षिलें निर्बळें हो ॥
अरे मूर्ख हो व्यर्थ आलात येथें । समारंगणीं जावया मृत्युपंथें ॥ ९८ ॥
अरे सुग्रिवा वानरा भूललाशी । रिसांमर्कटांमाजि तूं मूर्ख होशी ।
मुढा व्यर्थ घेऊनि आलासि सेना । तुला रावणू कोण कैसा कळेना ॥ ९९ ॥
पुन्हा बोलता जाहला घोर वाणी । कपी मागुते क्षोभले वृक्षपाणी ॥
धरूनी बळें आणिलें पाक्षियाला । तिहीं रक्षिलें पाशबंधीं तयाला ॥ १०० ॥
पुढें शीघ्र कोपेल हा रामचंद्रू । म्हणे दास भेटेल भावें समुद्रू ॥
प्रतापें बळें तारिती चंड शीळा । बळें सेतु बांधूनि घेती सुवेळा ॥ १०१ ॥

---

७९ हातीं झाडें आहेत ज्यांच्या. ८० काम=मदन. ८१ पुंगव=श्रेष्ठ. k. पुढें (पा० भे०).

## द्वितीय प्रसंग प्रारंभ.

समुद्रातिरीं राम राजीव-नेत्रें । भुमी सेज दर्भासनीं तीन रात्रें ॥
बहूतां परी दीधला श्रेष्ठ मानू । परी सागरू तो नव्हे सुप्रसन्नू ॥ १ ॥
फळें तोय सांडुनियां नित्य नेमें । बहूतां परी प्रार्थिला सिंधु रामें ॥
परी [l]नायके जो बळें धुंद नाला । रघूनायका कोप तात्काळ आला ॥ २ ॥
उभा राहिला काळ कृतांतु[८२] जैसा । बळें सिंधु जाळावया राम तैसा ॥
दिसे रूप अद्भूत वज्रांग ठाणें । करीं चाप तें सज्जिलें अग्निबाणें ॥ ३ ॥
बळें ओढितां घोर-घोषें करारी । दिशा दाटल्या वन्हि शीतें थरारी ॥
भयें बैसला काळ-पोटीं दरारा । [m]चवों[८३] लागल्या त्या असंभाव्य तारा ॥ ४ ॥
बहू क्षोभला राम जाळूं निघाला । पुढें सिंधु भेटावया शीघ्र आला ॥
म्हणे स्वामि हो थोर अन्याय झाला । समुद्रासि हो शीघ्र पालाण[८४] घाला ॥ ५ ॥
नळाचेनि हस्तें जळीं चंड शीळा । गिरी शृंग तर्तील हो जी नृपाळा ॥
वदे निश्चयें आदरें हा समद्रू । तेणें थोर [n]संतोषला रामचंद्रू ॥ ६ ॥
बहूतां परी राम संतोषवीला । पुढें सिंधु तो ही जळामाजि गेला ॥
नळें वानरांचीं दळें सिद्ध केलीं । गिरी-शृंग आणावया शीघ्र गेलीं ॥ ७ ॥
त्वरें उत्तरे चालिले भार सैरा । बळी धांवती येकमेकां पुढारां ॥
शिळा शीखरें झाड खंडें प्रचंडें । बळाचे कपी चालवीती उदंडें ॥ ८ ॥
कपी धांवती लक्ष कोटयानुकोटी । बळें गर्जती थोर आनंद पोटीं ॥
गिरी कंदरें देश लंघूनि जाती । शिळा शीखरें शीघ्र घेऊनि येती ॥ ९ ॥
निळें पींवळे श्वेत आरक्त काळे । फिके जांभळे गौर जांभे गव्हाळे ॥
बहू रंग पाषाण नाना परीचे । उभे वक्र वर्तूळ [o]गाभे गिरिचे ॥ १० ॥
कपीवीर ते [p]शीघ्र घेऊनि जाती । बळें मघवाचे[८५] परी वर्षताती ॥
शिळीं सेतु बांधी नळू लागवेगें । असंभाव्य तीं चालिलीं शैलशृगें ॥ ११ ॥
कपी मोडिती वाड झाडें कडाडां । कडे पाडिती पर्वतांचे खडाडा ॥
उड्या घेति आकाश पंथें धडांडां । बळें टाकिती सिंघु मध्यें थडाडां ॥ १२ ॥
विशाळा जडा वर्तुळा त्या उंदंडी । बहू मस्तकीं वाहती चंड धोंडी ॥
शिळा शीखरें फोडिती ते अभंगें । नभी भार झेंपावती लागवेगें ॥ १३ ॥
कपी मारुती सारिखे जे उडाले । गिरी मंदरा सारिखे चालवीले ॥
कपी साक्षपी देव-रूपी बळाचे । कडे लागले [q] ते सुवेळाचळाचे ॥ १४ ॥

---

l आयकेना ( पा० भे० ). ८२ कृतांतु=यम. m. चळूं ( पा० भे० ). ८३ चवों=पडूं. ८४ पालाण=पल्याण=खोगोर=पूल. n. आनंदला ( पा० भे० ). o. गा ते ( पा० भे० ). p. सर्व ( पा० भे० ) ८५ मघवा=इंद्र. q. त्या ( पा० भे० ).

बळें सेतु बांधावया वेगु केला । शतें योजनें लांब विस्तीर्ण[८६] जाला ॥
दशें योजनें भव्य रुंदी तयाची । जळीं बांधणी सर्व पांचां दिसांची ॥ १५ ॥
कपी सर्व आनंदले कार्य झालें । बळें गर्जती चित्त सूखें निवालें ॥
सुवेळाचळा सेतु बांधोनि नेला । नळा वानराला जयो प्राप्त जाला ॥ १६ ॥
म्हणे रामराणा तया सुग्रिवातें । दळें चालवा सागराचेनि पंथें ॥
निरूपी कपी शीघ्र सेनापतीला । निळें सर्व सेनेसि संकेत केला ॥ १७ ॥
दळें सर्वही वानरांचीं निघालीं । पुढें चालतां दाटणी थोर जाली ॥
कडेचा पडे तो उडे अंतराळीं । सुवेळाचळा पावले शीघ्र काळीं ॥ १८ ॥
सुवेळाचळा भीतरीं राजभारें । दळें लोटलीं वानरांचीं अपारें ॥
बळें घोर घोषें कपी गर्जताती । दिशाचक्र सिंधू गिरी पाहताती ॥ १९ ॥
त्रिकूटागिरी-शीखरीं दिव्य जे कां । रघूनायकें देखिली रम्य लंका ॥
दिसे तेज पुंजाळ लावण्यराशी । तया देखतां पौरणें[८७] लोचनाशीं ॥ २० ॥
म्हणे धन्य रे धन्य तो विश्वकर्मा । असंभाव्य या पर्वताचा महीमा ॥
सुवर्णाचळा सारिखा दीसताहे । सिता सुंदरी या स्थळा माजि आहे ॥ २१ ॥
पुढें राम बोले रिसा[८८]वानरांशीं । असावें तुम्ही [३] सर्व सेना-प्रदेशीं ॥
कपी-चक्र अव्यग्र तें सिद्ध जालें । निळें [४] वानरें सर्व सन्नद्ध[८९] केलें ॥ २२ ॥
कपी-भार ते सर्वही स्वस्थ जाले । पुढें धर्मता उत्तरीं राम बोले ॥
म्हणे सुग्रिवा बापुडें शूक सोडा । तया पायिंचे सर्व ही पाश तोडा ॥ २३ ॥
तया अंगदें सोडतां तो उडाला । मुखीं रामनामें नभीं गुप्त जाला ॥
बळें चालिला मुक्त सूखें त्वरेशीं । त्रिकूटाचळीं भेटला रावणाशीं ॥ २४ ॥
म्हणे रावणू गा शुका काय झालें । नवें रात्र पर्यंत कोठें क्रमीलें ॥
वदे शूक हो लंकनाथा वरिष्ठा । मुखें व्यर्थ बोलों नये अप्रतिष्ठा ॥ २५ ॥
तयां वांनरांच्या दळामाजि गेलों । ˘देहें पालटीलें स्वयें शूक जालों ॥
नभोमंडळीं राहिलों अंतराळीं । बळें वांनरांचीं दळें तीं न्यहाळीं ॥ २६ ॥
समुद्राचिये उत्तरे भीमें[९०] सेना । दहा योजनें दाट भूमी दिसेना ॥
तियें मुख्य ते राम-सौमित्र बंधू । कपि-श्रेष्ठ सुग्रीव राजा अगाधू ॥ २७ ॥
उचिष्ठोत्तरें तूमचीं त्या कपीला । मुखें बोलिलों सर्व ही सुग्रिवाला ॥
मला सांगतां वीर कोपासि आले । कितीएक ते पाठि लागीं उडाले ॥ २८ ॥
कपी-वीर धांवोनिया पाठि लागीं । मला ताडिते जाहले ते प्रसंगीं ॥
बहू सूख जालें तयां वानरांतें । कठोरें करें ताडिलें या ˘देहातें ॥ २९ ॥

---

८६ विस्तीर्ण=प्रशस्त. ८७ पारणें=तृप्ति. ८८ रिस=आस्वल. ३. 'सिद्ध' पा० भे०.
४. 'वानरेंशीं प्रतमिळ्ळ केलें' पा० भे०. ८९ सन्नद्ध=तयार. ९० भीम=भयंकर.

बहू कष्ट जाले प्रभो या जिवासीं । नसो वोखटी[११] वेळ ती वैरियाशीं ॥
रिसां वांनरांची असंभाव्य मांदी[१२] । पुढें घातलें हो मला पाश-बंदीं ॥ ३० ॥
प्रभू काय सांगों चमत्कार जाला । समुद्रांतुनीं सिंधु बाहेर आला ॥
रुपें भव्य तो मूर्तिमंतू निघाला । अती आदरें भेटला राघवाला ॥ ३१ ॥
पुढें बोलता जाहला तोय[१३]-राशी । तयें शुद्धि सांगितली राघवासी ॥
म्हणे जी बळें सिंधु बांधा दयाळा । नळाचेनि हस्तें जळीं चंड शीळा॥ ३२॥
कपी प्रेरिले त्या रघूनायकानें । शिळा तारिल्या त्या नळा वानरानें ॥
कपी भार ते सर्व ऐलाड आले । सुवेळाचळा मस्तकीं ते मिळाले ॥ ३३ ॥
कृपाळूपणें बोलिला रामचंद्रू । कपीला म्हणे शूक सोडा नरेंद्रू ॥
पुढें वानरीं सोडिलें लागवेगीं । समर्था तुला भेटलों ये प्रसंगीं ॥ ३४ ॥
प्रभू सांगतों बुद्धि t आतां करावी । त्वरें जानकी राघवा भेटवावी ॥
सिता पाठवीतां बरें लंकनाथा । न होतां असें प्राप्त होईल वेथा ॥ ३५ ॥
शुकें सांगतां रावणा कोप आला । म्हणे कोण लेखा[१४] नरां वानरांला ॥
रणामंडळीं सोडितां बाण-वृष्टी । बळें आपुल्या सर्व जाळीन सृष्टी ॥ ३६ ॥
बळें बूजितों भूमि आकाश वाणीं । म्हणे काय तीं लेंकुरें दैन्यवाणीं ॥
न होतां असंभाव्य त्या बाणवृष्टी । सुखें सांगती थोर संग्राम-गोष्टी ॥ ३७ ॥
अमित्रीं[१५] तिहीं एक अद्भूत केलें । समुद्रासि पाळाणिलें[१६] सैन्य आलें ॥
नव्हे पाहतां गोष्टि सामान्य कांहीं । परी राक्षसां शुद्धि अद्यापि नाहीं ॥ ३८ ॥
पुढें हेर बोलाविले आदरेशीं । शुका सारणातें म्हणे गर्वराशी ॥
मिळालीं दळें श्रा[१७]वणारी-सुताचीं । तुळा रे बळें त्या रिसां वानरांची ॥ ३९ ॥
तयें बोलिल्या नंतरें लंकनाथें । बळें चालिले शीघ्र आकाश-पंथें ॥
सुवेळाचळा देखतां सिद्ध जाले । देॅहे आपुले ते तिहीं पालटीले ॥ ४० ॥
रुपें जाहले वानरू वेषधारी । कळेना कळा बाणलीसे शरीरीं ॥
दळीं कोटिच्या कोटि संख्या असेना । तिहीं राक्षसीं तूळिली सर्व सेना ॥ ४१ ॥
सभे बैसले राम-सौमित्र जेथें । शुका-सारणाला नव्हे रीग तेथें ॥
पुढें अंतरीं दूर राहून वेगीं । बळें तूळिते जाहले ते प्रसंगीं ॥ ४२ ॥
सभे अंतरें लक्ष लावोनि ठेले । अकस्मात बीभीषणें ओळखीले ॥
धरीलें करीं त्या शुका-सारणातें । म्हणे दूत हे धाडिले लंकनाथें ॥ ४३ ॥
तंव बोलिला राम बीभीषणाला । दळें दाखवा सर्वही शीघ्र त्याला ॥

---

११ वोखटी=वाईट. १२ मांदी=मेळा. १३ तोयराशी=समुद्र. t. 'ऐशी' पा० भे०. १४ लेखा=हिशेब. १५ अमित्र=शत्रु. १६ पाळाणिलें=खोगीर घातलें=पूल बांधला. १७ श्रावणारीसुत=श्रावणनामक पुरुषाचा शत्रु दशरथ त्याचा पुत्र राम.

तुळा ना दळें तीं शुका-सारणाहो । तुम्ही आपुलें कार्य सिद्धीस न्याहो ॥ ४४ ॥
स्तुती उत्तरें सारणू शीघ्र बोले । कृपा-सागरें हेर ते रक्षियेले ॥
प्रभू देइजे स्नेह आज्ञा दयाळा । तुजे लागिं कल्याण हो जी नृपाळा ॥ ४५ ॥
निरोपें चि तात्काळ ते हेर गेले । तया रावणाला नमस्कार केले ॥
प्रभू मृत्यु आला बळें लागवेगें । परी सूटका जाहली प थोर भाग्यें ॥ ४६ ॥
दळा माजि बीभीषणें ओळखीलें । धरूनी बळें तैं सभेमाजि नेलें ॥
उदारें रघूनायकें सोडवीलें । कृपाळू-पणें भूपती मुक्त केलें ॥ ४७ ॥
कळेना दळीं कोण संख्या बळाची । असंभाव्य सेना बहू विक्रमाची ॥
तयांच्या बळा ऊपमा काय द्यावी । समारंगणीं भेटि त्यांची न व्हावी ॥ ४८ ॥
रघूनाय सौमित्र बीभीषणानें । कपी सुग्रिवें अंगदें मारुतीनें ॥
बळें घेउं लंका असा नेम केला । घडीनें घडी कोप येतो तयांला ॥ ४९ ॥
मनीं वाटतें बुद्धि ऐशी करावी । सिता आदरें राघवा भेटवावी ॥
तया बोलतां कोपला गर्वराशी । म्हणे ताडिलें काय नेणों तुम्हांसी ॥ ५० ॥
भया सांगतां त्या नरां वानरांचे । सदां सर्वदां भक्ष जे राक्षसाचे ॥
मजे रावणा सारिखा कोण आहे । समारंगणीं काळ भीडों न राहे ॥ ५१ ॥
महा थोर दामोदरीं गर्वराशी । पुढें रावणू वेघला सारणेशीं ॥
तया मस्तकीं उंच आकाश-पंथीं । पुढें पाहतां दृष्टि फांके दिगंतीं ॥ ५२ ॥
सुवेळाचळीं दृष्टि घालोनि पाहे । असंभाव्य तें सैन्य पोटीं न साहे ॥
पुढें रावणू सारणा लागिं पूसे । कपी सांग रे सर्व आहेत कैसे ॥ ५३ ॥
कपीभार पाहूनियां हेर आले । पुसे रावणू सारणू शीघ्र बोले ॥
वदे देखिल्या सारिखें सत्य वाचे । पुढें दाखवी भार गोळांगुळांचे ॥ ५४ ॥
म्हणे सारणू ते कपी वीर जेठी । मिळाले असंभाव्य कोट्यानुकोटी ॥
देहे पर्वता सारिखे काळ रूपी । रणीं भीडतां शूर संग्राम कोपी ॥ ५५ ॥
म्हणे लंकनाथा कपी पैल पाहें । समस्तांमधें आगळा बैसलाहे ॥
समारंगणीं वीर नेता विरामा । महा मुख्य सेनापती नीळ नामा ॥ ५६ ॥
दिसे दूसरा त्याचिये दक्षिणांगीं । बळें डुड्डतू वीर लोहीत अंगीं ॥
धरा हाणतां पुच्छ-घातें थरारी । कपी अंगदू नाम त्याचें सुरारी ॥ ५७ ॥
मिळाले कपी रीस कोट्यानुकोटी । पुढें बैसला भार घालूनि व पाठी ॥
सदां सर्वदां लक्ष ज्यांचें त्रिकूटीं । बहूसाळ युद्धा उतावीळ पोटीं ॥ ५८ ॥
करी चंड उड्डाण आकाश-पंथें । महा मेघ वीतूळती अंगवातें ॥
समारंगणीं भीडतां अग्रवादू । बळें आगळा नाम त्याचें कुमूदू ॥ ५९ ॥

प. 'पूर्व' पा० भे०. ५४ गोळांगुळ=वानर. ५६ विराम=मरण. व. 'पोटीं' पा० भे०.

देहे सिंधुरीं[१००] सारिखा पैल पाहे । महावीर विंध्याचळामाजि राहे ॥
सुपर्णास[१] सांडून उड्डाण ज्याचें । [w]कपी थोर हा ऋषभू नाम त्याचें ॥ ६० ॥
दिसे पैल पुच्छासनीं वीरभारें । खचे स्वर्ग तें याचिया भूभुकारें ॥
कपी शर्भ ऐसें तया नाम राया । उतावीळ हा थोर शत्रू जिताया ॥ ६१ ॥
कपी बीनतू पैल पाहा विशाळू । रणीं धांवतां वीर-प्रेतां सुकाळू ॥
देहे आचळा सारिखा ताम्रवर्णी । विरां वानरां माजि अद्भूत कर्णी ॥ ६२ ॥
भृकूटी भयासूर त्या भीस पाहे । भुमी अंग रोमावळी स्थळताहे ॥
कपी क्रंदनू भूपती नाम ज्याचें । तया सारिखें देह नाहीं बळाचें ॥ ६३ ॥
प्रमाथी कपी वीर कैसा कडाडी । महा मेघ गंभीर जैसा गडाडी ॥
रणीं झुंजतां थोर कल्पांत मांडे । तया वानरांशीं बळें कोण भांडे ॥ ६४ ॥
सुवर्णाचळीं[२] सारिखा देह ज्याचा । मुखें विक्रमू[३] बोलवेना बळाचा ॥
गवायू कपी वीर तात्काळ कोपे । उडाणें सवीतारथीं अश्व कांपे ॥ ६५ ॥
विशाळू गजू वानरू पैल पाहो । तुळीतो सदां सर्वदां सव्य बाहो ॥
त्रिकूटाचळीं लाविली दृष्टि जेणें । बळें सर्व रोमांच येती फुराणें ॥ ६६ ॥
विरांमाजि हा धूम्रचंड प्रतापी । महा पर्वता सारिखा [x]चंडकोपी ।
रिसू कर्कशू घोर घोषू अगाधू । बळी होय हा जांबुवंतासि बंधू ॥ ६७ ॥
कपीचें बहूसाल सामर्थ्य वांनी[४] । मुखें बोलतां रावणू वीट मानी ॥
म्हणे रावणू सारणा मूर्ख होशी । मज देखितां मर्कटां वर्णितोशी ॥ ६८ ॥
असोंदे रिसें मर्कटें या प्रसंगीं । रिपू दाखवीं मुख्य तो राम वेगीं ॥
अभिप्राय जाणूनि लंकापतीचा । वदे सारणू मागुती रम्य वाचा ॥ ६९ ॥
पहा [y] राम तो पैल कोदंडपाणी[५] । रूपें सांवळा रम्य लावण्य-खाणी ॥
रतीचा पती तूळतां तुच्छ होये । विराजे रिसां वांनरां माजि पाहे ॥ ७० ॥
पहा राम विश्राम आत्मा जगाचा । बळें काळहर्ता [z]विहर्ता अघाचा[६] ॥
तुणीरें[७] बरें कांस माथां लपेटा । झणत्कारिती [a]वाजटा चाप[८]-घंटा ॥ ७१ ॥
महावीर तो देखतां धाक सूटे । समारंगणीं भीडतां काळ वीटे ॥
तयाशीं बळें भीडतां पूरवेना । कदां ही जयो प्राप्त होतां दिसेना ॥ ७२ ॥
तया दक्षणे दूसरा बैसला हो । महावीर सौमित्र राया पहा हो ॥
असंभाव्य सामर्थ्य याचें कळेना । बळें आगळा जिंकतां जिंकवेना ॥ ७३ ॥

---

१०० सिंधुर=हत्ती. १ सुपर्ण=गरुड. w. 'तया सारिखें देह नाहीं बळाचें' पा० भे०. २ सुवर्णाचळ=मेरुपर्वत. ३ विक्रम=पराक्रम. x. 'काळरूपी' पा० भे०. ४ वानी=वर्णी. y. 'ह्मणे' पा० भे०. ५ कोदंडपाणी=धनुष्य आहे हातीं ज्याच्या. z. 'विवर्ता' पा० भे०. ६ अघ=पाप. ७ तुणीर=बाणांचा भाता. a. 'वाजती' पा० भे०. ८ चाप=धनुष्य.

कपी राघवा वाम भागींच आहे । त्रिकूटाचळू दृष्टिनें वक्र पाहे ॥
कपीनाथ सुग्रीव तो ओळखावा । कळेना असंभाव्य त्याचा उठावा ॥ ७४ ॥
कपी आणिले सर्व भूमंडळींचे । असंख्यात संख्या नसे भार त्यांचे ॥
वनीं मैत्रिकी जोडिली राघवाशीं । रघूनायका साह्य जाला जिवेसी ॥ ७५ ॥
सिता शोधिली मारिलें कूमरासी । वनें मोडिलीं जाळिलें त्रीकुटाशीं ॥
बळें आगळा भूपती पैल पाहें । समस्तां मध्यें मारुती शोभताहे ॥ ७६ ॥
महा भीस भिंगोळ काळा कराळू । विशाळें नखें फोडितो ब्रह्मगोळू ॥
रिसां कर्कशां माजि हा काळ-केतू । बळें आगळा पैल जो जांबवंतू ॥ ७७ ॥
उतावीळ मारावया दैत्य पाहें । महा वीर बीभीषणू शोभताहे ॥
तयें सांगतां रावणा दुःख जालें । असंख्यात कोपानळें दग्ध केलें ॥ ७८ ॥
करीं खंड्ग घेऊनियां सारणाला । प्रसंगीं तये शीघ्र मारूं निघाला ॥
म्हणे सारणू जी पिडा कां करीतां । मुखें बोलिलों सर्व ही सत्य वार्ता ॥ ७९ ॥
तुळाया दळें पाठवीलें भुपाळें । रिपूचीं दळे पाहिलीं तीं विशाळें ॥
तया सारिखें बोलिलों सत्य भावें । समर्था पुढें मिथ्य कैसें वदावें ॥ ८० ॥
प्रभू आमुचा कोण अन्याय जाला । खरें सांगतां कोप येतो तुह्मांला ॥
नसे पाहतां अल्प अन्याय कांहीं । नसे मिथ्य आम्ही नसों स्वामि द्रोही ॥ ८१ ॥
पुढें रावणू कोप सांडून ठेला । पुसे आदरें मंत्र माहोदराला ॥
सुवेळाचळा कोण रे पाठवावा । रिपूचा विवेकें बरा शोध घ्यावा ॥ ८२ ॥
वदे वीरू माहोदरू रावणातें । सुवेळाचळा पाठवा शार्दुलातें ॥
महा धूर्त हा जाणतो सर्व मत्तें । बळें शीघ्र तूळील रीपू-दळातें ॥ ८३ ॥
पुढें दैत्य बोलाविला आदरेंशीं । म्हणे सैन्य पाहोनि यावें त्वरेशीं ॥
अलंकार देऊनियां तोषवीला । बळें हेर तो शीघ्र जाऊनि आला ॥ ८४ ॥
नमस्कारिला राव तो आदरेशीं । म्हणे रावणू म्लान कां दीसतोशी ॥
अधोमूख राहोनि शार्दूल बोले । म्हणे हो कपी काळ जैसे उदेले ॥ ८५ ॥
बहू दाटलीसे असंभाव्य सेना । नसे रीघ तेथें कदां जाववेना ॥
परी मी तयांमाजि तैसाच गेलों । बहू ताडिलों पाडिलों कुस्त केलों ॥ ८६ ॥
निरोपें तुझ्या शीघ्र गेलों सुरारी । रूपें जाहलों वानरू वेष-धारी ॥
मला हिंडतां हिंडतां थोर मानें । पुढें लक्षिलें धूर्त बीभीषणानें ॥ ८७ ॥
कपी धांवले दूत त्या सुग्रिवाचे । पुरोहीत चत्वारि बीभीषणाचे ॥
धरूनी मला चालवीलें त्वरेशीं । पुढें चालतां देखिलें राघवासी ॥ ८८ ॥
म्हणे धन्य तो रामराजा दयाळू । मला देखितां शीघ्र सोडी नृपाळू ॥

---

९ केतु=निशाण, बावटा. १० खड्ग=तरवार.

मनीं माझिये वाटतें निश्चयेशीं । रघूनायका भेटवावें सितेसी ॥ ८९ ॥
समाचार तो सर्वही श्रूत केला । तया सांगतां रावणा क्रोध आला ॥
पुढें राक्षसें शीर केलें रिपूचें । वनीं चालिला सत्व घ्याया सितेचें ॥ ९० ॥
अशोकीं वसे जानकी भूमि-बाळा । वदे रामनामावळी सत्वशीळा ॥
पहा रावणें शीर मायीक केलें । छळाया सिते कारणे शीघ्र नेलें ॥ ९१ ॥
म्हणे रावणू व्यर्थ त्वां धीर केला । रणीं दीर भर्तार तूझा निमाला ॥
कपी राक्षसांतें महा मार जाला । प्रहस्तू जयो शीघ्र घेऊनि आला ॥ ९२ ॥
रिपू सांगतां ते भयातूर जाली । भयें जानकी शोक-सिंधूं [11] बुडाली ॥
शिरें देखतां मूर्च्छना शीघ्र आली । देहे सांवरेना भुमी अंग घाली ॥ ९३ ॥
भविष्योत्तरें [b] बोलिलीं वाल्मिकाचीं । म्हणे कायसा बोलिला तो विरिंची [12] ॥
पहा आजि तें सर्व ही [c] व्यर्थ जालें । कृतांतापुढें [13] मंश्यका [14] येश आलें ॥ ९४ ॥
बहू शोक होतां देहे-भाव सांडी । म्हणे रावणू [d] सत्त्व सीता न सांडी ॥
महा प्रेत्न सायास त्यां व्यर्थ केला । पुढें शीघ्र लंका-पुरी माजि गेला ॥ ९५ ॥
दळें सिद्ध केलीं बळें लंकनाथें । प्रती-मल्ल राक्षेस चत्वार पंथें ॥
महा वीर ते सर्वही शस्त्रपाणी । बुजूं पाहती भूमि आकाश बाणीं ॥ ९६ ॥
कपी-चक्र तें ही बळें सिद्ध जालें । निळें वानरेशीं प्रतीमल्ल केलें ॥
महा वीर ते गर्जती मेघ जैसे । भुतां खेचरां थोर कल्पांत भासे ॥ ९७ ॥
सुवेळाचळा राम पाहे स्वभावें । तया मस्तकीं शृंग तें दोन गांवें ॥
नभीं लागला उंच आकाश-पंथें । म्हणे राम गा सुग्रिवा जाइं तेथें ॥ ९८ ॥
म्हणे वीर सुग्रीव आज्ञा प्रभूची । असंभाव्य सेना रिसां वानरांची ॥
महा वीर तात्काळ सर्वै मिळाले । बळें शृंग वेंघावया सिद्ध झाले ॥ ९९ ॥
कथे लागिं श्रोतीं पुढें चित्त द्यावें । म्हणे दास अर्थांतरीं वीवरावें ॥
स्वहीता कथामृत घ्यावें फुकाचें । सदां सेवितां दुःखदारिद्र्य कैंचें ॥ १०० ॥

---

## तृतीय प्रसंग.

पुढें चालिला शीघ्र तो राम राजा । कपी धांवती वीर वेष्टीत फौजा ॥
करीं हस्त घेऊनि बीभीषणाचा । बळें वेंघले शृंग त्या पर्वताचा ॥ १ ॥
कितीएक ते राहिले भार मागें । बळें वेंघती शृंग तो लागवेगें ॥
पुढें शीघ्र आटोपिलें जात जातां । मिळाले कपी राम सौमित्र माथां ॥ २ ॥
सुवेळागिरी-शीखरीं राम पाहे । अती साजिरा त्रीकुटू शोभताहे ॥

---

११ सिंधु=समुद्र. b. 'सर्व ही' पा० भे०. १२ विरिंची=ब्रह्मा. c. 'मिथ्य' पा० भे०. १३ कृतांत=यम. १४ मश्यक=घुंगुर्डे. d. 'सत्य' पा० भे०.

उभा रावणू गोपुरीं थोर धीट । तियें पावला सुग्रिवाचा चपेट ॥ ३ ॥
कवे घातली पेटला शीघ्र कोपा ! बळें रावणू ताडिला चंड थापा ॥
बळें झोडिलीं तोडिलीं दिव्य छत्रें । म्हणे जानकी आणिली या कुपात्रें ॥ ४ ॥
पुढें देखतां रावणा कोप आला । पदीं झाडिलें ताडिलें सुग्रिवाला ॥
मदें मातले दूर टाकून शंका । कळा लाविली नीकरें येकमेकां ॥ ५ ॥
बहू कोपले मल्ल-युद्धासि आले । रिपू भीडतां अंग अंगीं मिळाले ॥
बळें हाणिती पृष्ठिसी वज्र मुष्टी । दणाणीतसे त्रीकुटीं सर्व सृष्टी ॥ ६ ॥
विरश्री-बळें वीर झोंबीस आले । झडा चांचरा भूतळा माजि गेले ॥
पुढें रावणें देह संकोचवीलें । अनर्थास भीऊनि गंतव्य केलें ॥ ७ ॥
कपीनाथ तो येश घेऊनि आला । रिपू-गर्व हो सर्व ही भग्न केला ॥
नमस्कारिलें राघवा ते प्रसंगीं । कपी-भार ते सर्व आनंद-संगीं ॥ ८ ॥
कपीशीं सुवेळाचळा राम आला । असंभाव्य तो वीर-मेळा मिळाला ॥
दळें e भूतळीं लोटले भार सैरा । पुढें आणिलें राज-नीती विचारा ॥ ९ ॥
कपी शोधितां शोधितां लक्ष कोटी । तया माजि हा अंगदू वीर जेठी ॥
बळें आगळा दक्ष चातुर्य जाणे । वयें अल्प लावण्य तारुण्य बाणे ॥ १० ॥
स्तुती-उत्तरीं राम बोले तयासी । म्हणे धन्य गा अंगदा गुणराशी ॥
मिळालासि तूं आमुच्या स्नेह-वादा । विवेकें तुवां सोडिलें पित-द्वंदा ॥ ११ ॥
बहूतां परी राघवें गौरवीला । तेणें शोभला शीघ्र ऊदीत जाला ॥
प्रती-उत्तरें अंगदें स्तूति केली । उभा दृष्टि हे राम-पायीं च ठेली ॥ १२ ॥
पुढें आपुला विक्रमू वाड बोले । महावीर ते सर्व चक्कीत जाले ॥
तया अंगदा थोर आवेश आला । तेणें राघवा थोर संतोष जाला ॥ १३ ॥
म्हणे रामराणा तया अंगदासी । त्रिकूटाचळीं भेटरे रावणासी ॥
तया सांग रे भीम पूर्षार्थ माझा । वदे सर्व संहारिशी कोण काजा ॥ १४ ॥
प्रसंगोत्तरें अंगदा त्वां वदावें । बहूतां परी रावणा बोधवावें ॥
सिताकारणीं युद्ध मागून घ्यावें । परी शेवटीं भाग तोडून यावें ॥ १५ ॥
नमस्कारिलें त्या रघूनायकाला । समस्तांसि सन्मानिलें सिद्ध जाला ॥
कपी राम आज्ञेसि घेऊनि माथां । उडाला बळें चालिला ¹⁶व्योम-पंथा ॥ १६ ॥
नभा माजि झेंपावला वेग केला । बळें शीघ्र लंकापुरीमाजि गेला ॥
अकस्मात खालावला व्योम-पंथें । रिपूची सभा बैसली भीम जेथें ॥ १७ ॥
पुढें पावला तो सभेमाजि कैसा । कपी राक्षसां भासला काळ जैसा ॥
रिपू शस्त्र-पाणी बळें सिद्ध जाले । उगे सर्व कोणासि कोणी न बोले ॥ १८ ॥

e. 'बळें' पा॰ भे॰. १५ द्वंद=तंटा. १६ व्योम=आकाश.

कपीनें सभा सर्व अमान्य केली । पुढें रावणू लक्षिला भेटि जाली ॥
मनीं पाहातो तों रिपू *उच्च होतो । महापुच्छसिंहासनीं बैसला तो ॥ १९ ॥
रिपू सर्व ही बैसले स्तब्ध जाले । तयां लागिं हा अंगदू काय बोले ॥
पुढें बोलतां बोलतां येरयेरां । बहूसाल धिःकारिलें थोरथोरां ॥ २० ॥
बहूतां परीच्या बहू शब्द-याती । महा वीर तोंडागळे गर्जताती ।
रिपू घोर तो आपुलाल्या [17]वेगैत्रें । बळें मातले हाणिती शब्दशस्त्रें ॥ २१ ॥
बहू बोलती बोल नाना परीचे । महा युक्तिचे भक्ति संख्या रसाचे ॥
तया बोलतां मातला शब्द-सिंधू । असंख्यात संख्या नसे तो [18]अगाधू ॥ २२ ॥
बहूतां परी रावणू बोधवीला । परी नायके मानसीं गर्व केला ॥
ह्मणे काय रे पाहतां घ्या कपीला । महा वीर तो अंगदू आक्रमीला ॥ २३ ॥
कपीनें बळें थोर उड्डाण केलें । सभामंडपा मस्तकीं शीघ्र नेलें ॥
रिपू घोर ते ही भयातूर जाले । घिराचे बहू स्तंभ झोकें उडाले ॥ २४ ॥
विरें अंगदें त्रीकुटीं ख्याति केली । नभीं अंतराळीं बळें झेंप गेली ॥
बळाचे भुजीं मल्ल राक्षेस कैसे । गळाले तळीं मारिले सर्प जैसे ॥ २५ ॥
पुढें अंगदू भेटला रामचंद्रा । नमस्कारिलें आदरें त्या नरेंद्रा ॥
कपी f सर्व ही तो समाचार सांगे । म्हणे शत्रुचा गर्व-ताठा न भंगे ॥ २६ ॥
बहू बोलिलों जी तया रावणासी । परी नायके मातला गर्व-राशी ॥
भिजेना जळा माजि पाषाण जैसा । धरीना मनीं सांगतां शब्द तैसा ॥ २७ ॥
बहूसाल त्या रावणें गर्व केला । रघूनायका कोप तात्काळ आला ॥
म्हणे राम गा सुग्रिवा ये प्रसंगीं । त्रिकूटाचळू पालथा घालिं वेगीं ॥ २८ ॥
कपींद्रू वदे शीघ्र सेनापतीला । निळें सर्व सैन्यास संकेत केला ॥
बळें चालिलीं तीं दळें वांनरांचीं । अयूधें करीं शैल-शृंगादिकांचीं ॥ २९ ॥
कपी क्षोभले गर्जती मेघ जैसे । बळें भार ऊठावले शीघ्र तैसे ॥
महा घोर घोषें भुमी-कंप जाला । त्रिकूटाचळा थोर कल्पांत आला ॥ ३० ॥
हुडे कोट आटोपिले लंकनाथें । कपीभार झेंपावले व्योम-पंथें ॥
महायुद्ध आरंभिलें येकमेकां । बळें घेतली वानरीं शीघ्र लंका ॥ ३१ ॥
त्रिकूटाचळीं वानरीं वेग केला । कपीराक्षसांतें महामार जाला ॥
बहू कोपले वीर ते चंडकोपा । बळें हाणिती मस्तकीं वज्रथापा ॥ ३२ ॥
[19]ग्रिवीं तोडिती मोडिती [20]पंजैरातें । कपी झोडिती पाडिती वृक्षघातें ॥
रिपू भांडतां g थोर आवेश पोटीं । बळें वोढिती हात घालोनि [21]झोटीं ॥ ३३ ॥

---

* 'तुच्छ' पा० भे०. १७ वगत्र, वक्त्र=तोंड. १८ अगाध=खोल. f. 'वर्तला' पा० भे०. १९ ग्रीवा=मान, कंठ. २० पंजर=हाडांचा पिंजरा. g. 'भीडती' पा० भे०. २१ झोटी=शेंडी, केश.

कपी कोपले गर्जती युद्ध-काळीं । शिळा टाकिती पाडिती दुर्ग-पौळी ॥
गिरी हाणिती थोर नेटें धडाडी । बळें लागतां दिव्य लंका घडाडी ॥ ३४ ॥
त्रिकूटाचळीं लोटली सर्व सेना । असंभाव्य ते भार लंका दिसेना ॥
कपी क्षोभले गर्जती काळ जैसे । दळेंशीं बळें धांवती वीर तैसे ॥ ३५ ॥
दळें पायिचीं थोर[h] अश्वा गजांचीं । रणीं चालिलीं दाट थाटें रथांचीं ॥
बहू भार शृंगारिले राक्षसांचे । महा वीर ते घोर नाना परीचे ॥ ३६ ॥
रणीं पातली ते [i]भयातूर सेना । रजें मातली चंद्र-सूर्यो दिसेना ॥
बहूसाल वाद्यें बहूतां परीचीं । महा कर्कशें वाजती राक्षसांचीं ॥ ३७ ॥
समारंगणीं चालिल राजभारें । दळें दाटलीं वानरांचीं अपारें ॥
बळें हाणिती येकमेकां धबाबां । झरे लागले शोणितां[२३]चे थबाबां ॥ ३८ ॥
पुढें धांविले पायिचे शस्त्रधारी । जयां देखतां रोमें[२४] आंगीं थरारी ॥
कपी राक्षसांतें महा मार जाला । तेणें शोणिताचा नदी पूर आला ॥ ३९ ॥
रणीं तोडिती वीर वीरां धसासां । भगाडें बहू पाडिती ते घसासां ॥
बळें टोंचिती शूळ पोटीं भसासां । शिरें फोडिती मुष्टि–घातें ठसासां ॥ ४० ॥
पुढें झुंझतां भार तो मृत्यु पावे । करीती बळें वीर मागें उठावे ॥
कपी कोपले थोर काळाग्नि जाले । रिपू पायिचे सर्व ही भग्न केले ॥ ४१ ॥
निमाले रणीं देह त्या पायिच्यांचे । बळें ऊठले भार त्या रौंउतां[२५]चे ॥
देहे टाकिती झुंझती स्वामि-काजा । पुढें धांवती वीर मागील फौजा ॥ ४२ ॥
कपी झुंझतां भंगल्या अश्व-याती । रणीं लोटलीया बळें भद्र[२६]जाती ॥
गिरी सारिखे थोर कोकोट घोषें । गर्जी वानरां त्रासिलें हो विशेषें ॥ ४३ ॥
कपीराज ते हाणिती मत्त हस्तें । बळें झोडिती कुंजरें[२७] खस्त व्यस्तें ॥
दळें पायिचीं अश्व–रत्नें अपारें । रणीं पाडिलीं कुंजरें थोर थोरें ॥ ४४ ॥
कळेना महा मार त्या वानरांचा । रथीं[j] थोर संहार केला गजांचा ॥
तया पृष्ठिभागीं पुन्हा भार आले । रिपू वनारीं सर्व संहार केले ॥ ४५ ॥
पुढें चालिले भार नाना रथांचे । बहू बाण जाळें कपी-सैन्य खोंचे ॥
रणीं धांवती चक्र चाली घडाडां । [k]करीं टाकिती चंडशीळा धडाडां ॥ ४६ ॥
रथी सारथी सर्व ही चूर्ण केले । महा वीर ते [l]भार मागूनि आले ॥
रणीं राक्षसांतें क्षयो प्राप्त जाला । जयो वानरां शीघ्र टाकून आला ॥ ४७ ॥
रणीं मारुतें पाडिला जंबुमाळी । सुखेणें विदूणा पुढें ते चि काळीं ॥

---

h. ‘अश्वरत्नें’ पा० भे०. i. ‘भयासूर’ पा० भे०. २३ शोणित=रक्त. २४ रोम=केश, लोम, कांटा. २५. राउत=घोडेस्वार. २६ भद्रजाती=हत्ती. २७ कुंजर=हत्ती. j. ‘रणीं’ पा० भे०. k. ‘कपी’ पा० भे०. l. ‘मागुनी शीघ्र’ पा० भे०.

विरें सुग्रिवें क्षिप्र भट्टांशि द्वंद्वें । बळें झोडिलें वज्र मुष्टीस मैंदें ॥ ४८ ॥
द्विवीदा करें वज्रस्पर्शू निमाला । नळें ताडिलें शीघ्र [m]प्रातीपनाला ॥
रणीं लक्ष्मणें भेदिलें वीरुपाक्षा । चतुर्थांशि रामें शरें एक शिक्षा ॥ ४९ ॥
दळीं राक्षसांचे हाहाकार जाला । दळेंशीं बळें वीरुपाक्षू निमाला ॥
कपी राक्षसांची बहूसाल सेना । रणीं माजलें युद्ध तें वोहटेना ॥ ५० ॥
निशी प्राप्त जाली रणीं घोर मारें । महा वीर ते झुंझती अंधकारें ॥
बळें हाणती कोण कोणा कळेना । विरश्री-बळें मातले ते ढळेना ॥ ५१ ॥
पुढें शीघ्र चंद्रोदयो शुद्ध जाला । दिसों लागले राक्षसां वानरांला ॥
रिपू हाणती येक मेकां कडाडां । नद्या वाहती शोणिताच्या भडाडां ॥ ५२ ॥
[n]कपी वीर चंद्रोदयाच्या उजेडें । बळें हाणती एकमेकां निवाडें ॥
दळें भांडती राक्षसां वानरांचीं । असंभाव्य भ्यासूर प्रेतें विरांचीं ॥ ५३ ॥
कपी तापले कोपले वीर जेठी । बळें ताडिले दैत्य कोट्यानुकोटी ॥
समारंगणीं आटली सर्व सेना । रणीं राक्षसां येश येतां दिसेना ॥ ५४ ॥
क्षयो प्राप्त जाला बहू राक्षसांतें । पुढें युद्ध आरंभिलें इंद्रजीतें ॥
दिसे पाहतां सर्व ही येश गेलें । तया राक्षसें शीघ्र कापट्य केलें ॥ ५५ ॥
अकस्मात तो इंद्रजीतू उडाला । नभोमंडळीं [28]रावणी गुप्त जाला ॥
पुढें घोर नीशाचरें ते चि काळीं । कपी पाडिले सर्व ही सर्प-जाळीं ॥ ५६ ॥
बहू सर्प झेंपावले व्योम-पंथें । बळें धांवती वानरी सैन्य जेथें ॥
महा काळ कर्कोट नाना परीचे । रणीं पाडिती भार [29]गोळांगुळांचे ॥ ५७ ॥
कपींची पडों लागली सर्व सेना । पुढें पाहतां युद्ध-कर्ता दिसेना ॥
गमे सर्व आकाश [30]व्याळें विखारीं । बळें झोंबती सर्प-कूळें जिव्हारीं ॥ ५८ ॥
कपी-भार ते सर्व निर्जीव जाले । निचेष्टीत ते राम-सौमित्र केले ॥
रिपू पाडिले थोर आनंद जाला । पुढें शीघ्र लंकापुरी माजि गेला ॥ ५९ ॥
नमस्कारिला राव तो आदरेशीं । तेणें पुत्र आलिंगिला सौख्य-राशी ॥
अती आदरें सुंदरें रम्य सारें । पिता अंगिचीं दे अलंकार [31]चीरें ॥ ६० ॥
म्हणे हो रणीं शांति केली रिपूंचीं । बळें सर्व ही त्या रिसां वानरांचीं ॥
बहूतां परी राव संतोषवीला । निरोपें चि तो भूवना माजि गेला ॥ ६१ ॥
बहू सूख जालें तया रावणाशीं । तेणें शीघ्र पाचारिलें त्रीजटेशीं ॥
म्हणे हो विमानीं सिता बैसवावी । रिपू मारिले शीघ्र तेथें चि न्यावी ॥ ६२ ॥
रणीं पाडिले ते तये दाखवावे । सिता वीट मानील ऐसें करावें ॥

m. 'प्रेतानलाला' पा० भे०. n. 'रणीं' पा० भे०. २८ रावणी=रावणाचा पुत्र. २९ गोळांगुल=वानर. ३० व्याल=साप. ३१ चीर=वस्त्र.

बहूतां परी रावणें शीकविली । वना माजि ते त्रीजटा शीघ्र गेली ॥ ६३ ॥
पुसे जानकी ते तया त्रीजटेला । सभामंडपीं कोण वृत्तांत जाला ॥
म्हणे त्रीजटा सोडिं चिंता स्वभावें । रणामंडळा राज-आज्ञेस जावें ॥ ६४ ॥
अहो जानकी दुःख चिंतीन तूंतें । तरी देह माझा पडो वज्र-घातें ॥
म्हणे सोडिं चिंता सिते सर्व कांहीं । तया लंकनाथा जयो प्राप्त नाहीं ॥ ६५ ॥
सिता ऐकतां शोक सांडूनि ठेली । तये त्रीजटेची बहू स्तूति केली ॥
पुढें बैसल्या शीघ्र दोघी विमानीं । रणामेदिनी पावल्या घोरवाणी ॥ ६६ ॥
पुढें पाहतां लक्ष कोट्यानुकोटी । रणीं पाडिले हुंबती वीर जेठी ॥
धडें तूटलीं राक्षसां वानरांचीं । शिरें दाटलीं घोर माहा विरांचीं ॥ ६७ ॥
भयासूर हा घोर संहार जाला । रणीं राक्षसां वानरां अंत आला ॥
असंभाव्य उत्पाटिले वृक्ष जैसे । रणीं भग्न केले महा वीर तैसे ॥ ६८ ॥
असंभाव्य ते तूटले पादपाणी । धडें मस्तकें थोर विक्राळवाणी ॥
बहू जाहली मेदँमांसें चिडाणी । महा दर्प ते माजली वरढाणी ॥ ६९ ॥
रणीं येक ते छेदिले सर्व अंगीं । तेणें काळिजें दीसती पृष्ठि-भागी ॥
शिरें तोडिलीं मेंदु नीघे बरारां । बहू घाय ते रक्त वाहे झरारां ॥ ७० ॥
कितीएक ते वीर जाले उताणे । किती पालये दीसती दैन्य वाणे ॥
कितीएक ते वीर घालूनि मेटें । भुमि पीटिती थोर दुःखें ललाटें ॥ ७१ ॥
कितीएक भूमी वमीती अँशुद्धें । कितीएक ते मोडले माज मध्यें ॥
कितीएक ते वीर चैारंग जाले । कितीएक ते दूधडी भग्न केले ॥ ७२ ॥
कितीएक ते मुंडकीहीन जाले । कितीएक वक्षस्थळीं चूर्ण केले ॥
कितीएक तीं तूटलीं जानु घोटीं । कितीएक ते कंठ बोटीं ललाटीं ॥ ७३ ॥
कितीएक वोटारिती तीव्र डोळे । निघाले बहू पोटिंचे मांस-गोळे ॥
पितें चारटें फोफसें रक्त मेंदू । शिसें० आंतडीं कातडीं मूळ कंदू ॥ ७४ ॥
कितीएक जालीं शिरें चूर चेंदा । बहू दाटलासे रणीं रक्त-रेंदा ॥
कितीएक हुंकारिती दैन्यवाणी । कितीएकp ते मागती अन्न-पाणी ॥ ७५ ॥
कितीएक ते खूडिती पाद-पाणी । कितीएक ते शब्द कारुण्य वाणी ॥
कितीएक ते दंशिती भूमि दंतीं । कितीएक ते लागले मृत्यु-पंथीं ॥ ७६ ॥
शिरें राक्षसांचीं धडें वानरांचीं । रणीं लागलीं एकमेकां विरांचीं ॥
विरा शकटा कुंजरां-घोडियांचीं । रिसां वानरां सर्व इत्यादिकांचीं ॥ ७७ ॥
नदी शोणिताचे महापूर जाती । धडें कोथळे फूगले वाहताती ॥

---

३२ मेद=चरबी. ३३ अशुद्ध=रक्त. ०. 'किती' पा० भे०. p. 'घोरती' पा० भे०.

शिरें पाद-पाणी बहू मांस-माळा । धनू खेटकें[३४] भातड्या त्या विशाळा ॥ ७८ ॥
गिधें श्वापदें तीं असंभाव्य आलीं । स्वइच्छा बहू मांस भक्षूं निघालीं ॥
भुतें सर्व ही औटं[३५] कोटी मिळालीं । बहूतां परींचीं बहू तृप्त जालीं ॥ ७९ ॥
पुढें जानकी बोलिली त्रीजटेशीं । रणीं पाडिले सर्व ही [q]वानरांशीं ॥
महा वीर ते कोण वेळा तयांतें । म्हणे त्रीजटे दाखवीं सर्व मातें ॥ ८० ॥
रणीं त्रीजटा दाखवी जानकीशीं । महा वीर ते पाडिले नाग-पाशीं ॥
दिसे राम सौमित्र तो ही निमाला । पुढें जानकीनें महा शोक केला ॥ ८१ ॥
बहूतां परी जानकी शांत केली । तये त्रीजटा शीघ्र घेऊनि गेली ॥
समाचार सांगे तया रावणाला । वना माजि आली सिता रक्षणाला ॥ ८२ ॥
कपी सर्व ही पावले मृत्यु-पंथू । जिती मारुती आणि नैर्ऋत्य-नाथू ॥
जया लागिं जाली दया राघवाची ॥ पहाया तया शक्ति काळाशि कैंची ॥ ८३ ॥
रणें शोधिलीं सर्व बीभीषणानें । विरां लागिं अश्वासिलें थोर मानें ॥
पुढें दृष्टिनें पाहिलें राघवानें । गरुडास्त्र नीरूपिलें व्योम जानें ॥ ८४ ॥
तया लागिं प्रायोजिलें शीघ्र पंथें । असंभाव्य झेंपावले व्योम पंथें ॥
उड्या घालिती पक्षि[r] कूळें झडाडां । बळें तोडिती सर्प कूळें तडाडां ॥ ८५ ॥
विहंगीं तिहीं सर्प संहार केला । कपी-भार तो मोकळा सिद्ध जाला ॥
गिरी-शीखरीं सर्व सेना घडाडी । त्रिकूटा चळीं घोष तेणें धडाडी ॥ ८६ ॥
म्हणे रावणू थोर आश्चर्य जालें । कपी-चक्र तें सर्व निर्जीव केलें ॥
सुतें वैरियां दाविली थोर ख्याती । रणीं मागुती ते कपी गर्जताती ॥ ८७ ॥
रणीं शत्रु जिंकील धूम्राक्ष नामा । तया पाठवीजे प्रभू सार्व-भौमा ॥
पुढें मंत्र ऐकोऽनका[s] मंत्रियांचा । वदे रावणू आदरें त्याशि वाचा ॥ ८८ ॥
म्हणे गा विरा शीघ्र तूं ये प्रसंगीं । रिपू लागिं मारावया जाय वेगीं ॥
अलंकार देऊनियां तोषवीला । महा वीर धूम्राक्ष युद्धा निघाला ॥ ८९ ॥
रणीं वीर धूम्राक्ष तो वज्रदंष्ट्री । तिजा अंकपू चालिला भार पृष्ठी ॥
रणामंडळीं थोर संहार केला । पुढें राक्षसांतें क्षयो प्राप्त जाला ॥ ९० ॥
बहू युद्ध केलें तया राक्षसानें । महावीर धूम्राक्ष त्या अंकपानें ॥
बळें दोघँ ही मारिले मारुतानें । रणीं वज्रदंष्ट्री[t] तया अंगदानें ॥ ९१ ॥
महा वीर ते झुंजतां भग्न जाले । बहूसाल घायाळ धाकें पळाले ॥
तिहीं सर्व सांगितली युद्ध-वार्ता । तेणें रावणा मानशीं थोर चिंता ॥ ९२ ॥
रणीं राक्षसांतें क्षयो प्राप्त जाला । प्रहस्तू पुढें शीघ्र युद्धा निघाला ॥

---

३४ खेटक=ढाल. ३५ औट=साडे तीन. q. 'नागपाशीं' पा० भे०. r. 'पक्षवातें' पा० भे०. s. 'ऐकूनियां' पा० भे०. t. 'वज्रदंष्ट्री' पा० भे०.

कपी राक्षसां थोर संहार जाला । निळें झोडिला पाडिला भग्न केला ॥ ९३ ॥
पुढें रावणू चालिला लाग वेगें । तया लागिं मंदोदरी नीति सांगे ॥
न मानीत तो चालिला आंवरेना । बळें लोटली ते असंभाव्य सेना ॥ ९४ ॥
महा वीर झुंझार ते भार आले । बहूसाल शृंगार-मंडीत जाले ॥
बळें पुत्र-प्रधान-मेळा मिळाला । रणामंडळा रावणू शीघ्र आला ॥ ९५ ॥
बहू त्रासिलें सैन्य गोळांगुळांचें । रिपू-बाण-जाळें वहू सैन्य[५] खोंचे ॥
महा वीर ते ही बळें भग्न केले । पळाले कपी राघवा आड गेले ॥ ९६ ॥
बहू त्रासिलों राक्षसांचेनि बाणीं । कपी-भार ते बोलिले दैन्य वाणी ॥
चळें कांपती खोंचती देति धापा । बळें रक्षिं गा राघवा मायबापा ॥ ९७ ॥
तया देखतां राम कार्मूक[३६] वोढी । पुढें शीघ्र सौमित्र तो हात जोडी ॥
म्हणे वीर तो स्थीर व्हावें समर्थें । करी तों बळें भग्न त्या रावणातें ॥ ९८ ॥
रणीं रावणा वीर सामर्थ्य नेलें । नटे नीळ माया तया भग्न केलें ॥
पुढें शीघ्र पाचारिलें रावणाला । महा वीर सौमित्र युद्धा निघाला ॥ ९९ ॥
सुमित्रा-सुता रावणा युद्ध आतां । पुढें देइजे आदरें चित्त श्रोतां ॥
म्हणे दास हा वीर कोदंड-पाणी । रणीं रावणा लागिं त्रासील बाणीं ॥ १०० ॥

प्रसंग ३ रा समाप्त.

---

## चवथा प्रसंग प्रारंभ.

दशाशीर सौमित्र युद्धा निघाले । समारंगणीं वीर सन्मूख जाले ॥
महा वीर संग्राम आवेश पोटीं । पुढें देखिलें येकमेकांसि दृष्टी ॥ १ ॥
बहूसाल धिःकारिलें येरयेरां । बहू सोडिलीं बाण-जाळें सरांरां ॥
दळीं टाकिती थोर शस्त्रें शरांचीं । बळें तोडिती येकमेकां विरांचीं ॥ २ ॥
रणीं भीडतां हाणिती एकमेकां । म्हणे रावणू वीर[६] हा थोरु नीका[३७] ॥
पुढें शक्ति काढूनियां ब्रह्मयाची । बळें सोडिली वोळि विद्युल्लतेची ॥ ३ ॥
शरें वारितां बैसली शक्ति अंगीं । रणीं वीर सौमित्र तो देह त्यागी ॥
पुढें धांवला रावणू शीघ्र तेथें । बळें ताडिता जाहला मुष्टि-घातें ॥ ४ ॥
तया देखतां मारुती कोप आला । अकस्मात तो व्योम[३८]-पंथीं उडाला ॥
कठोरें करें ताडिलें वज्रमुष्टी । वमूं[३९] लागला रावणू रक्त सृष्टी[४०] ॥ ५ ॥
रिपू रावणू मागुता शीघ्र गेला । पुढें लक्ष्मणू ऊठला स्वस्थ जाला ॥

---

५. 'साल' पा० भे०. ३६ कार्मुक=धनुष्य. ६. 'लक्ष्मणू वीर' पा० भे०. ३७. नीका =चांगला. ३८. व्योम=आकाश. ३९. वमूं=ओकूं. ४०. सृष्टि=प्रवाह.

पुन्हा[b] रावणू कोपला काळ रूपी । विरां राक्षसां माजि चंड प्रतापी ॥ ६ ॥
दहा मस्तकीं त्या दहा दिव्य छत्रें । पताका बहू [४१]मत्स्य[c] [४२]मार्तंड-पत्रें ॥
महां वैभवेंशीं रथा रूढ जाला । तया मागुती थोर आवेशु आला ॥ ७ ॥
बहू बाण जुंबाड वाहोनि पृष्टीं । दहा ही धनुष्यें करीं दृढ मुष्टी ॥
करूं लागला मागुती बाण वृष्टी । रघूनायकें देखिलें त्यासिं दृष्टी ॥ ८ ॥
उभा राहिला राम वज्रांग ठाणें । करीं सज्जिलें चाप चंद्रार्ध-बाणें ॥
दहा हेमें[४३] मुगूट छत्रें धनुष्यें । बळें तोडिलीं पाडिलीं तीं निमेषें[४४] ॥ ९ ॥
पुढें रावणू तो भयातूर जाला । बहूतां परी राघवें शीकवीला ॥
म्हणे जाइं रे रक्षिलें आजि तूला । रिपू प्राण घेऊनि तैसा पळाला ॥ १० ॥
महा मेघनादू असे नाम ज्यासीं । पळे लंकनाथा सवें तो त्वरेशीं ॥
तया सारिखीं मूढ मूढें मिळालीं । रणीं भ्रष्टलीं सर्व मागें पळालीं ॥ ११ ॥
न पाहात मागें पुरी माजि गेले । विरां माजि कोणी कुणासी न बोले ॥
पुढें सर्व ही मंडपा माजि आले[d] । समस्तांशि तो रावणू काय बोले ॥ १२ ॥
भयातूर लंकापती दैन्य वाणा । म्हणे ऊठवा हो बळें कुंभकर्णा ॥
तया वीण आणीक कोणी दिसेना । रिपू घोर हा थोर संहारवेना[e] ॥ १३ ॥
पुढें धाडिले शीघ्र माहोदराला । महा घोर वाद्यें दळें सिद्ध जाला[f] ॥
कितीएक ते धीट मोठे[g] पळाले । कितीएक पोटीं भयातूर जाले ॥ १४ ॥
निजेला दरी भीतरी कुंभकर्णू । दिसे [h]काळ विक्राळ तो मेघवर्णू ॥
शरीरें भयासूर हा घोर रूपी । विरां भासला मृत्यु येमस्वरूपी ॥ १५ ॥
तया ऊठवीतां भयातूर जाले । महा वीर ते कंप अंगीं उदेले ॥
पुढें जाहले धीट ते नेट पाटें । उभीं पाहती सर्व [४५]नैऋत्य थाटें ॥ १६ ॥
बहूसाल वाद्यें बहूतां परीचीं । महा कर्कशें चंड घोर ध्वनीचीं ॥
तयाच्या पुढें जाहला एक वेळा । नभोमंडळीं नाद गेला भुगोळा ॥ १७ ॥
गदा [४६]तोमरें हाणती वज्र घातें । महा मार आरंभिला राक्षसांतें ॥
कळा लाविती टाकिती वृक्ष नाना । गळाले परी कुंभकर्णू उठेना ॥ १८ ॥
शिळा टाकिती टोंचिती शूळ शस्त्रें । महा घोष संपूर्ण तो कर्ण पात्रें ॥
बळें लोटले मस्त ते हस्ति वेगीं । शरीरावरी चालती ते प्रसंगीं ॥ १९ ॥
विरा ऊठवाया बहू यत्न केला । परी नूठतां सर्वही व्यर्थ गेला ॥

---

b. 'पुढें' पा० भे०. ४१ मत्स्य=मासा. c. 'दिव्य' पा० भे०. ४२. मार्तंड=सूर्य. ४३. हेम=सोनें. ४४. निमेष=अत्यल्प काळ. d. 'गेले' पा० भे०. e. 'नीवारवेना' पा० भे०. f. दळेंशीं निघाला' पा० भे०. g. 'मागें' पा० भे०. h. 'वीर' पा० भे०. ४५ नैऋत्यथाट=राक्षसमंडळी. ४६. तोमर=शस्त्रविशेष.

तया मारितां हिंपुटे वीर जाले । उठेना महा वीर सर्वे गळाले ॥ २० ॥
नव्हे कार्य तेणें बहूसाल शंका । पुढें बोलती वीर ते यकमेकां ॥
उठेना महा वीर कसें करावें । तयीं अंतरीं जाहलें वर्म ठावें ॥ २१ ॥
तया किन्नरी रम्य गाती विशेषें । अलापें [i]कळा वीरती तोय जैसें ॥
जयांचेनि नट्टांग लावण्य-वेषें । मनीं होय शक्रादिकां काम-पीसें[47] ॥ २२ ॥
तयां लागिं बोलाविलें आदरेशीं । पुढें आलिया [j]गायकी स्वर्ग-वासी ॥
करीं टाळ मृदंग यंत्रें उपांगें । बहू गीत संगीत तें राग रंगें ॥ २३ ॥
सुखें भोगिती देव त्या गायनाचीं । मनें धांवती ऊर्ध्व शेषादिकांचीं ॥
सुधा सेवितां त्या पुढें वीष वाटे । खरा सुस्वरें अमृतानंद लोटे ॥ २४ ॥
तेथें गायनाची कळा रम्य जाली । तेणें कुंभकर्णाशिं जागृति आली ॥
भुकेला दिसे बैसला काळ जैसा । बहू भक्षिलें शोणितीं[48] मेद[49]मांसा[k] ॥ २५ ॥
रिपू सिद्ध होऊनि लंकेंत चाले । कपी देखतां ते भयातूर जाले ॥
उभा राहतां शीर बाहेर आलें । रघूनायकें थोर आश्चर्य केलें ॥ २६ ॥
पुसे आदरें राम बीभीषणाला । महावीर हा कोण हो सिद्ध जाला ॥
कथी सर्व साकल्य तो मंत्रें[50] त्याचा । म्हणे राघवा बंधु हा रावणाचा ॥ २७ ॥
बळें आगळा वीर हा कुंभकर्ण । महा पर्वता सारिखा मेघवर्ण ॥
समारंगणीं काळ भीडों शकेना । सखा बंधु हा रावणा होय सैंना ॥ २८ ॥
पुढें कुंभकर्णू सभे माजि गेला । नमस्कारिलें भेटला रावणाला ॥
म्हणे भोगणें लागलें कर्म केलें । सिता आणितां दुःख हें प्राप्त जालें ॥ २९ ॥
मनीं भंगला राव जाणोनि तेणें । पुन्हां तोषवीला विरें कुंभकर्णे ॥
रिपू मारणें हे चि आज्ञा प्रतिज्ञा । उभा राहिला शीघ्र घेऊनि आज्ञा ॥ ३० ॥
पुढें पावला तो रणीं शीघ्र काळें । दळेंशीं बळें चालिला एक वेळें ॥
कपी ग्रासिले त्रासिले [l]घोर मारें । समारंगणीं लागले घायवारें ॥ ३१ ॥
रिसां वानरां मांडिली थोर आटी । कपी गीळिले लक्ष कोट्यानुकोटी ॥
उठे सृष्टि भक्षावया काळ जैसा । रणीं वावरे तो महा वीर तैसा ॥ ३२ ॥
रिपू भार तो भक्षिला भग्न केला । कपीनाथ[52] काखे [m]दुपाडें उडाला ॥
पुरी पावतां पावतां सुग्रिवानें । त्वरेनें पणू सिद्ध केला विरानें ॥ ३३ ॥
तया सुग्रिवें कर्ण नाशीक नेलें । पुढें पाहतां दर्पणीं दुःख केलें ॥

---

i. ‘शिळा’ पा० भे०. ४७. कामपीसें=मदनाचें वेड. j. ‘गावया’ पा० भे०. ४८. शोणित=रगत. ४९. मेद=चरबी. k. ‘मद्यमांसा’ पा० भे०. ५०. मंत्र=मसलत. ५१ सामा=धाकटा. l. ‘शूळ’ पा० भे०. ५२. कपीनाथ=सुग्रीव. m ‘उपाडी’ पा० भे०.

म्हणे व्यर्थ आतां जिणे रूप-हाणी । रणीं लोटला मागुती शूळपाणी[53] ॥ ३४ ॥
बहू कोपला वीर राक्षेस कैसा । कडाडी बळें थोर काळाग्नि जैसा ॥
कपी-वाहिनीची[54] मनीं सांडी केली । रणीं रामचंद्रा उजू धांव घाली ॥ ३५ ॥
तया राक्षसें खर्डिल्या वज्र दाढा । रणीं राघवें वाहिला चंद्र[n]-मेढा ॥
बळें [o]लागतां मेरू-मांदार फोडी । रघू[p]नायकू क्रूर तो बाण सोडी ॥ ३६ ॥
रणा माजि तें तीव्र संधान ऐसें । गिळूं लागला आदरें खाद्य जैसें ॥
बहू सोडिले बाण कोट्यानु कोटी । बळें राक्षसें घातले सर्व पोटीं ॥ ३७ ॥
सुळा सारिखे बाण पोटीं निघाले । असंभाव्य मध्यें च ते गुप्त जाले ॥
महा घोर संधान या राघवाचें । गिळीतो रणीं कोण सामर्थ्य [q]याचें ॥ ३८ ॥
महा घोर[r] त्या मुद्गलाचेनि घातें । [s]रणीं हाणता जाहला राघवातें ॥
रघूनायकें छेदिला [55]वामबाहो । भुमी चालिला शोणिताचा प्रवाहो ॥ ३९ ॥
रणीं जाहलें हस्त स[56]व्यांग ऊणें । पुढें दैत्य तो कोपला कोटि गूणें ॥
बळें ताळ उत्पाटिला वाम हस्तें । रघूनायकें तोडिलें बाण-घातें ॥ ४० ॥
बहू कोपला दैत्य सन्मूख आला । रणीं पाद छेदूनि चौरंग केला ॥
पदें वीण चाले महा सर्प जैसा । बळें ऊदरें चालिला वीर तैसा ॥ ४१ ॥
पुढें राघवें शीर छेदूनि नेलें । बहूसाल तें व्योम-पंथें उडालें ॥
रणीं कोथ[57]ळा फोडिला बाण-घातें । महा वीर तो चालिला मृत्यु-पंथें ॥ ४२ ॥
तया देखतां वीर मागें पळाले । भयें शीघ्र लंकापुरीमाजि गेले ॥
पुढें देखिला रावणू मेघवर्णू । तया सांगती पाडिला कुंभकर्णू ॥ ४३ ॥
करूं लागला रावणू शोक भारी । पुढें त्रीशिरा त्याशिं बोधें निवारी ॥
म्हणे हो रणीं आजि युद्धासि जातों । रिपू थोर सामर्थ्य याचें पहातों ॥ ४४ ॥
महावीर तो त्रीशिरा [t]प्राप्त जाला । सुतां आणिकां थोर आवेश आला ॥
करूं लागले पुत्र मंत्री प्रतिज्ञा । निघाले बळें शीघ्र घेऊनि आज्ञा ॥ ४५ ॥
महा मत्त माहोदरू सिद्ध केला । तुरंगीं नरा-अंतकू [u]स्वार जाला ॥
बहूसाल तेजाळ तें खड्[58]ग हातीं । बळें चालिले वीर ते राज-पंथीं ॥ ४६ ॥
रणीं शूर देवांतकू त्रीशिरा हा । अती काय तो वीर पारश्व माहा ॥
बळें [59]चौघे हि चौरथीं स्वार जाले । दळें लोटलीं विक्र[60]मेशीं निघाले ॥ ४७ ॥

---

५३. शूळपाणी=शूळ आहे हातीं ज्याच्या असा ( कुंभकर्ण ) ५४. वाहिनी=फौज. n. ‘ चंडमेढा ’ पा० भे०. o. ‘ मागुता ’ पा० भे०. p. ‘ रघूनाथ ऐसे बहू ’ पा० भे०. q. ‘ कैचें ’ पा० भे०. r. ‘ चंड ’ पा० भे०. s. ‘ पुढें ’ पा० भे०. ५५. वाम=डावा. ५६. सव्य=उजवा. ५७ कोथळा=पोट. t. ‘ सिद्ध ’ पा० भे०. u. ‘ सिद्ध ’ पा० भे०. ५८. खड्ग=तलवार. ५९. चौघे=( महोदर, नरांतक, देवांतक, व पारश्व.) ६०. विक्रम=पराक्रम.

निघाले बळें भार साही जणांचे । महावीर ते गर्जती विक्रमाचे ॥
रणामंडळीं पारखे वीर कैसे । दळेंशीं बळें धांवती काळ जैसे ॥ ४८ ॥
महा मार दोहीं दळीं एक जाला । कपी वीर राक्षेस कीती निमाला ॥
पुढें वानरीं घोर घातें निघातें । रणीं भग्न केलें तयां राक्षसांतें ॥ ४९ ॥
तयां देखतां लोटला दिव्य घोडा । नरां-अंतकू कोपला वीर गाढा ॥
बळें हाणतां शस्त्र वाजे घडाडां । तुटों लागले पादपाणी थडाडां ॥ ५० ॥
बहू वेग संहारिती सर्व सेना । कपी पाहती अश्व कोठें दिसेना ॥
पुढें पाहतां पाहतां लाग वेगीं । अकस्मात तें आदळे खड्ग अंगीं ॥ ५१ ॥
बहूसाल तेणें vतया वानरांच्या । ग्रिवा कापिल्या थोर माहा विरांच्या ॥
कपी-वाहिनीचा रणीं आट जाला । wभुमी लोटिले शोणितें पूर आला ॥ ५२ ॥
कपी वीर ते खोंचले भग्न जाले । महा मार देखोनि वेगेंx पळाले ॥
कितीएक ते सुग्रिवा आड गेले । पुढें अंगदें सर्व ही स्वस्थ केले ॥ ५३ ॥
उणें देखिलें धांवला शीघ्र कोपें । बळें ताडिला अश्व तो वज्र-थापें ॥
नरा-अंतकाला रणीं अंत आला । बहू मेद-मांसें भुमी गाळ जाला ॥ ५४ ॥
नरा-अंतका मारिलें अंगदानें । पुढें वीर ऊठावले घोर त्राणें ॥
रणामंडळा माजि ते शीघ्र आले । तया अंगदा ही कपी साह्य जाले ॥ ५५ ॥
करी नीळ तो युद्ध माहोदराशीं । महा वीर देवांतकू मारुताशीं ॥
भिडे त्रीशिरा पार्श्व तो ऋषभेशी । बळें झुंझती चौघे तीघां जणांशीं ॥ ५६ ॥
पुढें मांडिला थोर संहार तेथें । रणीं माजलीं तैं बहूसाल प्रेतें ॥
महावीर ते धीर संग्राम-सैरें । बळें धांवती एकमेकां पुढारें ॥ ५७ ॥
विरश्री बळें दूर टाकूनि शंका । रणीं हाणती घाय ते येकमेकां ॥
महा थोर संग्राम साही जणांचा । पुरीं पूरला अंत त्या राक्षसांचा ॥ ५८ ॥
गजारूढ माहोदरू त्या निळानें । रणामाजि देवांतकू मारुतीनें ॥
महा वीर पारश्व त्या ऋषभानें । रणीं झुंजतां पाडिले थोर मानें ॥ ५९ ॥
बळें कोपला तो अती चंडकाया । रथू लोटिला शत्रु तेणें जिताया ॥
कपी वीर ते आडवे शीघ्र आले । पुढें चालतां सर्व ही भग्न केले ॥ ६० ॥
रथीं बैसला पर्वता सारखा तो । म्हणे राम हा कोण युद्धासि येतो ॥
वदे शीघ्र बीभीषणू रम्य वाचा । रघूनायका पुत्र हा रावणाचा ॥ ६१ ॥
सखा होय सौमित्र तुह्मांसि जैसा । अतीकाय तो मेघनादासि तैसा ॥
न लेखी कपी-वाहिनीचा उठावा । तुह्मीं कीं सुमित्रा-सुतें हा वधावा ॥ ६२ ॥

---

v. 'रिसां' पा० मे०. w. 'भुमीलागिं शोणीत तो पूर आला' पा० मे०. x. 'मागें' पा० मे०.

म्हणे त्यासि पाहा बरें रावणारी । उभा राहिला शीघ्र कोदंड[61]-धारी ॥
विरश्री बळें बाणिली दिव्य शोभा । रणामंडळीं ठाण मांडूनि ऊभा ॥ ६३ ॥
पुढें राघवें ओढिला बाण जैसा । वदे आदरें वीर सौमित्र तैसा ॥
पहावें घडी येक राजीव[62]-नेत्रें । वधीतों बळें दैत्य मुहूर्त[63]-मात्रें ॥ ६४ ॥
पुढें पावला तो अती चंड काया । y बहू बोलती येकमेकां छळाया ॥
तया येकमेकांस निर्वाण जालें । शरां सोडिलें व्योम संपूर्ण केलें ॥ ६५ ॥
शरा तोडिती एकमेकां विरांचे । पुन्हा मागुती भार येती शरांचें ॥
बळें भीडती बाणबाणास कैसे । पडों लागती छेदिले सर्प जैसे ॥ ६६ ॥
शरीं राक्षसें व्योम संपूर्ण केलें । विरें लक्ष्मणें शीघ्र छेदूनि नेलें ॥
रिपू कोपला मागुते बाण सोडी । बळें वीर सौमित्र तात्काळ तोडी ॥ ६७ ॥
पुढें वीर रामानुजें ते चि काळीं । नभीं मंडपू घातला बाणजाळीं ॥
किती चूकले भार येतां शरांचे । देहे खोंचले एकमेकां विरांचे ॥ ६८ ॥
विरश्री-बळें दुःख नाहीं तयाचें । नभीं पाहती देव कौतूक त्यांचें ॥
बळें योकलीं युद्ध होतां खणाणां । तया मस्तकू डोलवी रामराणा ॥ ६९ ॥
भला रावणी[64] वीर हा चंडदेही । दुजा मानवी वीर सौमित्र तो ही ॥
महावीर दोघे रणामाजि कैसे । बळें मातले भीडती काळ जैसे ॥ ७०॥
पुढें शीघ्र सौमित्र तो वज्र-ठाणें । बळें तोडिलें शीर चंद्रार्ध-बाणें ॥
रणीं पाडिला तो अती चंडकाया । बळें लागले दैत्य मागें पळाया ॥ ७१ ॥
बहूसाल ते मृत्युपंथेंचि गेले । परी अल्प घायाळ मागें पळाले ॥
पुरी माजि जाऊन लंकापतीला । भयें सांगती सर्व संहार झाला ॥ ७२ ॥
बहू झुंजतां झुंजतां भग्न जाले । रणीं सर्व ही पुत्र-मंत्री निमाले ॥
नरां वानरांला जयो प्राप्त जाला । क्षयो रांक्षसां शीघ्र टाकूनि आला ॥ ७३ ॥
पुढें रावणू तो भुमी अंग घाली । तया ऐकतां मूर्छना शीघ्र आली ॥
शरीरीं नसे शुद्धि सर्वै उडाली । बहू दैन्यवाणी दशा प्राप्त जाली ॥ ७४ ॥
करी रावणू शोक शंकारहीतू । सभा-मंडपीं धांवला इंद्रजीतू ॥
पिता शीघ्र आलिंगिला मेघनादें । ह्मणे काय जी शीणतां व्यर्थ खेदें ॥ ७५ ॥
बहूतां परी जनकू[65] शीकवीला । म्हणे शीघ्र मारूनि येतों रिपूला ॥
तेणें रावणू शोक सांडूनि ठेला । बहूसाल सन्मानिलें त्या सुताला ॥ ७६ ॥
बहू दीस होती गळां रत्न माळा । तये पाहतां मोल थोडें भुगोळा ॥
करीं घेतली माळिका आवडीनें । सुताच्या गळां घातली तेz त्वरेनें ॥ ७७ ॥

---

६१. कोदंड=धनुष्य. ६२. राजीव=कमल. ६३. मुहूर्त=अत्यल्प काळ. y. ‘बळें’ पा० भे०. ६४. रावणी=रावणाचा पुत्र. ६५. जनक=बाप (रावण). z. ‘रावणानें’ पा० भे०.

रणा चालिला वीर संग्राम सैरा । दळेंशीं बळें लोटला भार सैरा ॥
रथां घोडियां कुंजरां [६६]मीति नाहीं । बहूसाल वाद्यें पुढें एक घाई ॥ ७८ ॥
महा वैभवेशीं रणामाजि आला । तया इंद्रजीतें रणीं होम केला ॥
[a]यथायोग्य पूर्णाहुतीचेनि तोषें । रथू दीधला अग्निवर्णू हुताशें[६७] ॥ ७९ ॥
रथू तोमरू-खड्ग-बाणीं विराजे । वरी रावणी तो महा वीर साजे ॥
उडाला रथेंशीं बळें अंतराळें । असंभाव्य सोडी तळीं बाण-जाळें ॥ ८० ॥
बळें सूटले बाण त्या राक्षसाचे । बहू खोंचले भार गोळांगुळांचे[६८] ॥
[b]फुटों लागले कोथळे पादपाणी । भयें बोलती वानरें दैन्य वाणी ॥ ८१ ॥
कितीएक ते वीर भेणें पळाले । पुढें जात जातांचि चौरंग केले ॥
कितीएक धाकें विरां आड जाती । अकस्मात तेथें चि ते भेदिजेती ॥ ८२ ॥
कपी-वाहिनीमाजि आकांत जाला । रणीं तो विरें वीर सर्वै निमाला ॥
सुमित्रा-सुतू बोलिला राघवाला । बहू आट जाला रिसां वानरांला ॥ ८३ ॥
पुढें बोलतां बोलतां ते चि काळीं । अकस्मात ते भेदिले बाण-जाळीं ॥
निचेष्टीत भूमी धनुष्यें गळालीं । विरें इंद्रजीतें [c] बहु ख्याति केली ॥ ८४ ॥
बळी रावणी एकला वीर जेठी । कपी पाडिले लक्ष कोट्यानुकोटी ॥
महा वीर ते धीर मेरू बळाचे । प्रतापें सुरांहूनि ते विक्रमाचे ॥ ८५ ॥
रिसां वानरां सर्व संहार केला । पुरी माजि तो येश घेऊनि गेला ॥
नमस्कार केला तया रावणाला । दळेंशीं बळें राम शत्रू निमाला ॥ ८६ ॥
रणीं सर्व ही पाडिले प्रेतराशी । बहूसाल आनंद त्या रावणासी ॥
महा सूख लंका-पुरीमाजि ऐसें । पुढें वर्तलें वानरांमाजि कैसें ॥ ८७ ॥
कपी रीस[d] ते पर्वता-तुल्य कैसे । निमाले रणीं [e]पाडिले वृक्ष जैसे ॥
तयांमाजि कल्याण दोघां जणाला । कपी मारुती आणि बीभीषणाला ॥ ८८ ॥
रणें माजलें सर्व ही प्रेतरूपी । तया माजि ते दोघे उद्विग्न[६९] रूपी ॥
विचारूनियां [७०]वन्हि-शीखा उजेडें । रणा शोधिलें सर्व [f]तिहीं निवाडें ॥ ८९ ॥
रणा शोधितां सर्व सेनेसि अंत । तयामाजि तो बोलिला जांबुवंत ॥
पुढें वीर ते शीघ्र धांवूनि आले । तया पाहतां बाण आंगीं बुडाले ॥ ९० ॥
बहूसाल तो रीस घायाळ जाला । बळी[g] बाण-जाळीं रणीं आकळीला ॥
महावीर बीभिषणें ऊठवीला । बळें बाण वोढूनियां स्वस्थ केला ॥ ९१ ॥

---

६६. मिति=गणति. a. 'तयालागिं' पा० भे०. ६७. हुताश=विस्तव. ६८. गोलांगुल=वानर. b. 'तुटों' पा० भे०. c. 'रणीं' पा० भे०. d. 'वीर' पा० भे०. e. 'डेविले' पा० भे०. ६९. उद्विग्न=दुःखी. ७०. वन्हिशिखा=विस्तवाची ज्वाला. f. 'हो तें' पा० भे०. g. 'बहू' पा० भे०.

पुढें ऋक्ष बीभीषणालागीं पुसे । महावीर ते मुख्य आहेत कैसे ॥
म्हणे जांबुवंतासि नैऋत्य-नाथू[७१] । विरा पुससी काय जाला अनर्थू ॥ ९२ ॥
महावीर दोघे निचेष्टीत जाले । [h]परी सुग्रिवादीक सर्वै निमाले ॥
रणामाजि ते शोधिली सर्व सेना । समस्तामध्यें एक तोही [i]दिसेना ॥ ९३ ॥
प्रसंगीं निरूपी यथातथ्य मातू । मनामाजि तो जांबुवंतू निवांतू ॥
म्हणे वीर बीभीषणू जांबुवंता । समस्तासि कल्याण तें सांग आतां ॥ ९४ ॥
म्हणे ऋक्ष तो मारुतीवीण कांहीं । विरां ऊठवाया दुजा प्रेत्न नाहीं ॥
क्षिराब्धी-तटीं योजनें चारि कोटी । गिरी द्रोण आणील हा वीर जेठी ॥ ९५ ॥
महा रम्य द्रोणाचळू भव्य रूपी । तया मस्तकीं औषधी दिव्यरूपी ॥
बळें आणितां ऊठती सर्व सेना । कपी मारुतीवीण दूजा दिसेना ॥ ९६ ॥
म्हणे जांबुवंतासि नैऋत्य-नाथू । असंभाव्य तूं सांगशी दूर पंथू ॥
गमे प्रेत्न हा सर्वथा ही घडेना । गिरी मारुतीचेनिही आणवेना ॥ ९७ ॥
म्हणे गा विरा काय तूं बोलिलाशी । कपी सारखा मारुता भावितोशी ॥
परी जाणहा ईश्वरू साक्ष रूपी । कळेना जना रुद्र पूर्ण-प्रतापी ॥ ९८ ॥
बहु स्तूति केली तया मारुताची । तयें तोषली वृत्ति बीभीषणाची ॥
म्हणे गा विरा संकटीं धांव घालीं । बळें ऊठवीं सर्व सेना निमाली ॥ ९९ ॥
कपी मारुती उत्तरें सिद्ध जाला । मनीं चिंतिलें राम-पादांबुजाला[७२] ॥
महावीर आणील द्रोणाचळातें । पुढें वीनवी दास तो श्रोतयांतें ॥ १०० ॥

---

## प्रसंग ५वा प्रारंभ.

उभा राहिला वीर मंदार जैसा । मनाहूनि पूढें बळें वेग तैसा ॥
रूपें कर्कशू पाहतां पाहवेना । बहूसाल उंचाट त्या राहवेना ॥ १ ॥
अकस्मात तो व्योम[1]-पंथें उडाला । मही झोंकली पन्नगा[2] भार जाला ॥
बहू झोंकिले[a] कूर्म[3] वाराह[4] दंती[5] । झडा चांचरे[b] ते धरा[6] सांवरीती ॥ २ ॥
स्फुरद्रूप सर्वांग वाजे झडाडां । उडाले नभीं वृक्ष वातें फडाडां ॥
असंभाव्य पिंजारिलें पुच्छ[7] मागें । नभोमंडळीं[8] जातसे लागवेगें ॥ ३ ॥
बहू लंघिली फोकळी वेग केला । द्विपें[9] पांच ही शीघ्र टाकूनि गेला ॥
उडाला बळें पांच सिंधू[10] अगाधू[11] । पुढें देखिला साहवा क्षीर[12]-सिंधू ॥ ४ ॥

---

७१. नैऋत्यनाथ=राक्षसांचा स्वामी. h. 'कपी' पा० भे०. i. 'वदेना' पा० भे०. ७२. पादांबुज=पदकमल. १. व्योम=आकाश. २. पन्नग=शेष, सर्प. a. 'धाकले' पा० भे०. ३. कूर्म=कासव. ४. वराह=डुकर. ५. दंती=हत्ती. b. 'चांचरीती' पा० भे०. ६. धरा=पृथ्वी. ७. पुच्छ=शेंपुट. ८. नभोमंडळ=आकाशमंडळ. ९. द्वीप=बेट. १०. सिंधु=समुद्र. ११. अगाध=खोल. १२. क्षीर=दूध.

तयाच्या तिरीं उंच आकाश पंथें । दिसे देखिलें रम्य द्रोणाचळें तें ॥
तया मस्तकीं दिव्य वल्ली अपारा । प्रभा फांकली तेज कल्लोळ सैरा ॥ ५ ॥
पुढें देखतां मारुता सांवरेना । धरीतां बळें तेज हाता चढेना ॥
महा औषधी दिव्य शैल्या निशैल्या । कपी देखतां सर्व ही गुप्त जाल्या ॥ ६ ॥
तया पर्वताची बहु स्तुति केली । परी नायके सर्व ही व्यर्थ गेली ॥
बहूसाल त्या [13]अचळें गर्व केला । पुढें मारुता कोप तात्काळ आला ॥ ७ ॥
महा थोर धिःकार केला तयासी । बळें शीघ्र उत्पाटिलें पर्वतासी ॥
गिरी घेतला पुच्छ वेष्टीत माथां । कपी-राज तो चालिला व्योम पंथा ॥ ८ ॥
रणीं जाहला सर्व संहार जेथें । महावीर आला अकस्मात तेथें ॥
निंशा[14] दाटली अंधकारें दिसेना । गिरी ठेवितां देखिली सर्व सेना ॥ ९ ॥
पिता पावला तो बळें मारुतीचा । रणीं वास नेला तया औषधींचा ॥
सुगंधें चि ते वीर आरोग्य जाले । कपी सर्व ही मृत्यु मारूनि ठेले ॥ १० ॥
दळेंशीं बळें ऊठला रामराजा । स्फुराणें रणीं[c] गर्जती वीर-फौजा ॥
पुढें मारुतें घेतलें पर्वताला । क्षिराब्धी तटीं शीघ्र ठेवूनि आला ॥ ११ ॥
तुळेना गती शक्ति माहा विराची । कळेना करी कोण संख्या[15] बळाची ॥
दिसे पाहतां वानरू वेषधारी । परी जाणिजे सत्य हा त्रीपुरारी[16] ॥ १२ ॥
निशीच्या [17]पदें चारि कोटी उडाला । गिरी दों[d]पदीं शीघ्र घेऊनि आला ॥
पुन्हा मागुती तीपदां माजि नेला । प्रभातें चि चौथे पदीं प्राप्त जाला ॥ १३ ॥
सहस्रेक [18]गांवें गिरी[19] स्थूल मोठा । असंभाव्य या मारुतीचा चपेटा ॥
उडाला नभीं योजनें कोटि सोळा । नसे शोधितां दूसरा या भुगोळा ॥ १४ ॥
बहू पंथ चाले रवी भार नाना । बहू भार वाहे फणी[20] तो उडेना ॥
गरूडासि तो आचळू हालवेना । दुजी साम्यता ब्रह्म-गोळीं दिसेना ॥ १५ ॥
पुढें मारुती भव्य आनंद-रूपी । नभोमंडळीं भानु[21] जैसा प्रतापी[22] ॥
महा वीर तैसा दळामाजि आला । समस्तांसि देखोनि आनंद जाला ॥ १६ ॥
सखा तो जिवाचा असे दूरि देशीं । सदां लागलें चित्त हें त्याजपाशीं ॥
पुढें पाहतां तो अकस्मात आला । तया सारिखें [e]जाहलें मारुताला ॥ १७ ॥
कपीनें कसें पाहिलें राघवासी । पुढें देखिलें लोभियानें धनासी ॥
तथा बाळकें देखिलें जननीळें[23] । तया सारिखें जाहलें मारुताला ॥ १८ ॥

---

१३. अचळ=पर्वत. १४. निशा=रात्र. c. 'कपी' पा० भे०. १५. संख्या=गणना. १६. त्रिपुरारी=शिव. १७. पद=चवथा हिसा (प्रहर). d. 'द्रोण तो' पा० भे०. १८. गांव=योजन=चार कोस. १९. गिरी=पर्वत. २०. फणी=शेष. २१. भानु=सूर्य. २२. प्रतापी=ऊन पाडणारा, पक्षीं शूर. e. 'वाटलें राघवाला' पा० भे०. २३. जननी=आई.

नमस्कारिलें त्या रघूनायकासी । उभा राहिला हात जोडोनि पाशीं ॥
म्हणे राम धन्य गा धन्य वीरा । कपी काय द्यावें तुझ्या ऊपकारा ॥ १९ ॥
अगा मारुती तूझिया उपकारें । जिवा ऋण जालें बहूसाल भोंर ॥
सदा सर्वदा आमुची थोर चिंता । समस्तांसि तूं एकला प्राण-दाता ॥ २० ॥
म्हणे मारुती सर्व स्वामी प्रतापें । प्रभू काय कीजेल म्यां दीनरूपें ॥
समर्था तुझेनी कृपेवीण कांहीं । स्वता अल्पही कार्य होणार नाहीं ॥ २१ ॥
बहूतां परी मारुतें स्तूति केली । मनोवृत्ति ते राघवाची निवाली ॥
पुढें राघवें रुद्र संतुष्ट केला । बहूतां परी आदरें गौरवीला ॥ २२ ॥
प्रसंगें [२४]कपी-नाथ सुग्रीव बोले । म्हणे मारुती प्राण त्वां रक्षियेले ॥
कुळामाजि जालासि पूर्ण प्रतापी । कपींचीं कुळें सर्व ही [२५]श्लाघ्यरूपी ॥ २३ ॥
कपी सर्व ही बाण-जाळें [२६]निमाले । तुझीया प्रतापें पुन्हा जन्म जाले ॥
प्रसंगें सखा राघवें निर्मिलासी । कपी कारणें तूं बहू कष्टलासी ॥ २४ ॥
तया बोलतां मारुता सूख जालें । पुन्हा मारुतें ही बहू तोषवीलें ॥
असो हे बहूसाल पाल्हाळ-गोवी । कथा राहिली ते पुढें चालवावी ॥ २५ ॥
कपी-नाथ बोले रघूनायकासी । नये रावणू चंडदुःखें रणासी ॥
तरी शीघ्र लंकापुरी जाळवावी । समर्थें कपींलागिं आज्ञा करावी ॥ २६ ॥
पुढें बोलिजे सुग्रिवालागिं देवें । तुम्हीं कल्पिलें कार्य सिद्धीस न्यावें ॥
कपी राम-आज्ञेस घेऊनि वेगीं । विरांलागिं आज्ञा करी ते प्रसंगीं ॥ २७ ॥
तुम्हीं लागवेगें चुड्या पाजळीजे । बळें शीघ्र लंकापुरी दग्ध कीजे ॥
करीं घेतले उंच बांधूनि भारे । कपी धांवती एकमेकां पुढारे ॥ २८ ॥
चुड्या पावकें सर्व ही दीप्त केल्या । अकस्मात लंकापुरीमाजि नेल्या ॥
बळाचे कपी धांवती लक्ष कोटी । चुड्या खेळती थोर आनंद पोटीं ॥ २९ ॥
[२७]शिखा लागतां शीघ्र जाले उमाळे । निळे पींवळे [२८]श्वेत [२९]आरक्त काळे ॥
बहू लागला [३०]चंड वारा भरारां । पुरी माजि तो [३१]वन्हि धांवे सरारां ॥ ३० ॥
गृहा[३२]गोपुरा जाहला एक वेळा । असंभाव्य हेलावती तीव्र ज्वाळा ॥
दिशा दाटल्या धूम्र आकाश-पंथें । पिडा जाहली [३३]खेचरां [३४]भूचरांतें ॥ ३१ ॥
मळें धूविलीं तीं तया रावणानें । सळें ऊसणें घेतलें [३५]पावकानें ॥
बळें लागतां थोर कोपें कडाडी । बळें माजला वन्हि पोटीं धडाडी ॥ ३२ ॥

---

२४. कपी-नाथ=वानरांचानाईक. २५. श्लाघ्य=स्तुत्य. २६. निमाले=मेले. २७. शिखा=ज्वाला. २८. श्वेत=पांढरा. २९. आरक्त=लाल. ३०. चंड=सपाट्याचा. ३१. वन्हि=विस्तव. ३२. गोपुर=देवडी. ३३. खेचर=आकाशांत हिंडणारे. ३४. भूचर=पृथ्वीवर हिंडणारे. ३५. पावक=विस्तव.

बळें क्रोध आला तया पावकाला । वरी वात वेगीं बळें साह्य जाला ॥
[*]शिखा चालिल्या अंतराळीं धडाडां । जळों लागली दिव्य लंका भडाडा ॥ ३३ ॥
अपारें घरें गोपुरें रम्य सारें । बहूसाल [३६]धामोदरें थोर थोरें ॥
पडों लागलीं दग्ध होतां धबाबां । महा राक्षसी तोंड घेती खबाबां ॥ ३४ ॥
ध्वनी राक्षसांची असंभाव्य जाली । मुखें बोलती आगि रे आगि आली ॥
कितीएक राक्षेस धांवूनि आले । अकस्मात ते वीर सर्वै [f]मिळाले ॥ ३५ ॥
बळें धांवली ते असंभाव्य सेना । पुढें जावया लाग कोठें दिसेना ॥
शिखा धांवती वन्हिच्या पाठि लागें । पळाले बळी प्राण घेऊनि वेगें ॥ ३६ ॥
बळें सूटलीं वैभवें राक्षसांचीं । बहू दाटलीं वाट प्रेतें विरांचीं ॥
कितीएक ते धीट नेटें जळाले । कितीएक ते वीर मागें पळाले ॥ ३७ ॥
त्रिकूटाचळीं थोर आकांत जाला । असंभाव्य राक्षेस कीती निमाला ॥
स्त्रिया बाळकें जेथ जेथें पळालीं । शिखा लागतां तेथ तेथें जळालीं ॥ ३८ ॥
पळायासि मार्गे पुढें रीघ नाहीं । जळाले पुरीमाजि ते सर्व कांहीं ॥
बहू [३७]कुंजरें [३८]शकटें [३९]अश्व नाना । निमाले [४०]रथी [४१]सारथी सर्व सेना ॥ ३९ ॥
सहस्रें दहा [४२]भुवनें रावणाचीं । जळालीं बहू संपदा वैभवाची ॥
सुवस्ता अळंकार दिव्यां[४३]बरांचीं । सुगंधेल [४४]आज्यादि नाना [४५]रसांची ॥ ४० ॥
गुरें वांसरें जाळिलीं पावकानें । बहू [४६]हाट बाजार [४७]केणी-दुकानें ॥
बहूतां जणांचें बहू वित्त गेलें । त्रिकूटाचळा पावकें शुद्ध केलें ॥ ४१ ॥
बहू [४८]वेवसायी भले मोठ मोठे । [४९]भुसारी जरी जोहरी आणि [५०]चाटे ॥
जळालें बहू वित्त हाणोनि घेती । धरेना कदा सांवरेना [५१]रुदंती ॥ ४२ ॥
सभा-मंडपीं राक्षसीं हाक नेली । म्हणे पाहतां काय लंका जळाली ॥
दहा योजनें तीसरा भाग जो कां । बळें जाळिली वानरीं [g]सर्व लंका ॥ ४३ ॥
तया रावणा वाटली सर्व चिंता । म्हणे पाठवावें रणीं कोण आतां ॥
न दीसे मुखीं मंदली सर्व शोभा । पुढें बोलिला शीघ्र कुंभा निकुंभा ॥ ४४ ॥
म्हणे वानरीं जाळिली सर्व लंका । तयांशीं करा युद्ध टाकूनि शंका ॥
तया सांगतां सर्व ऊदीत जाले । महा वीर ते सात युद्धा निघाले ॥ ४५ ॥
बळी कुंभ नीकुंभ जंघ प्रजंघें । दळें सिद्ध केलीं बळें लागवेगें ॥

---

* शिखा=ज्वाला. ३६. धाम=घर. f. 'जळाले' पा० भे०. ३७. कुंजर=हत्ती. ३८. शकट=गाडा. ३९. अश्व=घोडा. ४०. रथी=रथांत बसणारे. ४१. सारथी=रथ हाकणारे. ४२. भुवनें=घरें. ४३. दिव्यांबरें=उंचीं वस्त्रें. ४४. आज्य=शेळीचें तूप (अजा=शेळी). ४५. रस=पातळ पदार्थ. ४६. हाट=बाजार. ४७. केणीं=जिन्नस. ४८. वेवसायी=उद्योगी, व्यापारी. ४९. भुसारी=धान्य विकणारे. ५०. चाटे=कापड विकणारे. ५१. रुदंती=रडती. g. 'शीघ्र' पा० भे०.

महा वीर झुंझार तो वीरुपाक्षू । दळीं चालिला क्रोधनू शोणिताक्षू ॥ ४६ ॥
बळी सात ही ते रयारूढ जाले । महा वीर राक्षेस सर्वे मिळाले ॥
दळें चालिलीं राक्षसांचीं अपारें । भुमी शेष सांडू म्हणे थोर भारें ॥ ४७ ॥
बहू दग्ध लंकापुरी होय जेथें । बळें चालिले भार तेणें चि पंथें ॥
निमिष्यांत कुंभें विरें ते चि काळीं । महा मेघ तो पाडिला बाण-जाळीं ॥ ४८ ॥
बळें मातला वन्हि तो वीझवीला । त्रिकूटाचळीं लोक आनंदवीला ॥
विझाली पुरी शीघ्र तेणें चि मार्गे । निघाली पुढें [५२]वाहिनी [h]लागवेगें ॥ ४९ ॥
रणामंडळा पारखे वीर आले । कपि [५३]द्रूमपाणी बळें सिद्ध जाले ॥
समस्तांपुढें अंगदू वीर रागें । रणीं लोटला क्रोधनू लागवेगें ॥ ५० ॥
बळें फोडिली हाक कल्पांत जैशी । रणीं मांडलें युद्ध दोघांजणांशीं ॥
विरें विंधिलें वानरालागिं बाणीं । कपी कोपला अंगदू शैल-[५४]पाणी ॥ ५१ ॥
गिरी टाकिता क्रोधनू गुप्त जाला । महा पर्वताचे तळीं तो निमाला ॥
तया [५५]सान्हया शोणिताक्षू निघाला । तयें अंगदू भेदिला भग्न केला ॥ ५२ ॥
रणीं वीर लक्षूनियां बाण घाली । बळें गेलिया अंग भेदूनि भाली ॥
उणें देखतां शीघ्र मैंदें द्विवीदें । त[५६]रू घेतला हाक देऊनि क्रोधें ॥ ५३ ॥
कपी वीर धांवोनि युद्धासि आला । रणीं अंगदालागिं तो साह्य जाला ॥
तवं शीघ्र येरीकडे लागवेगें । बळें धांवले ते विरश्रींत रागें ॥ ५४ ॥
प्रजंघें युपाक्षें तया शोणिताक्षा । दिल्हें [i]पूट धांवोनि घेऊनि पक्षा ॥
त्रिवर्गा त्रिवर्गीं रणीं युद्ध जालें । शरीं राक्षशीं व्योम संपूर्ण केलें ॥ ५५ ॥
शिळा शीखरें वृक्ष पाषाण-घातें । कपी वीर ते हाणिती राक्षसांतें ॥
समारंगणीं दूर टाकोनि शंका । बळी नीकुरें भेदिती एकमेकां ॥ ५६ ॥
तंव अंगदें थोर अद्भूत केलें । बळें वाड झुंबाड तें उन्मुळीलें ॥
प्रजंघासि हाकूनि क्रोधें बहूतें । रणीं झोडिला पाडिला वृक्ष-घातें ॥ ५७ ॥
पुढें देखिलें त्या युपाक्षासि मैंदें । बळें गर्जला तो कपी घोर नादें ॥
रणीं झुंझतां थोर आवेश मैंदा । शिळा टाकितां जाहला [j]चूर्ण चेंदा ॥ ५८ ॥
द्विवीदें विरें पाडिला शोणिताक्षू । उणा देखिला सर्व नै[५७]ऋत्य-पक्षू ॥
तिघां राक्षसां थोर संहार जाला । रणामाजि युद्धासि तो कुंभ आला ॥ ५९ ॥
पिता कुंभकर्णू महावीर जैसा । तया सारिखा लोटला कुंभ तैसा ॥

---

५२. वाहिनी=फौज. h. 'वातवेगें' पा० भे०. ५३. द्रुमपाणी=झाडें आहेत हातांत ज्यांच्या असे. ५४. शैल-पाणी=डोंगर आहे हातांत ज्याच्या असा. ५५. सान्हया=मदत करण्यास. ५६. तरु=झाड. i. 'पूर' पा० भे०. j. 'शीर' पा० भे०. ५७. नैऋत्य-पक्ष=राक्षसांची बाजू.

उभारे उभा फीर मैंदा द्विवीदा । रणा माजि जाशी कुठे रे अंगदा ॥ ६० ॥
बहू विक्रमें पाडिलें राक्षसांशी । रणीं ऊसनें शीघ्र घेतों तुम्हांशीं ॥
क्षणीं तेचि कोदंडें[58] घेऊनि हातीं । कपी मैंद तो भेदिला बाण-घातीं ॥ ६१ ॥
नवां बाण-घातीं कपी भग्न केला । रणामाजि तो प्रेत होऊनि ठेला ॥
द्विवीदाशि दाही शैरीं[59] तेचि काळीं । विरें राक्षसें पाडिलें बाण-जाळीं ॥ ६२ ॥
पुढें पाहतां देखिलें अंगदाला । कपी वीर तो वृक्ष घेऊनि आला ॥
बळें हाणितां खीळिले हस्त बाणीं । चळेना कपी वीर तो वँज्रठाणी[60] ॥ ६३ ॥
उभा राहिला बाण झेलीत कैसा । कुंठारा[61] तळीं छेदिजे वृक्ष जैसा ॥
तया अंगदा शीघ्र प्राणांत आलें । रघूनायका वानरीं जाणवीलें ॥ ६४ ॥
मुखें बोलती अंगदू वीर गेला । कपीनाथ सुग्रीव तैसा उडाला ॥
रथारूढ होऊनि कोदंडें[62] हातें । बळें मोडिलें तोडिलें kवृक्ष-घातें ॥ ६५ ॥
रणीं कुंभ तो मॅल्ल-युद्धासि[63] आला । बळें ताडिता जाहला सुग्रिवाला ॥
तया सुग्रिवें दीधली वज्र-मुष्टी । रणीं पाडिला कुंभ तो प्रेत सृष्टी ॥ ६६ ॥
महा वीर तो धाडिला मृत्यु-पंथें । निकुंभें रणीं हाकिलें सुग्रिवातें ॥
कपीनाथ सुग्रीव घालूनि मागें । पुढें धांवला मारुती लागवेगें ॥ ६७ ॥
तया राक्षसें भेदिलें मारुताला । कपीवीर किंचीत मूर्छीत जाला ॥
पुढें ऊठला तो कपी काळ जैसा । मना माजि आवेश अद्भूत तैसा ॥ ६८ ॥
महा पर्वतू घेतला मारुतानें । निकुंभावरी टाकिला थोर त्रॉणें[64] ॥
गिरि टाकितां शांति जाली तयाची । फळी फूटली सर्वही राक्षसांची ॥ ६९ ॥
त्रिकूटाचळा माजि घायाळ गेले । रिपू प्राण घेऊनि तैसे पळाले ।
भयातूर ते सांगती रावणाला । बळी तो विरेंवीर सर्वै निमाला ॥ ७० ॥
बहू दुःख जालें तया रावणाशी । पुढें धाडिलें शीघ्र तीघां सुताशी ॥
विशालाक्ष मकाक्ष आणि खरातें । रणा पाठवीलें तिघां कूमरांतें ॥ ७१ ॥
तिघे ही दळेंशीं बळें सिद्ध जाले । असंभाव्य ते भार मागें मिळाले ॥
महा विक्रमें झेलिती वीर खॅगें[65] । समारंगणीं पावले लागवेगें ॥ ७२ ॥
वंडगे लोहो मूसळें शूळँपाणी[66] । कटाऱ्या सुऱ्या तोमरें[67] चापपाणी[68] ॥
बहू खेटकें[69] मुद्गलें आणि भाले । महा वीर राक्षेस युद्धा निघाले ॥ ७३ ॥

---

५८. कोदंड=तिरकमठा. ५९. शर=बाण. ६०. वज्रठाण=दृढासन. ६१. कुठार=कुऱ्हाड. ६२. कोदंड=तिरकमठा. k राक्षसांनें. ६३. मल्लयुद्ध=कुस्ती. ६४. त्राण=जोर. ६५. खर्ग=तरवार. ६६. शूळपाणी=त्रिशूळ आहे हातीं ज्याच्या असा. ६७. तोमर=एक प्रकारचें शस्त्र. ६८. चापपाणी=तिरकमठा आहे हातीं ज्याच्या असा. ६९. खेटक=ढाल.

कपी-वाहिनीचा असंभाव्य थावा । प्रतापें बळें शीघ्र केला उठावा ॥
शिळा शीखरें हाणिती राक्षसांतें । रिपू मारिती वानरां बाण-घातें ॥ ७४ ॥
महा युद्ध आरंभिलें एकमेकां । तयां भीडतां तो धरी काळ शंका ॥
रणीं राक्षसां पाडिलें घोर मारें । कपी वीर ते गर्जती भूभुकारें ॥ ७५ ॥
रणा माजि मक्राक्ष तो शीघ्र कोपे । पुढें चालिला चापपाणी प्रतापें ॥
स्वयें आपुलें सैन्य घालूनि मागें । कपी भेदिता जाहला लागवेगें ॥ ७६ ॥
बळें सोडिलीं राक्षसें बाण-जाळें । तुटों लागती वानरांचीं शिसांळें[७०] ।
घटाटां रणीं तूटती पादपाणी । शरीरें बहूसाल विक्राळ वाणी ॥ ७७ ॥
देहे खोंचले थोर महा विरांचे । झरे लागले वाहती शोणितांचे[७१] ॥
रिपू झुंझतां राक्षसें भग्न केले । कितीएक ते भार मागें पळाले ॥ ७८ ॥
बळें धांवती बाण ते लागवेगें । पळाले बळाचे कपी सर्व मागें ॥
कपींचीं दळें भंगिलीं राक्षसानें । तया मस्तकू तूकिला[७२] राघवानें ॥ ७९ ॥
रणीं मांडिला थोर कल्पांत सृष्टी । बहुतां विरीं दीधली त्याशि पृष्ठी ॥
रणामाजि कोणास ही राहवेना । करी घोर संधान तें साहवेना ॥ ८० ॥
ह्मणे राम हो कोण सामर्थ्य याचें । रणीं भंगिलें सैन्य गोळांगुळाचें[७३] ॥
वरी अंतराळीं बहू बाण-जाळें । क्षणा माजि ते तोडिले शीघ्र काळें ॥ ८१ ॥
उभा राहिला राम वज्रांग-ठाणें । गुणीं लाविलें चाप[l] चंद्रार्द्ध बाणें ॥
टणत्कारिलें सीतें[७४] बोटीं थरारी । महाचंड ब्रह्मांड घोषें गरारी ॥ ८२ ॥
बळें राक्षसें व्योम संपूर्ण केलें । रणीं राघवें [m]शीघ्र छेदूनि नेलें ॥
पुढें घेतला दूसरा बाण रामें । गुणीं लाविला थोर शत्रू विरामें ॥ ८३ ॥
विरें मागुतें थोर संधान केलें । रिपूचें रणीं शीर छेदूनि नेलें ॥
महा वीर मक्राक्ष तो बाण-घातें । निमाला रणीं चालिला मृत्यु-पंथें ॥ ८४ ॥
पुढें राम पाचारिला त्या खरानें । विशालाक्ष ऊठावला थोर त्राणें ॥
ह्मणे राज-पुत्रा बरें युद्ध केलें । रणीं विक्रमें शीर छेदूनि नेलें ॥ ८५ ॥
असे सर्वदा तो जयो प्राप्त कैंचा । करी ग्रास राहू रवी-मंडळाचा ॥
प्रती उत्तरें बोलिला राम वाणी । बळें [n]बूजिलें भूमि-आकाश बाणीं ॥ ८६ ॥
तिहीं राक्षसीं घोर संधान केलें । विरां वाटलें थोर कल्पांत जालें ॥
पुढें तोडिले सर्व ही बाण रामें । प्रतापें रणामाजि त्या पूर्ण-कामें ॥ ८७ ॥
प्रतापें रणीं राघवें बाण-घातें । रिपू दोघ हि धाडिले मृत्यु पंथें ॥

---

७०. शिसाळें=डोकीं. ७१. शोणित=रक्त. ७२. तूकिला=डोलविला. ७३. गोळांगुळ=वानर. l ते घोर. ७४. सीत=तिरकमटयाची दोरी. m सर्व. n झुंजती सर्व आकाश-वाणी.

रणीं राक्षसां थोर संहार जाला । समाचार गेला तया रावणाला ॥ ८८ ॥
पुढें रावणानें बहू दुःख केलें । नसे अंतरीं सौख्य टाकून गेलें ॥
दशग्रीव बोले विरा इंद्रजीता । प्रतापें रणा माजि तूं जाय आतां ॥ ८९ ॥
रिसां वानरांची असंभाव्य सेना । तुज वेगळी सर्व संहारवेना ॥
उभा राहिला शीघ्र ऊदीत जाला । म्हणे० शीघ्र संहारितों वैरियांला ॥ ९० ॥
दळें चालिलीं राक्षसांची अचाट । पुढें वानिती भाट वेताळ थाट ॥
बळी *रावणी तो रथारूढ जाला । बहूसाल वाद्यें दळेंशीं निघाला ९१ ॥
रणा माजि येवोनियां होम केला । महा भीम कृत्या रथ प्राप्त जाला ॥
रथारूढ होऊनि वेगीं उडाला । नभोमंडळा माजि तो गुप्त जाला ॥ ९२ ॥
असंसाव्य तीं मोकळी बाण-जाळें । बळें धांवती प्रेरिले दूत काळें ॥
कपींचीं तुटों लागलीं कंठ-नाळें । रणीं लोटती वीर-प्रेतें सुकाळें ॥ ९३ ॥
असंभाव्य सामर्थ्य त्या रावणीचें । कळेना कळा कोण कापट्य याचें ॥
कदां नेणती बापुडे देव कांहीं । रणीं पाडितो वीर सन्मूख नाहीं ॥ ९४ ॥
बहू खोंचली ते असंभाव्य सेना । दिशा दाटल्या बाण-जाळीं दिसेना ॥
कपी-वाहिनी मानि आकांत जाला । पुढें मारुतीचा पिता शीघ्र आला ॥ ९५ ॥
निरूपी अती आदरें राघवाशीं । म्हणे अंगिराअ-स्त्र योजीं त्वरेशीं ॥
पुढें राम तात्काळ तें अस्त्र घाली । तेणें तूटलें शीर कृत्या निमाली ॥ ९६ ॥
पुढें रावणी भूतळा माजि आला । रणामंडळीं मृत्यु जैसा उदेला ॥
भयासूर तो वीर घोर प्रतापी । शरा सोडिता जाहला काळ-रूपी ॥ ९७ ॥
समस्तीं अकस्मात तो देखियेला । तया एक वेळा बहू मार केला ॥
कपी वीर ऊठावले शीघ्र काळें । शिळा शीखरें टाकिती बाण-जाळें ॥ ९८ ॥
रणीं रावणी येकला वीर नेटीं । कपी लोटले लक्ष कोट्यानुकोटी ॥
रिसीं वानरीं थोर कल्लोळ केला । बळें ताडिते जाहले राक्षसाला ॥ ९९ ॥
बळें फेंकिला शूळ त्या मारुतानें । गदा घेतली शीघ्र बीभीषणानें ॥
परीघांशी घेऊनियां शीघ्र धांवे । कुमूदू करीं वेग नेटें उठावे ॥ १०० ॥
कपी-ॠषभा थोर आवेश आला । शतघ्नीस घेऊनि सन्मुख जाला ॥
द्विविदें बळें सोडिलें चक्र कैसें । महा पर्वतीं चालिलें वज्र जैसें ॥ १०१ ॥
सुगंधें विरें ताडिला शस्त्र-घातें । गिरि-शृंग तो टाकिला जांबुवंतें ॥
शिळा टाकिली चंड त्या अंगदानें । महा खड्ग तें मोकलीलें नळानें ॥ १०२ ॥

० बहूसाल वाद्यें दळेंशीं निघाला. ७५. वानितो=वर्णितो. ७६. भाट=स्तुतिपाठक. ७७. वेताळ=भाट. * रावणी=इंद्रजित. ७८. मोकली=सोडी. ७९. परिघ=शस्त्रविशेष. ८०. ऋषभ=श्रेष्ठ. ८१. शतघ्नी=तोफ.

बहू गा निळें झोंकिला तो विशाळू । कपी सुग्रिवें टाकिला चंड शैलू ॥
सुमित्रा-सुतें राघवें तेचि काळीं । रिपू रावणी विंधिला बाण-जाळीं ॥ १०३ ॥
बहूतां pमधीं एकला इंद्रजीतू । रणीं वेढिला काळ जैसा [८२]कृतांतू ॥
बळें वानरांचा बहू मार जाला । रिपू राक्षसें अंतरीं तुच्छ केला ॥ १०४ ॥
बहूतां जणांचा बहू एक मेळा । निमिष्यांत तोडूनि नेला स्वलीळा ॥
पुढें राक्षसें घोर संधान केलें । विरें विक्रमें सर्व qसामर्थ्य नेलें ॥ १०५ ॥
रिपूंचीं दळें पाडिलीं इंद्रजीतें । रणामाजि rआलीं असंभाव्य प्रेतें ॥
रिसें वांनरें राम सौमित्र बाणीं । बळें भेदुनि चालिला चापपाणी ॥ १०६ ॥
पुढें सज्जनीं चित्त द्यावें कथेला । समाचार सांगेल हा रावणाला ॥
महा वैर हें ऐकतां वैर नासे । म्हणे दास निर्वैर सूखें विलासे ॥ १०७ ॥

प्रसंग पांचवा समाप्त.

---

## प्रसंग सहावा.

सभे बैसला राव त्रीकूटवासी । पुढें भेटला इंद्रजीतू तयासी ॥
नमस्कार केला तया रावणाला । म्हणे शत्रुचा सर्व संहार केला ॥ १ ॥
बहू लंकवासी रणीं भग्न केलें । कितीएक ते मृत्युपंथें चि गेले ॥
बळें ऊसणें घेतलें हो तयांचें । प्रभू शोधिले मुख्य त्या वैरियांचे ॥ २ ॥
तया रावणा थोर संतोष जाला । बळें अमृताचे नदी पूर आला ॥
अकस्मात संताप सर्वें उडाला । पुढें बोलता जाहला कूमराला ॥ ३ ॥
म्हणे इंद्रजीता विरा बैस आतां । सुपुत्रा तुंवां तोडिली सर्व चिंता ॥
[१]बळी चक्रचूडामणी वीर राजा । [२]असो त्या तुझ्या वज्र कल्याण भूजा ॥ ४ ॥
अगा इंद्रजीता सखे गोत्र बंधू । प्रतापें बळें आगळे वीर [३]सिंधू ॥
निमाले रणीं वैरियांचेनि हातें । बहूसाल वाटे मनीं दुःख मातें ॥ ५ ॥
त्रिकूटाचळीं वानरीं लाग केला । मुळारंभ राक्षस कीती निमाला ॥
पुढें थोर संग्राम दारूण जाला । [४]विरें राक्षसें सर्व ही तो बुडाला ॥ ६ ॥
तया ऊपरी वीर धूम्राक्ष जेठी । [५]तेणें जिंकिले देव तेतीस कोटी ॥
समारंगणीं त्या विरा अंत आला । रणामंडळीं देह त्यागून गेला ॥ ७ ॥
रणीं वज्रदंष्ट्री दिसे यमरूपी । गिरीसारिखा अंकपन्नु प्रतापी ॥
महा वीर ते दोघ युद्धासि गेले । समारंगणीं युद्ध होतां निमाले ॥ ८ ॥

---

p जणीं. ८२. कृतांत=यम. q छेदूनि. r जालीं. १. बळीचक्रचूडामणी=बळीसमूहशिरोभूषण. २. असो त्या=असाव्या (पाठ). ३. सिंधु=सागर. ४. विरें वीर तो प्रेतसिंधू बुडाला (पाठ).

बळी दक्ष विंत्पन्न चातुर्य जाणे । तया देखतां अंतरीं सूख बाणे ॥
प्रसंगें चि तो वीर युद्धासि गेला । प्रहस्तू रणीं युद्ध होतां निमाला ॥ ९ ॥
तयाचा बहू क्रोध आम्हांसि आला । रिपू राम जिंकावया वेग केला ॥
तयाचें महां युद्ध तें काय बोलों । समारंगणीं भ्रष्टलों भग्न जालों ॥ १० ॥
तया ऊपरी धीर आम्हां धरेना । पुढें ऊठवीलें बळें कुंभकर्णा ॥
तया सारिखा कोण आहे बळाचा । समारंगणीं धीर काळासि कैंचा ॥ ११ ॥
महा वीर तो घोर युद्धासि गेला । रिसां वानरां थोर संहार केला ॥
रिपूनें तया शेवटीं बाण-घातें । समारंगणीं धाडिला मृत्युपंथें ॥ १२ ॥
प्रतापी सखा बंधु माझा निमाला । बळें आगळा थोर आधार गेला ॥
मला पूसिल्यावीण गंतव्य केलें । नये बोलतां दुःख ब्रह्मांड जालें ॥ १३ ॥
तया ऊपरी चौघ ही सूत माझे । अगा इंद्रजीता सखे बंधु तूझे ॥
तयांच्या प्रतापानळें सूख लोटे । समारंगणीं भीडतां काळ वीटे ॥ १४ ॥
नरा अंतकाला नरा अंतकानें । बळें पीटिलें देवदेवांतकानें ॥
तळीं घातले सर्व त्या त्रीशिरानें । रणीं वानरीं घेतले सर्व प्राणें ॥ १५ ॥
अतीकाय तो वीर मेरू बळाचा । प्रतापें बळें आगळा विक्रमाचा ॥
रथारूढ होऊनि युद्धासि गेला । तयाचा सुमित्रासुतें घात केला ॥ १६ ॥
निमाले सखे दुःख ऊदंड जालें । पुढें पाहतां वीर सामर्थ्य गेलें ॥
महा वीर ते मृत्युपंथें चि जाती । नरें वानरें बापुडीं येश घेती ॥ १७ ॥
निमाले सखे सूत बंधू बळाचे । प्रतापें सुरांहूनि ते विक्रमाचे ॥
रणामंडळीं सर्व सेना निमाली । बहूसाल संहारिली कूळवल्ली ॥ १८ ॥
अगा इंद्रजीता तुवां सूख द्यावें । प्रतापें रणीं सर्व शत्रू वधावे ॥
मला सांगसी लाविले मृत्यु-पंथीं । परी मागुती ते रिपू गर्जताती ॥ १९ ॥
रिपू ऊठती मागुती हें न व्हावें । बळें सर्व निर्मूळ त्यांचें करावें ॥
प्रतापें रणीं सर्व पाडून येसी । परी मागुता जीव येतो तयांशीं ॥ २० ॥
बहूवेळ तां* युद्ध सामर्थ्य केलें । परी पाहतां सर्व ही व्यर्थ गेलें ॥
प्रतापें रणीं पाडिले बाण-घातीं । समारंगणीं मागुते सिद्ध होती ॥ २१ ॥
महीमंडळीं नाम त्यांचें नसावें । विरा विक्रमें त्वां मला सौख्य द्यावें ॥
पिता बोलतां धीर पोटीं धरेना । असंभाव्य कोपानळू सांवरेना ॥ २२ ॥
उभा राहिला वाक्य बोले पित्याशीं । म्हणे शीघ्र संहारितों वैरियांशीं ॥
समारंगणा माजि ऐसें न होतां । तरी जाणिजे भेटि ते हे चि आतां ॥ २३ ॥

५. युद्ध होतां=घोर मारें (पाठ). ६. बळें आगळा=शुळीहून तो (पाठ). ७. विक्रम=पराक्रम. ८. गर्जताती=ऊठताती (पाठ). * तां=त्वां. ९. पाडिले=मारिसी.

बहू कोपला चालिला वीर जेठी । प्रतापे म्हणे सर्व जाळीन सृष्टी ॥
पुढें बापुडीं वानरें दैन्यवाणी । खिळी तो बळें सर्व ब्रह्मांड बाणीं ॥ २४ ॥
पित्याकारणें वीरभद्रू निघाला । तयां दैत्यजाला धरूं सिद्ध झाला ॥
तयाचे परी कोपला काळरूपी । बळें चालिला शक्रशत्रु[10] प्रतापी ॥ २५ ॥
तुरें वाजती नाद गेला भुगोळा । दळेशीं वळें पावला होमशाळा ॥
तया राक्षसें मागुती होम केला । महावीर मेघासनीं गुप्त झाला ॥ २६ ॥
बळें बूजिलें सर्व आकाश बाणीं । पडों लागलीं वानरें दैन्य वाणी ॥
कपी-वाहिनीं[11] माजि आकांत जाला । पुन्हा मागुता थोर कल्पांत आला ॥ २७ ॥
वरी पाहतां युद्ध कर्ता दिसेना । धडाडा पडों लागली सर्व सेना ॥
महावीर ते घोर मागें पळाले । पळाले कपी राघवा आड गेले ॥ २८ ॥
म्हणे राम तो सुग्रिवा मारुता हो । नभोमंडळी युद्धकर्ता पहा हो ॥
प्रतापें बळें वीर सप्ते उडाले । असंभाव्य ते पोकळी माजि गेले ॥ २९ ॥
महा थोर तें युद्धसामर्थ्य गेलें । तया इंद्रजीतें पुढें काय केलें ॥
अकस्मात तो भूतळा माजि आला । रणामंडळीं सैन्यसिंधू मिळाला ॥ ३० ॥
खटाटोपिले ते बहू शस्त्रपाणी । रूपें कर्कशें काळ कर्कोटबाणीं ॥
बळें चालिला भार वेष्टीत सेना । रजें मातला व्योम पूढें दिसेना ॥ ३१ ॥
कपी वीर राक्षेस सन्मूख जाले । समारंगणा माजि युद्धा निघाले ॥
पुढें राक्षसें रूप केलें सितेचें । महा रम्य लावण्य तें जानकीचें ॥ ३२ ॥
रणीं लोटल्या वीर राक्षेस फौजा । कपीभार ऊठावले स्वामिकाजा ॥
दळीं राक्षसांचे बळी इंद्रजीतू । बळी चालिला काळ जैसा कृतांतू[12] ॥ ३३ ॥
तया देखतां धांवला रुद्र तैसा । करीं घेतला शैल ब्रह्मांड जैसा ॥
बळें इंद्रजीता उजू धांव घाली । तयीं इंद्रजीतें सिता दाखवीली ॥ ३४ ॥
म्हणे रे कपी हे सिता राघवाची । गुणी स्वामिणी हे तुम्हां मर्कटांची ॥
महापापिणी सर्पिणी दुःखदाती त्रिकूटाचळीं राक्षसी कूळहंती ॥ ३५ ॥
अशोकावनामाजि हे शोकवल्ली । अकस्मात कोठून निर्माण झाली ॥
तया दीवसापासुनी दुःख झालें । त्रिकूटाचळा थोर दारिद्र्य आलें ॥ ३६ ॥
बळाचे बहू वीर हे पापिणीनें । सखे आमुचे ग्रासिले सर्पिणीनें ॥
[13]कळी मांडला त्यास हे मूळ सीता । करीतों इचा शीघ्र संहार आतां ॥ ३७ ॥
तया राक्षसें मारिलें जानकीला ॥ म्हणे रे कपी सांग त्या राघवाला ॥
समारंगणीं शीर छेदूनि नेलें । तया राक्षसें शीघ्र गंतव्य केलें ॥ ३८ ॥
सिता देखतां मारुती अंग घाली । प्रसंगीं तिये मूर्छना शीघ्र आली ॥

---

१०. शक्रशत्रु=इंद्रजित. ११. वाहिनी=फौज. १२. कृतांत=यम. १३. कळी=भांडण.

महाशोक आरंभिला त्या कपीनें । म्हणे काय केलें [14]जगज्जननीनें ॥ ३९ ॥
बहू दुःख मागील तें आठविलें । उदासीन हें चित्त दुश्चीत जालें ॥
म्हणे काय सांगों तया राघवाला । कपी मारुती शोकसिंधू बुडाला ॥ ४० ॥
म्हणे रे कपाळा असें काय केलें । बहू थोर हें पाप माझें उदेलें ॥
न सांगों तरी गोष्टी राहों नये कीं । पुढें सांगतां राघवा दुःख हें कीं ॥ ४१ ॥
प्रवाहो बळें चालिला अश्रुपातीं । विलापें करूं लागला तो रुदंती ॥
बळें ऊठला चालतां चालवेना । रघूनायका भेटला दैन्यवाणा ॥ ४२ ॥
अधोमूख पाहोनि कांहीं वदेना । दुखें दाटला कंठ त्या बोलवेना ॥
म्हणे जानकीसारिखी शस्त्रघातें । रणीं मारिली राक्षसें इंद्रजीतें ॥ ४३ ॥
तयें सांगतां मांडला शोक रामें । मिळालीं दळें दैन्यवाणीं विरामें ॥
कपीवाहिनीमाजि आकांत जाला सुमित्रासुतें राम तो शांत केला ॥ ४४ ॥
भविष्योत्तरें वाल्मिकी सत्य व्हावीं । देहेसोंगसंपादणी कां करावी ॥
म्हणूनी रघूनायकें शोक केला । तंव वीर बीभीषणू शीघ्र आला ॥ ४५ ॥
म्हणे जी प्रभू शोक वांयां करीतां । असे सत्य नेमस्त कल्याण सीता ॥
अशोकावना दूत म्यां पाठविले । प्रसंगीं समाचार घेऊनि आले ॥ ४६ ॥
तया इंद्रजीतें रणीं [15]भाव केली । नव्हे सत्य हें मिथ्य होऊनि गेली ॥
पुरी होम आरंभिला मेघनादें । पुरा जालिया कोण घेईल [16]द्वंदें ॥ ४७ ॥
तया इंद्रजीतासी आधीं वधावें । वृथा शोक सांडूनियां सिद्ध व्हावें ।
पुरा होम हो जालिया आंवरेना । समारंगणीं मारितां ही मरेना ॥ ४८ ॥
प्रभू जाहली [17]अभ्रिणी [18]व्योमपंथें । वधावा सुमित्रासुताचेनि हातें ॥
तयें सांगतां सर्व आनंद जाला । बहूतांपरी राघवें गौरविला ॥ ४९ ॥
पुढें राघवाची बहू स्तूति केली । विरांची असंभाव्य मांदी[19] मिळाली ॥
सभामंडळीं ते कपी रीस राजे । तयामध्यभागीं महावीर साजे ॥ ५० ॥
समस्तांशीं सोडीलसें इंद्र भावी । समर्था तया ऊपमा काय द्यावी ॥
असा राम हा देव ब्रह्मादिकांचा । सुमित्रासुतासी वदे रम्य वाचा ॥ ५१ ॥
म्हणे होम आरंभिला इंद्रजीतें । मुखें बोलिलें सत्य [20]नैऋत्यनाथें ॥
पुरा होम होतां कदां आंवरेना । समारंगणीं मारितां ही मरेना ॥ ५२ ॥
प्रतापें समारंगणीं त्या वधावें बळें आजि ब्रह्मादिकां सौख्य द्यावें ॥
पुढें ऊठिला शीघ्र सौमित्र कैसा । नभोमंडळी तीव्र [21]आदित्य जैसा ॥ ५३ ॥

---

१४. जगज्जननी=जगन्माता=सीता. १५. भाव=कपट. १६. द्वंद=युद्ध. १७. अभ्रिणी=अशरीरिणी=आकाशवाणी. १८. व्योम=आकाश. १९. मांदी=मेळा. २०. नैऋत्यनाथ=राक्षस (बिभीषण). २१. आदित्य=सूर्य.

जया देखतां काळ कांपे थरारां । सवें दीधलें राघवें पंचवीरां ॥
हनूमंत बीभिषणू जांबुवंतू । सुगंधू कपी ऋषभू वीर्यवंतू ॥ ५४ ॥
महावीर ते पांच ही सिद्ध जाले । कपी रीस आणीक कीती निघाले ॥
सुमित्रासुता लागिं राजाधिराजें । मुखें बोलली शक्तिसामर्थ्यबीजें ॥ ५५ ॥
वरू दीधला स्वामिदेवाधिदेवें । म्हणे शत्रु जिंकोनियां शीघ्र यावें ॥
करू मस्तकीं ठेविला रामचंद्रें । नमस्कार तैसा चि केला फणींद्रें[२२] ॥ ५६ ॥
समस्तीं विरीं ही नमस्कार केले । पुढें सव्य घालूनि तैसे निघाले ॥
अतीआदरें स्कंधभागीं विरानें । सुमित्रासुता घेतलें मारुतीनें ॥ ५७ ॥
निघाले महावीर ते लागवेगें । पिता हिंपुटी[२३] मारुती मागमागें ॥
पुढें चालतां पंथ नीकुंबळेचा । विरां थोर आवेश काळासि कैचा ॥ ५८ ॥
महा घोर तो लंघिला मार्ग तींहीं । पुढें पाहतां पाहतां वाट नाहीं ॥
तरूंचीं वनें लागलीं तीं वितंडें । प्रचंडें उदंडें बहू झाडखंडें[२४] ॥ ५९ ॥
भुमी दाटले वृक्ष वृक्षा मिळाले । तया अंतरी वंशें[२५] मिश्रीत झाले ॥
वरी पाहतां वाड आकाश पंथें । पुढें रीघ नाहीं तया वारियातें ॥ ६० ॥
समें वीषमें झाडखंडें अचाटें । मिळालीं बळें वाजती कर्कराटें ॥
कडे तूटले थोर त्या पर्वताचे । झरे वाहती झाडखंडीं विषाचे ॥ ६१ ॥
तया अंतरीं सिंह शार्दूल[२६] कैसे । मदें मातले गर्जती काळ जैसे ॥
गजांचीं बहू दाट थाटें विशेषें । पळों लागती थोर किक्काट घोषें ॥ ६२ ॥
बहू संकटें धांवती रान म्हैसे । रिसें कर्कशें देखतां जीव त्रासे ॥
बहू सांबरे चीतळे रानगाई । शुनी शूकरां मर्कटां मीति नाहीं ॥ ६३ ॥
बहू श्वापदें घोर नाना परीचीं । बहु गर्जताती बहुतां स्वरांचीं ॥
भुतें खेचरें शक्ति वेताळ पीसे । बहू धांवती वन्हिचे ज्वाळ जैसे ॥ ६४ ॥
बहू व्याळ[२७] वेटाळले झाडखंडीं । बनें व्यापिलीं सर्व कूळीं उदंडीं ॥
बहुतां परीचीं बहू तीं विखारें । विषें घोळती लोळ[२८] ती थोरथोरें ॥ ६५ ॥
वहाती विषाचे महा वोघ तेथें । धुधूकारतां ज्वाळ आकाशपंथें ॥
गिरीशीं बळें आदळे तोयराशी[२९] । बहूसाल त्या तोडिलें पर्वताशीं ॥ ६६ ॥
गिरिशृंग पाठार दारी कपाटें । शिळा शीखरें वृक्ष पाषाण थाटें ॥
दरे दर्कुटे थोर भ्यासूरवाणे । बहूतां परींचे तरू ते पुराणे[३०] ॥ ६७ ॥
कडे कापले तोयनेटें भडाडी । गिरि कंदरीं घोष तेणें धडाडी ॥

---

२२. फणींद्र=शेषाचा अवतार लक्ष्मण. २३. हिंपुटी=म्लानवदन. २४ झाडखंड=वृक्षसमूह. २५. वंश=कळक, वेळू. २६. शार्दूल=वाघ. २७. व्याळ=साप. २८. लाळती=खेळती (पाठ). २९. तोयराशी=समुद्र. ३०. पुराणे=जुने.

धडाडां नद्या लोटल्या व्योमपंथें । भुमी तूटल्या घोर घातें विघातें ॥ ६८ ॥
महारण्य तें घोर नीकुंबळेचें । पुढें जावयालागिं सामर्थ्य कैचें ॥
समुद्रा तिरीं दाटलें वीस [३१]गांवें । पुढें जावया वाट नाहीं स्वभावें ॥ ६९ ॥
भुमीपंथ नाहीं पुढें जावयातें । उडाले महावीर आकाशपंथें ॥
समुद्रासि सांडूनि वेगें निघाले । बळें शीघ्र नीकुंबळेमाजि गेले ॥ ७० ॥
पुढें काळविक्राळ ते वीर गाढे । बळें राक्षसीं घातले सप्त वेढे ॥
तयांमध्यभागीं विरें इंद्रजीतें । त्वरें आणलीं होमद्रव्यें बहूतें ॥ ७१ ॥
घटीं मद्यआज्यादिकें मांस नेलें । विरें राक्षसें शोणितें[३२] स्नान केलें ॥
पुढें [३३]वेदिकेमाजि हूताशनू[३४] तो । महा वीर प्रेतासनीं बैसला तो ॥ ७२ ॥
सहस्रैक आहूतिचा नेम केला । म्हणे म्यां वधावें नरां वानरांला ॥
शतें भक्ति संख्या हुती लागवेगें । विरें घातल्या अग्निमूखीं प्रसंगें ॥ ७३ ॥
रथू नीघतां हिंसती दिव्य घोडे । उदेले मुखीं आगळे घोष गाढे ॥
तया धूर्त बीभीषणा श्रूत जालें । सुमित्रासुतालागिं तें जाणवीलें ॥ ७४ ॥
म्हणे होम पूर्णाहुती लागिं आला । प्रतापें बळें पाहिजे यत्न केला ॥
म्हणे शेष गा धन्य बीभीषणा तूं । सवें धाडिलें राघवें या चि हेतू ॥ ७५ ॥
वधूं शीघ्र राक्षेस हे बाणघातें । तंव वारिलें त्यासि नैऋत्यनाथें ॥
म्हणे वो प्रभू झुंजतां पूरवेना । पुरा होम होतां रिपू आंवरेना ॥ ७६ ॥
तंव बोलिला [३५]ऋक्ष तो जांबुवंतू । म्हणे वीर हो आइका एक मातू ॥
तुम्हीं होम विध्वंसिजे लागवेगें । रणामाजि मी पाडितों दैत्यदुर्गें ॥ ७७ ॥
मुखें बोलिला वीर मेरू बळाचा । सुमित्रासुतू गौरवी रम्य वाचा ॥
कपी ऋषभू आणि त्या वायुसूतें । बळें घातली धांव आकाशपंथें ॥ ७८ ॥
नभीं मुख्य हे वीर दोघे उडाले । कपी रीस ऊदंड धांवूनि गेले ॥
धबावां शिळा टाकिती व्योमपंथें । बळें होम विध्वंसिला घोर घातें ॥ ७९ ॥
रथू मोडिला फोडिलीं सर्व पात्रें । विरें मोडिलें कुंड संकेतमात्रें ॥
पुढें वन्हि वीदारिला वेग केला । कितीएक राक्षेस तेथें निमाला[३६] ॥ ८० ॥
रिपू रावणी ध्यान भंगून पाहे । तंव भंगिला होम तो दीसताहे ॥
त्वरें इंद्रजीतू नभीं दृष्टि घाली । तंव ऋषभानें दिशा[३७] शीघ्र केली ॥ ८१ ॥
बळें होम विध्वंसिला मारुतानें । देहे[३८]धर्म संपादिला ऋषभानें ॥
पुढें पाहतां होम भंगून गेला । महा वीर राक्षेस युद्धा निघाला ॥ ८२ ॥

---

३१. गांवें=योजनें. ३२. शोणित=रक्त. ३३. वेदिका=होमकुंड. ३४. हुताशन=विस्तव. ३५. ऋक्ष=आस्वल. ३६. तेथें निमाला-भंगोनि गेला (पाठ). ३७. दिशा केली=विष्टा केली. ३८. देहधर्म संपादिला=विष्टा केली.

बळें कोपला काळ कृतांत जैसा । महावीर ऊठावला शीघ्र तैसा ॥
कपी वीर दोघे त्वरेशीं निघाले । बळें आपुल्या ते दळामाजि आले ॥ ८३ ॥
सुमित्रासुतें वाहिला चंड मेढा । पुढें चालिला तो बळें वीर गाढा ॥
कपी लोळ कल्लोळ कोट्यानुकोटी । दळेंशीं बळें चालिला वीर जेठी ॥ ८४ ॥
महावीर ते थोर राक्षेस होते । कपीवीर ते धांवले शीघ्र तेथें ॥
समारंगणीं भार भारी मिळाले । कितीएक ते भीडतां भग्न जाले ॥ ८५ ॥
दळें लोटलीं राक्षसांचीं अचाटें । समारंगणीं चाललीं दाट थाटें ॥
बळें हाणिती शस्त्रघातें खणाणां । महीमंडळीं घोष ऊठे दणाणा ॥ ८६ ॥
असंभाव्य राक्षेस मारीत आले । कपी वीर ते भंगले भग्न केले ॥
तया देखतां मारुता कोप कैसा । बळें चालिला काळकृत्तांत जैसा ॥ ८७ ॥
गदा घेतली शीघ्र नैऋत्यनाथें । उडाला कपी ऋषभू व्योमपंथें ॥
सुगंधू कपी लोटला वीर्यवंतू । बळें आगळा चालिला जांबुवंतू ॥ ८८ ॥
कपी काळ कल्पांतिचे मेघ जैसे । रणीं लोटले गर्जती वीर तैसे ॥
बळें घालिती पालथें या भुगोळा । तिहीं मांडिला आट राक्षेस कूळा ॥ ८९ ॥
रणीं हाणिती येकमेकां फडाडां । तुटों लागले पादपाणी तडाडां ॥
नद्या लोटल्या शोणिताच्या भडाडां । समारंगणीं घोष ऊठे धडाडां ॥ ९० ॥
रणीं पाडिले दैत्य कोट्यानुकोटी । बहूतीं विरीं दीधली त्यासि पृष्ठी ॥
पुढें देखतां कोपला काळ जैसा । रणीं लोटला रावणी वीर तैसा ॥ ९१ ॥
तया राक्षसें घोर संधान केलें । कपीवाहिनीमाजि कल्पांत आलें ॥
मयूरासि पिंजारिलें पुच्छ जैसें । रणीं पाडिले ते कपी वीर तैसे ॥ ९२ ॥
कपी मारुती सारिखे भग्न केले । कितीएक ते वीर धाकें पळाले ॥
पुढें पाहतां वीर सौमित्र कैसा । गजा देखतां ऊठला सिंह जैसा ॥ ९३ ॥
टणत्कारिलें चाप काळाग्नि रोषें । थरारी धरा सप्त पाताळ घोषें ॥
भुमीं वर्षती मेघ ऊदंड गारा । चळों लागल्या त्या असंभाव्य तारा ॥ ९४ ॥
भिडाया रणीं ऊठले वीर कोपें । बळें सृष्टि जाळील नेणों प्रतापें ॥
तंव शीघ्र बीभीषणें वेग केला । गदा घेउनी वीर सन्मूख जाला ॥ ९५ ॥
सुमित्रासुतालागिं सांडूनि मागें । पुढें धांवला वीर तो लागवेगें ॥
रणीं देखिला वीर बीभीषणू तो । तया बोलता जाहला रावणी तो ॥ ९६ ॥
म्हणे रे बहूतां दिसां देखिलासि । वृथा पुष्ट तूं राक्षसांमाजि होशी ॥
नरें वानरें दास जालासि त्यांचा । मनू भंगिला रे तुवां पूर्वजांचा ॥ ९७ ॥
तुला ठाउका कोप माझा कृतांतू । मज इंद्रजीता पुढें मश्यकू तूं ॥
करूं पाहशी थोर सामर्थ्य येथें । समारंगणीं धाडितो मृत्युपंथें ॥ ९८ ॥

म्हणे इंद्रजीतास नैऋत्यनाथू । बळें वीण तूं बोलशी व्यर्थ मातू ॥
मजलागिं तो काळ मारूं शकेना । वरू दीधला तोषला रामराणा ॥ ९९ ॥
बहू शीकवीलें तुम्हां दुर्जनासी । परी नायका रे तुम्ही पापराशी ॥
मज सांगतां हीत अव्हेर केला । समस्तांसि येणें गुणें मृत्यु आला ॥ १०० ॥
मला ताडिलें वैभवाचेनि तोषें । बुडालेत रे सर्व तेणें चि दोषें ॥
समस्तांसि मारील हा रामराजा । समारंगणीं मी च पाहीन वोजा ॥ १०१ ॥
सभामंडपीं फार त्वां गर्व केला । कळेना तुला मृत्यु संनीध आला ॥
तुला आजि मारील सौमित्र बाणीं । मुढा राक्षसा जाण हे सत्य वाणी ॥ १०२ ॥
बहूसाल धिःकार केला तयातें । प्रतापें सिमा सांडिली इंद्रजीतें ॥
पदें ताडितां तो महा सर्प जैसा । रणीं कोपला वीर राक्षस तैसा ॥ १०३ ॥
म्हणे रे उभा फीर[a] सन्मूख राहें । समारंगणीं [b]घीर संधान साहें ॥
बळें सोडिले बाण दारूण आले । सुमित्रासुतें सर्व छेदून नेले ॥ १०४ ॥
रणीं घातला रावणानूज पाठी । प्रतापें पुढें चालिला वीर नेठी ॥
समारंगणीं अं[३९]तकातुल्य भासे । महावीर तो देखतां जीव त्रासे ॥ १०५ ॥
महा युद्ध होईल दोघांजणाशीं । पुढें सज्जनीं चित्त द्यावें कथेसी ॥
म्हणे दास ऊदास श्रोतीं न व्हावें । ऋ[४०]षी बोलिला तें चि हें सार घ्यावें ॥ १०६ ॥

---

## प्रसंग सातवा.

फ[४१]णी रा[४२]वणी वीर सन्मूख जाले । बळाचे महाकाळ जैसे उदेले ॥
करायास निर्वाण ते एकमेकां । विरश्रीबळें सोडिली सर्व शं[४३]कां ॥ १ ॥
पुढें बोलिता जाहला इंद्रजीतू । कृ[४४]तांतापुढें निर्बळी मानवा तूं ॥
मरायासि कां व्यर्थ आलासि येथें । निमि[४५]षांत मारीन रे बा[४६]णघातें ॥ २ ॥
रणामाजि सन्मूख होतां बळेंशीं । समस्तां तुम्हां पाडिलें ना[४७]गपाशीं ॥
पुन्हा मागुती सर्व ही बाणजाळीं । निमालेत माझ्या करें युद्धकाळीं ॥ ३ ॥
अरे काय झाली तुझी शक्ति तेथें । पुनः शीघ्र आलासि युद्धास येथें ॥
तुवां आणिलें काय सामर्थ्य जाया । बळें दावितां निर्बळें व्यर्थ वांयां ॥ ४ ॥
वृथा पुष्ट रे हा बहू रा[४८]जिभ्राता । नृपें ताडिला रे सभेमाजि लाथा ॥

---

a. फीर=धीर. b. घीर=घोर. ३९. अंतकातुल्य=यमासारखा. ४०. ऋषि=वाल्मीकि ऋषि (आद्य कवि रामायणकर्ता). ४१. फणी=शेषाचा अवतार लक्ष्मण. ४२. रावणी=रावण पुत्र इंद्रजित. ४३. शंका=भीति. ४४. कृतांत=यम. ४५. निमिष=अत्यल्पकाळ. ४६. बाणघात=बाणाचा तडाखा. ४७. नागपाश=सापांचीं बंधनें. ४८. राजभ्राता=रावणराजाचा भाऊ बिभीषण.

समस्तांमध्यें रावणें भ्रष्टवीला । तुम्हां मर्कटां माजि तो श्रेष्ठ केला ॥ ५ ॥
बळें आपुल्या रे तुझे [४९]पादपाणी । नभामाजि खंडून थाडीन बाणीं ॥
समस्तां तुम्हां ठाउकी शक्ति माजी । रहाया पुढें काय रे [c]प्राप्ति तूझी ॥ ६ ॥
बहू बोलिला [५०]वांजटू घोर शत्रू । प्रती उत्तरें बोलिला तो [५१]सुमित्रू ॥
मि हा कोण तूं नेणशी काय मूढा । वृथा [५२]विक्रमू बोलशी [५३]वाढ पूढां[d] ॥ ७ ॥
मही रुंद विस्तीर्ण [५४]छपन्न कोटी । गिरी[५५] दिग्गजांची असंभाव्य दाटी ॥
तटाकें नद्या मातले भव्य[५६]सिंधू । वरी दाटली जीवसृष्टी अगाधू ॥ ८ ॥
असंभाव्य हा भार कोणा धरेना । न घेतां पुढें जीव सृष्टी उरेना ॥
सहस्त्रां[५७]फणींचा असंभाव्य [५८]व्याळू । तयांमाजि येके फणीं हा भुगोळू ॥ ९ ॥
[५९]स्वभावें शिरीं ठेविजे पुष्प जैसें । तयाचे परी घेतले विश्व तैसें ॥
तयाहून तो कोण आहे विशेषू । मुढा नेणशी कां स्वयें मी च शेषू ॥ १० ॥
भविष्योत्तरें सर्व ही सत्य व्हावीं । बळें वैभवें राक्षसांचीं दिसावीं ॥
म्हणूनी तुवां घेतलें येश युद्धीं । नभामाजि जाऊनि कापट्य बुद्धी ॥ ११ ॥
जनीं हीन त्याला बरी वेळ आली । अकस्मात ते कीर्ति होऊनि गेली ॥
बळें आगळा राम आत्मा जगाचा । तयाहूनि रे विक्रमू [e]कोण कैंचा ॥ १२ ॥
तुम्हां पापरूपांमध्यें भक्त एकू । महावीर बीभीषणू [६०]पुण्यश्लोकू ॥
तयाशीं सभामंडपीं गर्व केला । दिसेंदिस राक्षेस सर्वै बुडाला ॥ १३ ॥
रिपू बोलतो जाण रे सत्य वाणी । प्रतापें तुझें शीर छेदीन बाणीं ॥
तया बोलितां ताविली [६१]भीम दृष्टी । उभा काळ जाळावया जीवसृष्टी ॥ १४ ॥
बळें छेदिता जाहला वोष्ट दंती । सिमा फांकली वैभवाची दिगंतीं ॥
करारां रणीं खादल्या वज्रदाढा । शतें सोडिलीं बाण वोढूनि [६२]मेढीं ॥ १५ ॥
बळें धांविलीं बाणजाळें उफाळें । लखाखीत [६३]सौदामिनीचेनि[f] मेळे ॥
तडाडीत घोषें कडाडीत आले । सुमित्रासुतें सर्व छेदून नेले ॥ १६ ॥

---

४९. पादपाणी=हातपाय. c. प्राप्ति=शक्ती. ५०. वाजटू=बडबड्या. ५१. सुमित्र=सुमित्रेचा मुलगा लक्ष्मण. ५२. विक्रम=पराक्रम. ५३. वाड=पुष्कळ. d. पुढा=गाढा. ५४. छपन्नकोटी (योजनें)=हा पृथ्वीचा विस्तार प्राचीन समजुतीप्रमाणें आहे. अर्वाचीन काळीं भूगोलव्यासमान ८००० मैल म्ह० ८०० योजनें, परिघ २५००० मैल म्ह० २५०० योजनें, आणि पृष्ठफल २००००००००० वीस कोट मैल म्हणजे २ कोट योजनें आहे. तसेंच पृथ्वीचें घन २७०००००००००००० दोन निखर्व सात खर्व मैल म्ह० २ खर्व व सात अब्ज योजनें आहे. ५५. गिरी=डोंगर. ५६. सिंधु=समुद्र. ५७. फणी=फडा. ५८. व्याल=साप. ५९. स्वभावें=सहज. e. 'तूज' पा० भे०. ६०. पुण्यश्लोक=पवित्र आहे कीर्ति ज्याची असा. ६१. भीम=भयंकर. ६२. मेढा=तीरकमटा. ६३. सौदामिनी=वीज. f. 'सप्रेरिले दूत काळें' पा० भे०.

पुन: कोपला तो रिपू कोटिगूणें । शतांचीं शतें सोडिले बाण तेणें ॥
नभामाजि ते बाण बाणीं सणाणा । कितीएक स्फुलिंग[64] झालीं फणाणा ॥ १७ ॥
असंभाव्य ते जाहली बाणवृष्टी । जळों लागली पावकें[65] सर्व सृष्टी ॥
अती चंड ते दंड अद्भूत कैसे । महाकाळ कल्पांतिचे मेघ जैसे ॥ १८ ॥
कडाडां खडाडां गडाडां घडाडां । तडाडां थडाडां दडाडां धडाडां ॥
बहूतां परीचे बहू घोष झाले । ग्रहीं[66] चंद्रसूर्यादिकां कंप आले ॥ १९ ॥
कितीयेक सिंधूदकें तप्त जालीं । कितीएक g सिंधूदकें तीं उडालीं ॥
असंभाव्य त्या दाटल्या बाणकोटी । बळें सोडिती पाडिती वीर जेठी ॥ २० ॥
नभामाजि कल्पांत ते बाणजाळीं । महायुद्ध तें होतसे अंतराळीं ॥
रिपू पेटले दोघ ही घोर मारा । भुमी वृष्टि गारा परी सर्व तारा ॥ २१ ॥
वरी पाहतां बाणबाणीं खणाणां । रिपू येकमेकांसि तो भेदवेना ॥
रथारूढ तो रावणी धांवताहे । पदीं चालतां शेष ऋक्षा[67] न साहे ॥ २२ ॥
पुढें चालिला वीर तो **जांबुवंतू** । शिळा घेतली धांवला **काळकेतू** ॥
बळें हाक देऊनियां चक्रचाली । उफाळें शिळा तो रथामाजि घाली ॥ २३ ॥
रथा मोडिलें पाडिलें भग्न केलें । **सुमित्रासुता रावणी** साम्य जालें ॥
**सुगंधें** विरें वैभवें लागवेगें । महा अश्व ते चूर्ण केले प्रसंगें ॥ २४ ॥
कपीनाथ **बीभीषणें मारुतीनें** । विरां लागिं सन्मानिलें थोर मानें ॥
भले हो भले थोर आश्चर्य केलें । रिपूच्या रथा विक्रमें भंगवीलें ॥ २५ ॥
नभीं सर्व आनंदली देवसृष्टी । बहूसाल संपादिली पुष्पवृष्टी ॥
समस्तां मनीं थोर आनंद जाला । रिसीं वानरीं घोष अद्भूत केला ॥ २६ ॥
म्हणे **रावणी** हा रिपू आंवरेना । बहूसाल सामर्थ्य याचें सरेना ॥
शरां मारितां सर्व तोडीत आहे । पुढें अग्निअस्त्रासि तो सोडिताहे ॥ २७ ॥
तयें सोडितां अस्त्र तैसें निघालें । धडाडीत तें तेज पुंजाळ आलें ॥
नभीं धूम्र दाटे असंभाव्य ज्वाळा । करूं पाहती भस्म नक्षत्रमाळा ॥ २८ ॥
असंभाव्य ते चालिली वन्हि[68]धाडी । मही सर्व आकाश तेणें कडाडी ॥
बहू hवर्ण ज्वाला शिखा[69] धांवताती । कडाडीत नेटें कपीमाजि येती ॥ २९ ॥
कपी ऋक्ष तेणें भयातुर जाले । कितीएक ते वीर पोटीं गळाले ॥
बहू सोडिला धीर नैऋत्यनाथें[70] । म्हणे गा विरां सर्व गेलों अनर्थें ॥ ३० ॥

---

६४. स्फुलिंग=ठिणग्या. ६५. पावक=विस्तव. ६६. ग्रह=मंगळ, बुध, गुरु, शुक्र, व शनि हे पंच तारा ग्रह. g. सिंधूदकें तीं उडालीं=तीं श्वापदें ही जळालीं. ६७. ऋक्ष=रीस, आस्वल. ६८. वन्हि=विस्तव. h. वर्ण=धूम्र. ६९. शिखा=ज्वाला. ७०. नैऋत्यनाथ=राक्षसस्वामी इंद्रजित.

सुमित्रासुतें देखिलें अग्निअस्त्रा । पुढें सोडिता जाहला मेघअस्त्रा ॥
तया सोडितां मेघ तैसे उदेले । गिरीचे परी [७१]अंबरीं भार आले ॥ ३१ ॥
नभीं दीसती ते [७२]हुडे कोट झाडें । महा मेघ गर्जोनि गंभीर वाडें ॥
नभा व्यापिलें घोर अंधार जाला । दिसेना रणामाजि दोहीं दळांला ॥ ३२ ॥
नभीं चालिले ते बहू कीट काळे । झकाकीत सौदामिनीचेनि मेळें ॥
बळें मेघधारा असंभाव्य गारा । सुटे कंपु सूसाट घोषें थरारां ॥ ३३ ॥
प्रसंगीं तये पाणजंजाळ जालें । रणामंडळीं तोयँ[७३] अद्भूत आलें ॥
कितीएक झाडें भुमी चूर्ण होती । पुरें पट्टणें सर्व वाहून जाती ॥ ३४ ॥
सुमित्रासुतें थोर अद्भूत केलें । जनाला गमे आजि [७४]कल्पांत आलें ॥
बुडों लागले भार त्या राक्षसांचे । बहूसाल त्या धीर गेले विरांचे ॥ ३५ ॥
रणीं सोडिलें अस्त्र नेटें विझालें । बहू राक्षसां थोर कल्पांत आलें ।
त्वरें रावणी वायुअस्त्रास सोडी । असंभाव्य तो वात नेटें झडाडी ॥ ३६ ॥
कडाडीत पाडें असंभाव्य झाडें । बळें पाडिलीं वाड झुंबाड झाडें ॥
फुटों लागलीं शै[७५]शृंगें खडाडां । कडे चालिले पर्वतांचे भडाडा ॥ ३७ ॥
भ्रमों लागलीं खे[७६]चरें प्रेत जालीं । गृहें गोपुरें एक वेळे उडालीं ॥
बहूसाल तो वात आ[७७]वर्त जाला । तया देखतां मेघ नेटें उडाला ॥ ३८ ॥
सुमित्रासुतें देखिला चंड वारा । गिरीअस्त्र सोडूनि केला निवारा ॥
असंभाव्य तीं चाललीं शैलशृंगें । बहू वात निर्वात केला प्रसंगें ॥ ३९ ॥
गिरी चालिले ते असंभाव्य कैसे । नभीं धांवती मातले मेघ जैसे ॥
महावीर तो वज्रअस्त्रासि सोडी । रणीं रावणी शैल तात्काळ तोडी ॥ ४० ॥
रिपू राक्षसें शैल ते पिष्ट केले । बळें आपुल्या दिग्गजां आड नेले ॥
पुढें जाहली ते बहू वज्रदाटी । तया देखता जाहला वीर जेठी ॥ ४१ ॥
पुढें वीर सौमित्र ब्रह्मास्त्र सोडी । तया पासुनि वन्हि नेटें भडाडी ॥
गमे कोटी विद्युल्लता एक वेळा[i] । महा लोळ कल्लोळ भासे भुगोळा ॥ ४२ ॥
रणा मंडळीं पावकें त्या अचाटें । [j]जळों लागलीं सर्व ही वज्रथाटें ॥
पुढें चालिल्या त्या असंभाव्य ज्वाळा । रणा मंडळीं जाहली एक वेळा ॥ ४३ ॥
तया देखतां रावणी तें चि सोडी । रणामंडळीं एकमेकांसि तोडी ॥
रणामाजि तात्काळ सन्मूख आले । महा ज्वाळ ते एक होऊनि [k] गेले ॥ ४४ ॥

---

७१. अंबर=आकाश. ७२. हुडे=बुरूज. ७३. तोय–पाणी. ७४. कल्पांत=जलप्रलय होण्याचा काळ. ७५. शैलशृंगें=डोंगरांचीं शिखरें. ७६. खेचरें=आकाशांत उडणारे पक्षी. i. एक वेळा=एक मेळा. j. जळों लागली=बळें जाळिलीं. ७७. आवर्त=भोंवरा. k. 'एक होतां विजाल्या०.

पुढें घोर रुद्रास्त्र त्या रावणीनें । बळें सोडिलें शीघ्र माहाविरानें ॥
रणामाजि तें चालिलें एकवेळे । भुमी पाय आकाश पंथीं शिसाळें ॥ ४५ ॥
बळें धाविले ते रणामाजि कैसे । गिळाया भुगोळा महाविघ्न जैसे ॥
तया देखतां कंप माहाविरांसी । भयें मूर्छना पावली वानरांसी ॥ ४६ ॥
तया देखतां तो फणी सिद्ध जाला । पुढें सोडिलें शीघ्र माहेश्वराला ॥
उठे मातला काळ कल्पांत काळीं । दिशा दाटल्या सर्व आकाश ज्वाळी ॥ ४७ ॥
रवी कोटि विद्युल्लता एक वेळां । रणीं धांवती कंप जाला भुगोळा ॥
महातेज हेलावलें ते चि काळीं । असंभाव्य तें चालिलें ब्रह्मगोळीं ॥ ४८ ॥
तया देखतां अस्त्र मागें पळालें । बहू कूळ तें खेचरांचें जळालें ॥
पुढें देखतां रावणी भ्रांत जाला । भयें भूलला वारवेना तयाला ॥ ४९ ॥
मनीं भावितो कोण राखेल गेलों । कळेना मला व्यर्थ येथें जळालों ॥
तयीं शीघ्र रामानुजें काय केलें । प्रतिज्ञापणाला मनीं आठवीलें ॥ ५० ॥
म्हणे हो मनीं शीर छेदूनि न्यावें । म्हणोनी बळें अस्त्र मागें वळावें ॥
रणामंडळामाजि वीरें सुमित्रें । बळें वारिलें अस्त्र तें बीजमंत्रें ॥ ५१ ॥
म्हणे मेघनादू मला विघ्न आलें । परी थोर आश्चर्य कां वाचवीलें ॥
भला वीर सौमित्र हा वीर्यवंतू । मना सारिखें युद्ध मोठें करीतू ॥ ५२ ॥
असेना पुढें वीर होणार नाहीं । बहू देखिले पाहिले झुंजतां ही ॥
महावीर हे सूर्यवंशी बळाचे । रिपूलागिं रक्षावया कोण कैचे ॥ ५३ ॥
महावीर दोघे रणीं ते चि काळें । पुन्हा सोडिते जाहले बाणजाळें ॥
रणामाजि ते भेदिती एकमेकां । नभीं सोडिल्या बाणभाळी अनेका ॥ ५४ ॥
रिपूंचीं रिपू तोडिती बाणजाळें । पुन्हा मागुती सोडिती ते उफाळें ॥
विरें वीर तो भेदितां ही ढळेना । विरश्रीबळें काय होतें कळेना ॥ ५५ ॥
पुढें काय केलें तया मेघनादें । रणीं हाक देऊनि धांवोनि क्रोधें ॥
महातेज पुंजाळ त्या शीघ्र काळीं । बळें भेदिल्या तीन भाळी कपाळीं ॥ ५६ ॥
महावीर तो रावणी काळरूपी । पुराणा बहू काळ कापट्य रूपी ॥
सुमित्रासुतू तो दिसे बाळलीळा । बळें भेदिला रक्त वाहे कपाळा ॥ ५७ ॥
तया देखतां कोप नैऋत्यनाथा । पुढें चालिला पाववायासि वेथा ॥
रणीं हाक देऊनि बीभीषणानें । गदा घेतली चालिला थोर त्राणें ॥ ५८ ॥
तया देखतां त्या दशग्रीवसूतें । रणीं विंधिला पाडिला बाणघातें ॥

---

७८. शिसाळें=मस्तक. ७९. माहेश्वर=रुद्रास्त्र. ८०. भाळी=समूह. ८१ वेथा=व्यथा, दुःख. ८२. त्राण=नेट.

पुढें देखिला कोपला वीर गाढा । सुमित्रासुतें वोढिला[1] चंद्र मेढा ॥ ५९ ॥
रणीं रावणी लक्षिला ते चि काळीं । बळें भेदिल्या बाणभाळी कपाळीं ॥
नवां बाणघातें रिपू m(स्वस्थ केला । तया मेघनादा बहू खेद जाला ॥ ६० ॥
कपाळीं बळें भेदिले बाण वीरें । प्रवाहो बळें चालिला तो [83]रुधिरें ॥
महामस्तकामाजि सर्वै बुडाले । कपाळावरी पि[84]च्छ वाशिंग जालें ॥ ६१ ॥
म्हणे वीर बीभीषणू वीरछा[85]त्रा । बरें ऊसणें घेतलें गा सुमित्रा ॥
रिपू रावणी तापला वीर कैसा । शुळें टोंचितां ऊठला सर्प जैसा ॥ ६२ ॥
महावीर निर्वाणिचें[86] बाण सोडी । लघू लाघवें शेष तात्काळ तोडी ॥
असंभाव्य कोपानळें तीव्र ज्वाळा । मुखें सांडितां काळकांपे चळाळां ॥ ६३ ॥
सिमा सांडिली थोर कल्पांत काळीं । महावीर ते खीळिले बाणजाळीं ॥
बहू खोंचले देह दोघांजणांचे । झरे लागले वाहती शोर्णितां[87]चे ॥ ६४ ॥
विरश्रीबळें दुःख नाहीं प्रतापें । रणीं भेदिती एकमेकांस कोपें ॥
बहू माजलें युद्ध तें ओसरेना । बळें भीडती येकमेकां सरेना ॥ ६५ ॥
पुढें काय केलें सुमित्रासुतानें । गुणीं सज्जिलें त्या रवीचक्रबाणें ॥
मुखीं धांवती त्या शिखी[88] पावकाच्या । बहू चंचका कोटि विद्युल्लतेच्या ॥ ६६ ॥
कडाडीत कोपानळें बाणभाळी । बळें सोडितां शीघ्र तैशी निघाली ॥
भयातूर दोहीं दळीं कंप जाले । ऋषी, देव, गंधर्व धाकें पळाले ॥ ६७ ॥
ग्रहादीक आकाशपंथीं जळाले । बहू खेचरें भार भूमी गळाले ॥
ध्वनी ऊठला घोर घोषें तडाखा । बळी कांपती ईतरां कोण लेखा[89] ॥ ६८ ॥
सुमित्रासुतें शीघ्र संधान केलें । रणीं रावणी शीर छेदून नेलें ॥
समस्तां सुरालागिं आनंदवीलें । सुरेशा[90]मनींचें महा शल्य गेलें ॥ ६९ ॥
रणामाजि तो इंद्रजीतू निमाला । समस्तां सुरांलागिं आनंद जाला ॥
महाकंटकू घोर संहार केला । त्रिलोकीं बहू कीर्तिचा घोष गेला ॥ ७० ॥
पुढें शेष सूगंध बीभीषणानें । दळें सर्व ही सिद्ध केलीं विरानें ॥
कपीशीं सुवेळाचळा राम जेथें । महावीर ते चालिले सर्व तेथें ॥ ७१ ॥
प्रभू राम तो बंधुची वाट पाहे । उतावीळ पोटीं वियोगा न साहे ॥
बहूसाल चिंता करी बांधवाची । म्हणे कोण वेळा सुमित्रासुताची ॥
तया बोलतां भार तैसे उदेले । दळेंशीं बळें येश घेऊनि आले ॥
समर्था प्रभूला नमस्कार केले । रघूनायका भेटले स्वस्थ जाले ॥ ७३ ॥

1. वोढिला चंद्रमेढा=वाहिला चंडमेढा. m. 'सुस्त' पा० ८३. रुधिर=रक्त. ८४. पिच्छ =बाणाचा पिसारा. ८५. छात्र=शिष्य. ८६. निर्वाण=निकर. ८७. शोणित=रगत. ८८. शिखा=ज्वाला. ८९. लेखा=हिशेब. ९०. सुरश=इंद्र.

सुमित्रासुताचा देहे स्वस्थ जाला । पुढें राघवें वैद्य पाचारवीला ॥
मुखें बोलिला राम तो वीर बाहो । करावा अतीआदरें दिव्य देहो ॥ ७४ ॥
रणीं इंद्रजीतासि प्राणांत जालें । कपीऋृषभानें सवें शीर नेलें ॥
निचेष्टीत काया रणीं स्तब्ध ठेली । प्रिये लागिं सांगावया भूज गेली ॥ ७५ ॥
त्रिकूटाचळीं भूवनें रावणाचीं । तया सारिखीं रम्य नीकुंबळेचीं ॥
तया भूवनामाजि सूलोचना ती । सुखें वैभवाची बरी वेळ जाती ॥ ७६ ॥
अकस्मात तेथें ध्वनी घोष जाला । परीचाॅरिका सांगती भूज आला ॥
भुमी रम्य रॉजांगणें पांच बंदी । पडे भूज तेथें स्रवे रक्तॅबिंदीं ॥ ७७ ॥
मनामाजि ते० शंकली दिव्य बॉळा । रणामाजि भॅर्तार त्या कोण वेळा ॥
भ्रमें चित्त दुश्चित्त बाहेर आली । फॅणीचेपरी भूज ते ओळखीली ॥ ७८ ॥
खुणे दाविलें लीहिलें पत्र हातें । म्हणे चालिलों मी पुढें मुक्तिपंथें ॥
तुझ्या कारणें धाडिली मूॅळ बाहे । प्रिये चाल वेगीं तुझी वाट पाहे ॥ ७९ ॥
तया वाचितां थोर आकांत जाला । दुखा माजि तो सौख्यसिंधू बुडाला ॥
मनीं वैभवाची तिनें सांडि केली । त्रिकूटाचळा जावया सिद्ध जाली ॥ ८० ॥
बहू पूतळ्यॅा पिंजरे पक्षियाती । तये भोंवतीं भोंवतीं रूदताती ॥
अहो माय आम्हांसि सांडून जाशी । तुझ्या वेगळीं सर्व आम्ही विदेशी[99] ॥ ८१ ॥
तयांलागिं संबोखिलें[100] रम्य वाणी । तुम्हां रक्षिता देव तो शूळपांणी ॥
मिळाले बहू लोक ते दाटि जाली । शिबीके[2] मधें भूज वेगें निघाली ॥ ८२ ॥
विसोरे बहू साल नानापरीचे । अलंकार भॅांगार ते सुंदरीचे ॥
धनें संपदा पहातां मीति नाहीं । तिनें वांटिलें लूटिलें सर्व कांहीं ॥ ८३ ॥
पुढें अॅश्विनी लागिं आरूढ जाली । बहू वेग लंकापुरी माजि गेली ॥
नमस्कार केला तया रावणाला । पुढें टाकिलें पत्र आकांत जाला ॥ ८४ ॥
रणीं झुंजतां इंद्रजीतू निमाला । बहू नायकांचा ध्वनी घोष झाला ॥
दुखें व्याप्त लंकापती आंग घाली । नसेp मानसीं शुद्धि सर्वे उडाली ॥ ८५ ॥
प्रधानीं बहूतां परी सांवरीला । पुढें रावणा कोप तात्काळ आला ॥
म्हणे आजि संहारितों वैरियांला । दळेंशीं रणीं जावया सिद्ध जाला ॥ ८६ ॥

---

९१. परिचारिका=दासी. ९२. राजांगण=मुख्य अंगण. याप्रमाणें च राजमार्ग, राय आंवळा ( राजामलक ), राजजंबुवृक्ष यांचा अर्थ समजावा. ९३. रक्तबिंदीं=रक्ताच्या बिंदूनीं. ०. ते शंकली–वोसावली. ९४. दिव्य बाळा=सुंदर स्त्री. ९५. भर्तार=नवरा. ९६. फणीचे परी=सापासारखा गोंडस भुज. ९७. मूळ=बलावणें, आमंत्रण. ९८. पुतळ्या=चित्रें. ९९. विदेशी=परकीदेशी. १००. संबोखिलें=समजाविलें. १. शूळपाणी=त्रिशूळ आहे हातीं ज्याच्या असा शिव. २. शिबिका=पालखी. ३. भांगार=सोनें. ४, अश्विनी=घोडी. p. मानसीं–शरीरीं.

म्हणे सासुऱ्यालागिं सूलोचना ते । घडीनें घडी आमुची वेळ जाते ॥
समर्था मला शीर आणून द्यावें । पुढें काय मानेल तैसें करावें ॥ ८७ ॥
शिरें आणितों आजि आठां जणांचीं । मुखें तीव्र क्रोधानळें[5] रावणाचीं ॥
रिपू दोघे बीभीषणा अंगदाचें । शिसा सुग्रिवा मारुता ऋषभाचें ॥ ८८ ॥
बहूसाल तो कोप रायासि आला । पुढें मंदिरामाजि नेलें सुनेला ॥
तियेलागिं मंदोदरी नीति सांगे । रघूनायका भेट वो लागवेगें[6] ॥ ८९ ॥
अहो देखिलें स्वप्न म्यां घोरवाणें । निमाले रणीं सर्व राक्षेस प्राणें ॥
नव्हे स्वप्न हें वाटतें सत्य आहे । दिलें राज्य बीभीषणालागिं पाहे ॥ ९० ॥
गृह सूटले तूटले पाशबेडी । पुढें सोडिले देव तेतीस कोडी[7] ॥
त्रिलोकीं उभी राहिली राम गूढी[8] । पुढें साच होईल ऐशीच प्रौढी ॥ ९१ ॥
म्हणोनि तुवां शीघ्र आतां उठावें । दिनाचे परी रामचंद्रा वदावें ॥
करूणास्वरें राघवा आळवावें । बहूतां परी शीर मागूनि घ्यावें ॥ ९२ ॥
त्वरें ऐकतां ऊठली शब्द नेटें । पुढें वानिती[9] भाट वेताळ[10] थाटें[11] ॥
कपी वाहिनीनें[12] महद्भूत केलें । त्वरें बोलतां जानकी पाठवीलें ॥ ९३ ॥
म्हणे राम हें सर्वथा ही घडेना । रिपू मारिल्यावीण दृष्टी पडेना ॥
असंभाव्य सेनासभा दाटली ते । पुढें शीघ्र सूलोचना भेटली ते ॥ ९४ ॥
पुढें देखतां राम सूखें निवाली । कृपा भाकितां ते नमस्कार घाली ॥
कृपासागराची बहू स्तूति केली । सुशब्दें रघुनायकें तोषविली ॥ ९५ ॥
प्रसंगीं तये थोर आश्चर्य जालें । निचेष्टीत शीरें बरें हास्य केलें ॥
कृपें पाहिलें रामचंद्रें दयाळें । पती ऊठवितों तुझा शीघ्र काळें ॥ ९६ ॥
खुणा दाविती वो वळावें दयाळा । सभे घालिती येकमेकांसि डोळा ॥
कपी वीर ते सांगती कानगोष्टी । पुढें ऊठतां सर्व आटील सृष्टि ॥ ९७ ॥
वदे ऋक्ष[13] स्वामी बरेंसे विचारा । रिपू नूठवावा कदा ऊपकारा ॥
वदे मारुती राघवालागिं रागें । रघूनायकें सांडिली गोष्टि मागें ॥ ९८ ॥
उदासीन देखोनि सूलोचना ते । नमस्कार केला त्वरें चालिलीते ॥
प्रभू सव्य घालूनिया शीघ्र गेली । मनोभावना सर्व ही सिद्ध केली ॥ ९९ ॥
समुद्रातिरीं भीमकुंडा प्रचंडा । बळें चेतल्या वन्हिशीखा उदंडा ॥
दशग्रीव मंदोदरी राजभारें । सवें चालिलीं गांव लोकें अपारें ॥ १०० ॥
ऋषी देव गंधर्व मांदी[14] मिळाली । समस्ती तियेची बहू स्तूति केली ॥

---

५. क्रोधानळ=क्रोध हाच अग्नि. ६. लागवेगें=लवकर. ७. कोडी=कोटी. ८. गूढी=ध्वज, झेंडा. ९. वानिती=वर्णिती. १०. भाट वेताळ=स्तुतिपाठक. ११. थाटें=समुदाय. १२. वाहिनी=फौज. १३. ऋक्ष=रीस जांबवान. १४. मांदी=समूह.

करी ती ऋषीनायका अक्षवाणें[15] । उडी घातली अग्निमूखीं स्फुराणें ॥ १०१ ॥
मनामाजि होता मनांतील हेतु । पुढें देखिला इंद्रजीतू समर्थू ।
सती आदरें मुक्तिपंथास गेली । कथा राहिली पाहिजे चालविली ॥ १०२ ॥
फणीगर्भरत्नासि[16] हो दग्ध केलें । म्हणे दास हें राक्षसी कृत्य जालें ॥
पुढें सज्जनीं चित्त द्यावें कथेला । महाशक्ति भेदील रामानुजाला ॥ १०३ ॥

---

## प्रसंग ८ वा प्रारंभ

सुमित्रासुतें पाडिला इंद्रजितू । रणीं ग्रासिला काळ जैसा कृतांतू ॥
दळें फूटलीं वीर मागें पळाले । किती एक घायाळ लंकेत गेले ॥ १ ॥
सभामंडपीं वीर घालोनि मेटें । भुमी पीटिती थोर दुःखें ललाटें ॥
मुखें बोलती इंद्रजितू निमाला । पुरी माजि तो थोर आकांत जाला ॥ २ ॥
त्रिकूटाचळीं मृत्यु आला बहूतां । समस्तांसि संहार हे मूळ सीता ॥
सुपारश्व संबोखितां ते प्रसंगीं । पिशाच्यापरी ऊठला लागवेगीं ॥ ३ ॥
तया रावणा मूर्छना सांवरेना । भुमी आंग घाली कदां आवरेना ॥
स्त्रियापुत्रकन्यादिकें तोंड घेती । प्रसंगीं तये थोर नाली रुदंती[17] ॥ ४ ॥
अशोका वना माजि तो शीघ्र गेला । सितेलागिं मारावया सिद्ध जाला ॥
पुढें देखतां ते भयातूर जाली । सुपारश्व धांवोनियां आड घाली ॥ ५ ॥
बहूतांपरी राव तो बोधवीला । पुढें रावणू क्रोध सांडून ठेला ॥
महावीर दोघे पुरीमाजि आले । रणीं जावयालागिं ते सिद्ध झाले ॥ ६ ॥
पुढें ऊठविलीं[q] दळें सिद्ध होती । रथी सारथी हस्ति घोडे पदाती[18] ॥
महाविक्रमें चालिले राजभारें ॥ दणाणीतसे मेदिनी[19] घोरभारें ॥ ७ ॥
असंभाव्य तीं सोडिलीं बाण जाळें । कपी टाकिती चंड शीळा उफाळें ।
महावीर संघट्टले एकमेकां । बळें भेदिती दूरि टाकूनि शंका ॥ ८ ॥
महामार आरंभिला वानरांतें । पुढें बाण कार्मूक[20] तें सिद्ध होतें ॥
उभा राहिला विक्रमें वीर कैसा । बळें सर्व संहरितो काळ जैसा ॥ ९ ॥
बहूसाल तीं सोडिलीं बाणजाळें । तुटों लागलीं राक्षसांचीं शिसाळें ॥
असंभाव्य तीं पोकळी माजि जाती । पुरे धांव तेथूनियां खालिं येती ॥ १० ॥
बहूसाल संहार केला दळाचा । करी कोण लेखा तयां घायळांचा ॥
रणीं राघवें लाविले घायवारे । पळाले पुरी माजि ते थोर मारें ॥ ११ ॥

---

१५. अक्षवानें=अक्षयवायनें. १६. फणीगर्भरत्न=शेषाची सुंदर कन्या सुलोचना. १७. रुदंती=रडारड. q. ऊठविलीं–पाठविलीं. १८ पदाती=पायदळ. १९. मेदिनी=पृथ्वी. २०. कार्मूक=धनुष्य.

भयें बोलती सांगती रावणाला । रणामाजि तो सर्व संहार जाला ॥
असंभाव्य तो कोपला पापराशी[r] । पुढें धाडिलें शीघ्र तीघांजणासी ॥ १२ ॥
विरूपाक्ष विद्युन्मतू आणि मन्तू । रथारूढ होऊनियां लंकनाथू ॥
महाशस्त्र सामुग्रिया तो समर्थू । बळें चालिला रुंधिला राजपंथू ॥ १३ ॥
असंभाव्य सेना पुढें आणि मागें । रणामंडळा चालिला लागवेगें ॥
बहुसाल वाद्यें पुढें येक वेळां । समारंगणीं नाद गेला भुगोळा ॥ १४ ॥
रथां घोडियां कुंजरां दाटि जाली । उफाळें बळें चंड सेना निघाली ॥
बहू शस्त्रपाणी बहू छत्रछाया । बळें वोळले मेघ जैसे पडाया ॥ १५ ॥
उभा राहिला रावणू राजभारें । तिघे वीर ते भिडती घोर मारें ॥
पुढें देखितां रावणू सांवरेना । उभा रहातां धीर पोटीं धरेना ॥ १६ ॥
बळें वाईलीं[२१] रावणें चंड चापें । बहूसाल ते बाण सोडी प्रतापें ॥
असंभाव्य तीं सोडिलीं बाळजाळें । तुटों लागलीं पाद[२२]पाणी शिसाळें ॥ १७ ॥
कपी सर्व ही छेदिले मुख्य शत्रू । रणामंडळी गर्जला तो अमित्रू[२३] ॥
कपी खोंचले नेट पोटीं धरेना । परा[२४]धिक्य तें सुग्रिवा साहवेना ॥ १८ ॥
बळें हाक देऊन तैसा निघाला । तया पाठिशीं तो विरें[२५]वीर आला ॥
किती येक ते बाड जुंबाड हातीं । किती येक ते धांवती शृंग घेती ॥ १९ ॥
किती येक घेऊनियां चंड शीळा । किती येक फिराविती भिंडमाळा ॥
कितीएक ते झाडिती शस्त्रधारा । कितीएक घेऊनि आले कुठारा[२७] ॥ २० ॥
कितीएक ते खड्ग[२८] घेऊनि आले । कितीएक ते शूळ[२९]पाणी मिळाले ॥
कितीयेक लोहर्गळीं[३०] ते प्रसंगीं । कितीकीं गदा घेतल्या लागवेगीं ॥ २१ ॥
कितीयेक घेऊनि आले दशघ्नी[३१] । कितीयेक घेऊनि आले शतघ्नी[३२] ॥
किती तोमरें[३३] [३४]पट्टिशेंशीं निघाले । कितीयेक शूळ घेऊनि आले ॥ २२ ॥
किती फर्श[३५]पाणी किती चक्र[३६]पाणी । किती येक ते वीर खट्वां[३७]गपाणी ॥
कितीएक असी[३८]लता झाडिताती । कटयारा सुऱ्या वीर घेऊनि येती ॥ २३ ॥

---

r. पाप-गर्व. २१. वाइलीं=घेतलीं. २२. पादपाणी शिसाळें=हात, पाय, डोकीं. २३. अमित्र=शत्रु. २४. पराधिक्य=शत्रूचें वर्चस्व. २५. विरेंविर=योध्यानयोद्धा. २६. शृंग=डोंगराचें शिखर. २७. कुठार=कुऱ्हाड. २८. खड्ग=तरवार. २९. शूळपाणी=त्रिशूळ आहे हातीं ज्यांच्या असे. ३०. लोहर्गळा=लोखंडाच्या कांबी, अडसर. ३१. दशघ्नी=बंदुका. ३२. शतघ्नी=तोफा. ३३. तोमर=शस्त्रविशेष. ३४. पट्टीश=शस्त्रविशेष. (पट्टा). ३५. फर्शपाणी=फरशी म्ह० कुऱ्हाड घेतली आहे हातीं ज्यांनीं. ३६. चक्रपाणी=चक्र आहे हातीं ज्यांच्या ते. ३७. खट्वांग पाणी=बाजेचा खूर आहे हातीं ज्यांच्या असे. ३८. असिलता=तरवार.

बहूतांपरीचीं बहूसाल शस्त्रें । बहू हाक देती विशाळें वॅगॅगें ॥
कपीनायका भोंवतीं दाट थाटें । रणीं धांवती वीर ते कड्कडाटें ॥ २४ ॥
पुढें रावणें देखिला थोर थावा । असंभाव्य तो सुग्रिवाचा उठावा ॥
कपीचक्र तें घोर अद्भूत आलें । मनामाजि तें थोर आश्चर्य केलें ॥ २५ ॥
कपींचा रणीं लोळ कल्लोळ आला । गजारूढ माहामतू सिद्ध जाला ॥
तया रावणा देखतां युद्ध होतें । वहू मांडला आट त्या राक्षसांतें ॥ २६ ॥
गजारूढ महामतू शैल जैसा । शिळा टाकितो वीर सुग्रीव तैसा ॥
गजामस्तकीं ते शिळा चंड आली । गरारून तो कुंजरू आंग घाली ॥ २७ ॥
गजा पाडितां छेदिला उष्ट्र दंती । बळें चालिला शूळ घेऊनि हस्तीं ॥
ह्मणे साहरे साह तूं सुग्रिवाला । सुळा टाकितां वीर वर्ता उडाला ॥ २८ ॥
पुढें सूळ मोडूनियां लागवेगें । गदा घात हाणे तया पृष्टिभागें ॥
महा वीर तो घोर मारें पळाला[s] । रणीं राक्षसां थोर संहार जाला ॥ २९ ॥
विरेंवीर राक्षेस ते भग्न केले । कपी धीट ते नीट मारीत आले ॥
तयां देखतां वीरूपाक्षू निघाला । बहूसाल धिःकारिलें सुग्रिवाला ॥ ३० ॥
पुढें सुग्रिवें बाड जुंबाड हातें । रिपूचें रथीं टाकिलें घोर घातें ॥
वरी पाहतां झाड सन्मूख आलें । विरें बाण टाकूनि छेदून नेलें ॥ ३१ ॥
शिळा टाकिली चंड त्या सुग्रिवानें । बळें फोडिली बाण घातें विरानें ॥
पुन्हां राक्षसें घोर संधान केलें । कपी सूग्रिवें तुच्छ मानूनि नेलें ॥ ३२ ॥
पुढें सुग्रिवें शृंग त्या आचळाचें । करीं घेतलें अग्र मंद्राचळाचे ॥
बळें टाकिली ते शिळा घोर घातें । विरूपाक्ष तो चालिला मृत्युपंथें ॥ ३३ ॥
रणीं राक्षसां पातली मृत्युवेळा । पुढें देखिलें रावणें त्यांसि डोळां ॥
अहारे कसें काय जालें कपाळा । भयें भूलला पातली कंपवेळा ॥ ३४ ॥
पुढें रावणें देखिलें सव्यँ भागीं । महा वीर विद्युन्मतू ते प्रसंगीं ॥
तया बोलला पाहसी काय वीरा । महावीर तो पेटला घोर मारा ॥ ३५ ॥
रथारूढ होऊनियां सुग्रिवाला । पुढें शीघ्र पाचारिलें त्या कपीला ॥
शरांचीं शतें टाकिलीं राक्षसानें । विरश्रीबळें साहिलें सुग्रिवानें ॥ ३६ ॥
पुढें सुग्रिवें घेतली चंड शीळा । बळें टाकिली त्यासि लक्षूनि डोळां ॥
शिळा फोडिली राक्षसें बाणघातें । बहू कोप आला तया सुग्रिवातें ॥ ३७ ॥
शिळा घेतली दुसरी सुग्रिवानें । पुन्हा टाकिली चंड महा विरानें ॥
तयें राक्षसें फोडिलें त्या शिळेला । महावीर तो धीर देतो दळाला ॥ ३८ ॥

---

३९. वगगें=तोंडानें. ३. पळाला–निमाला. ४०. सव्य=डावा ( लोकांत सव्य याचा अर्थ उजवा समजतात. परंतु तो अर्थ खरा नव्हे. )

कपीनाथ सुग्रीव देखोनि ऊणें । बहू कोपला वीर तो कोटिगूणें ॥
बळें लेंगुळें[४१] घाव हाणे महीला । गदे झेलिलें[t] तोडिलें त्या रथाला ॥ ३९ ॥
निमाले गदा लागतां दिव्य घोडे । रथू वीघडे चूर्ण होऊनि मोडे ॥
पडे सांरथी[४२] दैन्यवाणा उताणा । विरा राक्षसा मूर्छना सांवरेना ॥ ४० ॥
रणीं उठला वीर तो सिद्ध जाला । गदा घेतली हांकिलें सुग्रिवाला ॥
बळें हाणतां झेलिली त्या कपीनें । पुन्हा हाणती येकमेका गदेनें ॥ ४१ ॥
बळाचे महावीर दोघे प्रतापी । गदा हाणती भीडती काळरूपी ॥
गदाघात संघट्टणें वन्हिवृष्टि । जळों[u] लागली पावकें सर्वसृष्टि ॥ ४२ ॥
तया देखतां मंत धावोनि आला । रणामंडळीं हांकिलें अंगदाला ॥
बहू त्रासिता जाहला घोर वाणी । तयें अंगदा भेदिलें पंच बाणीं ॥ ४३ ॥
तया मूर्छना देखतां जांबुवंतें । महावीर तो ताडिला वृक्षघातें ॥
विरें राक्षसें वृक्ष छेदूनि नेला । रणीं भेदिला ऋक्ष[४३] तो भग्न केला ॥ ४४ ॥
रणीं भेदिलें देखिलें त्या रिसाला । गवाक्षा विरा थोर आवेश आला ॥
पुढें लक्षिता जाहला राक्षसातें । बळें ताडिलें थोर पाषाणघातें ॥ ४५ ॥
विरें शीघ्र पाषाण तो भग्न केला । शरें नीकुरें भेदिलें त्या कपीला ॥
गवाक्षू कपी तो भुमी आंग घाली । तयीं अंगदें मूर्छना सांवरिली ॥ ४६ ॥
करीं सार आसीलतेशीं निघाला । बळें हाक देऊनि सन्मूख आला ॥
कठोरें करें ताडिलें राक्षसातें । महामंतु तो चालिला मृत्युपंथें ॥ ४७ ॥
रणामंडळीं शांति जाली रिपूंची । दळें गर्जती जाहलीं वानरांचीं ॥
उणें देखितां रावणा कोप आला । प्रतापें रणामाजि युद्धा निघाला ॥ ४८ ॥
रथू लोटिला रावणें शीघ्र काळें । बहूसाल तीं सोडिलीं बाणजाळें ॥
पुढें देखतां राम तात्काळ छेदी । पुन्हां रावणू घोर संधान साधी ॥ ४९ ॥
नभीं सोडिले बाण कोटयानुकोटी । असंभाव्य जाली बहू थोर दाटी ॥
महामेघ तो मोकली[४४] मेघधारा । रघूनायकें छेदिले ते सरारां ॥ ५० ॥

---

४१. लांगूल=शेंपूट. t. गदें झेलिले तोडिलें त्या रथाला—गदा मोडिली पाडिलें त्या रथाला. ४२. सारथी=रथहांकणारा. u. जळों लागली पावकें सर्व सृष्टि—तया पावकें जाळिली सर्व सृष्टि. श्लोक ४२ व ४३ यांच्या दरम्यान हे दोन श्लोक एका पोथींत अधिक आहेत:—

बळें हाणतां भंगलें सर्व कांहीं । गदा टाकिल्या घेतले शूळ तेही ॥
रणीं भीडतां शूळ ते चूर्ण झाले । महावीर ते मल्ल युद्धासि आले ॥ १ ॥
दणाणा रणामाजि ते मुष्टिघाते । बळें हाणिती एकमेकां निघातें ॥
कपी सुग्रिवें दीधली वज्रमुष्टि । महा वीर तो पाडिला प्रेत सृष्टि ॥ २ ॥

४३. ऋक्ष=आस्वल ( जांबवान ). ४४. मोकली=सोडी.

पुढें रावणू थोर कोपें कडाडी । करी गर्जना मेघ जैसा गडाडी ॥
बहू कोपला तो असूरास्त्र सोडी । तेणें चालिल्या त्या नभीं चक्रकोडी ॥ ५१ ॥
असंभाव्य तीं चाललीं घोर चक्रें । महातेज पुंजाळ त्यांचीं वगत्रें[४५] ॥
कपी वाहिनीमाजि ते एकवेळे । तुटों लागलीं वानरांचीं शिसाळें ॥ ५२ ॥
पुढें देव गंधर्व अस्त्रास सोडी । तेणें तोडिल्या सर्व ही चक्रकोडी ॥
रणीं रावणू रुद्रअस्त्रास घाली । शुळामूसळांची नभीं दाटी जाली ॥ ५३ ॥
धुधाटें कपींच्या दळामाजि यावें । तयीं योजिलें तें महाअस्त्र देवें ॥
महाथोर माहेश्वरी[४६] मूळ मंत्रें । तयें सोडिलें सूटलीं वज्रशस्त्रें ॥ ५४ ॥
लोहोमूसळें ते गदा शूळ हो ते । बळें तोडिले पाडिले वज्रघातें ॥
दशग्रीव तो क्षोभला काळ जैसा । तयें भेदिलें पंच बाणीं सुरेशा ॥ ५५ ॥
रिपूबाण सर्वांग भेदून गेलें । दळीं रावणाच्या महा घोष जाले ॥
वपू भेदिली रावणें पंच बाणीं । चळेना रणीं राम तो वज्रठाणी ॥ ५६ ॥
रणीं ऊसणें घेतलें राघवानें । दशग्रीव तो भेदिला सप्त बाणें ॥
महा दुःख जालें तया रावणाला । सुमित्रासुता थोर आवेश आला ॥ ५७ ॥
तया आग्रजालागिं घालुनि मागें । महावीर तो चालिला लागवेगें ॥
सुमित्रासुतें बाणघातें निघातें । रिपूसारथी धाडिला मृत्यूपंथें ॥ ५८ ॥
पुढें मागुतें थोर संधान केलें । रिपूच्या धनूलागिं छेदून नेलें ॥
तया वीर बीभीषणा कोप गाढा । रणीं चालिला चंड वाहून मेढा ॥ ५९ ॥
तयें पाडिलें अष्ट तूरंगमातें । ध्वजस्तंभ तो छेदिला बाणघातें ॥
रथू सारथी सर्व ही भग्न केला । दशग्रीव दूजे रथीं स्वार जाला ॥ ६० ॥
महाशक्ति ब्राम्ही तया रावणानें । अनूजावरी[४७] टाकिली तैं फुराणें ॥
कडाडीत धांवे महावीज जैशी । करी शेष[४८] मागें रिपूबांधवासी[४९] ॥ ६१ ॥
सुमित्रासुतें घोर संधान केलें । महाशक्तितें शीघ्र छेदून नेलें ॥
शरें ताडितां पावका वृष्टि झाली । कितीयेक राक्षेससेना निमाली ॥ ६२ ॥
रणीं रावणू तो कडाडीत कोपें । सिमा सांडिली घोर रूपें प्रतापें ॥
धुधुःकार सांडीत घर्डीत दाढा । अनर्थासि ऊठावला वीर गाढा ॥ ६३ ॥
महाशक्ति काढूनि मायासुराची[५०] । बहू काळ संन्नाध तैशी विरांची ॥
तये लागिं त्या रावणें सिद्ध केलें । जयेमाजि ब्रम्हांड बिंबोन गेलें ॥ ६४ ॥
कडाडीत घोषें धडाडीत ज्वाळा । तडाडी नभामाजि नक्षत्रमाळा ॥

---

४५. वगत्रें=तोंडें. ४६. माहेश्वरी=रुद्रास्त्र. ४७. अनुज=रावणाचा धाकटा भाऊ बिभीषण. ४८. शेष=शेषाचा अवतार लक्ष्मण. ४९. रिपुबांधव=शत्रूचा भाऊ बिभीषण. ५०. मायासुर=मयासुर.

महावीर ते थोर धाकें गळाले । विमानाहुनी देव नेटें पळाले ॥ ६५ ॥
सुमित्रासुता लक्षिलें रावणानें । त्वरें टाकिली शक्ति माहाविरानें ॥
बळें आदळे ते अकस्मात अंगीं । रणीं वीर सौमित्र तो प्राण त्यागी ॥ ६६ ॥
दळीं वानरांचे हाहाकार जाला । महावीर सौमित्र युद्धीं निमाला ॥
कपी वीर नैर्ऋत्य धांवोनी आले । तया भोवतीं वीर सर्वै मिळाले ॥ ६७ ॥
पुढें शोक आरंभिला राघवानें । तया वारिलें शीघ्र बीभीषणानें ॥
म्हणे काय जी स्वामिया कोण वेळा । उभा रावणू तो पिटावा नृपाळा ॥ ६८ ॥
सुमित्रासुता मारिलें तो उभासे । कपीवाहिनी थोर आकांत भासे ॥
प्रभो शोक सांडून वेगें उठावें । धनुर्बाण घेऊनियां सिद्ध व्हावें ॥ ६९ ॥
रणीं रावणें भेदिला ब्रम्हचारी । मिळाले कपी देखिल्या दैत्यहारी ॥
बळें हाक देऊनि क्रोधें नरेंद्रें । सिमा सांडली रामकाळाग्निरुद्रें ४ ॥ ७० ॥
करीं बाण कोदंड चंड प्रतापी । रणीं रावणा भासला काळरूपी ॥
पुढें देखतां पातली कंपवेळा । उभा राम ग्रासील नेणों भुगोळा ॥ ७१ ॥
चळें सूटला रावणा कंप देहीं । भयें भूलला न स्मरे युद्ध कांहीं ॥
पडे चांचरे धांवतां थोर धाकें । पुढें पाहतां राम सर्वत्र देखे ॥ ७२ ॥
रणीं पाडिलीं दैत्य कूळें अपारें । तया रावणा लागले घायवारे ॥
बळें झोडितां थोर नेटें पळाला । चळीं कांपतो गर्व ताठा गळाला ॥ ७३ ॥
रणीं भ्रष्टला तो भयातूर जाला । पुढें रावणू मंदिरामाजि गेला ॥
समाचार मंदोदरीलागीं बोले । म्हणे आजि युद्धीं बहू कष्ट जाले ॥ ७४ ॥
समाचार तो सर्व ही सांगताहे । म्हणे काय होणार तें होत आहे ॥
बहूतांपरी तूं मला शीकवीलें । परी मूर्ख मी सर्व ही तुच्छ केलें ॥ ७५ ॥
करूं काय आतां प्रिये सांग वेगीं । बहू बोलता जाहला ते प्रसंगीं ॥
त्वरें काळनेमी पुढें पाठवीला । स्वयें शीघ्र ऊठोनि होमास गेला ॥ ७६ ॥
पुढें चालिला वीर तो काळनेमी । बहूसाल तो थोर कापट्य कर्मी ॥
हनूमंत जाईल द्रोणागिरीला । पथामाजि तो बैसला योग केला ॥ ७७ ॥
वनें कर्दळी पोफळी नारिकेळी । वनें आंवळी जांबळी रम्य वोळी ॥
बहू वृक्षजाती बहू पुष्पजाती । बहू कूप बावी तळीं ओघ जाती ॥ ७८ ॥
वनें पावनें जीवनें भूवनें तीं । सुखें गोमुखें रम्य वृंदावनें तीं ॥
तिरें सुंदरें बांधले सारवोटे । अकस्मात ते देखतां सौख्य वाटे ॥ ७९ ॥
रणीं पाडिला वीर सौमित्र जेथें । मिळाले कपी ऋक्ष ते सर्व तेथें ॥

---

५१. नैऋत्य=राक्षस. ५२. ब्रम्हचारी=चवदा वर्षेपर्यंत ब्रम्हचर्यव्रत धारण केलेला लक्ष्मण. ४. राम-क्रूर. ५३. कोदंड=धनुष्य.

समस्तां मनीं लागली थोर चिंता । कपी बोलती नासलें कार्य आतां ॥ ८० ॥
पुढें राघवा शोक तो आंवरेना । धरीतां बळें धीर पोटीं धरेना ॥
मिळालीं दळें भोंवतीं दैन्यवाणी । विलपे वदे राम कारुण्यवाणी ॥ ८१ ॥
पुढें बोलता जाहला वैद्य तेथें । प्रभू शोक केल्या पुढें काय होतें ॥
म्हणे औषधी शीघ्र अतां आणाव्या । न जातां निशी सर्व देहीं पिळाव्या ॥ ८२ ॥
बहूसाल तो पंथ दूरस्त आहे । करा वेग हा काळ जातो न राहे ॥
समस्तांकडे पाहिले राघवानें । कपी बोलते जहाले सर्व माने ॥ ८३ ॥
बळासारिखी बोलिली सर्व सेना । निशीमाजि तो आचळू आणवेना ॥
रघूनायकें पाहिलें मारुतीला । कपीराज तो शीघ्र ऊदीत जाला ॥ ८४ ॥
म्हणे राम गा मारुता ये प्रसंगीं । विरांसारखी शक्ति तूं बोल वेगीं
वदे मारुती स्वामि देवाधिदेवा । गिरी आणितों शीघ्र सांगाल तेव्हां ॥ ८५ ॥
तयें बोलतां राघवा सूख जालें । प्रतीउत्तरीं कपीतें गौरवीलें
म्हणे मारुती जाय गा हे प्रसंगीं । गिरी आणिला पाहिजे रात्रभागीं ॥ ८६ ॥
म्हणोनी तुवां शीघ्र आतांचि जावें । विरा लक्ष्मणालागिं त्वां ऊठवावें ॥
कपी मारुती वीर तैसा उडाला । अकस्मात तो आश्रमामाजि गेला ॥ ८७ ॥
स्थळें निर्मिलीं रम्य नानापरीचीं । बहूसाल तीं भूवनें कूसरीचीं[५५] ॥
मुनी बोलती हो दयाळा[w] बसावें । फळें तोय सेऊनि सूखें रहावें ॥ ८८ ॥
म्हणे मारुती राहतां पूरवेना । तृषा लागली धीर पोटीं धरेना ॥
मुनीनें तडागा जळा दाखवीलें । जळा सेवितां थोर आश्चर्य जालें ॥ ८९ ॥
जळांतूनि धांविन्नली जी विशाळा । विरें मारुतें देखिलें तीस डोळा ॥
मिठी घातली मारुतें चूर्ण केली । तिच्या मेदमांसें[५६] भुमी तृप्त जाली ॥ ९० ॥
निघाली तियेंतूनि ते दिव्य कांता । निरूपी मुखें सर्व साकल्य वार्ता ॥
ह्मणे राक्षसू बैसला कूडभावें[५७] । समर्था प्रभो त्यासि आधीं वधावें ॥ ९१ ॥
नव्हे मिथ्य साचार हें सांगतें मीं । प्रभो धाडिला रावणें काळनेमी ॥
तयें बोलतां मारुती वाँड[५८] जाला । ऋषी ऊठला शीघ्र युद्धासि आला ॥ ९२ ॥
महावीर राक्षेस कैसा कुकर्मी । बहूसाल ते जाहले काळनेमी ॥
प्रसंगीं तये थोर संग्राम जाला । कपीच्या करें काळनेमी निमाला ॥ ९३ ॥
विरें सुंदरीलागिं उद्धार केला । उडाला बळें तो नभामाजि गेला ॥
गिरीचंद्र टाकूनियां लागवेगीं । कपी वीर द्रोणाचळीं ते प्रसंगीं ॥ ९४ ॥
वटा वेढिता जाहला शेष जैसा । गिरी बांधुनी छेदिला शीघ्र तैसा ॥

---

५५. कूसरी=कौशल्य. w. दयळा–हो पुढें शीघ्र यावें. ५६. मेद=चरबी. ५७. कूडभाव=कपटभाव. ५८. वाड=मोठा.

उडाला नभामाजि तो लागवेगें । बळें जातसे मारुती व्योममार्गें ॥ ९५ ॥
कपी लागवेगें बळें जात आहे । मही मंडळीं तेज हेलावताहे ॥
अयोध्यापुरीमाजि रामानुजानें । कपी भेदिला पाडिला एक बाणें ॥ ९६ ॥
मुखीं रामनामावळी बोलताहे । महावीर तो त्यास येऊन पाहे ॥
ह्मणे कोण तूं सांग आम्हां कपी रे । बहूसाल तूं दीससी साक्षपीरे ॥ ९७ ॥
मुखीं रामनामें सखा वाटतोसी । विरा कोण तूं कोठपर्यंत जाशी ॥
ह्मणे मारुती वोखटें थोर जालें । सुमित्रासुतालागिं देहांत आलें ॥ ९८ ॥
समाचार सांगीतला मारुतानें । मुखें बोलिले शीघ्र रामानुजानें ॥
कपी कष्टलासी बहू दूर जातां । सुखें बाणमूखावरी बैस आतां ॥ ९९ ॥
त्वरें पाठवींतों विरा शीघ्र जावें । पुढें राहिलें कार्य xवेगीं करावें ॥
ह्मणे मारुती हें कदांहि घडेना । उडाला नभीं लंघितो देशनाना ॥ १०० ॥
त्रिकूटाचळीं राम तो वाट पाहे । विरेंवीर तो सर्व ही बैसला हे ॥
अवस्था बहू लागली आवरेना । बहू रात्र जाली कपी कां दिसेना ॥ १०१ ॥
बहू राम तेथें उतावेळ जाला । अकस्मात तों मारुती शीघ्र आला ॥
कपी सर्व आनंदले गर्जताती । प्रभूलागिं सांगावया शीघ्र जाती ॥ १०२ ॥
मनीं चिंतिलें शीघ्र हातासि आलें । तयासारिखें तें समस्तांसि जालें ॥
[६०]सुषेणें रसू काढिला औषधींचा । क्षतामाजि तो वोतिला अमृताचा ॥ १०३ ॥
सुमित्रासुतालागिं आरोग्य जालें । समस्तीं विरीं मारुता गौरवीलें ॥
त्वरें ऊठिला वीर सौमित्रबाहो । रघूनायकें देखिला दिव्य देहो ॥ १०४ ॥
कपी राम सौमित्र मेळा मिळाला । गिरी मारुती शीघ्र ठेवून आला ॥
पुन्हां मागुती भेटती एकमेकां । तया देखतां सूख जालें अनेकां ॥ १०५ ॥
कथा ऐकतां नासतें कार्य होते । महा विघ्न तें भग्न होऊनि जातें ॥
सुखानंद आनंद नानाविलासी । अखंडीत हे प्राचिती रामदासी ॥ १०६ ॥

---

## प्रसंग नववा.

ह्मणे वीर सौमित्र स्वामी समर्था । बळें तोडिजे थोर चत्वारि चिंता ॥
[६१]सुरेशासि ह्या मुक्त आधीं करावें । अरिभ्रातया[६२] राज्य हें शीघ्र द्यावें ॥ १ ॥
कपीराज[६३] हा राज्य त्यागोनि आला । कपींशीं पुन्हा पाहिजे शीघ्र गेला ॥
प्रभो नीजबंधूस[६४] त्या भेट द्यावी । अयोध्यापुरी सर्व सूखी करावी ॥ २ ॥

---

५९. रामानुज=रामाचा धाकटा भाऊ भरत. x. वेगीं करावें–सिद्धीस न्यावें. ६०. सुषेण=रामाच्या वैद्याचें नांव. ६१. सुरेश=इंद्र. ६२. अरिभ्राता=बिभीषण. ६३. कपीराज=सुग्रीव. ६४. निजबंधु=आपला भाऊ भरत.

पुढें शीघ्र त्या रावणाच्या वधांतीं । समाधान तें पाविजे तें समस्तीं ॥
म्हणोनी त्वरें हेंचि आतां करावें । बळें सर्व लोकत्रया सूख द्यावें ॥ ३ ॥
वदे रावणानूज वाक्य प्रमाणें । प्रभो कल्पवृक्षातळीं काय ऊणें ॥
परी होम आरंभिला रावणानें । पुरा जालिया भीडिजे त्यासि कोणें ॥ ४ ॥
कपी वीर ते पाठवावे भुपाळें । महा होमविध्वंसिजे शीघ्र काळें ॥
अरी रावणू तो रणामाजि येतां । पुढें पाठवावें तया मोक्ष पंथा ॥ ५ ॥
प्रभू हेर ते गुप्त लंकेसि गेले । समाचार साकल्य घेऊनि आले ॥
कपींद्राकडे पाहिलें राघवानें । विरां जाणवीलें तया सुग्रिवानें ॥ ६ ॥
पुढें ग्रंथसंख्यीं[1] कपी सिद्ध जाले । सहस्त्रें दहा वीर मार्गे मिळाले ॥
हनूमंत तारासुतू[2] जांबुवंतू । गवायू सुषेणू बळी वीर्यवंतू ॥ ७ ॥
सुगधू कपी नीळ तो शर्भ नामें । महा मैंद तो द्विविदू वीर धर्मे ॥
सहस्त्रें दहाशीं बळें सिद्ध झाले । महा वीर ते व्योमपंथें[3] निघाले ॥ ८ ॥
किती एक राक्षेस ते रक्षणेशीं । कपींनीं बळें युद्ध केलें तयाशीं ॥
मुखें हांकिती हांकिती थोर नेटें । तयां पूसती रे दशग्रीव[4] कोठें ॥ ९ ॥
गुहेचे मुखीं लाविली चंड शीळा । तये भोंवते जाहले वीर गोळा ॥
शिळेनें शिळा फोडिली थोर घातें । कपी चालिले ते गुहेचे नि पंथें ॥ १० ॥
पुढें मारुती चालिला लागवेगें । कपी चालिले सर्व ही मागमागें ॥
महायोगियाचे परी बैसला तो । नभीं पावकू[5] तो भडाडीत जातो ॥ ११ ॥
तया हाणते जाहले द्रूमपाणी[6] । मुखीं हाकिती टाकिती घोर वाणी ॥
शिळा शीखरें हाणती तो उठेना । कपी लोटती ध्यान त्याचें सुटेना ॥ १२
कितीएक ते गर्जती कर्णबीळीं । मुखामाजि ते टाकिती एक धूळी ॥
विरीं वानरीं मांडिलीसे धुमाळी । बहूतांपरी ताडिला होमकाळीं ॥ १३ ॥
बहूतांपरी मांडिले प्रेत्न नाना । परी रावणू कांहि केल्या उठेना ॥
विरें अंगदें थोर वीचार केला । बळें शीघ्र अंतःपुरामाजि[7] गेला ॥ १४ ॥
बहूसाल अंतःपुरीं त्या सुनारी । तयांमाजि मंदोदरी मुख्य नारी ॥
तियेलागिं घेऊनि वेगीं उडाला । महावीर तेथें अकस्मात आला ॥ १५ ॥
अलंकार चीरें[8] करें चूर्ण जालीं । बहू कंकणें भूषणें भग्न केलीं ॥
कपी कंचुकी[9] केश वोढूनि घेती । विटंबूनि लोटूनिया शीघ्र देती ॥ १६ ॥

---

१. ग्रंथसंख्या=चोवीस हजार ( वाल्मीकि रामायणाची ग्रंथसंख्या चोवीस हजार आहे ). २. तारासुतु=अंगद. ३ व्योमपंथें=आकाश मार्गानें. ४. दशग्रीव=दहा आहेत ग्रीवा (मस्तकें ) ज्याला. ५. पावक=अग्नि. ६. द्रुमपाणि=द्रुम ( वृक्ष ) आहेत हातांत ज्यांच्या ते. ७. अंतःपुर=जनानखाना. ८. चीरें=वस्त्रें. ९. कंचुकी=चोळी.

अरे रावणा घे तुझी नीज कांता । जगज्जन्ननी आणिली व्यर्थ सीता ॥
तिचें ऊसनें काढिती द्रूमपाणी । वदे मुख्य मंदोदरी दैन्यवाणी ॥ १७ ॥
अहो प्राणनाथा असें काय केलें । तुम्हां देखतां कीं मला कष्टवीलें ॥
महा रम्य नेत्रीं महा वोघ जाती । विलापें करूं लागली ते रुदंती ॥ १८ ॥
करूणास्वरें रावणालागिं बाहे । प्रभू धांव रे वानरू नेत आहे ॥
प्रसंगीं तये थोर आकांत जाला । भुमीकंप होतां चि पाहों निघाला ॥ १९ ॥
पुढें अंगदा लात हाणोनि पाडी । तया जांबुवंतासि वेगें लथाडी ॥
कितीएक ते ताडिले मुष्टिघातें । किती वोढिले पाडिले व्योमपंथें ॥ २० ॥
नभीं ऊर्ध्व पाहोनि वेगीं उडाला । बळें झोडिलें पाडिलें मारुतीला ॥
धरी हृदयीं शीघ्र मंदोदरीला । विवेकें चि संबोखिलें[10] त्या वधूला[11] ॥ २१ ॥
अहल्या सती ते शिळारूप होती । विचारूनि पाहें नळाची दमंती ॥
बहू कष्टली मुख्य वृंदा पुलोमा । सिता सुंदरी सांगणें काय तुम्हां ॥ २२ ॥
बहूतां परी ते सती तोषवीली । पती धाडितां भूवनामाजी[12] गेली ॥
दळें सिद्ध केलीं रथारूढ जाला । रणीं शूर संग्राम सैरा निघाला ॥ २३ ॥
प्रतापें बळें वाहिनी[13] घोर चाले । कपी वीर ते सर्व पूर्वींच गेले ॥
पुढें सोडिता जाहला बाणजाळें । बळें धावती प्रेरिले दूत काळें ॥ २४ ॥
कपीभार ऊठावले लागवेगें । करीं घेतलीं वृक्ष पाषाण शृंगें ॥
बळें टोकत जाहले द्रूमपाणी । रणीं रावणें भेदिले सर्व बाणीं ॥ २५ ॥
गळाले महा वीर धाकें पळाले । चळीं कांपती राघवा आड गेले ॥
उभा राहिला राम तो वीर गाढा । करीं घेतला चंड वोढूनि मेढा[14] ॥ २६ ॥
बहू बाण सोडी महा वीर कैसा । रणीं क्षोभला काळ कृत्तांत जैसा ॥
महा वीर ते दोघ सन्मूख आले । बळें सोडिती बाण बाणीं मिळाले ॥ २७ ॥
रणामाजि ते तोडिती बाण बाणीं । बहू मातली ते विरश्री फुराणी ॥
पुन्हा रावणें सोडिल्या बाण कोडी[15] । लिलाविग्रही[16] राम तात्काळ तोडी ॥२८॥
बहू क्षोभले व्योम संपूर्ण केलें । शरीं दाटलेंसे नभीं थाट जालें ॥
बळें तोडिती एकमेकां विरांचे । पुन्हा मागुती भार येती शरांचे ॥ २९ ॥
रणीं झुंजती ते महा वीर बाहो । मोहो पावले ते भयें केतु राहो[17] ॥

---

१०. संबोखिलें=समजाविलें. ११. वधू=स्त्री. १२. भुवनामाजि=घरांत. १३. वाहिनी=फौज. १४. मेढा=तिरकमठा. १५. बाणकोडी=कोटयावधि बाण. १६. लीलाविग्रही=क्रीडे करितां धारण केलें आहे शरीर ज्यानें असा ( राम ). १७. राहूकेतु राक्षस, व नवग्रहांत ह्या दोघांची गणना आहे. ज्योतिष दृष्टीनें पाहिलें असतां पृथ्वीची कक्षा व चंद्रकक्षा यांचे जे दोन संपात म्हणजे छेदनबिंदु तेच हे होत.

बुधा मंगळा थोर आक्रांत आला । शनी सोम तो आपधाकें पळाला ॥ ३० ॥
ग्रहानेंग्रह भूतलाप्रत आले । विमानाहुनी देव धाकें पळाले ॥
दिशा दिग्गजा व्यापिलें अंतकाळें । चळी द्विचळी कांपती ते चळाळें ॥ ३१ ॥
महावीर ते मातले घोर मारें । दिशा दाटल्या व्यापिलें अंधकारें ॥
पुढें पाहतां येकमेकां दिसेना । ध्वनी मातली ऊठले घोष नाना ॥ ३२ ॥
महावीर दोघे रणीं स्तब्ध जाले । पुढें पाहतां बाण बाणीं गळाले ॥
पुन्हा मागुती हाणिती एकमेकां । भरें नीकुरें टाकुनि थोर शंका ॥ ३३ ॥
पुढें रावणू पन्नगास्त्रास[18] सोडी । तयें चालिल्या त्या नभीं सर्पकोडी ॥
उभ्या वानरामाजि आक्रांत जाले । मुखें बोलती सर्प रे सर्प आले ॥ ३४ ॥
गरूडास्त्र तें राम सोडी भडाडां । नभीं चालिलीं पक्षिकूळें झडाडां ॥
तिहीं तोडिलीं सर्प कूळें तडाडां । कपी गर्जती नामघोषें घडाडां ॥ ३५ ॥
पुढें रावणें सोडिली तीं अचाटें । नभीं चाललीं थोर गंधर्वथाटें ॥
भुमी पाय आकाशपंथीं शिंशाळें[19] । बहू भार ते धावले येकवेळे ॥ ३६ ॥
निवारावया राम तो तें चि सोडी । नभामाजि तें अस्त्र अस्त्रासि तोडी ॥
रणीं रावणू थोर क्रोधाग्नि ज्वाळा । रूपें जाहला थोर कैंकोंट[20] काळा ॥ ३७ ॥
शरा अस्त्र ते सोडिलें लंकनाथें । बहूसाल वर्षाव केला अनर्थें ॥
महासिंह नानापरी सर्प जैसे । महामत्त व्याघ्रापरी बाण तैसे ॥ ३८ ॥
वज्राअस्त्र सोडूनि राजीवनेत्रें[21] । असंभाव्य तीं चालिलीं वज्रअस्त्रें ॥
तिहीं सर्व ही बाण छेदून नेले । कपी वीर ते थोर आनंदवीले ॥ ३९ ॥
तया रावणा कोप पोटीं भडाडी । कडाडीत कोपें रणीं बाण सोडी ॥
अकस्मात तो त्यावरी स्पर्श जाला । गडाडीत मेघापरी शब्द केला ॥ ४० ॥
रथारूढ जाला रणीं लंकनाथू । पदीं चालतो रामराजा समर्थू ॥
नभीं देव ते देखवेना तयांला । रथू मातली[22] शीघ्र तो पाठवीला ॥ ४१ ॥
बहू शस्त्र मंडीत रत्नीं विराजे । परी अंतकातुल्य[23] तो राम साजे ॥
नभीं दुंदुभी[24] घोष आकाश गाजे । तया रावणा अंतरीं क्रोध माजे ॥ ४२ ॥
पुढें बोलता जाहला घोर वाणी । तुला साह्य जाला रणीं वज्रपाणी[25] ॥
उभा रे रिपू खीळितों आजि बाणीं । तुझीं झुंजतां थोर वाटे शिराणी[26] ॥ ४३ ॥
तुझा बंधु म्यां पाडिला एकवेळां । रणामाजि त्या देखिले त्वां चि डोळां ॥
तयासारिखें तूज मारीन आतां । पतंगापरी जाळितों जातजातां ॥ ४४ ॥

---

१८. पन्नगास्त्र=सर्पास्त्र. १९. शिसाळें=मस्तकें. २० कर्कोट= सर्प. २१. राजीव नेत्र= कमलनयन. २२. मातली=इंद्राचा सारथी. २३, अंतक=यम. २४. दुंदुभी=नगारा. २५. वज्रपाणी=इंद्र. २६ शिराणी=आवड.

पुढें ऐकतां राम बोले तयासी । म्हणे ऐकरे रावणा गर्वराशी ॥
असंभाव्य रे वैभवें मातलासी । मराया रणीं आजि तूं पातलाशी ॥ ४५ ॥
म्हणे राम रे रावणा वीरधर्मै । रणामाजि मीं तूज मारीन नेमें ॥
पळालासि कोठें तरी हें सुटेना । तुझी मृत्युवेळा कदां पालटेना ॥ ४६ ॥
रिपू जाणरे तूजला मृत्यु आला । दिल्हें अक्षयी राज्य बीभीषणाला ।
सितेकारणें थोर कापटय केलें । अभाग्या तुझें सर्व ही राज्य गेलें ॥ ४७ ॥
तयें बोलतां कोपला वीर गाढा । रणामाजि त्या घर्डिल्या वज्रदाढा ॥
पुढें शूळपाँणी[२७] करी सज्ज मेढा । बळें वोढितां चूकला राम वोढा ॥ ४८ ॥
कडाडीत घोषें रणीं तेचि काळीं । रघूनायका बैसला बाण भाळीं ॥
असंभाव्य तो कोपला चापपाणी । दशग्रीव तो छेदिला शीघ्र बाणीं ॥ ४९ ॥
बळें मारिती वारिती बाणजाळें । पुन्हा क्षोभले धांवती ते उफाळें ॥
रिपू कोपला थोर काळाग्नि जाला । तया रावणा थोर आवेश आला ॥ ५० ॥
प्रतापें रणीं राघवें एकवेळे । बळें फोडिलीं बाणघातें कपाळें ॥
रथीं सारथी पाडिले अश्व जे कां । विरें नीकुरें भेदिलें एकमेकां ॥ ५१ ॥
बळें छेदिता जाहला वोष्ट्र दंतीं । बहू बाण ते सोडिले व्योमपंथीं ॥
कितीएक ते राघवें चूर्ण केले । कितीएक ते बाण अंगीं बुडाले ॥ ५२ ॥
तया देखतां रावणू हाक फोडी । असंभाव्य ते मागुते बाण सोडी ॥
बळें अश्व ते मातली भग्न केला । ध्वजस्तंभ तो शीघ्र छेदून नेला ॥ ५३ ॥
भयातूर ते भार गोळांगुँळांचे[२८] । ऋषी देव गंधर्व इत्यादिकांचे ॥
रणीं आगळें दाखवी लंकनाथू । भयें बोलती मांडिला कीं अनर्थू ॥ ५४ ॥
पडे मातली अश्व ते पळवीले । ऋषी देव गंधर्व साशंकें[२९] जाले ॥
कपी बोलती मांडलें विघ्न हें कीं । रणामाजि त्या रावणें जिंकिलें कीं ॥ ५५ ॥
अगस्ती ऋषी तो रणामाजि आला । रणीं मंत्र सांगे तया राघवाला ॥
जपे आदरें राम तो मूळ मंत्रें । रवी शीघ्र येऊनि दे सारशस्त्रें ॥ ५६ ॥
ह्मणे राघवा जिंकिशी रावणाला । अती काळ हा वेळ नाहीं तयाला ॥
पुढें राघवें विंधिले पंच बाणीं । तुरंगू रणीं पाडिले दैन्यवाणी ॥ ५७ ॥
रणीं राघवें चूर्ण केलें रथाचें । बळें ऊसने घेतलें मातलीचें ॥
विरें सारथी धाडिला मृत्युपंथें । ध्वजस्तंभ तो पाडिला बाणघातें ॥ ५८ ॥
पुन्हा राघवें मागुती तेचि काळीं । रिपू भेदिला बाणजाळीं कपाळीं ॥
सुरां देखतां थोर आनंद जाला । महद्भूत तो वानरीं घोष केला ॥ ५९ ॥

---

२७. शूळपाणी=शूळ आहे हातीं ज्याच्या असा. २८. गोलांगुल=वानर. २९ साशंक=भयाभीत.

असंभाव्य त्या राक्षसा कोप आला । बळें टाकिलें शीघ्र तेणें शुळाला ॥
रणीं फोडिली हाक नैऋत्यनांथें[30] । म्हणे शूळ आला प्रभो व्योमपंथें ॥ ६० ॥
बहू बाणसंभार जातां जळाला । पुढें शूळ पाशूपतें[31] भग्न केला ॥
पुन्हा रावणें थोर संधान केलें । असंभाव्य ते पोकळीमाजि नेले ॥ ६१ ॥
सुरेशें[32] गिरी फोडिला वज्रघातें । तयाचे परी भेदिलें रावणातें ॥
देहे खीळिला बाण पैलाड गेला । महीमंडळामाजि जातां निवाला ॥ ६२ ॥
पुन्हा सोडिलीं राघवें बाणजाळें । बहूसाल सूसाटती अंतराळें ॥
रथी खीळिला प्राण व्याकूळ जाला । बहु मूर्छना सांवरेना तयाला ॥ ६३ ॥
रिपू भेदिला थोर लक्षून वर्में । उभा राहिला राम तो वीरधर्में ॥
रथू सारथी शीघ्र घेऊनि गेला । पुढें शुद्धि जाली तया रावणाला॥ ६४ ॥
बहू कोप आला तया रावणासी । म्हणे सारथ्या तूं भयातूर होसी ॥
रथू काढिला कां तुवां लागवेगीं । न येतां उणें दीसतें या प्रसंगीं ॥ ६५ ॥
म्हणे सारथी स्वामिया हो उदारा । रिपू पेटला तो रणीं घोर मारा ॥
रथारूढ राया तुम्हीं वीकळांगें । म्हणोनी रथू काढिला लागवेगें ॥ ६६ ॥
तये बोलतां राव संतुष्ट जाला । समर्पीतसे हातिच्या कंकणाला ॥
बहू वेग केला तया लंकनाथें । रथू फीरवीला रणाचेनि पंथें ॥ ६७ ॥
रणीं माजल्या त्या बहू प्रेतराशी । पुढें जावया वाट नाहीं रथासी ॥
भुमी दाटली मेदमांसें[33] अचाटें । रथांगें[34] बळें वाजती चर्चराटें ॥ ६८ ॥
समारंगणीं रावणू शीघ्र आला । वदे घोरवाणी तया राघवाला ॥
उलंघी सिमा शीघ्र मृत्यू जयाला । रणीं कोण लेखा[35] तुला मानवाला ॥ ६९ ॥
असंभाव्य तो रावणू बाण सोडी । नभीं वांकडीचे परी ते झडाडी ॥
उफाळें बळें धांवती दिव्य घोडे । रथामाजि संघट्टणीं घोष गाढे ॥ ७० ॥
धुरा ऊलथों पाहती शीघ्र मागें । विरीं वोढिले बाण ते लागवेगें ॥
रथामाजि तो पैस ऊदंड जाला । विरां मागुता थोर आवेश आला ॥ ७१ ॥
रणीं राघवा रावणा युद्ध काळू । रिपूभारसंहार भूतां सुकाळू ॥
करीं चंड कोदंडें[36] मंडीत बाणीं । उभे राहिले वीर ते वज्रठाणी ॥ ७२ ॥
रणीं येकमेकांसि ते घोर शब्दें । बहू भाषणें त्रासती वीर द्वंद्वें ॥
बळें धांवती क्षोभले वीर क्रोधें ॥ पुढें मारिती शस्त्र क्रोधें विरोधें ॥ ७३ ॥
रणीं लोटला राम हा सूर्यवंशी । महायुद्ध आरंभिलें रावणाशीं ॥
उभे राहिले काळकृत्तांत जैसे । महावीर त्यां घोर आकांत भासे ॥ ७४ ॥

---

३० नैऋत्यनाथ=राक्षस. ३१. पाशुपत=यानावाचें अस्त्र. ३२. सुरेश=इंद्र. ३३. मेद=चरबी. ३४. रथांगें=चाकें. ३५. लेखा=हिशेब. ३६. कोदंड=धनुष्य.

बळें सोडितां शक्ति नेटें सरारी । महा वात प्रख्यात पिच्छीं भरारी ॥
मही सप्तपाताळ घोषें गरारी । पळाली भुतें काळ पोटीं थरारी ॥ ७५ ॥
फणी[३७] कूर्म वाराह चक्कीत जाले । विमानाहुनी देव ऋषी पळाले ॥
ग्रहो सोम सूर्यादि पोटीं गळाले । कपी खेचरां[३८] दिग्गजां कंप जाले ॥ ७६ ॥
प्रसंगीं तये थोर उत्पात जाला । नभीं शोणितांचा[३९] बळें मेघ [a] आला ॥
धुमारा बहू दाटलासे दिगंतीं । असंभाव्य ते ऊलकापात होती ॥ ७७ ॥
बळें कोपले रुद्र काळाग्नि जैसे । अरिराय ते मातले भीम तैसे ॥
तयां झुंजतां कोण कोणा निवारी । रणीं भीडती काळ कोदंडधारी ॥ ७८ ॥
रिपू सोडिती घोर शस्त्रें झणाणा । बळें वाजती बाणभाळी[४०] खणाणा ॥
बहूसाल स्फुलिंग[४१] जाती फणाणा । महीमंडळीं घोष ऊठे दणाणा ॥ ७९ ॥
महाशक्ति ते काळरूपें कडाडी । असंभाव्य ते ज्वाळवन्ही भडाडी ॥
मही मेरु मंदार घोषें गडाडी । बळें शोषला सिंधु[४२] पोटीं तडाडी ॥ ८० ॥
पुढें राघवें लक्षिलें रावणातें । बळें मस्तकें तोडिलीं बाणघातें ॥
गिरीशीखरांचे परी तीं विशाळें । पुन्हा नीघती कंठनाळें ढिसाळें ॥ ८१ ॥
शिरें देखतां राम चक्कीत जाला । ह्मणे मृत्यु नाहीं गमे रावणाला ॥
वदे मातली स्वामि देवाधिदेवा । सुधावक्ष[४३] भेदून शत्रू वधावा ॥ ८२ ॥
कुपी फोडिली बाणघातें निघातें । तयें रावणू चालिला मृत्युपंथें ॥
ऋषी देव गंधर्व ते सर्व तोषें । विमानी सुखें गर्जती नामघोषें ॥ ८३ ॥
नभीं दुंदुभी वाजती एकनादें । बहूतांपरीचीं बहूसाल वाद्यें ॥
ध्वनी दाटले पूर्ण ब्रम्हांड घोषें । कपी गर्जती नामघोषें विशेषें ॥ ८४ ॥
सुखानंद आनंदली सर्व सृष्टी । विमानाहुनी जाहली पुष्पवृष्टी ॥
ऋषी देव गंधर्व सर्वै मिळाले । विणे लाउनी नारदादीक आले ॥ ८५ ॥
मिळाल्या सुखें नायिका[४४] अष्ट भावें । करीं ताळ मुर्दंग वीणे स्वभावें ॥
कळा कौतुकें दाविती ते प्रसंगीं । गुणी नाचणी[४५] नाचती रागरंगीं ॥ ८६ ॥
बहू गायनें थोर गंधर्व गाती । कळा ऐकतां देव थक्कीत होती ॥
जयाच्या अलापें देहभाव जाती । मृगें श्वापदें लाभल्या त्या द्विजाती[४६] ॥ ८७ ॥
रूपें सुंदरी किंनरी दिव्य यंत्रें । बहूसाल विद्याधरी गूणपात्रें ॥
उठे रागकल्लोळ सप्त स्वरांचा । गमे वोळला मेघ हा अमृताचा ॥ ८८ ॥

---

३७. फणी=शेष ३८. खेचर=आकाशांत फिरणारे गंधर्वादि. ३९. शोणित=रक्त. a नभीं शोणिताचा बळें मेघ जाला—नदी शोणिताचा बळें पूर आला. ४०. बाणभाळी=बाणांचा समूह. ४१. स्फुलिंग=ठिणग्या. ४२. सिंधु=समुद्र. ४३. सुधा=अमृत. ४४. नायिका=अप्सरा. ४५. नाचणी=नाचणाऱ्या कळवांतिणी. ४६. द्विजातीं=पांखरें.

तुरें वाजती अंबरीं[47] शंख भेरी । जयो पावला राम लीलावतारी ॥
सुरां मानसीं थोर आनंद जाला । महा घातकी रावणू तो निमाला ॥ ८९ ॥
समस्तां सुरां मानसीं सौख्य जालें । परी दुःख बीभीषणा प्राप्त जालें ॥
रणीं रावणू श्रेष्ठ बंधू निमाला । झळंबे मनीं शोक उत्पन्न जाला ॥ ९० ॥
रुदंती प्रसंगीं ध्वनी घोष जाला । झळंबे मनीं दुःख बीभीषणाला ॥
अहा हो अहा हो मुखीं बोलताहे । विलापें चि तो श्वास टाकीत आहे ॥ ९१ ॥
बहू लोटले वोघ नेत्रोदकाचे । दिनासारिखे शब्द कारुण्यवाचे ॥
घडीनें घडी तो भुमी अंग घाली । अरे भ्रातया शुद्धि सर्वै उडाली ॥ ९२ ॥
देहभाव सांडून तो रुदताहे । मोहोजाळ होतां चि आक्रंदताहे ॥
बहूतां परीचें बहू सौख्य दीलें । मनामाजि तें सर्वही आठवीलें ॥ ९३ ॥
मुखें श्वास सोडूनि पाणी[48] चुरीतो । भुमी मस्तकू आपटीतो पिटीतो ॥
म्हणे वीर तो वोखटा[49] काळ आला । त्रिकूटाचळाचा अळंकार गेला ॥ ९४ ॥
नव्हे रावणासारिखा संपतीचा । नव्हे रावणा सारिखा वित्पतीचा[50] ॥
बहू सांगतां वैभवालागिं कांहीं । प्रतापी तया सारिखा वीर नाहीं ॥ ९५ ॥
मनाचा उदारू धनाचा कुबेरू । बहूसा विचारू जगीं दानशूरू ॥
गळाला बहू धीर त्या राक्षसांचा । महीमंडळीं धाक गेला सुरांचा ॥ ९६ ॥
बहूतां जनाचें बहू भाग्य गेलें । गमे सर्व ब्रह्मांड हें वोस जालें ॥
जया कारणें देव लीलावतारी । तयाच्या गुणा तूळणा कोण सारी ॥ ९७ ॥
उदासीन वाटे जनीं पाहवेना । मनीं स्वस्थ नाहीं तया राहवेना ॥
गताचे गुणें वीर तो मग्न जाला । तयालागिं वारावया राम आला ॥ ९८ ॥
उभा चापपाणी वदे रम्य वाणी । सदां सर्वदां गाइजे जो पुराणीं ॥
म्हणे गा विरा थोर आश्चर्य जालें । मोहोसागरीं ज्ञानतारूं बुडालें ॥ ९९ ॥
तयासारिखें आजि हें दीसताहे । प्रभू बोलतां वीर तात्काळ राहे ॥
करीं घेतलें शीघ्र बीभीषणाला । कृपाळू दिनांचा दळामाजि आला ॥ १०० ॥
म्हणे राम बीभीषणा बुद्धिवंता । रणीं रावणालागिं देहांतवेथा ॥
तुम्ही शीघ्र आतां पुरामाजि जावें । समस्तांसि पाहावया आणवावें ॥ १०१ ॥
समर्था मनीं लागली सर्व चिंता । परी अंतरा जाणतो सौख्यदाता ॥
तयाची कथा ऐकतां दुःख नासे । चरित्रें बरीं अंतरीं दास तोषे ॥ १०२ ॥

---

४७. अंबरीं=आकाशांत. ४८. पाणी=हात. ४९ वोखटा=वाईट. ५० वित्पतीचा=शहाणा.

## प्रसंग दहावा.

तया रावणालागिं देहांत आलें । प्रधानासि बीभीषणें पाठविलें ॥
तुम्हीं शीघ्र अंतःपुरामाजि जावें । समस्तांसि तात्काळ घेऊन यावें ॥ १ ॥
प्रभू बोलतां वीर तैसे निघाले । पुढें शीघ्र अंतःपुरा माजि गेले ॥
समस्ता वधू मार्ग लक्षीत होत्या । उदासीन उद्विग्न चिंतातुरा त्या ॥ २ ॥
तंव देखिले ते अकस्मात डोळां । भयातुर त्या कंप सूटे चळाळा ॥
तयांमाजि मंदोदरी मुख्य नारी । तये सांगती हो निमाला सुरारी ॥ ३ ॥
प्रसंगीं तये थोर कल्लोळ जाला । दुखामाजि तो सौख्यसिंधू बुडाला ॥
भुमी लोळती रूदती एक वेळा । देहे व्यस्त हाणोनि घेती कपाळा ॥ ४ ॥
समस्तांजणींचे महा शब्द जाले । दुखाचे तया योग सर्वै मिळाले ॥
मुखें बोलती थोर कल्लोळ जाला । समस्तां सुखांचा अळंकार गेला ॥ ५ ॥
धुळी टाकिती ऊर हाणून घेती । धरेना असंभाव्य जाली रूदंती ॥
चिरें फाडिती ते अळंकार गेले । भुमी लोळती मोकळे केश जाले ॥ ६ ॥
पुढें सर्व राजांगना त्या निघाल्या । दशग्रीव जेथें रणामाजि आल्या ॥
रणीं कांत देखून आक्रांत केला । बहू पाप हो बोखटा काळ आला ॥ ७ ॥
अकस्मात तें सर्व सौभाग्य गेलें । समर्था प्रभू कां उदासीन केलें ॥
समस्तांसि शोकार्णवीं बूडवीलें । असंभाव्य हें दुःख टाकूनि आलें ॥ ८ ॥
म्हणे राम बिभीषणा जाय आतां । बहूतां परी तोषवावें समस्तां ॥
निमाल्यावरी वैर कां हो करावें । विवेकें चि मंदोदरी नीववावें ॥ ९ ॥
कृपासागरें वीर तो पाठवीला । अकस्मात राजांगनांमाजि आला ॥
प्रबोधें चि नानापरी तोष केला । समस्तीजणीं भूषना पाठवील्या ॥ १० ॥
पुन्हा मागुती वीर तात्काळ आला । म्हणे हो प्रभू पाठवीलें तयांला ॥
वदे मागुता राम बीभीषणाला । रणीं रावणू अग्नि द्या जा तयाला ॥ ११ ॥
पुढें ऊठला तो रणामाजि आला । हुताशीं तया रावणा वीधि केला ॥
समुद्रीं शुचिश्मंत होऊनि आला । नमस्कार केला तया राघवाला ॥ १२ ॥
वदे राम तैसा चि त्या बांधवातें । कपीनाथ सुग्रीव राजा तयातें ॥
तुम्हीं शीघ्र नैऋत्यनाथासि न्यावें । विधीयुक्त भद्रासैनीं बैसवावें ॥ १३ ॥
महा वीर तीहीं नमस्कार केले । पुढें सव्य घालूनि तैसे निघाले ॥
सवें चालली ते असंभाव्य सेना । ऋषी देव ते रूढ जाले विमाना ॥ १४ ॥
बहूसाल वाद्यध्वनीघोष जाला । बळी गर्जती नाद गेला भुगोळा ॥
कपीनाथ सौमित्र ते राजभारें । दळें चालिलीं वानरांचीं अपारें ॥ १५ ॥

५१. भद्रासनीं=सिंहासनावर.

महादूत वेगीं पुढें पाठवीले । बळें शीघ लंकापुरीमाजि गेले ॥
त्वरें लाविलें काम पूर्वींच तीहीं । बहू वेग त्या राक्षसां वानरां ही ॥ १६ ॥
बहूसाल कामार[52] ते लक्ष कोटी । स्थळें सिद्ध होतां असंभाव्य दाटी ॥
प्रसंगीं तया तातडी फार जाली । पहाया सुखें लोकमांदी[53] मिळालीं ॥ १७ ॥
शिड्या पायिंच्या उंच आकाशपंथें । असंभाव्य तें लागलें काम तेथें ॥
बहू जाणते वेग मोठ्या बळाचा । पुरीमाजि तो एक मेळा तयांचा ॥ १८ ॥
कपीच्या करें अल्पशी भग्न जाली । पुरी मागुती सर्व ही सिद्ध केली ॥
त्रिकूटाचळीं भव्य चत्वार द्वारें । विशाळें नभा सारिखीं थोर थोरें ॥ १९ ॥
दिसे रम्य लंकापुरी कांचनाची[54] । बरी पाहतां हांवे[55] पूरे मनाची ॥
हुडे[56] कोट गेले नभामाजि उंची । जगीं धन्य निर्माण केली विरंची[57] ॥ २० ॥
पहाया गवाक्षें[58] लघू दीर्घ द्वारें । बहूसाल जाळंधरें[59] थोर थोरें ॥
असंभाव्य चर्या गिरी तो विलासे । वरी सर्व रेखाटिलें व्योम भासे ॥ २१ ॥
हुडे कोट दामोदरें थोर थोरें । सजे b बाहुड्या चौक नाना प्रकारें ॥
महा मंदिरें सुंदरें थोर थोरें । भुयेरें बरीं वीवरें तीं अपारें ॥ २२ ॥
बहू चित्रशाळा बहू होमशाळा । बहू सुंदरा धर्मशाळा विशाळा ॥
तके थोर वृंदावनें पार[60] ओटे । सभामंडपी देखतां सौख्य वाटे ॥ २३ ॥
बिदी[61] हाट बाजार माड्या c दुकानें । मठ्या पर्णशाळा महा यागस्थानें ॥
वनें वाटिका जीवनें वोध जाती । झरे कालवे वाहती पाटजाती ॥ २४ ॥
ध्वजा गोपुरें शीखरें तीं अपारें । बहू देव देवालयें थोर थोरें ॥
तळीं कूप बावी जळें पूर्ण जालीं । बहूतां परींचीं स्थळें सिद्ध केलीं ॥ २५ ॥
बळी झाडिती लोटती सर्व शाळा । सडे शिंपिती घालिती रंगमाळा[62] ॥
सुगंधी बहू गुंफिल्या पुष्पमाळा । जळें निर्मळें बैसका त्या सुढाळा ॥ २६ ॥
सुवर्णाचिया रत्नमंडीत भिंती । हिरे पाच गोमेद ते ढाळ देती ॥
सडे शिंपिले कस्तुरी केशरानें । बहूसाल तीं रम्य यानें विमानें ॥ २७ ॥
ध्वजा त्या गुढ्या तोरणें ऊभवीलीं । पुरी सर्व शृंगारमंडीत केली ॥
पताका निशाणें वरी दिव्य छत्रें । बहू चामरें दिव्य मार्तंडपत्रें[63] ॥ २८ ॥
तया राजद्वारीं बहू दाटि जाली । सभामंडपीं मंडळी ते मिळाली ॥

---

५२. कामार=मजूरदार. ५३. लोकमांदी=लोकसमूह. ५४. कांचनाची=सोन्याची. ५५. हांव=इच्छा. ५६. हुडे=बुरूज. ५७. विरंची=ब्रह्मा. ५८. गवाक्षें=खिडक्या. ५९. जाळंधरें=जाळ्या. b बाहुड्या–चावड्या. ६०. पार=पिंपळ वड इत्यादिकांस सभोंवती जो वर्तुलाकर किंवा अष्टपैलू ओटा बांधतात तो. ६१. बिदी=गल्ल्या. c माड्या–मंड्या. ६२. रंगमाळा=रांगोळी. ६३. मार्तंड पत्रें=छत्रचा.

पुढें रावणानूज शृंगारवीला । विधियुक्त भद्रासनीं बैसवीला ॥ २९ ॥
धमामा नभीं दुंदुभीनाद जाला । सुरीं अंबरीं पुष्पवर्षाव केला ॥
रघूनायकें सेवका राज्य दीलें । सुरां सोडिलें थोर आनंदवीलें ॥ ३० ॥
असंभाव्य तो वाद्यकल्लोल जाला । निशाणावरी तो विरीं घाव केला ॥
महावीर संतोषले राज्य तोषें । बहूसाल ते गर्जती नामघोषें ॥ ३१ ॥
समस्तां जणांचें बहू पाप गेलें । सुरांचें महा शल्य[६४] निर्मूळ केलें ॥
यथासांग लंकापुरीतें प्रसंगीं । विरीं वानरीं पाहिली लाग वेगीं ॥ ३२ ॥
पुढें सर्व ही वीर तैसे निघाले । रघूनायका भेटले स्वस्थ जाले ॥
समाचार ते सर्व ही सांगताती । जगन्नायका थोर आनंद चित्तीं ॥ ३३ ॥
म्हणे राम गा मारुती ये प्रसंगीं । अशोकावना जाय तूं लागवेगीं ॥
समाचार सांगे तये सुंदरीला । कपी वीर तो शीघ्र तैसा निघाला ॥ ३४ ॥
अशोकीं वसे जानकी शोक भारी । अकस्मात तेथें चि आला वनारी[६५] ॥
नमस्कार घालूनि तो बोलताहे । सुवेळे समस्तांस कल्याण आहे ॥ ३५ ॥
दशग्रीव संहारिला लंकवासी । प्रतापें दिलें राज्य बीभीषणासी ॥
प्रभूनें समाचार हा सांगवीला । तेणे जानकी थोर आनंद जाला ॥ ३६ ॥
स्तुती उत्तरें बोलली एकमेकां । सिता तोषली दूरी टाकून शंका ॥
म्हणे मारुती हा समाचार नेतों । पुढें जावया शीघ्र जाऊनि येतों ॥ ३७ ॥
नमस्कार केला तये जानकीसी । म्हणे रे कपी तूं चिरंजीव होसी ॥
त्वरें चालिला भेटला राघवाला । पुन्हा मागुती पाठवीलें तयाला ॥ ३८ ॥
म्हणे गा विरा सांग बीभीषणातें । वना जाऊनी आणिजे जानकीतें ॥
दिजे मंगळस्नान नाना प्रकारें । सुगंधें फुलेंलें अळंकार चीरें ॥ ३९ ॥
महा वीर ते शीघ्र तैसे निघाले । पहाया सिता सर्व ही सिद्ध जाले ॥
बहूसाल वाद्यें दळेंशीं निघाले । कपी लागवेगीं त्रिकूटासि गेले ॥ ४० ॥
सुवेळाचळामाजि तो रामराजा । पहाया तया चालिल्या देव फौजा ॥
मदोन्मत्त ऐरावतारूढ जाला । सुरांशी सुरेशू पुढें शीघ्र आला ॥ ४१ ॥
पुढें शीघ्र मेषा[६६]रूढें पावकानें । करीं शुभ्र शक्ती तया ताम्रवर्णें ॥
बहू भूषणें देव तो अग्नि आला । सुखें चालिला राम पाहावयाला. ॥ ४२ ॥
पहा दंडपाणी महामेघ जैसा । तयालागि बैसावया थोर म्हैसा[६७] ॥
पती दक्षिणेचा[६८] तयारूढ जाला । सुखें चालिला राम पाहावयाला ॥ ४३ ॥
नरारूढ होऊनि नैरृत्यनाथें । त्वरें जाइजे धूम्रवर्णें समर्थें ॥

---

६४. शल्य=दुःखाचें कारण. ६५. वनारी=मारुती. ६६. मेष=मेंढा. ६७. म्हैसा=रेडा. ६८, दक्षिणेचा पति=यम.

करीं खड्ग[६९] घेऊनिया सिद्ध जाला । सुखें चालिला राम पाहावयाला ॥ ४४ ॥
जळाधीश[७०] नक्रीं[७१] समारूढ जाला । करीं पाश तो शीघ्र घेऊनि आला ॥
सर्वे सागरांचा समूदाव आला । सुखें चालिला राम पाहावयाला ॥ ४५ ॥
निळा वर्ण तो वायु अंकूशपाणी । मृगारूढ[७२] होऊनिया नीळवर्णी ॥
सुताच्या गुणें आवडीनें निघाला । सुखें चालिला राम पाहावयाला ॥ ४६ ॥
गदा घेउनी तो प्रभू उत्तरेचा[७३] । हयारूढ तो शुभ्र वर्णू तयाचा ॥
महा सुंदरू तो सुधारूप आला । सुखें चालिला राम पाहावला ॥ ४७ ॥
रूपें कर्दळीसूत तो शूळपाणी । जये अंतरीं रामरामेतिवाणी ॥
महादेव नंदीवरी रूढ जाला । सुखें चालिला राम पाहावयाला ॥ ४८ ॥
गणेंशीं गणाधीश अंकूशपाणी । चतुर्भूज तो भव्य सिंदूरवर्णी ॥
महास्थूळ तो मूषकारूढ जाला । सुखें चालिला राम पाहावयाला ॥ ४९ ॥
सुरांचा गुरू अंगिरा दूसरा तो । प्रतापें कुबेरू धनाचा बळी तो ॥
रथारूढ होऊनि मार्तंड[७४] आला । सुखें चालिला राम पाहावयाला ॥ ५० ॥
विधी मुख्य हंसासनीं सृष्टिकर्ता । तयाचेनि उत्पती हा विश्वभर्ता ॥
ऋषी देव गंधर्व मेळा मिळाला । सुखें चालिले राम पाहावयाला ॥ ५१ ॥
गुणी नाचणी गायका स्वर्गवासी । अलापें कळा कूशळा त्या विलासी ॥
दळें भूतळीं चालिले देव कोटी । बहूतांपरी चालिले रामभेटी ॥ ५२ ॥
सदाशीव तो शीघ्र भेटीस आला । पदींचालि तो राम सन्मूख आला ॥
प्रितीनें सखे भेटती एकमेकां । तया भेटतां सौख्य जालें अनेकां ॥ ५३ ॥
विरंचीस आलिंगिलें राघवानें । बहू सूख तें मानिलें ब्रम्हयानें ॥
पुढें भेटला शक्र सूखें निवाला । तया मानसीं थोर आनंद जाला ॥ ५४ ॥
ऋषी देव गंधर्व सर्वे मिळाले । पुढें रामआलिंगनीं सिद्ध जाले ॥
समस्तांसि तो भेटला रामचंद्र । मही लोटला सर्वसूखें समुद्र ॥ ५५ ॥
सभा बैसली सर्वही स्वस्थ जाली । कथा राहिली पाहिजे चालवीली ॥
रघूनायकें मारुती पाठवीला । त्वरें शीघ्र लंकापुरी माजि गेला ॥ ५६ ॥
पुढें भेटला शीघ्र बीभीषणातें । बहूसाल सन्मानिलें मारुतातें ॥
तयालागिं उंचासनीं बैसविलें । म्हणे आजि हें भाग्य माझें उदेलें ॥ ५७ ॥
सखा वाटसी राघवें धाडिलासी । बहूसाल तें सौख्य जालें मनासी ॥
प्रभूची मला काय आज्ञा करावी । शिरीं वंदितों मी करन्यास दावी ॥ ५८ ॥
पुढें मारुतें मात ते जाणवीली । म्हणे जानकी वैभवें आणवीली ॥

---

६९. खड्ग=तरवार. ७०. जळाधीश=वरुण. ७१. नक्र=मगर. ७२. मृग=हरण. ७३. उत्तरेचा पति=सोम. ७४. मार्तंड=सूर्य.

महावीर ते शीघ्र तैसे निघाले । दळेंशीं अशोकावनामाजि गेले ॥ ५९ ॥
बहूसाल यानें गजा घोडियांचीं । सर्वे चालिलीं दिव्य सूखासनांचीं ॥
महावीर ते सर्व येऊनि मागें । त्वरें वीर ते चालिले लागवेगें ॥ ६० ॥
पुढें भेटते जाहले जानकीला । नमस्कार साष्टांग केला तियेला ॥
अनूवादिजे शीघ्र नैॠत्यनाथें । तुम्हां न्यावया पाठवीलें समर्थें ॥ ६१ ॥
तरी जन्ननी शीघ्र आतां उठावें । महा मंगलस्नान आधीं करावें ॥
अळंकार चीरें पुढें सिद्ध केलीं । सुगंधेल तेलें बहू आणवीलीं ॥ ६२ ॥
बहूसाल आनंद तो जानकीला । स्तुती उत्तरीं गौरवीलें तयाला ॥
म्हणे मारुती जन्ननी मान दीजे । उदासीन बीभीषणाला न कीजे ॥ ६३ ॥
कपी बोलतां मान्य ते गोष्टि केली । सर्वे राक्षसी शीघ्र तैशी निघाली ॥
बहूसाल उष्णोदकें सिद्ध होतीं । बहू कूशळा राक्षसी माखितातीं ॥ ६४ ॥
स्तुती उत्तरीं माखिलें जानकीला । म्हणे आजिचा दीन हा धन्य जाला ॥
चिरें सुंदरें कंचुकी रत्नमाळा । सुगंधी बहू घातल्या पुष्पमाळा ॥ ६५ ॥
अळंकार भांगाँरजांबूनँदाचे । महीमंडळींच्या नृपाळांस कैंचे ॥
तया मारुतें बैसका सिद्ध केली । जगज्जन्ननी बैसली सिद्ध जाली ॥ ६६ ॥
पुढें ठेविलें पात्र सूँधाफळांचें । शकूनार्थ द्यावें म्हणे रम्य वाचे ॥
दिलीं पँचँकें दोनि दोघां जणाला । कपी मारुती आणि बीभीषणाला ॥ ६७ ॥
जिवाच्या सख्या राक्षसी जानकीच्या । बहू दीस होत्या वनीं संगतीच्या ॥
दिलीं पंचकें दोन दोघीं जणींना । महाशर्भ नामें तये त्रीजटेला ॥ ६८ ॥
म्हणे जानकी लोभ आतां असावा । उदासीन वाटे बहूसाल जीवा ॥
समस्तां जणांतें फळें पाठविलीं । मुखें जानकीनें बहू स्तूति केली ॥ ६९ ॥
फळें सेविलीं आच्मनें शुद्धि केली । पुढें शीबिकाँ ते विरें आणवीली ॥
पताका चिरें सुंदरें दिव्य छेत्रें । पुढें विंजणे चामरें तेंवि चित्रें ॥ ७० ॥
दळें चाललीं दाटणी थोर जाली । सिता शीबिकेमाजि तैशी निघाली ॥
तुरें सुंदरें गंभिरें वाजताती । असंभाव्य वाद्यें ध्वनी गर्जताती ॥ ७१ ॥
महा सुंदरें रम्य दिव्यांबरें तें । वरी सर्व आच्छादिलें शीबिकेतें ॥
पुँलस्ती कपी वीर सन्नीध जाती । पुढें वारिती वेत्र घेउनि हातीं ॥ ७२ ॥
अशोकावनींहूनि ते लागवेगें । बहूवीध सन्नीध येती प्रसंगें ॥
सर्वे चालिले लोक त्रीकूटवासी । पहाया अती आदरें जानकीसी ॥ ७३ ॥
सभे बैसला देव कैलासवासी । गणाधीश तो ईश सर्वां गुणांसीं ॥

---

७५. भांगार=सोनें. ७६. जांबुनद=सोनें. ७७. सुधाफळें=अमृतफळें=आंबे. ७८. पंचकें=पांच फळांचा समुदाय. ७९. शिबिका= पालखी. ८०. पुलस्ती=पुलस्त्य पुत्र बिभीषण

विधी शक्रते सर्व गंधर्व आले । ऋषी देव तेतीस कोटी मिळाले ॥ ७४ ॥
मिळाले कपी रीस कोटयानुकोटी । सिता आणितां जाहली थोर दाटी ॥
शतांचीं शतें धांवती वेत्रपाणी । दळें वारिती गर्जती घोर वाणी ॥ ७५ ॥
पहाया सिता वीरमांदी मिळाली । प्रसंगीं तयें दाटणी थोर जाली ॥
बळें टाकिती एकमेकांसि मागें । कपी रीस ते धांवती लागवेगें ॥ ७६ ॥
झडा घालिती एकमेकां पुढारें । दिसेना पदीं सर्वसेना उभारें ॥
पुढें पाहया घालती मस्तकांतें । महा वीर ते हाणिती वेत्रघातें ॥ ७७ ॥
कितीयेक आकाशपंथीं उडाले । कितएिक ते वृक्ष अग्रीं दडाले ॥
कितीयेक ते फीरती अंतराळीं । कितीएक ते घोष उल्हासकाळीं ॥ ७८ ॥
कपींचीं दळें चंचळें फार जालीं । महाभार देखोनि मागें पळालीं ॥
बळी गर्जती थोर घोषें फुराणें । वरी साधती अंतराळीं किराणें ॥ ७९ ॥
महाभार देखोनि माहा विरांचे । भ्रमों लागले भार गोळांगुळांचे ॥
दिसेना सिता आर्त पोटीं सरेना । उतावीळ त्यां धीर पोटीं धरेना ॥ ८० ॥
कपी धांवती शीघ्र पाहावयाला । परी रीघ नाहीं पुढें जावयाला ॥
प्रसंगीं महा भार देखोनि दृष्टी । रघूराज तो बोलिला एक गोष्टी ॥ ८१ ॥
सिते कारणें वानरीं कष्ट केले । किती वेळ हे बाणघातें निमाले ॥
उतावीळ पोटीं पाहाया सितेला । दिसे स्पष्ट ऐसें करावें तियेला ॥ ८२ ॥
महोत्साव यात्रा तथा पर्वकाळीं । विवाहीं युद्धांतीं तथा अंतकाळीं ॥
गृहीं सासऱ्याचे तया जन्मकाचे । नव्हे नित्य ते संगती नोवऱ्याचे[d] ॥ ८३ ॥
पुढें धाडिलें शीघ्र त्या अंगदाला । म्हणे रे तया सांग बीभीषणाला ॥
म्हणावें बळें आपुले लोक वारा । पुढें शीघ्र येऊनियां दूरि सारा ॥ ८४ ॥
त्वरें धांवला राव त्रीकूटवासी । बहू वारिलें मारिलें राक्षसांसी ॥
पुढें काढिले पट्टे कूळा सकूळा । दिसों लागली जानकी दिव्य बाळा ॥ ८५ ॥
समस्तीं सिता देखिली आदरेशीं । असंभाव्य सौंदर्य लावण्यराशी ॥
तये देखतां सर्व सूखें निवाले । कपी बोलती आजि निःपाप जाले ॥ ८६ ॥
सिता देखती जाहली रामचंद्रा । नमस्कार केला तसा ची महेंद्रा ॥
तया राघवें पाहिलें जानकीला । पुढें भ्रूलता वक्र अव्हेर केला ॥ ८७ ॥
उदासीन ते जानकी लागिं केलें । सभामंडळीं सर्व बेरंग जालें ॥
सभेमाजि ते बोलती एकमेकां । सितेलागिं अव्हेरिलें राघवें कां ॥ ८८ ॥
अवस्था बहू लागली ते प्रसंगीं । बुडाले कपी वीर सर्वै विरंगीं ॥

---

८१. आर्त=आवड. d नव्हे नित्य ते संगती नोवऱ्याचे-नव्हे निंद्य ते संगतीनें वराचे.
८२. पट्ट=पडदे.

मुखें बोलती सर्व ही कोण वेळा । शिणे मारुती कंप जाला भुगोळा ॥ ८९ ॥
सभा बैसली त्या द्विजांब्राह्मणांची । असंभाव्य सौंदर्यता त्या सितेची ॥
कितेकीं मनामाजि संकेत केला । तिहीं अंतरीं कल्पिले दोष तीला ॥ ९० ॥
रघूनाथ हा हेत जाणे मनींचा । सदा सर्वदा साक्ष सर्वा जनांचा ॥
जिवांतील जाणे तया चोरवेना । महा पातकी पाप त्याचें सरेना ॥ ९१ ॥
म्हणोनी प्रसंगें उदासीन केलें । जनीं कल्पिलें सर्व ही व्यर्थ गेलें ॥
म्हणे राम तो जानकीलागिं जावें । स्वइच्छासुखें त्वां दिगंतीं फिरावें ॥ ९२ ॥
प्रसंगीं तये शब्दकाठिण्य रामें । मुखें बोलिजे अर्थभेदें विरामें ॥
अधोमूख सीता विलोकी भुमीतें । मही भीजती जाहली अश्रुपातें ॥ ९३ ॥
म्हणे न्याय अन्याय सर्वै बुडाला । दिसे आज कल्पतरू वांज जाला ॥
नसे अल्प अन्याय ब्रह्मांड केला । वृथा दंड हा कोण धर्मं मिळाला ॥ ९४ ॥
मनीं अल्प हे कल्पना कां करावी । म्हणे कल्पिली बुद्धि पोटीं धरावी ॥
बहूसाल बोलोनियां काय आतां । महासौख्य तें पावकें भस्म होतां ॥ ९५ ॥
म्हणे जानकी त्या रिसां वानरांसी । बहूसाल ते कष्ट जाले तुम्हांसी ॥
परी मागुती एक जीवीं धरावें । बहूसाल त्या पावका चेतवावें ॥ ९६ ॥
पुढें शीघ्र खाणोनियां कुंड केलें । असंभाव्य त्या पावका चेतवीलें ॥
शिखा[८३] धांवती ऊर्ध्व आकाशपंथें । खिडा जाहली खेचरां भूचरांतें ॥ ९७ ॥
विरंची हरादीक देवां समस्तां । मनामाजि ते थोर जाली अवस्था ॥
मुखें बोलती सर्व ही कार्य जालें । परी मागुती काय हें विघ्न आलें ॥ ९८ ॥
स्वभावें चि हा वन्हि जाळीत आहे । तयामाजि हे जानकी कैंवि राहे ॥
धडाडीत ज्वाळा पुढें पाहवेना । तया अंतरें ही उभें राहवेना ॥ ९९ ॥
मनामाजि पूजा यथासांग केली । पुढें जानकी पावकामाजि गेली ॥
तये स्पर्शतां पावकू शुद्ध जाला । निवाला प्रसंगीं तये शांत जाला ॥ १०० ॥
तयामाजि ते जानकी शोभताहे । समस्तीं सभा लोक त्रैलोक्य पाहे ॥
पुटीं घालिजे पूतळी कांचनाची । तयेहूनि ते दिव्य काया सितेची ॥ १०१ ॥
अळंकार चीरें बहू पुष्पमाळा । सुगंधें तनू चर्चली दिव्य बाळा ॥
जगज्जन्ननी शीघ्र बाहेर आली । सभे देखतां दिव्य सीता निघाली ॥ १०२ ॥
महावीर ते गर्जले नामघोषें । कपीवीर ते तोषले सर्व तोषें ॥
सुरीं अंबरीं पुष्पवर्षाव केला । नभीं दुंदुभीं नाद कल्लोळ जाला ॥ १०३ ॥
सिता मुख्य ते पावकामाजि होती । वृथा रावणें चोरिली हे वदंती[८४] ॥
रमा सागरांतूनि नेली हरीनें । तयाचे परी जानकी राघवानें ॥ १०४ ॥

---

८३. शिखा=ज्वाळा. ८४. वदंती=वार्ता.

पुढें जानकी रामअंकीं विराजे । रमा आदिनारायणा जेंवि साजे ॥
असंभाव्य तो वाद्यकल्लोळ गाजे । कपीवाहिनी मानि आनंद माजे ॥ १०५ ॥
जनाच्या मना कारणें धीर केला कृपेचा कृपासागरा पूर आला॥
कृपादृष्टिनें पाहिलें जानकीला । पुढें शीघ्र आलिंगिलें त्या सितेला ॥ १०६ ॥
म्हणे दास हे श्लोक रामायणाचे । जरी अल्प सोपे चि नाना गुणांचे ॥
कितीएक पाल्हाळ टाकोनि मागें । कथा चालिली ते पुढें लागवेगें ॥ १०७ ॥

---

## अकरावा प्रसंग प्रारंभ.

प्रतापें दिनेशूं तपाचा हुताशू । विरांमाजि ईशू सुरांचा सुरेशूं ॥
मुनींचा महेशू महादेव धीशूं । सदांचा उदासू वनारण्यवासू ॥ १ ॥
पिनाकी शुळी बोलिजे रुद्रवाणी । जटाभार पंचाननू शूळपाणी ॥
हरू शैलजावल्लभू भक्तपाळू । धराधार मृत्युंजयो तो कृपाळू ॥ २ ॥
महादेव शंभू गिरीजाविलासी । सुवर्णाचळामाजि कैलासवासी ॥
विराजे रुपें गौर कपूर जैसा । दिसे धाम ढौळा सदाशीव तैसा ॥ ३ ॥
विषें कंठ काळा दिसे चंद्र मौळीं । फणीधारकू वन्हि साजे कपाळीं ॥
असंभाव्य भोळा गळां रुंडमाळा । पहा मस्तकीं वोघ जाती खळाळा ॥ ४ ॥
बसे भस्म अंगीं प्रभू वीतरागी । उदासीन तो सर्व सामर्थ्य त्यागी ॥
विधी शक्र हे सर्व ध्याती जयाला । महादेव तो वर्णितो राघवाला ॥ ५ ॥
म्हणे धन्य रामा विरा पूर्णकामा । असंभाव्य सीमा कळेना महीमा ।
महा थोर अद्भूत सामर्थ्य केलें । प्रतापें चि ब्रह्मादिकां सोडवीलें ॥ ६ ॥
तया रावणालागिं प्रसन्न आम्हीं । विरंचीवरें मातला पापकर्मी ॥
ऋषी देव माझे बहू कष्टवीले । समर्था तुवां सर्व ही सोडवीले ॥ ७ ॥
अखंडीत घेतों तुझें नाम वाणी । पुन्हा अंतराभाने कोदंडपाणी ॥
बहू काळ होतें बहू आर्त पोटीं । प्रसंगें चि ये जाहली थोर भेटी ॥ ८ ॥
अकस्मात हा भेटिचा लाभ जाला । मनामाजि अद्भूत आनंद जाला ॥
सुरांकारणें संकटीं पावलासी । मनोभावना राहिली तूजपाशीं ॥ ९ ॥
भविष्योत्तरें बोलिलीं वाल्मिकानें । पहातों चरित्रें तुझीं आवडीनें ॥
विषें पोळला प्राण माझा निवाला । निजध्यास तो लागला पार्वतीला ॥ १० ॥

---

८५. दिनेश=सूर्य. ८६. हुताश=अग्नि. ८७. सुरेश= इंद्र. ८८. धीश=बुद्धीचा स्वामी. ८९. पंचानन=पंचमुखी. ९०. शैलजावल्लभ=पार्वतीपति शिव. ९१. फणीधारकू=सर्प धारण करणारा. ९२. रुंडमाळा=मुंडक्यांच्या माळा. ९३. वीतरागी=वैराग्ययुक्त.

समस्तां मनीं लागला ध्यास रामा । तुझें रूप ध्यातों सदां योगधामा ॥
बहूसाल हें बोलणें काय देवा । अखंडीत हा लोभ आतां असावा ॥ ११ ॥
प्रती उत्तरें राम बोले महेशा । उदाराधिशा सुंदरा देवधीशा ॥
समर्था प्रभू लोकपाळा नृपाळा । लिळे जाळिशी पाळिशी या भुगोळा ॥ १२ ॥
तुझा योग होतां चि आनंद जाला । पुढें देखतां प्राण माझा निवाला ॥
दयासागरा सर्व सांभाळ केला । सुखानंद हेलावला तृप्त जाला ॥ १३ ॥
पुढें बोलता जाहाला तो विरंची । म्हणे आजि हे धन्य वेळा सुखाची ॥
तुझा योग होतां घडी अमृताची । बहू स्तूति केली रघूनायकाची ॥ १४ ॥
किती बंधनें पावलों पूर्व पापें । बहू दीस ओसंडिलें[e] मायबापें ॥
बहू कष्ट केलेसि देवाधिदेवा । कृपाळूपणें शीघ्र केला कुडावा ॥ १५ ॥
तुम्हां वेगळे सर्व ही दीन झाले । त्रिकूटाचळीं बंदि शाळे मिळाले ॥
दिनासारिखे जाहले दैन्यवाणे । प्रभू आमुचें दुःख तें कोण जाणे ॥ १६ ॥
बहू कष्टविलें तया रावणानें । घडीनेंघडी त्रासिलें दुर्जनानें ॥
गमे हानि येतां मनामाजि चिंता । समस्तांस कोणी नसे सोडवीता ॥ १७ ॥
बहू वोखटी वेळ येऊन गेली । कृपासागरा धावणी शीघ्र केली ॥
सुतालागिं झेंपावला व्याघ्र तैसा । जगज्जन्नका तूं समस्तांस तैसा ॥ १८ ॥
स्तुती उत्तरें बाळकू काय जाणे । बरें वोखटें सर्व कांहीं च नेणें ॥
मुलें खेळतां मायबापास चिंता । तयाचे परी बोलताहे विधाता ॥ १९ ॥
बहू स्तूति केली तया ब्रह्मयानें । कृपाळूपणें वारिलें राघवानें ॥
प्रसंगें विधीचें समाधान केलें । मनीं दुःख मागील तें सर्व गेलें ॥ २० ॥
पुढें बोलता जाहला वज्रपाणी । सदा सर्वदा गाइजे जो[f] पुराणीं ॥
तया सूकताचा बरा काळ आला । प्रभू रामचंद्रा तुझा योग झाला ॥ २१ ॥
बहूतां परी राघवा ऐकलासी । पुरी पूरली लोचनांची असोसी ॥
पुढें पाहतां देखतां रूप तूझें । जगन्नायका धन्य हें भाग्य माझें ॥ २२ ॥
उणे कोटि कंदर्प हें रूप साजे । सदा सर्वदा योगि ध्यानीं विराजे ॥
मुनी शोधिती भक्त कोट्यानुकोटी । बहू साधनें ही नव्हे शीघ्र भेटी ॥ २३ ॥
कितीएक योगी उदासीन जाले । गिरी कंदरीं तूज शोधीत गेले ॥
तयां अंतरीं भेटसी अल्प कांहीं । जनीं आमुच्या सूकता पार नाहीं ॥ २४ ॥
म्हणे इंद्र तो स्वामि देवाधिदेवा । जनीं सेवका आपुलासा म्हणावा ॥
घडेना मला भक्तिभावार्थ नाहीं । प्रभू सांगिजे जी मुखें कार्य कांहीं ॥ २५ ॥
म्हणे राम गा वज्रपाणी प्रसंगें । रथू मातळी धाडिला लागवेगें ॥

---

e बहूदीस ओसंडिलें माय बापें—बहुदीस हो शीणलों मायबापें. f गाइजे जो—देव ऐकों.
१४. कंदर्प=मदन.

तुवां कार्य तें सर्व पूर्वीं च केलें । रथारूढ होऊनियां येश आलें ॥ २६ ॥
पुन्हा मागुतें एक आतां करावें । निमाले कपी ऋक्ष त्या ऊठवावे ॥
सुधामेघ पाडूनियां लागवेगीं । महा वीर ते ऊठवीं ये प्रसंगीं ॥ २७ ॥
मुखें बोलता जाहला चक्रपाणी । तेणें थोर संतोषला वज्रपाणी ॥
प्रसंगीं तये थोर आनंद जाला । नमस्कार केला रघूनायकाला ॥ ॥ २८ ॥
जळेशास आज्ञापिलें ते चि काळीं । महा मेघ ते चालिले अंतराळीं ॥
असंभाव्य ते जाहली मेघवृष्टी । तिणें भीजली सर्व ते प्रेतसृष्टी ॥ २९ ॥
कपी रीस ते सर्व आले निमाले । नमस्कारिला राम सैन्यीं मिळाले ॥
कळेना कळा कोण या राघवाची । मनीं कल्पितां हांव पूरे मनाची ॥ ३० ॥
निमाले कपी पावले दिव्य देहो । मिळाला रिसां वानरांचा समूहो ॥
सुवेळाचळामाजि ते भार आले । क्षमारूप तैसे चि सर्वे मिळाले ॥ ३१ ॥
मिळाले बहू देव कोट्यानुकोटी । असंभाव्य दोहों दळामाजि दाटी ॥
मुखें बोलती देव त्या राघवाला । स्तुती उत्तरीं तोषवीती दयाळा ॥ ३२ ॥
प्रसंगें चि आज्ञा समस्तांस द्यावी । पुन्हा मागुती सर्व चिंता असावी ॥
तुम्हीं हो अयोध्यापुरीमाजि जावें । विलासें बहू राज्य सूखें करावें ॥ ३३ ॥
प्रती उत्तरीं राम बोले समस्तां । म्हणे हो बरें जाइजे शीघ्र आतां ॥
समस्तीं तुम्हीं भूवनामाजि जावें । विलासें बहू राज्य सूखें करावें ॥ ३४ ॥
मुखें बोलतां राम ते देव तोषें । करीं पीटती टाळिका नामघोषें ॥
नमस्कार केला रघूनायकाला । समस्तां मनीं थोर आनंद जाला ॥ ३५ ॥
रवी पावकें येम नैऋत्यनाथें । जळाढ्यें धनाढ्यें रघूनायकातें ॥
गुरू अंगिरा देव गंधर्व ते ही । बहू बोलते जाहले सर्व कांहीं ॥ ३६ ॥
ऋषी देव गंधर्व सर्वे मिळाले । स्तुतीउत्तरीं बोलते शीघ्र जाले ॥
समस्तांसि सन्मानिलें राघवानें । गुणां किन्नरादीक गाती पुराणें ॥ ३७ ॥
निरोपें चि त्या चालिल्या देवकोडी । पुढें शीघ्र बीभीषणू हात जोडी ॥
समर्था मला थोर आतां करावें । घडी एक लंकापुरीमाजि जावें ॥ ३८ ॥
धरावें मनामाजि देवाधिदेवें । जनीं सेवकालागिं कांहीं घडावें ॥
करावें समर्थें जिणें श्लाघ्य माझें । घडावें महद्भाग्य हें दास्य तूझें ॥ ३९ ॥
प्रती उत्तरीं राम बोले तयासी । म्हणे धन्य बीभीषणा गूणराशी ॥
प्रसंगें सखा बंधु तूं जोडलासी । पुरेना तुझे संगतीची असोसी ॥ ४० ॥
प्रितीच्या सुखा लागिं कैसें वदावें । गुणाच्या गुणाला किती आठवावें ॥

---

१५. सुधामेघ=अमृताचे ढग. १६. जळेश=वरुण. ‡ मनीं कल्पितां हांव पूरे मनाची—न चाले पुढें बुद्धि ब्रम्हादिकांची. १७. जळाढ्य=वरुण. १८. धनाढ्य=कुबेर. १९. श्लाघ्य=धन्य.

बहूसाल तूं राखिला स्नेहवाद । जनामाजि तूं धन्य साधू अगाधू ॥ ४१ ॥
स्नेहाळा तुंवा आनि ऐसें करावें । पुरीमाजि त्वां सुग्रिवालागीं न्यावें ॥
विलासें बहूतां परी सूख द्यावें । कपी ऋक्ष घेऊनि वेगें उठावें ॥ ४२ ॥
सखा सुग्रिवा सारिखा कोण आहे । मनामाजि बीभीषणा तूं च पाहें ॥
जिवेंशीं सखा आमुचा साह्य जाला । असंभाव्य हा वीरमेळा मिळाला ॥ ४३ ॥
जनीं मैत्रिकी राखिली सुग्रिवानें । बहूसाल हा कष्टला जीव प्राणें ॥
स्वयें देखिलें सांगणें काय तुम्हां । कपी पूजितां पावलें सर्व आम्हां ॥ ४४ ॥
पुढें शीघ्र बीभीषणें ते चि काळीं । अती आदरें ठेविलें वाक्य भाळीं ॥
करीं घेतलें प्रीतिनें सुग्रिवाला । म्हणे आजिचा काळ हा धन्य जाला ॥ ४५ ॥
समर्था गुणें तूं सखा जोडलासी । तुझा योग हा पार नाहीं सुखासी ॥
कपी ऋक्ष घेऊनि तैसा निघाला । पुढें शीघ्र लंकापुरीमाजि गेला ॥ ४६ ॥
जळें निर्मळें सर्व अभ्यंग केलें । अळंकार चीरें कपी तोषवीले ॥
बहूतां परींचीं सुगंधें फुलेलें । समस्तांसि नाना रसें तृप्त केलें ॥ ४७ ॥
रिसां वानरांला पुजा सांग जाली । बहूसाल बीभीषणें स्तूति केली ॥
महावीर विश्रांति पावून तेथें । निघाले पुढें सर्व ही राम जेथें ॥ ४८ ॥
सुगंधी बहू घातल्या पुष्पमाळा । [१००]अनीळें सुखें वास नेला भुगोळा ॥
प्रभूला नमस्कार साष्टांग केले । मिळाले कपी ऋक्ष सूखें निवाले ॥ ४९ ॥
सभेमाजि आली बहूसाल शोभा । पुढें राहिला हात जोडोनि ऊभा ॥
प्रसंगीं तयें राम बीभीषणाला । [१]सुधाउत्तरीं बोलता शीघ्र जाला ॥ ५० ॥
म्हणे गा विरा त्वां पुरीमाजि जावें । ध्रुवाचे परी राज्य तेथें करावें ॥
शशी सूर्य तारागणें अंतराळीं । असावें सुखें भोगिजे सर्व काळीं ॥ ५१ ॥
पुढें बोलिजे शीघ्र नैऋत्यनाथें । म्हणे वासना पूरवावी समर्थें ॥
प्रभू बोलतां चित्त माझें न राहे । पहावी अयोध्यापुरी वासना हे ॥ ५२ ॥
पुरीमाजि भद्रासनीं तूं नृपाळा । महोत्साह उत्साह पाहेन डोळां ॥
उदारा प्रभू सौख्य पाहेन संगें । निरोपें चि मी शीघ्र येईन मागें ॥ ५३ ॥
सवें घेतलें वीर बीभीषणाला । रघूराज तो वानरेंशीं निघाला ॥
असंभाव्य तो वाद्यकल्लोळ जाला । पुढें सिद्ध केलें महा [२]पुष्पकाला ॥ ५४ ॥
नसे तूळणा रत्नमंडीत [३]याना । महीतुल्य त्या आणवीलें विमाना ॥
तयारूढ तो जाहला राम वेगीं । कपी वीर ते आपुलाल्या विभागीं ॥ ५५ ॥
विमानावरी रामराजा विराजे । वरी बैसले ते कपी रीस राजे ॥

१००. अनीळ=वारा. १. सुधाउत्तरीं=गोड शब्दांनीं. २. पुष्पक=रावणाचें विमान. ३. यान=वाहन.

सुमित्रासुतू बैसला सैंव्य भागीं । जगन्मात सीता तया वांमभागीं ॥ ५६ ॥
विमानावरी वाजती घंटमाळा । खडे घोष हेलावती मुक्तमाळा ॥
समुद्रोदकीं पूर्ण तारूं च जैसें । नभामाजि तें चालिलें भव्य तैसें ॥ ५७ ॥
पुढें चालतां चालतां लागवेगीं । सितेलागिं ते राम सांगे प्रसंगीं ॥
रणामंडळीं आट राक्षसकूळा । त्रिकूटाचळू दाखवीली सुवेळा ॥ ॥ ५८ ॥
असंभाव्य पालाणिला सेतु जेथें । स्वयें वास दर्भासनीं योग तेथें ॥
स्त्रिया रत्नमंडीत नानाविलासी । समुद्रातिरीं भेटला तोयरांशी ॥ ५९ ॥
बळें आगळा वीर वाळी निमाला । दिलें राज्य तेथें कपी सुग्रिवाला ॥
अकस्मात जाली हनूमंत भेटी । तटाकें नद्या दाखवी वीर जेठी ॥ ६० ॥
जटायू पुढें पावला स्वर्गलोकीं । जैनस्थान हें रम्य गोदातटाकीं ॥
पुढें चालतां राम राजाधिरानें । तया राहवीलें ऋषी भारद्वाजें ॥ ६१ ॥
कपींचीं दळें भूतळीं दाटि जाली । तया भारद्वाजें बहू स्तुति केली ॥
पुढें धाडिलें मारुतीलागिं देवें । म्हणे गा विरा भ्रातया भेटवावें ॥ ६२ ॥
प्रभू बोलतां वीर तैसा निघाला । तया गूहकानें नमस्कार केला ॥
स्तुती बोलतां तो समाचार सांगे । नंदीग्राम तो पावला लागवेगें ॥ ६३ ॥
कपी देखिला भव्य रामानुजानें । नमस्कार केला तया बांधवानें ॥
कपी भेटला बैसला स्वस्थ जाला । समाचार साकल्य सांगे तयाला ॥ ६४ ॥
म्हणे मारुती बांधवाच्या वियोगें । पळें भासती तीं किती काळयूगें ॥
महद्भाग्य आलासि येणें प्रसंगीं । रघूनाथ तो भेटवीं लागवेगीं ॥ ६५ ॥
उदासीन तो बंधु त्या राघवाचा । वदे मारुतीलागिं कारुण्यवाचा ॥
बहू कष्टलों काळ गेला दुखाचा । कधीं राम भेटेल सिंधू सुखाचा ॥ ६६ ॥
वृथा संपदा राज्य हें काय कीजे । उदासीन या राघवाला नमीजे ॥
पदें भोगिजे ते मदें बाधिजे तें । दिसेंदीस आयुष्य हें व्यर्थ जातें ॥ ६७ ॥
कितीएक ते भाग्य भोगून गेले । पुन्हा मागुती मृत्युपंथें निमाले ॥
कितीएक साधू उदासीन जाले । महीमंडळीं लोक सूखें निवाले ॥ ६८ ॥
भले जाणती संपदा दुःखदाती । स्वहीतापरा त्रास होतो नियंती ॥
हरादीक ते तापसी या च लागीं । सदां सर्वदां फीरती वीतरागी ॥ ६९ ॥
म्हणोनी मला राघवें वीण कांहीं । सदां सर्वदां वैभवें चाड नाहीं ॥

---

१. सव्य=या शब्दाचा अर्थ "डावा" असा मूळचा आहे. परंतु लोक "उजवा" असा चुकीनें समजतात. याप्रमाणेंच परोक्ष व अपरोक्ष यांचाही अर्थ लोक विपरीत समजतात. ५. वामभागीं=डावेकडे. ६. मुक्तमाळा=मोत्यांचे हार. ७. पालाणीला=खोगिरासारखा घातला. ८. तोयराशी=समुद्र. ९. जनस्थान=नाशिक शहर.

मला भेटवीं राम आत्मा जगाचा । वदे मारुतीलागिं तो दीन वाचा ॥ ७० ॥
म्हणे मारुती धन्य गा धन्य साधू । महाशक्ति वीरक्ति बोधें अगाधू ॥
नव्हे साधनें भेटि ब्रह्मांदिकाला । तुम्हांलागिं भेटीस तो राम आला ॥ ७१ ॥
नमस्कार केला तया मारुतीनें । रजें डौरलें भाळ माहा विरानें ॥
प्रिती लागली अंतरीं ते ढळेना । म्हणे धन्य गा धन्य लीळा कळेना ॥ ७२ ॥
तया देखतां चित्त सूखें निवालें । मनामाजि तें थोर आश्चर्य केलें ॥
म्हणे वीर अद्भूत वैराग्य कैसें । महद्भाग्य हें मानिले तृण जैसें ॥ ७३ ॥
पुढें वीर रामानुजें काय केलें । पुरीमाजि शत्रूघना पाठविलें ॥
समस्तां वसिष्ठांदिकां जाणविलें । असंभाव्य तें सैन्य पालेंणवीलें ॥ ७४ ॥
म्हणे वीर तो राम येईल आतां । सुखी जाहली मुख्य माता समस्तां ॥
प्रसंगें तये थोर आनंद जाला । पुरीमाजि तो लोक सर्वै मिळाला ॥ ७५ ॥
पुढें शीघ्र पालेंणिले दिव्य घोडे । महीमंडळीं त्यांस नाहींत जोडे ॥
असंभाव्य तीं हींसती दिव्य घोडीं । उफाळें तयां धांवतां भूमि थोडी ॥ ७६ ॥
मुठाळी झुली पाखरा मुक्तमाळा । बहू रत्नमंडीत भासे उफाळा ॥
अळंकार भांगार मंडीत केले । बहूभार शृंगारिले सिद्ध जाले ॥ ७७ ॥
गिरिसारिखीं चंड बाडें अपारें । बहू मातलीं कुंजरें थोरथोरें ॥
पताका झुली रम्य दिव्यांबरांच्या । बहू रंग लावण्य नाना परीच्या ॥ ७८ ॥
महा मस्त ते हस्ति भारें निघाले । त्वरें चालतां भव्य सर्वांग डोले ॥
भुमी हाणतां अंदु वाजे खणाणा । बळें वाजती चंड घंटा घणाणा ॥ ८० ॥
तयारूढ ते वीर कीतीक जाले । धडाडीत सेना असंभाव्य चाले ॥
शिबीका बहूसाल सूखासनातें । पताका निशाणें फडाडीत वातें ॥ ८० ॥
महावीर शत्रूघनू लागवेगीं । सुमंतू प्रधानू तया पृष्ठभागीं ॥
बहू वाद्य तो घोष गेला दिगंता । ऋषीराज वासिष्ठ त्या मुख्य माता ॥ ८१ ॥
पदीं चालिला मुख्य तो योगि बंधू । सवें घेतला मारुती वीर्यसिंधू ॥
महा वीर दोघे पुढें शीघ्र आले । असंभाव्य ते भार मागें उदेले ॥ ८२ ॥
पुढें राम तेथूनि वेगीं निघाला । महा पुष्पकारूढ होऊनि आला ॥
त्वरें पावतां पावतां नंदिग्रामा । कपी वीर तो दाखवी शीघ्र व्योमा ॥ ८३ ॥
असंभाव्य तें तेज हेलावताहे । म्हणे गा कपी काय हें येत आहे ॥
तया सांगतो मारुती राम आला । नभामाजि तो पुष्पकारूढ जाला ॥ ८४ ॥

---

१०. पालाणवीलें=चोळविलें ११. पालाणिलें=खोगीर चढविले ( सं. पल्याण=खोगीर ). १२. मुठाळी=बैल इत्यादिकांवर जें हलक्या प्रतीचें खोगिर घालतात त्याला मूठ किंवा मुठाळी म्हणतात. १३. अंदु=हत्तीच्या पायांतली बेडी.

पुढें रामभ्राता नमस्कार घाली । सुखाची असंभाव्य ते वेळ आली ॥
तया देखतां सौख्य अद्भूत जालें । वरी पाहतां यान सांन्निद्ध आलें ॥ ८५ ॥
पुढें देखिला भव्य तो रामयोगी । असंभाव्य सेना तया पृष्ठभागीं ॥
त्वरें चालतां धांवतो रामभ्राता । नव्हे धीर त्या भेटिचा काळ येतां ॥ ८६ ॥
बहू रम्य लावण्य कामावतारी[14] । महा वीर दोघे रूपें योगधारी ॥
तया देखतां रोम[15] अंगीं थरारी । सुखें पाहतां सर्व सेना थरारी ॥ ८७ ॥
रूपें सारिखे वीर दोघे मिळाले । सुखाचे बहू कंप रोमांच आले ॥
पदीं ठेविला मस्तकू बांधवानें । तया ऊठवीलें त्वरें राघवानें ॥ ८८ ॥
स्पुरद्रूप आलिंगनीं वीर गात्रीं । जळें लोटलीं रम्य राजीवनेत्रीं[16] ॥
तयां रामरामानुजां भेटि जाली । प्रसंगीं तये सृष्टि सूखें निवाली ॥ ८९ ॥
सुमित्रासुता भेटला वीतरागी[17] । नमस्कारिली जानकी ते प्रसंगीं ॥
खुणा दावितां रामराजाधिराजें । कपीनाथ आलिंगिला योगिराजें ॥ ९० ॥
पुढें भेटिचा लाभ नैऋत्यनाथा । पदीं ठेविला शीघ्र येऊनि माथा ॥
तयालागिं रामानुजें ऊठविलें । समस्तां विरां राघवें भेटवीलें ॥ ९१ ॥
प्रिती भेटला अंगदा जांबुवंतां । प्रसंगें कपी थोर थोरां समस्तां ॥
स्तुतीउत्तरीं बोलती एकमेकां । स्नेहे लागला सौख्य जालें अनेकां ॥ ९२ ॥
प्रितीनें तया गूहका भक्तराजा । कृपाळूपणें भेटला रामराजा ॥
नमस्कार केला समस्तां विरांला । तयां अंतरीं थोर आनंद जाला ॥ ९३ ॥
पुढें सर्व ही पुष्पकारूढ जाले । दळेंशीं महा वीर तैसे निघाले ॥
अयोध्यापुरी देखतां सौख्य जालें । प्रसंगें रघूनायकें दाखवीलें ॥ ९४ ॥
रूढांच्या[18] मनासारिखें वर्तताहे[19] । महीमंडळीं यान येऊनि राहे ॥
भुमी ऊतरे रामबंधू सितेशीं । कपीनाथ सुग्रीव बीभीषणेंशीं ॥ ९५ ॥
कपी रीस ते भार कोटयानुकोटी । दिसेना भुमी जाहली थोर दाटी ॥
समर्थें विमानासि त्या पाठवीलें । कुबेरासि भेटावया शीघ्र गेलें ॥ ९६ ॥
असंभाव्य तो वाद्यकल्लोळ जाला ॥ कपी पाहती भार अद्भूत आला ॥
रजें व्योम आच्छादिलें सर्व कांहीं । विरां कुंजरां घोडियां मीति[20] नाहीं ॥ ९७ ॥
कपी सर्व चाकौंटले[21] पाहताती ॥ गिरीचे परी भार अद्भूत येती ॥
कपी भार ते देखिले राजभारें । पाहाया दळें लोटलीं तीं अपारें ॥ ९८ ॥

---

१४. कामावतारी=इच्छामात्रें करून अवतार घेणारा. १५ रोम=लोम=केश=आंगावरील रोमांच ( कांटा ). १६. राजीवनेत्रीं=कमळा सारख्या डोळयांत. १७. वीतरागी=भरत. १८. रूढांच्या=बसणाऱ्याच्या. १९. वर्तताहे=चालताहे. २०. मीति=गणती. २१. चाकाटले=चकीत झाले.

खुणा दाविती एकमेकांस तेथें । मुखें बोलती राहिला राम येथें ॥
महा वीर ते मुख्य धांवोनि गेले । कपीभार त्यांमाजि वेगीं मिळाले ॥ ९९ ॥
रघूनायकालागिं शत्रूघनानें । नमस्कार केला तया मंत्रियानें ॥
उभा वर्ग ते भेटले राघवाला । तया मानसीं थोर आनंद जाला ॥ १०० ॥
सुमित्रासुता आणि त्या जानकीला । महा वीर तीहीं नमस्कार केला ॥
प्रसंगीं समस्तां सिते भेटि जाली । सुखाची नदी अंतरामाजि आली ॥ १०१ ॥
सुमंतू समर्था म्हणे पैल पाहें । ऋषी जन्नी मंडळी येत आहे ॥
तयें सांगतां राम तो सिद्ध जाला । पदीं चालतां तो पुढें शीघ्र गेला ॥ १०२ ॥
पुढें देखिला तो ऋषी ब्रह्मनिष्ठ । कुळा रक्षिता तो कुळामाजि श्रेष्ठ ॥
रघूनाथ तेथें नमस्कार घाली । स्तुती उत्तरें आदरें भेटि जाली ॥ १०३ ॥
प्रसंगें नमस्कारिली मुख्य माता । बहू सौख्य जालें तयां भेटि होतां ॥
समस्तां जणींला नमस्कार केले । तया देखतां प्राण त्यांचे निवाले ॥ १०४ ॥
समस्तांस तो भेटला राम जैसा । यथासांग तो वीर सौमित्र तैसा ॥
नमस्कार घाली बहू स्तूति केली । तया देखतां मंडळी ते निवाली ॥ १०५ ॥
सितासुंदरीनें नमस्कार केले । असंभाव्य ते लोक तेथें मिळाले ॥
स्तुती उत्तरें एकमेकांस जालीं । प्रसंगीं तये अंतरें तीं निवालीं ॥ १०६ ॥
समस्तां समस्तां जणा भेटि जाली । पहाया सुखें लोकमांदी मिळाली ॥
पुरीमाजि तो थोर आनंद जाला । मुखें बोलती हो सुखें राम आला ॥ १०७ ॥
सुखें पाहतां मुख्यमाता मिळाल्या । सर्व सुंदरा त्या असंभाव्य आल्या ॥
वधूंची बहू दाटणी थोर जाली । सिता सुंदरी शीघ्र तेथें मिळाली ॥ १०८ ॥
नमस्कारिले नम्र होऊनि श्रेष्ठां । प्रसंगें चि भेटी वरिष्ठां वरिष्ठां ॥
धडाडां नभीं वाजती चंड भेरी । बहू वारितां जाहली दाटि थोरी ॥ १०९ ॥
महा वैभवाची कथा राघवाची । जुनी सौख्यदाती च ब्रह्मादिकांची ॥
पुढें राम ऊपासकें रामदासें । पुरी वर्णिली रम्य नाना विलासें ॥ ११० ॥

---

## बारावा प्रसंग प्रारंभ.

पुढें चालिली ते असंभाव्य सेना । रजें मातलें व्योम पूढें दिसेना ॥
कितीएक ते भार सन्मूख आले । समर्थास तीहीं नमस्कार केले ॥ १ ॥
दळें राहिलीं दूरि वेष्टीत पाळा । कपीचक्र येकीकडे चंड मेळा ॥
तया मध्यभागीं ऋषी बंधु माता । महा वीर ते मुख्य चत्वारि कांता ॥ २ ॥
उभा राहिला राम तो राजभारें । गृहें निर्मिलीं अंबेरांचीं अपारें ॥

---

२२. अंबरांचीं गृहें=तंबू.

सभामंडपीं धर्मशाळा विशाळा । गृहें रम्य अंतर्गृहें[२३] चित्रशाळा ॥ ३ ॥
बहूसाल दिव्यांबरें थोरथोरें । सुचित्रें विचित्रें अमोल्यें अपारें ॥
कितीएक त्या लाविल्या स्तंभवोळी । प्रभा रत्नमंडीत तेजें झळाळी ॥ ४ ॥
बहू रत्नमाळा बहू मुक्तमाळा । बहू लागले घोंस नक्षत्रमाळा ॥
कितीएक जाळीवरी अंतराळीं । कितीएक मुक्तें निराळीं निराळीं ॥ ५ ॥
सुढाळा किळा[२४] मंडपीं ढाळ देती । विशाळा स्थळामाजि त्या दिव्य ज्योती ॥
सुवर्णासनें दिव्य नाना परीचीं । कितीएक सिंहासनें कुसरीचीं[२५] ॥ ६ ॥
बहू ते फुलारे बहूतां परीचे । वरी घोस हेलावती माणकांचे ॥
निळे पाच गोमेद इत्यादिकांचे । बहू रंग नाना परी कांचनाचे ॥ ७ ॥
नभामाजि त्या दिव्य नक्षत्रमाळा । तयाचे परी शोभती मुक्तमाळा ॥
विराजे तया मंडपा मध्यभागीं । ऋषी राम माता सखे बंधुवर्गी ॥ ८ ॥
असंभाव्य ते संपदा वैभवाची । मुखें सर्व बोलावया शक्ति कैंची ॥
वरी पाहतां उंच आकाशपंथें । असंभाव्य तें भव्य लावण्य तेथें ॥ ९ ॥
समूदाय तो बैसला स्वस्थ जाला । वधूमेळ अंतर्गृहामाजि गेला ॥
ऋषी राम माता सखे बंधुवर्गी । स्नेहे उत्तरें बोलिजे ते प्रसंगीं ॥ १० ॥
कितीएक तो काळ गेला वियोगें । असंभाव्य ते सौख्य संयोगयोगें ॥
सरेना मुखें बोलतां मोह माया । निवाली मुखें पाहतां सर्व काया ॥ ११ ॥
कपीनाथ[२६] बीभीषणाला भुपाळें । रहाया गृहें दीधलीं तीं विशाळें ॥
तयांमाजि ते सर्व ही स्वस्थ जाले । समर्थें बहू सोहळे दाखवीले ॥ १२ ॥
पुढें मंगलस्नान तेणें चि काळें । बहूसाल[h] ते चालिले एक वेळे ॥
कितीएक ते हाटकाचे[२७] तटाकीं । जळें ठेविलीं सेवकें ग्रामलोकीं ॥ १३ ॥
असंभाव्य ती सिद्ध केलीं फुलेलें । बहूतां परीचीं सुगंधेल तेलें ॥
किती चौकिया चौक गंगाळ पात्रें । विशाळें पवित्रें सुचित्रें विचित्रें ॥ १४ ॥
सुगंधें रसें चोखण्या कालवील्या । यथासांग सामग्रिया सिद्ध केल्या ॥
बहू आर्त पोटीं उभा भर्त बंधू । करी प्रार्थना राम कारूण्यसिंधू ॥ १५ ॥
प्रभू बोलता जाहला शीघ्र काळें । किजे मंगळस्नान या लोकपाळें ॥
अयोध्यापुरीमाजि त्या सर्व लोकां । विरें सर्व संकेत केला अनेकां ॥ १६ ॥
समस्तांसि तात्काळ अभ्यंग जालें । महा लोक ते सर्व सूखें निवाले ॥
कितीएक सामग्रिया सिद्ध केल्या । कपीनाथ बीभीषणा पाठवील्या ॥ १७ ॥
पुन्हा राम बोले वरिष्ठां वरिष्ठां । किजे मंगळस्नान हो सर्व श्रेष्ठा ॥

---

२३. अंतर्गृहें=जनानखाने. २४. किळा=चुका, खिळे. २५. कुसरीचीं=करामतीचीं.
२६. कपीनाथ=सुग्रीव. h बहूसाल–बहूदास २७. हाटक=सोनें.

पुढें जननी लागीं देवाधिदेवें । म्हणे मंगळस्नान तुम्हीं करावें ॥ १८ ॥
समस्तीं यथासांग अभ्यंग केलें । पुन्हा देव तो भ्रातयालागीं बोले ॥
सखे बोलती स्वामि देवाधिदेवा । तुम्हीं सांग अभ्यंग आधीं करावा ॥ १९ ॥
बहूतां परी प्रार्थिलें बांधवासी । कितीएक ते सिद्ध जाले विलासी ॥
उभी मंडळी कूशळां [२८]नापितांची । तिहीं मांडिली सांग सेवा प्रभूची ॥ २० ॥
स[२९]मश्रू क्रमें जाहली त्या प्रसंगीं । नखें काढिलीं नीळरंगी तरंगी ॥
जटाजूट ते मोकळे केश केले । [३०]स्नेहे घालितां दिव्य चक्षू निवाले ॥ २१ ॥
पुढें [३१]दर्पणीं पाहिलें रूप रामें । प्रसंगीं तये कोटि कंपर्द[३२]धामें ॥
कळा बाणली भव्य लावण्य गात्रीं । असंभाव्य सौंदर्य राजीव नेत्रीं ॥ २२ ॥
जळें पादप्रक्षालना सिद्ध जालीं । पदीं लागतां स्वर्गगंगा निवाली ॥
पदांगुष्ठ भागीरथी ओघ आला । जनें मज्जनें लोक निर्दोष केला ॥ २३ ॥
पुढें तीर्थ वंदूनि बंधूजनानें । निवाले पवित्रोदकें तीर्थपानें ॥
बहू लाविलें लोचना आवडीनें । मनीं मानिलें सौख्य या बांधवानें ॥ २४ ॥
बहूसाल आयुष्य हो कल्पकोडी । घडावी सदां सर्वदां भक्तिजोडी ॥
सुगंधें फुलेलें चबाबीत माथां । महा मस्तकीं मर्दिती लोकनाथा ॥ २५ ॥
बहू मर्दना सांग नाना परीची । लिळे काढिली ते मळी निर्मळाची ॥
जळें निर्मळें घालिती उष्ण धारा । मुखें बोलती तोय आणीक सारा ॥ २६ ॥
शिरीं घालिती तोय नेटें घळाळां । नद्या वाहती उष्ण वोघें खळाळां ॥
सुगंधें चि दोहीं तिरीं पंक जाला । असंभाव्य तो भृंग तेथें मिळाला ॥ २७ ॥
यथासांग अभ्यंग केलें भुपाळें । पुढें रम्य दिव्यांबरें शीघ्र काळें ॥
महा तेज पुंजाळ तें लागवेगीं । विरें वल्कलें त्यागिलीं ते प्रसंगीं ॥ २८ ॥
प्रसंगीं तये रत्नमंडीत मानें । पुढें पादुका ठेविल्या बांधवानें ॥
वसिष्ठासि रामें नमस्कार केला । महा वीर तो बैसला स्वस्थ जाला ॥ २९ ॥
बहू कस्तुरी केशरें ते चि काळीं । ऋषी राम वीलेपवी गंध भाळीं ॥
बहू भूषणें रत्नमंडीत रामें । अमूल्यें सुखें घेतलीं पूर्णकामें ॥ ३० ॥
उटी घेतली घातल्या पुष्पमाळा । बहूतां परीच्या बहू रत्नमाळा ॥
महा मस्तकीं हेम मुगूट साजे । असंभाव्य तो तेज-कल्लोळ माजे ॥ ३१ ॥
वरी कीरटी कुंडलें वैजयंती । अलंकार नाना परी ढाळ देती ॥
चिरें सुंदरें घातला भव्य धौंटा । कटीं किंकिणी नागरा क्षुद्र घंटा ॥ ३२ ॥

२८. नापित=न्हावी. २९. समश्रु=स्मश्रु=हजामत. ३०. स्नेह=तेल. ३१. दर्पण=आरसा. ३२. कंदर्पधाम=मदनतेज. * वीतभर रुंद व पांच हात लांब असा जाळ्यासारखा वस्त्राचा पट्टा. हा कमरपट्ट्यासारखा हनवटीखालून कान झाकत अशा रीतीनें पागोट्यावर बांधितात.

वरी कंकणें मुद्रिका चापपाणी । ब्रिदें घातलीं अंदु[33] वांकी झणाणी ॥
महीमंडळीं सर्व ही एक जालें । रघुनायका भव्य लावण्य आलें ॥ ३३ ॥
पहातां नसे तूळणा ही तुळाया । विराज बहू भूषणें दिव्य काया ॥
ऋषीराज बंधू सखे आणि माता । सुखें पाहती राम हा सौख्यदाता ॥ ३४ ॥
प्रितीनें मुखें बोलता राम जाला । म्हणे स्नान कीजे तया बांधवाला ॥
स्नेहे उत्तरें बोलतां शीघ्र तैसें । किजे मंगळस्नान नाना विलासें ॥ ३५ ॥
जटाजूट ते मोकळे सर्व केले । मळें त्यागिले भव्य सुस्नात जाले ॥
सुगंधें उटी घेतली पुष्पमाळा । अलंकार दिव्यांबरें रत्नमाळा ॥ ३६ ॥
प्रसंगें समस्तांसि अभ्यंग जालें । सभोंते सखे आप्त सर्वे मिळाले ॥
अळंकार दिव्यांबरें दिव्य माता । सुखें राघवा पाहती त्या समस्ता ॥ ३७ ॥
फळें खाद्य नैवेद्य नाना परीचे । फळाहार ते आणिले कूसरीचे ॥
बहूतां परीचे बहू उंच मेवे[34] । म्हणे राम सर्वांस ते पाठवावे ॥ ३८ ॥
समस्तांसि ऊदंड ते पाठवीले । फळें सेवितां लोक संतुष्ट जाले ॥
स्वइच्छा स्वयें सेविलें अल्प कांहीं । जनीं सेवितां तूळणा त्यांसि नाहीं ॥ ३९ ॥
जळें निर्मळें आच्मनें शुद्ध केलीं । समस्तांसि पानें बहू पाठवीलीं ॥
विडे घेतले सर्व ही स्वस्थ जाले । असंभाव्य ते पाक ही सिद्ध जाले ॥ ४० ॥
पुढें मंडळी सेवकांची मिळाली । विशाळें स्थळें सर्व ही सिद्ध केलीं ॥
बहू चित्रशाळा बहू होमशाळा । सडे शिंपिले घातल्या रंगमाळा ॥ ४१ ॥
बहू रत्नमंडीत मोठीं अचाटें । दुकांठीं बहू मांडिलीं दिव्य ताटें ॥
कितीएक तीं बत्तिसां वाटियांचीं । कितीएक विस्तीर्ण नाना परींचीं ॥ ४२ ॥
असंभाव्य तीं रम्य चित्रें विचित्रें । बहूतां परींचीं बहू तोयपात्रें ॥
बहू आसनें दिव्य नाना परीचीं । असंभाव्य तीं घातलीं कूसरीचीं ॥ ४३ ॥
बहूवर्ण दिव्यांबरें पट्टकूळें । बहूरंग नाना परींचीं दुकूळें[35] ॥
असंभाव्य तीं सोंवळीं सिद्ध केलीं । कितीएक दिव्यांबरें आणवीलीं ॥ ४४ ॥
पुढें भोजना सर्व ही सिद्ध जाले । कितीएक ते लक्षकोटी मिळाले ॥
मिळाली ऋषीमंडळी ब्राह्मणांची । बहू भव्य मार्तंड जैसे विरंची ॥ ४५ ॥
वयें धाकुटे थोर कोटयानुकोटी । स्थळें रुंधिलीं जाहली थोर दाटी ॥
बहूसाल संतोषले थोर तोषें । असंभाव्य ते गर्जती नामघोषें ॥ ४६ ॥
बहूसाल गंधाक्षता पुष्पमाळा । बरीं धोत्रपात्रें दिल्या रत्नमाळा ॥
चिरें सुंदरें रम्य यज्ञोपवीतें । धनें चंदनें दीधलीं ब्राह्मणांतें ॥ ४७ ॥

---

३३. अंदु=तोडे. ३४. मेवे=फळफळावळ. ३५. दुकुलें=वस्त्रें.

पुढें वाढिते जाहले शीघ्र काळीं । बहू दाटल्या त्या असंभाव्य वोळी ॥
महा मंडपीं बैसला रामराजा । ऋषी मुख्य बंधू सखे आप्त वोजा ॥ ४८ ॥
पुढें रत्न झाऱ्या बहू साल चंबू । सुवासी तयांमाजि संपूर्ण अंबू[३६] ॥
स्थळें सर्व ही सिद्ध पूर्वींच केलीं । असंभाव्य अन्नें बहू आणवीलीं ॥ ४९ ॥
कपीनाथ सुग्रीव बीभीषणाला । बहू धाडिलीं दिव्य अन्नें तयांला ॥
रसें पूर्ण त्या कावडी लक्ष कोटी । पथामाजि नेतां असंभाव्य दाटी ॥ ५० ॥
पुढें वाढिते जाहले पात्रधारी । असंभाव्य ते चालिले एकहारी ॥
रुची रायतीं लोणचीं रम्य वोळी । बहू स्वाद शाखावळी शीघ्र काळीं ॥ ५१ ॥
बहू वाढिला ओदनू[३७] तो सुवासें । वरान्नें[३८] क्षिरी शर्करा पंच भक्षें ॥
कितीएक आणीक नानापरीचीं । बहू वाढिलीं भिन्नभिन्नां रुचींचीं ॥ ५२ ॥
सुगंधें तुपें वाढिती ते खळाळां । पयें घालिती थोर नेटें घळाळां ॥
पुढें दिव्य नाना रसें पूर्ण पात्रें । सभा शोभली भव्य राजीवनेत्रें ॥ ५३ ॥
बहूसाल संतोष नाना सुवासें । ऋषी मंडळी गर्जती नामघोषें ॥
पुढें सर्व ओगारिती[३९] सावकाशें । सुखें जेविती सर्व नाना विलासें ॥ ५४ ॥
गिरीसारिखा ओदनू शुभ्र वर्णें । बहू भक्षिलीं भक्ष संपूर्ण पूर्णें ॥
कथा मागुती सांगती एकमेकां । असंभाव्य ते तृप्ति जाली अनेकां ॥ ५५ ॥
कढी वर्पिती आवडीनें फरारां । ऋषी जेविती ढेंकरीती डरारां ॥
पुरे हो पुरे अन्न ऊदंड झालें । बहू भोजनें कंठमर्याद आलें ॥ ५६ ॥
पुढें शीघ्र दध्योदनें[४०] लागवेगीं । पुन्हा वाढिते जाहले ते प्रसंगीं ॥
ऋषी राम बंधू सखे सर्व माता । मुखें बोलती सर्व ही तृप्ति आतां ॥ ५७ ॥
सुवासें रुचीचीं असंभाव्य तर्कें । कदां ही कधीं नेणिजे स्वाद शर्कें ॥
सुखें सेविती जेविती लोक इच्छा । यथासांग संपूर्ण जालें स्वइच्छा ॥ ५८ ॥
यथासांग तीं भोजनें सर्व जालीं । खळाळें बरीं आच्मनें शुद्ध केलीं ॥
सुपारी विडे दीधले कर्पुराचे । बहू चूर्ण[४१] ते शुद्ध मुक्ताफळाचे ॥ ५९ ॥
सुवासी चतुर्भाग[४२] मागून घेती । सुखी जाहल्या सर्व ही वेदमूर्ती ॥
बहूसाल मंत्राक्षता मंत्रघोषें । मुखें बोलती सर्व ही विप्र तोषें ॥ ६० ॥
कपी रीस ते सर्वही तृप्त जाले । बहू भक्षिलें अन्न सूखें निवाले ॥
गिरीसारिखीं राहिलीं सर्व अन्नें । विडे ध्यावया धाडिलीं त्यांसि पानें ॥ ६१ ॥
यथासांग सर्वस्व संतृप्ति जाली । सभामंडपीं मंडळी ते मिळाली ॥

---

३६. अंबू=पाणी. ३७. ओदन=भात. ३८. वरान्न=वरण. ३९ ओगारिती=वाढिती. ४०. दध्योदन=दहींभात. ४१. मुक्ताफळाचें चूर्ण=मोत्यांचा चुना. ४२. सुवासी चतुर्भाग=सुवासीक कात ( गोळया ).

पुढें ब्राह्मणीं मांडिली धर्मचर्चा । मुखें बोलती धन्य दीनू सुवाचा ॥ ६२ ॥
पुढें दीन तो चालिला अस्तमाना । नमायासि आली असंभाव्य सेना ॥
कितीएक तीं दीवट्यांचीं अचाटें । सभामंडपीं चाललीं दाट थाटें ॥ ६३ ॥
प्रसंगीं तये वाद्यकल्लोळ जाला । दुरस्ता बहू लोक सूखें मिळाला ॥
विराजे सभेमाजि तो रामराजा । पुढें चालिल्या त्या कैळावंत-फौजा ॥ ६४ ॥
झणाणीत वीणे मनोरम्य नादें । दणाणीत मुंदग गंभीर शब्दें ॥
अलापें कळा दाविती रागमाळा । सुरें सुस्वरें माजली रंगवेळा ॥ ६५ ॥
बहू ताळ कल्लोळ वाजे खणाणां । विणे वाजती तंतुनादें झणाणा ॥
बहू गीत संगीत तें कूसरीची । भले जाणती ते घडी अमृताची ॥ ६६ ॥
असंभाव्य तो नृत्यकल्लोळ जाला । सुखें पाहतां शुद्धि नाहीं जनांला ॥
गुणी रातले मातले गायनानें । तदाकार ते वस्ति केली मनानें ॥ ६७ ॥
अळंकार चीरें पुढें ढीग केले । कळावंत ते सर्व संतुष्ट जाले ॥
विसर्जी सभा तो पुढें रामराजा । निरोपें चि गेल्या बहू लोकफौजा ॥ ६८ ॥
समस्तीं घडी एक विश्रांति केली । अकस्मात प्राभात ते प्राप्त जाली ॥
पुढें सारिते जाहले नित्य नेमें । महा वीर ते आपुलाल्या स्वधर्में ॥६९ ॥
सभे बैसिजे स्वामि देवाधिदेवें । म्हणे आजि वेगीं अयोध्येसि जावें ॥
पुरी सर्व शृंगारमंडीत केली । असंभाव्य ते सर्व सेना निघाली ॥ ७० ॥
महीमंडळीं मुख्य आधी पुराणीं । मुखें बोलिजे ते रवीवंशखाणी ॥
अयोध्यापुरी धन्य हा पुण्यराशी । किती राहिले तापसी तीर्थवासी ॥ ७१ ॥
मुनी संत योगी सदा वीतरागी । उदासीन साधू पराचे विभागीं ॥
ऋषीमंडळी सात्विकां सज्जनांची । महा योगि व्युत्पन्न विद्वज्जनांची ॥ ७२ ॥
कितीएक ते मंडळी प्रेमळांची । कितीएक ते ब्राह्मणां सूशिळांची ॥
मनस्वी किती ते यती ब्रह्मचारी । बहूतां परीचे बहू वेषधारी ॥ ७३ ॥
सदां सर्वदां योग ध्यानस्थ जाले । कितीएक ते काळ घेऊनि गेले ॥
भुयारें मठ्या त्या बहूतां परीच्या । नदीचे तिरीं पर्णशाला मठाच्या ॥ ७४ ॥
प्रभू देव हा सर्व ब्रह्मादिकांचा । जया वर्णितां शीणल्या वेदवाचा ॥
स्वयें वास जेथें जगन्नायकाचा । महीमा वदे कोण त्या हो स्थळाचा ॥ ७५ ॥
कितीएक ते राहिले भक्त ज्ञानी । कृपाळू बहू मुख्य नामाभिधानी ॥
बहू सूकृती सूर्य जैसे तपाचे । सदा धर्मचर्चा अखंडीत वाचे ॥ ७६ ॥
नदी चालिली भव्य ते पूर्णतोया । जनालागिं आधार आली उपाया ॥
शिवाल्यें बहू बांधिलीं थोरथोरें । ध्वजा देउळें शीखरें तीं अपारें ॥ ७७ ॥

---

४३. कळावंत फौजा=कळवांतणींचे ताफे.

तडागें जळें निर्मळें कूप बावी । सदां सर्वदां राहिजे मानुभावीं* ॥
स्थळें निर्मळें निर्मिलीं पावनानें । कितीएक कल्पतरूंचीं उद्यानें ॥ ७८ ॥
कितीएक त्या लागल्या वृक्षजाती । वनें वाटिका जीवनें पुष्पजाती ॥
अयोध्यापुरी रम्य लावण्य नांवें । महा रम्य विस्तीर्ण ते वीस गांवें[४४] ॥ ७९ ॥
गृहें बांधिलीं तीं असंभाव्य उंचीं । कितीएक तीं पंच सप्ता खणांचीं[४५] ॥
सजे चौक दामोदरें थोरथोरें । विशाळें विचित्रें गवाक्षें अपारें ॥ ८० ॥
बिदी हाट बाजार चौवार कुंचे । असंभाव्य ते भव्य नाना परीचे ॥
कितीएक तीं सारखीं दीसताती । महा धूर्त ते ही बळें भ्रांत होती ॥ ८१ ॥
गृहें गोपुरांचा बहू दाट खेटा । हुडे माडिया ऊपरा त्या अचाटा ॥
महद्भाग्य श्रीमंत ते लोक तेथें । सदा सर्वदा दाटणी थोर पंथें ॥ ८२ ॥
पुरीमाजिचे लोक आरोग्य भारी । मुलें लेंकरें थोरले आणि नारी ॥
करंटे तयांमाजि कोणीच नाहीं । नसे द्वेष ना मत्सरू सर्व कांहीं ॥ ८३ ॥
सदानंद उद्वेग नाहीं जनाला । नव्हे वृद्ध ना मृत्यु नाहीं तयांला ॥
कुरूपी महामूर्ख तेथें असेना । सुखाचें जिणें दैन्यवाणें दिसेना ॥ ८४ ॥
पुरीमाजि ते सर्व ही लोक कैसे । सुवर्णाचळीं नांदती देव जैसे ॥
प्रतापी बळाचे सदां सत्य वाचे । पुरीमाजि लावण्य देहें जनांचे ॥ ८५ ॥
बहू नीतिन्यायें विवेकें उपायें । कदा ही तया बाधिजे ना अपायें ॥
बहूतां धनांचे उदारा मनांचे । विशेषा गुणांचे गुणी सज्जनांचे ॥ ८६ ॥
पुरीमाजि त्या सर्व चातुर्य मोठें । कदां ही मनीं नावडे त्यासि खोटें ॥
विलासें वसे राम आणीक विद्या । कळा सर्व साधारणा सर्व साध्या ॥ ८७ ॥
अळंकार दिव्यांबरें सर्व लोकां । सदां प्रीतिनें बोलती एकमेकां ॥
महा वैभवाचे बहू सूकृताचे । पुरीमाजि ते लोक नानागुणांचे ॥ ८८ ॥
पुरीमाजि ते दाटणी मंदिरांची । रिकामी भुमी ते रहायासि कैंची ॥
तया मध्यभागीं असंभाव्य तेथें । महा भूवनें उंच आकाश पंथें ॥ ८९ ॥
गृहें गोपुरें निर्मिलीं कांचनाचीं । बहूसाल विश्रांतिदातीं मनाचीं ॥
महारत्नमंडीत तीं थोरथोरें । किती धाकटीं भव्य मोठीं अपारें ॥ ९० ॥
भुमी बांधल्या पांच बंदी विशाळा । मनोरम्य त्या रेखिल्या चित्रशाळा ॥
कितीएक दारें लघू थोरथोरें । स्थळें दिव्य तीं पाहतां सौख्यकारें ॥ ९१ ॥
किती अन्न शाळा किती वस्त्रशाळा । कितीएक विस्तीर्ण त्या होमशाळा ॥
किती नाट्यशाळा बहू रत्नशाळा । कितीएक त्या धर्मशाळा विशाळा ॥ ९२ ॥

---

* मानुभावीं=महानुभावीं=थोर मनाच्या पुरुषांनीं. ४४. वीस गांवें=वीस योजनें. ४५. सप्तां खणांची=सात मजली.

गृहें रम्य अंतर्गृहें हाटकाचीं । बहू हांसऱ्या पूतळ्या नाटकांची ॥
भुयारें घरें वीवरें गुप्त द्वारें । स्थळें भव्य बैसावया थोरथोरें ॥ ९३ ॥
सभामंडपीं ते असंभाव्य शोभा । बहू शोभतो हेमकल्लोळ गाभा ॥
फुलारे बहू लाविले माणिकांचे । कितीएक ते घोंस मुक्ताफळांचे ॥ ९४ ॥
मही-मंडळीं तेज पुंजाळ जालें । असंभाव्य तें सर्व लावण्य आलें ॥
विशाळा स्थळां निर्मिल्या भव्य भिंती । निळे पाच गोमेद ते ढाळ देती ॥ ९५ ॥
बहू रत्न पुंजाळले ज्वाळ जैसे । असंभाव्य हारी उभे स्तंभ जैसे ॥
विशाळें स्थळें निर्मिलीं जाड कैशीं । सुवर्णाचळामाजि विस्तीर्ण जैशीं ॥ ९६ ॥
विचित्रा कळा कूसरी लेखनाच्या । बहू रत्नमंडीत त्या कांचनाच्या ॥
सभामंडपीं फांकल्या रत्नकीळा । दिसे रंग तेथें निराळा निराळा ॥ ९७ ॥
कितीएक तीं फांकलीं दिव्य किर्णे । बहूतां परींचीं बहू रंग वर्णे ॥
कितीएक हेलावती हेमपर्णे । कितीएक घंटावळी त्या सुवर्णे ॥ ९८ ॥
स्थळें शोभती रम्य बैसावयाचीं । बहूसाल तीं भिन्नभिन्नां परींचीं ॥
कितीएक तीं रत्नमंडीत यानें । कितीएक सिंहासनें तीं विमानें ॥ ९९ ॥
बहू बैसका दिव्य रम्यांबरांच्या । विचित्रा बहूरंग नाना परींच्या ॥
वरी लोंबती घोंस मुक्ताफळांचे । कितीएक मुक्तावळी जाळियांचे ॥ १०० ॥
कितीएक रत्नावळी रम्य कैशा । कितीएक मुक्तावळी शुक्र जैशा ॥
प्रभेचे बहू घोंस हेलावताती । बहूतां परींच्या बहू रत्नजाती ॥ १०१ ॥
स्थळें निर्मिलीं रम्य विस्तीर्ण नाना । कितीएक बैसावया सर्व सेना ॥
कितीएक विस्तीर्ण [४६]राजांगणें तें । भुमी पाचबंदी महा रम्य तेथें ॥ १०२ ॥
हुडे कोठ माड्या सजे मोठमोठे । उभे राहिले भव्य ब्रह्मांड वाटे ॥
असंभाव्य चर्या लघु पंथ हारी । नभा भासवी रूप नाना विकारी ॥ १०३ ॥
[४७]झरोके कितीयेक त्या गुप्त वाटा । किती [४८]ऊपऱ्या अंतराळीं अचाटा ॥
कितीएक त्या भक्ति संख्यारसाच्या । कितीएक त्या उंच तेरा खणांच्या ॥ १०४ ॥
वरी रत्नकळ्साचिया रम्य वोळी । रवीकीर्ण तैशा कळा अंतराळीं ॥
वरी लागल्या सर्व नक्षत्रमाळा । मनीं भासती फांकती दिव्य कीळा ॥ १०५ ॥
रवीवंशिचे स्वर्ग विख्यात राजे । तयांच्या प्रतापें विधीगोळ गाजे ॥
करी कोण संख्या तया वैभवाची । उणी वर्णितां बुद्धि ब्रह्मादिकांची ॥ १०६ ॥
किती कोण लेखा मला मानवाला । मतीमंद मी काय वर्णूं तयाला ॥
म्हणे दास त्या अल्पशा भक्तिभावें । प्रभू बोबड्या उत्तरीं तोषवावें ॥ १०७ ॥

---

४६. राजांगणा=मुख्य अंगण; दुसरीं उदाहरणें, राजविद्या, राजगुह्य, रायआंवळी. ४७. झरोके=खिडक्या. ४८. उपऱ्या=माड्या.

## तेरावा प्रसंग प्रारंभ.

पुरी वर्णिली हो यथासांग येथें । परी पाहतां दीसतें अल्प तेथें ॥
मनीं संशयो श्रोतयां प्राप्त जाला । प्रतीउत्तरें काय दिल्हीं तयांला ॥ १ ॥
अयोध्यापुरी स्वर्गलोकासि गेली । पुढें वोस होतां चि ते भग्न जाली ॥
असेना जना राहणें वस्ति जेथें । खडे माणिकें कोण ठेवील तेथें ॥ २ ॥
पुरें पट्टणें वोस होतीं कितेकें । पुढें पाहतां दीसती सर्व टेकें ॥
युगें लोटतां ही वसे अल्प कांहीं । असंभाव्य हें तूं विचारूनि पाहीं ॥ ३ ॥
असो तूटला संशयो श्रोतयांचा । पुढें राहिला बोध जातां कथेचा ॥
अयोध्यापुरा चालिले वीर जेठी । निघाले स्वयें भार कोट्यानुकोटी ॥ ४ ॥
ऋषी राम ते चालिले नीज भारें । दळें चालिलीं पृष्टभागीं अपारें ॥
शिबीका पुढें चालती दिव्य हारी । सखे लोक बंधू मधें रावणारी[४९] ॥ ५ ॥
पुढें दाटले भार महारथांचे । दळीं घोष जाले गजां घोडियांचे ॥
गिरीतुल्य सेना रिसांवानरांची । बहू दाटि राक्षेस लंकापतीची ॥ ६ ॥
पुरी पावतां रुंधल्या सर्व वाटा । असंभाव्य तो जाहला दाट खेटा ॥
शतांचीं शतें धांवती वेत्रधारी[५०] । दळें माजलीं कोण कोणास वारी ॥ ७ ॥
कितीएक ग्रामस्थ मध्यें चि गेले । कितीएक ते चूकले भ्रांत जाले ॥
अयोध्यापुरीमाजि ऊभीं अचाटें । गृहें गोपुरें पाहती दाट थाटें ॥ ८ ॥
करीं रत्नताटें कितीएक हारी । असंभाव्य त्या चालिल्या दिव्य नारी ॥
बहूसाल नीराजनें लक्ष कोटी । पुरींतूनि येतां पुढें थोर दाटी ॥ ९ ॥
रूपें राजसा सुंदरा त्या प्रितीनें । रघूनाथ ओंवाळिती आवडीनें ॥
मनामाजि ते लागलीसे अवस्था । सुखें पाहती येकपत्नीव्रतस्था ॥ १० ॥
करीती बहू सुंदरा अक्षवाणे । कितीएक ओंवाळिती निंबलोणें ॥
असंभाव्य थोवे[५१] तया नायकांचे । मुखें गर्जती भाट वेतोळ[५२] वाचे ॥ ११ ॥
पताका निशाणें बहूरंग वर्णें । महातेजपुंजाळ मार्तंडपर्णें[५३] ॥
वरी दाटलीं तीं असंभाव्य छत्रें । भ्रमों लागलीं दिव्य छत्रें विचित्रें ॥ १२ ॥
पहा हो पहा पैल तो राम आला । असंभाव्य हा वीर मेळा मिळाला ॥
दिसेना पुढें पाहतां गर्द जाला । समस्तीं करें ताळिकाघोष केला ॥ १३ ॥
पुढें सर्व ही भूवनामाजि गेले । महावीर ते बैसले स्वस्थ जाले ॥
पुरीमाजि आनंद सर्वांस जाला । उभे राहिले भाग्य हें राम आला ॥ १४ ॥

---

४९. रावणारी=राम. ५०. वेत्रधारी=छडीदार, चोपदार. ५१. थोवे=थवे. ५२. वेताळ=स्तुतिपाठक ( सं. वैतालिक ). ५३. मार्तंड पर्णें=छत्रया.

ऋषी सांगती हे बरी शुद्ध वेळा । त्वरें बैस भद्रासनीं तूं नृपाळा ॥
समस्तांसि आनंद राज्याभिषेकें । ऋषी अक्षता टाकिती मंत्रघोषें ॥ १५ ॥
विधीयुक्त भद्रासनीं रामराजा । यथायोग्य संपादिली सांग पूजा ॥
कितीएक पुष्पांजळी वाहताती । सानंद आनंद सूखें पहाती ॥ १६ ॥
असंभाव्य नाना परी दान केलें । बहूतां परी याचकां तोषवीलें ॥
गिरीचे परी शर्करा ढीग-केले । कितेकीं समस्तांसि ते पाठवीले ॥ १७ ॥
नभीं दाटलीं मेघडंब्रे अपारें । कितीएक तीं चामरें थोरयोरें ॥
असंभाव्य हेलावती jरत्नपुच्छें । बहू डोलती उन्मतें शक्र[k] तुच्छें ॥ १८ ॥
सुचित्रें विचित्रें रवीतेजपत्रें । असंभाव्य तीं दाटलीं भव्य छत्रें ॥
विशाळा पताका सतेजें निशाणें । वरी सर्व आच्छादिलें व्योम तेणें ॥ १९ ॥
असंभाव्य ते दाटली भीमसेना । प्रसंगें विरीं घाव केला निशाणा ॥
महादिव्य सिंहासनीं रामराजा । पहाया भ्रमों लागल्या वीर फौजा ॥ २० ॥
बरी रामराजें गुढी ऊभवीली । गजेबे* सुखें लोकमांदी मिळाली ॥
झडा घालिती राम पाहावयाला । समस्तां मनीं थोर आनंद जाला ॥ २१ ॥
पुरीमाजि तीं वैभवाचीं अचाटें । दुतौळीं तितौळीं उभीं लोक-थाटें ॥
खुणा दाविती सांगती येकमेकां । बहूवीध तो राम वेधी अनेकां ॥ २२ ॥
दमामे धमामे दडाडां धडाडां । बहू वाजती चंड भेरी भडाडां ॥
तुतारे नगारे बहू शंख शृंगें । किती चौघडे ढोल कर्णे बुरंगें ॥ २३ ॥
तुरें गंभिरें तीं बहू गर्जताती । कितीएक पांवे मुखीं घोष वाती ॥
नफेऱ्या बहू दुंदुभी घोष जाला । असंभाव्य तो वाद्यमेळा मिळाला ॥ २४ ॥
कितीएक ते चौघडे वाजताती । कितीएक ते बागडे नाचताती ॥
कितीएक ते मागुते मेळ आले । कितीएक ते वेषधारी मिळाले ॥ २५ ॥
कितीएक थोंबे कळावंत गाती । हरीदास ते कीर्तनीं गर्जताती ॥
कितेकी गुणी नौंचणी नृत्यरंगें । अलापें कळा रागरंगे तरंगें ॥ २६ ॥
कितीएक वाखाणिती भाट ब्रीदें । कितीयेक ते छंद नाना विनोदें ॥
दिंडीगान तें मांडिलें वासुदेवीं । बहू कीनऱ्या लाधले लोक जीवीं ॥ २७ ॥
कितीएक ते भैरवाचे मिळाले । कमाचे कितीयेक घेऊनि आले ॥
कितीएक ते नाचताती धबाबां । सुखें डोलती वाजवीती खबाबां ॥ २८ ॥
कितीएक ते गारुडी नाचताती । गळे फूगले घागऱ्या लोळ घेती ॥
कितीएक ते लोक नाना गुणांचे । ब्रिदें अंकुशें लाविले भार कुंचे ॥ २९ ॥

---

५४. भद्रासन=सिंहासन. j रत्नपुच्छें-मत्स्य पुच्छें k शक्र-शुक्र ५५. * गजेबे=गजबजे. दुताळी=दुमजल्यावर. ५६. तिताळी=तिमजल्यावर. ५७. नाचणी=नाचणाऱ्या स्त्रिया.

कितीएक ते भोंवती भेद नाना । भ्रमों लागले पाय भूमी स्थिरेना ॥
कितीएक ते टीपऱ्या खेळताती । मिळाले समेळे बहू वाजताती ॥ ३० ॥
घनें सुस्वरें नाद कल्होळ जाला । बहूतां परीचा बहू लोक आला ॥
महद्भूत ते मांजली रंग-वेळा । दणाणी मही नाद गेला भुगोळा ॥ ३१ ॥
निशी प्राप्त जाली असंभाव्य दाटी । बहू दीवट्या लक्ष कोट्यानुकोटी ॥
कितीएक ते उंच नेले उमाळे । नळे जाळितां घोष तैसे उफाळे ॥ ३२ ॥
सरारां फुलें धांवती अंतराळीं । कडाडीत घोषें निराळीं निराळीं ॥
भुरारां हवींया कितीएक वेळां । बळें पाहती उर्ध्व नक्षत्रमाळा ॥ ३३ ॥
बहू औषधें दिव्य नाना परीचीं । कितीएक तेजाळ तीं कूसरीचीं ॥
घडीनें घडी तेजपुंजाळ होती । उजेडें चि ते लोक लोकां पहाती ॥ ३४ ॥
पुढें ऊठिला राम तो ते प्रसंगीं । प्रभू चालिला भूवनामाजि वेगीं ॥
समस्तांसि आरोगणा सांग केली । विडे कर्पुरे घेतले तृप्ति जाली ॥ ३५ ॥
गृहें दीधलीं रम्य दिव्यांबरांचीं । दळें स्वस्थ जालीं रिसांवांनरांचीं ॥
कपी वीर राक्षेस सूखें निघाले । सुषुप्तीचियें भूवनामाजि गेले ॥ ३६ ॥
सुवर्णाचिया मंचकीं मृदु शय्या । वरी सूमनें सेज त्या देवराया ॥
सभामंडपीं ते निशी अर्ध गेली । प्रभूनें यथासांग विश्रांति केली ॥ ३७ ॥
निजेले ऋषी राव तो बंधु माता । यथायोग्य विश्रांति जाली समस्तां ॥
कितीएक त्या वीरफौजा समस्ती । असंभाव्य तो वाद्यकल्लोळ वस्ती ॥ ३८ ॥
प्रभातींचि ऊठोनियां नित्य नेमें । किजे स्नानसंध्यादिकें सांग कर्मे ॥
किती एक दानें कितीकां परींचीं । धनें कांचनें भव्य नाना परींचीं ॥ ३९ ॥
अळंकार मुक्ताफळें मुक्तमाळा । कितीएक दिव्यांबरें रत्नमाळा ॥
कितीएक धोत्रें कितीएक पात्रें । दिलीं ब्राह्मणा दान राजीवनेत्रें ॥ ४० ॥
कितीएक कोट्यावधी गोधनांचीं । कितीएक लक्षावधी कुंजरांचीं ॥
बळाचे बहू अश्व ते पारखीले । धनेशीं द्विजा ब्राह्मणां दान केले ॥ ४१ ॥
ऋषी बांधवीं सारिलीं स्नानदानें । यथायोग्य उंचासनें स्थान मानें ॥
सभेमाजि तो बैसला राम राजा । निघाल्या कपी रीस राक्षेस फौजा ॥ ४२ ॥
कपीनाथ तो अंगदु जांबुवंतू । कुमूदू गजू वीनतू वीर्यवंतू ॥
महावीर लंकापती मारुती तो । सुमूखू द्विवीदू कपी केसरी तो ॥ ४३ ॥
प्रमाथी गवायू निळू हेमकूटू । सुषेणू नळू मैंद मोठा अचाटू ॥
कपी क्रोधनू ऋषभू आणि शर्भू । गवाक्षू दधीमूख स्वेदू शराभू ॥ ४४ ॥
कपी रीस राक्षेस कोट्यानुकोटी । असंभाव्य ते चालिले रामभेटी ॥

५८. हवाया=चंद्रजोती. ५९. सुषुप्ति–झोंप.

समस्तीं प्रभूला नमस्कार केले । पुढें सर्व ही हात जोडूनि ठेले ॥ ४५ ॥
समस्तीं विरीं रामगुणागराला । बहू प्रार्थिलें त्या दयासागराला ॥
समस्तांसि देवें निरोपासि द्यावें । म्हणे राम तो शीघ्र जेऊनि जावें ॥ ४६ ॥
नमस्कार केले तया विश्ववंद्या । पुढें शीघ्र संपादिली स्नानसंध्या ॥
असंभाव्य तीं दिव्य अन्नें सुवासें । बहू पंगती घातल्या सावकाशें ॥ ४७ ॥
ऋषी राम ते सर्व ही बंधुवर्गीं । कितीयेक ते बैसले आप्तवर्गीं ॥
प्रभा फांकली दिव्य रत्नीं अनर्घीं । कपी रीस ते बैसले जेंवि स्वर्गीं ॥ ४८ ॥
हरी[60] ऋक्ष[61] राक्षस सर्व मिळाले । असंभाव्य ते भोजना लागिं आले ॥
बहू पाकनिष्पत्ति नानापरीची । पक्वान्नें रसाळें कळाकूसरीचीं ॥ ४९ ॥
जगज्जननी जानकी वाढिताहे । सुवासें महासौख्य तें होत आहे ॥
यथासांग संपूर्ण तें अन्न जालें । पुढें शीघ्र तें शर्करा आज्य आलें ॥ ५० ॥
पयादीक नाना रसें पूर्ण पात्रें । त्वरें घेतले ग्रास राजीवनेत्रें ॥
समस्तांसि आज्ञापिलें देवधीशें । कपी सर्व ही गर्जती नामघोषें ॥ ५१ ॥
तयां जेवितां जेवितां भक्ष्य जालें । पुन्हा मागुती खाद्य ऊदंड आलें ॥
घृतें वाढितां वाढितां वोघ गेले । असंभाव्य नाना परी तृप्त केले ॥ ५२ ॥
अपेक्षी तया मागती सर्व शाका । कितीएक ते आणवीती कथीकीं[62] ॥
क्षिरी लोणचीं रायतीं भात भक्षे । खुणा दाविती मागती एक लक्षें ॥ ५३ ॥
जळें शीतळें सर्व ही सेविताती । पुन्हा मागुते वीर ते जेविताती ॥
समस्तांसि तीं सांग संपूर्ण जालीं । पुढें शीघ्र दध्योदनें आणवीलीं ॥ ५४ ॥
बहू जेवितां जेवितां येक मध्यें । प्रतापें मुखें बोलती श्लोक गद्यें ॥
मनीं भासती अर्थ नाना परीचे । मुखें रामनामें महद् घोष वाचे ॥ ५५ ॥
समस्तांसि तें सर्व संपूर्ण जालें । महातृप्तिनें लोक सूखें निवाले ॥
बरी आचमनें शुद्ध केलीं खळाळां । कितीएक ते तोय घेती घळाळां ॥ ५६ ॥
सभामंडपीं सर्व ही स्वस्थ जाले । सुगंधी विडे शीघ्र ते आणवीले ॥
समस्तांसि संपूर्ण गंधें सुवासें । कपी पूजिले सर्व नाना विलासें ॥ ५७ ॥
समस्तीं विडे घेतले पीत पर्णें[63] । सुपारी बरी कर्पुरू मुक्तचूर्णें[64] ॥
बहू वेळ[65] लौंगा सुवासें खदीरें[66] । किती जाति[67] कंकोळ नाना प्रकारें ॥ ५८ ॥
अळंकार चीरें बहू सिद्ध केलीं । असंभाव्य दिव्यांबरें आणवीलीं ॥
बहू भूषणांचे बहू ढीग केले । जगज्जनकें ते कपी गौरवीले ॥ ५९ ॥

---

६०. हरी=वानर. ६१. ऋक्ष=आस्वल. ६२. कथिका=कढी. ६३. पीत पर्णें=पिकलेली विड्याची पानें. ६४. मुक्त चूर्ण=मोत्यांचा चुना. ६५. वेळ=वेलदोडे (सं०. एला०.). ६६. खदीर=कात. ६७. जाति=जायफळ.

तुरे लाविले घातल्या पुष्पमाळा । कितीएक त्या रत्नमाळा सुढाळा ॥
करीं कंकणें मुद्रिकीं लेववील्या । यथासांग सर्वांस संपूर्ण केल्या ॥ ६० ॥
सभामंडपीं फांकल्या रत्नकीळा । समस्तांसि ते जाहली सौख्यवेळा ॥
कितीयेक सांगीतल्या गुप्त गोष्टी । माहावीर आनंदले सर्व पोटीं ॥ ६१ ॥
स्तुतीउत्तरीं सर्व लावण्यखाणी । मुखें बोलिला राम कारुण्यवाणी ॥
तुम्हीं कष्ट केले जिवीं सर्व भावें । तुम्हांलागिं म्यां काय उत्तीर्ण व्हावें ॥ ६२ ॥
कपी सुग्रिवा अंगदा जांबुवंता । गजा मारुता आणि नैऋत्यनाथा ॥
समस्तांसि सन्मानिलें रामचंद्रें । सुधाउत्तरीं तोषवीलें नरेंद्रें ॥ ६३ ॥
मुखें बोलिजे वैद्यराजासि देवें । कपी तूज ऊचीत म्यां काय द्यावें ॥
वरू दीधला रामचंद्रें उचीती । तुझ्या दर्शनें लोक आरोग्य होती ॥ ६४ ॥
समस्तां कडे पाहिलें राघवानें । तयां सर्व रोमांच आले फुराणें ॥
नमस्कारिलें स्वामि देवाधिदेवा । ह्मणे राम तो लोभ आतां असावा ॥ ६५ ॥
असंभाव्य केली स्तुती राघवाची । वदों लागली मंडळी प्रेमळांची ॥
कपी बोलती सर्व कारुण्य वाचा । स्तुती ऐकतो राम सिंधू सुखाचा ॥ ६६ ॥
गिरी कंदरा माजि आह्मीं असावें । नरां देखतां वानरीं शीघ्र जावें ॥
समर्थें सवे लाविली मर्कटांला । महा सूकृतें पार नाहीं सुखाला ॥ ६७ ॥
प्रभू बोलणें चालणें काय जाणें । बरें वोखटें सर्व कांहींच नेणें ॥
बहूतां परी चालवीलें दयाळें । तुम्हां योग्य हें आमुचें तोंड काळें ॥ ६८ ॥
कृपाळूपणें राघवें थोर केलें । बरें वोखटें सर्व साहून नेलें ॥
बहू देखिलें सौख्य नाना परीचें । प्रभूच्या पदालागिं हें प्राप्त कैचें ॥ ६९ ॥
सभाग्याचिया संगतीनें असावें । बहूतां परीचें बहू सौख्य द्यावें ॥
तया सारिखें सर्व आम्हांसि जालें । महा वैभवें चित्त सूखें निवालें ॥ ७० ॥
नव्हे भेटि नाना परी योगयागें । नव्हे भेटि नाना परी भोग त्यागें ॥
नव्हे भेटि ब्रह्मादिकां शीघ्र काळें । त्रिकूटाचळीं दाखवीलें भुपाळें ॥ ७१ ॥
कपी रीस ते बोलती दैन्यवाणें । कृपासागरू जीविंचा भाव जाणें ॥
तयांच्या शिणें देव तो शीणताहे । बहूतां परी राम संबोखिताहे ॥ ७२ ॥
सवे लागली राघवाची सुटेना । प्रिती गुंतली तोडितां ही तुटेना ॥
बहू दीस गेले सुखाचेनि योगें । अकस्मात तें दुःख जालें वियोगें ॥ ७३ ॥
प्रभू संगतीची सवे दृढ केली । अकस्मात कां सर्व छेदूनि नेली ॥
तयां बोलता जाहला रावणारी । तुम्हां भेटि देईन कृष्णावतारीं ॥ ७४ ॥

---

६०. मुद्रिका=आंगठया. ६१. उत्तीर्ण=उतराई. ७०. वैद्यराज=सुषेण नामक वैद्य. ७१. सवे=संवय.

दयाळासि तींहीं नमस्कार केले । प्रभू सव्य घालूनि तैसे निघाले ॥
समस्तीं समस्तांसि वंदूनि वेगीं । पुढें नीघते जहाले ते प्रसंगीं ॥ ७५ ॥
मने वीकले भक्तपाळें भुपाळें । मनामाजि ते खंति केली दयाळें ॥
जनी सेवकांलागिं देखोनि ऊणें । बहू कष्ट घेऊनियां सौख्य देणें ॥ ७६ ॥
मनीं भावना भक्तलोकासि जैशी । तया सारिखी देवरायासि तैशी ॥
जनीं सेवकां कारणें जन्म घेणें । महद्भाग्य सांडोनिया नीच होणें ॥ ७७ ॥
पडे सांकडें सर्वदां सेवकांचें । दिनानाथ हें ब्रीद विख्यात साचें ॥
मनामाजि ते जैशिजैशी अपेक्षा । करीना कदा राम त्याची उपेक्षा ॥ ७८ ॥
असंभाव्य अन्याय तो आठवीना । बहू चूकतां देव कांहीं शिणेना ॥
तया मानसीं लागली प्रेम माया । करी सेवकांलागिं नाना उपाया ॥ ७९ ॥
सदा सर्वदा देव हा साभिमानी । कृपा भाकितां शीघ्र पावे निदानीं ॥
तया अंतरीं थोर लाहान नाहीं । परी पाविजे दृढ भावार्थ कांहीं ॥ ८० ॥
जया अंतरीं भाव होईल जैसा । तयालागिं तो देव पावेल तैसा ॥
यदर्थीं कदां संशयो ही असेना । अभावें तरी देव तो पालटेना ॥ ८१ ॥
किती एक अन्याय कोटचानुकोटी । भ्रमें होय नानापरी बुद्धि खोटी ॥
परी पहातां लोभ त्याचा सरेना । कृपासागरू तो कदां वोसरेना ॥ ८२ ॥
कृपाळूपणें देव राजादि राजें । शिरीं वाहिजे सर्व ही भक्तवोझें ॥
जनीं दास देखोनियां दैन्दवाणा । मनामाजि वोसावतो देवराणा ॥ ८३ ॥
बहूसाल हें बोलणें काय कीती । स्वयें जाणिजे ज्या असे स्वप्रचीती ॥
अयोध्यापुरीमाजि तो रामराजा । कृपाळू सुखे राहिला भक्तकाजा ॥ ८४ ॥
कपी रीस गेले स्थळें जेथजेथें । प्रिती मारुती राहिला राम तेथें ॥
रघूनाथ सीता तया बंधुवर्गीं । उभें राहिजे सेवकें पूर्वभागीं ॥ ८५ ॥
समस्तांसि पूजूनि नाना विलासें । नमस्कारिले सर्व दासानुदासें ॥
उदासीन श्रोतीं कदां ही न कीजे । बहू भेद भाषा क्षमा सर्व कीजे ॥ ८६ ॥
मनामाजि ऊपासना रामध्यानीं । जनीं दासतो नीववी ब्रह्मज्ञानी ॥
अखंडीत त्या राघवाच्या प्रतापें । विवेकें विचारें समाधान सोपें ॥ ८७ ॥
पदीं लागतां निर्गुणी भक्त जाले । बहू संगनीसंग होऊनि गेले ॥
विवेकें बरें पहातां ध्येय ध्याता । विचारें बरें शोधितां ज्ञेय ज्ञाता ॥ ८८ ॥
विवंचूनि तो साधकू साध्य जाला । असंभाव्य तो ब्रह्मबोधें बुडाला ॥
पुसावें कळेना तरी सज्जनाला । धरूनी त्यजावें विदेही पणाला ॥ ८९ ॥
असे हें जनीं प्राप्त तेणें धरावें । अनिर्वाच्य तें वाच्य कैसें वदावें ॥
सदां नित्य नीरूपणीं वीवरावें । नुरावें परी कीर्तिरूपें उरावें ॥ ९० ॥

असो जाणत्याला कळे सर्व कांहीं । जनीं नेणता त्यासि कांहींच नाहीं ॥
नसे ज्ञान त्या सर्व ही व्यर्थ गेलें । जळो पंच मौक्तीक हें काय जालें ॥ ९१ ॥
असो ही कथा बोलिली राघवाची । जनीं सर्वदा ऐकती धन्य त्यांची ॥
सुखें ऐकतां ते महा दोष जाती । दुखें नाशती लोक ते धन्य होती ॥ ९२ ॥
चरित्रें बरीं उत्तमें राघवाचीं । असंभाव्य विस्तारलीं पावनाचीं ॥
कितीएक ते पाहती कोटि होती । जनीं एक एकाक्षरें दोष जाती ॥ ९३ ॥
शतांचीं शतें पूर्ण आरंभ संधीं । कळाया कथा हेतु संकेत सिद्धि ॥
पुढें बोलिले ते बरें वीवरावें । बुजायास हें गद्य पोटीं धरावें ॥ ९४ ॥
मुळारंभ ते स्तूति नाना परीची । गिरी वर्णिला जाहली सागराची ॥
पहीले शतीं भेटि बीभीषणाची । पुढें शेवटीं शेज दर्भासनाची ॥ ९५ ॥
द्वितीयीं शतीं राम क्रोधासि आला । कथेलागिं तेथूनि आरंभ झाला ॥
बळें सिंधु पालाणिला शूक गेला । अपेक्षा मनीं शृंग पहावयाला ॥ ९६ ॥
तृतियीं शतीं शृंग पाहों निघाले । रिपूलागिं तो शिष्ट जावूनि बोले ।
बहू वीर राक्षेस युद्धीं निमाले । कपी सर्वही नागपाशीं निजेले ॥ ९७ ॥
रणें दाखवीलीं तये जानकीला । तये वीरशीं तो* प्रहस्तू निमाला ॥
प्रसंगें चि मंदोदरी नीति सांगे । निघाला दशग्रीव तो लागवेगें ॥ ९८॥
चतुर्थीं शतीं युद्ध त्या रावणानें । रघूनायकें सोडिला जीवदानें ॥
पुढें कुंभकर्णासि संहार केला । समूदाय तो कूमरांचा निमाला ॥ ९९ ॥
कितीएक ते वीर माहोदरेशीं । प्रतापें रणामाजि ते प्रेतराशी ॥
पुढें इंद्रजीतें कपी भग्न केले । महावीर ते बाणजाळीं निमाले ॥ १०० ॥
शता पंचमा लागिं आरंभ जाला । कपी वीर द्रोणाचळालागिं गेला ॥
महावीर ते ऊठले स्वस्थजाले । त्रिकूटाचळू सर्व जाळूं निघाले ॥ १०१ ॥
कपी क्षोभले काळ युद्धा निघाले । कितीएक राक्षेस युद्धीं निमाले ॥
नभींहूनि तो रावंणी वीर आला । समस्तांसि भेदूनिया शीघ्र गेला ॥ १०२ ॥
सहावे शतीं रावणू दुःख सांगे । त्रिकूटाचळीं रावंणी लागवेगें ॥
पुन्हा इंद्रजीतू रणामाजि आला । विरीं वानरीं होम तो भग्न केला ॥ १०३ ॥
शतीं सातवे त्या विरें इंद्रजीतें । असंभाव्य केलीं रणामाजि प्रेतें ॥
सुमित्रासुतें मारिला बाणघातें । यथासांग तो वान्हि सूलोचनेतें ॥ १०४ ॥
शतीं आठवे वीर घायाळ जाले । कितीएक राक्षेस युद्धीं निमाले ॥
सुमित्रासुता रावणें घात केला । गिरी द्रोण आणूनियां स्वस्थ जाला ॥ १०५ ॥
नवामाजि रामासि सौमित्र सांगे । बळें भंगिला होम तो लागवेगें ॥

* 'तृतीयें विरेशीं' पा० भे०. ७२. रावणी=इंद्रजित.

रघूनायकें घोर संग्राम केला । रणामाजि तो मुख्य शत्रू निमाला ॥ १०६ ॥
दहावे शतीं शोक अंत:पुराचा । प्रसंगें महोत्साव बीभीषणाचा ॥
रघूनायकें जानकी आणवीली । समस्तां सुरां राघवा भेटि जाली ॥ १०७ ॥
शतीं ऐक एकादशीं राघवाची । असंभाव्य ते स्तूति ब्रह्मादिकांची ॥
महापुष्पकारूढ होऊनि गेले । पुढें भ्रातया भेटले स्वस्थ जाले ॥ १०८ ॥
पुढें द्वादशीं मंदिरें त्या विरांचीं । यथायोग्य मानें समस्तां जणांची ॥
पुजा भोजनें सांग सर्वांसि जालीं । पुरी वर्णितां मानसें तीं निवालीं ॥ १०९ ॥
शतीं अष्टपंचीं[७३] पुरीमाजि गेले । रघूराज भद्रासनीं बैसवीले ॥
महोत्साव उत्साव नाना परीचा । समूदाय तो बोळवीला कपींचा ॥ ११० ॥
करी राज्य तो राम नाना विलासी । जनामाजि ऊपासना रामदासी ॥
यथासांग तेरा शतें श्लोक जाले । गुणी ऐकतां सर्व सूखें निवाले* ॥ १११ ॥

॥ इति श्री रामदासकृत श्लोकबद्ध युद्धकांड संपूर्ण ॥

---

७३. अष्टपंची शतीं=तेराव्या शतकांत.

* १ बालकांड, २ अयोध्याकांड, ३ अरण्यकांड, ४ किष्किंधाकांड, ५ सुंदरकांड, ६ युद्धकांड, ७ व उत्तरकांड ह्या सप्तकांडांतील आम्हांस मिळालेल्या तीन कांडांपैकीं दोन कांडें आज संपलीं. राहिलेल्या किष्किंधाकांडास प्रारंभ १०५ पृष्ठावर करूं. सर्व रामायण स्वामींनीं रचिलें असावें असें महिपतीच्या पुढील लेखावरून दिसतें--

गुरू-गीता आणि पंचकरण । मनाचे श्लोक संपूर्ण ॥
श्लोकबद्ध रामायण । रायें लिहून घेतलें ॥ ५८ ॥
संतविजय-अ० १४वा.

ह्यास्तव आमच्या शोधक मित्रांहीं बाकीचीं चार कांडें मिळवून आमच्याकडे पाठविण्याची तसदी घ्यावी म्हणजे स्वामींची आणखी सेवा आमचे हातून होईल. महिपतीच्या पुढील लेखावरून स्वामींनीं हनुमंतरामायणही प्राकृतांत केलें होतें असें वाटतें:--

हनुमंताचें काव्य जाण । केलें नाटक रामायण ॥
तें सकळ मुखोद्गत पुराण । मारुती आपण गातसे ॥ ९७ ॥
मारुती-मुखींचें चरित्र नित्य । तें रामदास श्रवण करीत ॥
त्याचे श्लोक करूनि प्राकृत । कीर्तनीं गात निज प्रेमें ॥ ९९ ॥
संतविजय-अध्याय २रा

ह्या मतास बळकटी येण्याचें असें कारण आहे कीं, जीं कांडें आम्हीं प्रसिद्ध

केलीं आहेत तीं वाल्मिकीमुनीच्या आधारें लिहिलीं आहेत असा उल्लेख आलेला लक्ष्यपूर्वक वाचणाराच्या ध्यानीं असेलच. उदाहरणार्थ युद्धकांडाचा प्रसंग ६ श्लोक १०६ व किष्किंधा कांडाचा पांचवा श्लोक पहा. ह्या खेरीज ज्या रामदासी ग्रंथांची नांवें आम्हांस कळलीं आहेत व जे अद्याप छापले नाहींत त्यांचीं नांवें एथें देतों म्हणजे शोधकांस शोध करण्यास बरें पडेल:--

१ अंतर्भाव ( ओवीबद्ध ) आत्माराम ( कित्ता ) ३ एकवीस समासी ( कित्ता ) ४ गोसावी. ( कित्ता ) ५ जुनाट पुरुष. ( कित्ता ). ६ पंचसमासी. ७ सगुण-ध्यान. ८ सप्तसमासी. महिपतीसारखे भाविक चरित्रकार चरित्रनायकांच्या कालाचा फारसा निर्देश करीत नाहींत तरी प्रसंगविशेषीं तेही ती माहिती देतात असें पुढील लेखावरून दिसतें:--

शके सोळाशें तीन निश्चिती । संवत्सरासी नाम दुर्मति ॥
समर्थ तनू त्यागूनि प्रीति । समरस होती श्रीरामीं ॥ ९५ ॥
माघवद्य नवमीस । निर्गुण झाले रामदास ॥ ११४ ॥

संतविजय–अध्याय २५वा.

श्रीरामदासकृत

# किष्किंधा*कांड प्रारंभ.

गणेशा इशा हा परेशा उदारा । सुरेशा नरेशा सदा सौख्यकारा ॥
मनीं चिंतितां कामना पूरताती । असे सत्य नेमस्त माझी प्रचीती ॥ १ ॥
नमो शारदा सर्व-संगीत-मूर्ति । महा-हंस-लीला कळा सर्व कर्ती ॥
जयाला दया देतसे स्फूर्ति फूटे । बहू घोर संसारिचें मूळ तूटे ॥ २ ॥
नमो साधुसंतां महंतां महंतां । सदा निश्चयो वीतरागी स्वतंता ॥
भवीं बूडतां दीन तात्काळ काढी । तया वर्णवेना मला बुद्धि थोडी ॥ ३ ॥
अनिर्वाच्य वाचेसि कैसें वदावें । अतर्क्यासि तर्कें कसें आकळावें ॥
अवीनाश कोंदाटलें सर्व ठायीं । मुढा ज्ञान होतां चि त्या स्वामिपायीं ॥ ४ ॥
नमो रामराया कथा-रंग-राया । बहू वर्णितां स्फूर्ति दे देवराया ॥
मुनी-काव्य हें भव्य-शोकापहारी । हरा मानसीं व्यास हा सौख्यकारी ॥ ५ ॥
चरित्रें रघूनाथजीचीं अपारें । मनोरम्य विस्तारलीं सौख्यकारें ॥
तयामाजि तूं येक येकाक्षरासी । वदें पार नाहीं तया सूकृतासी ॥ ६ ॥
जगंनाथ हा राम कैवल्य-दाता । घडे वीघडे सर्व याचीच सत्ता ॥
जनाचे मनीं हीत तें हेतु जाणें । परी वर्तवीतो भवीं थोर मानें ॥ ७ ॥
रघूनाथ लक्षूमणू आणि सीता । वनीं वास तीघांस निःशेष होता ॥
पुढें जानकी चोरिली रावणानें । बहू शोक केला रघूनायकानें ॥ ८ ॥
वनीं राम-लक्षूमणू हिंडताती । सिता रावणें चोरिली धुंडिताती ॥
अकस्मात तेव्हां सुचे राघवासी । विचारूं ह्मणे आदरें सुग्रिवासी ॥ ९ ॥
ॠषीमूख माहागिरी पैल पाहे । कपीराज मीळांगि तेथें चि आहे ॥
कदाचीत त्या पूस आसेल ठांव । सुमित्रा तयालागिं वार्तां पुसावें ॥ १० ॥
चलावें समर्था ह्मणे ब्रह्मचारी । महावीर जाताति ते पंथहारी ॥
बहू झाड-खंडें प्रचंडें उदंडें । अखंडें अखंडें ची बंडें उदंडें ॥ ११ ॥
बहू घोर झाडी तयामाजि आले । त्वरें सर्व लंघूनि पंपेसि गेले ॥
तरू सुंदरू रम्य छाया बसाया । ह्मणे शेषे यातें चि या देवराया ॥ १२ ॥

---

* किष्किंधा जेथें होती तेथें हल्लीं अनागोंदी शहर आहे. हें तुंगभद्रेच्या कांठीं आहे. १. प्रचीती (सं. प्रतीती)=अनुभव. २. वीतरागी=सोडिला आहे संसार ज्यांनीं असे. ३. अनिर्वाच्य=अवर्णनीय. ४ मुनीकाव्य=वाल्मिकी मुनीनें रचिलेलें रामायण. ५ कैवल्य=मोक्ष. ६. ऋषीमूख=हें एका पर्वताचें नांव. याचें शुद्ध संस्कृत रूप ऋष्यमूक असें आहे. ७. वार्तां=बातमी. ८. पंपा=एका सरोवराचें नांव. ९. शेष=शेषाचा अवतार लक्ष्मण.

सुकूमार पायीं कदाही न चाले । बहू हिंडतां हिंडतां कष्ट जाले ॥
अशा कारणें राम पंथीं निजेले । अकस्मात ते सुग्रिवें देखियेले ॥ १३ ॥
रूपें योगधारी मना सौख्यकारी । महावीर हा कोण कामा-धिकारी ॥
मनीं वाटतें वाळिनें धाडिले हे । भयाभीत होऊनि चक्कीत पाहे ॥ १४ ॥
हनूमंत बोले तया सुग्रिवासी । नव्हे हो तसे साक्ष येते मनासी ॥
कळेना लिळा दीसती सौख्यवासी । असें वाटतें साह्य आले तुह्मांसी ॥ १५ ॥
तैं सुग्रीव बोले तरी जाय आतां । मनांतील घेऊनियां बुद्धि आतां ॥
तया धाडिलें राम सौमित्र जेथें । स्वयें चालिला शीघ्र तो दूरि पंथें ॥ १६ ॥
हनूमंत दूरूनि येऊनि पाहे । सुमित्रासुतू सिद्ध तो बैसला हे ॥
रघूराय मांडीवरी सौख्यकारी । पुढें बोलता जाहला तो वनारी ॥ १७ ॥
रूपें योग-मूर्ति धनुर्बाण हातीं । वयें बाळ-लीला फिरा कां दिगंतीं ॥
पुढें कोठ पर्यंत जाणें तुह्मांसी । अहां कोण ऐसें वदा निश्चयेशीं ॥ १८ ॥
कपी कोण तूं पूससी कासयारे । मला सांग साकल्य तूं सर्व सारें ॥
प्रसंगीं फणी बोलतो तो स्वभावें । प्रिती मारुती जाणवी सर्व भावें ॥ १९ ॥
प्रभू अंजनी माय या बा कपीची । पिता तत्वता वायु माझा तमाची ॥
पुसाया तुम्हां सुग्रिवें पाठवीलें । समर्थाप्रती सर्व म्यां जाणवीलें ॥ २० ॥
प्रतीउत्तरें बोलता शेष जाला । कपी ऐक रे सांगतों सर्व तूला ॥
जनीं सूर्य-वंशीं नृपाधीक राजे । बहू कीर्तिचा घोष अद्भूत गाजे ॥ २१ ॥
तयावंशिंचे दोन हे बंधु पाहें । रघूनाथ लक्ष्मणू नांव आहे ॥
पिता धाडिता जाहला त्यां वनासी । निघालों जनीं पंथि या सौख्यरासी ॥ २२ ॥
सदा सर्वदा संतसेवा घडावी । अखंडीत वृत्ती पदीं या जडावी ॥
सवें चालिलों आवडी राम जातां । जगन्माय ही जानकी विश्वमाता ॥ २३ ॥
वनीं वास तीघांस कीतेक काळीं । सिता रावणें चोरिली भूमिबाळी ॥
तये कारणें धुंडितों लागवेगें । किती फीरतों शुद्धि कोठें न लागे ॥ २४ ॥
महावीर तुम्हीं धनुर्बाणधारी । करूं दीधली रावणा केंवि चोरी ॥
तया लागिं तो शेष साकल्य बोले । न चाले चि येऊनि कापट्य केलें ॥ २५ ॥
सुवर्णाचिया त्या मृगालागि तेणें । चरायासि तैं धाडिलें रावणानें ॥
जगन्माय ती बोलली राघवासी । दिजे कंचुकी स्वामिनें आपणांसी ॥ २६ ॥
उठे शीघ्र धांवे मृगाच्याच पाठी । शरें मारि त्या राम कंदर्प-कोटी ॥
अकस्मात जाला ध्वनी घोष तेथें । मला धाडि श्री जानकी त्याच पंथें ॥ २७ ॥

१०. कामा-धिकारी=मदनाला धिःकार करणारा म्हणजे अति रूपवान्. ११. वनारी=मारुती. १२. फणी=लक्ष्मण. १३. शुद्धि=शोध.

महाघोर गुंफा तये माजि सीता । त्वरें भोंवतीं घातली रेघ जातां ॥
पुढें रावणें याचकी वेष केला । तिथें भीक मागावया शीघ्र आला ॥ २८ ॥
न चाले चि कांहीं पुढें जाववेना । तया जानकीतें कदा नेववेना ॥
करूणास्वरें उत्तरें फार बोले । दयें घालितां भीक तत्काळ नेलें ॥ २९ ॥
मृगा मारिलें राघवें बाण-घातें । गृहा माजि येतां न देखे सितेतें ॥
जरी भेटता रावणू पापरूपी । नसे प्राप्ति ब्रह्मांदिकां गोष्टि सोपी ॥ ३० ॥
महा विक्रमू राघवाचा कळेना । रणामाजि हो ठाण ज्याचें चळेना ॥
पुरूषार्थ सांगीतला सर्व कांहीं । वदे मागुती देखिलें त्यासि नाहीं ॥ ३१ ॥
जयें सर्व क्षेत्रास निर्धूत केलें । धरत्रीवरी नांव तें ही न चाले ॥
तया भार्गवा राघवें जिंकियेलें । कळेना तुला नेणसी तूं कपी रे ॥ ३२ ॥
हनूमंत वीचारितो अंतरेसीं । वयें बाळ-लीला वदे विक्रमासी ॥
तरी यावरी वृक्ष घालूनि पाहूं । असें भाउनी झेलिला ऊर्ध्व बाहू ॥ ३३ ॥
बहू थोर झाडें झुबाडें चि खोडें । कपी मोडता जाहला तैं कडाडें ॥
अकस्मात टाकी रघूनाथ जेथें । शरें शीघ्र वारी सुमित्रू तयांते ॥ ३४ ॥
कपी मागुता मागुता थोरथोरें । बळें वृक्ष घेऊनियां भूभुकारें ॥
वरी टाकितां शेष वारी तयांतें । विचारी मनीं काय कीजे अशातें ॥ ३५ ॥
रघूनायकाला बहू झोंप आली । कपी मागुता मागुता वृक्ष घाली ॥
जया हालतां बोलतां चालतां ही । करी प्रेत्न नाना न चाले चि कांहीं ॥ ३६ ॥
खुणावी दटावी तयातें उठावी । पुढें मागुता वृक्ष पुन्हा उठावी ॥
धवावां बहूसाल पाषाण टाकी । वरीच्यावरी वीर बाणें चि झोंकी ॥ ३७ ॥
बहू वृक्षपाषाण नाना परीचे । कडे टाकिले मोठमोठे गिरीचे ॥
परी अल्प रामावरी येउं देना । महावीर हा शेष लक्षीं चुकेना ॥ ३८ ॥
बहू वारितां वारितां ढीग जाले । गिरीचेपरी दूर होऊनि ठेले ॥
मनामाजि चक्कीत जाला वनारी । पुरावा करी तीतुका ही निवारी ॥ ३९ ॥
बहू घोष वीशेष कित्येक केले । कडाडां तरू मोडिले चूर केले ॥
न चाले कपीचें नसे वृक्ष माथां । नसे तूळणा तूळितां त्या समर्था ॥ ४० ॥
बहूसाल स्यां मानसीं गर्व केला । भला वीर सौमित्र तो देखियेला ॥
पहा एक तो धाकुटा वीर्य-सिंधू । प्रभू राम निद्रिस्त हा दीन-बंधू ॥ ४१ ॥
कपी ही उगा बैसला स्थीर राहे । महा वीर लक्ष्मणू त्यासि पाहे ॥
दिनोद्धारणें सांग विश्रांति केली । प्रसंगीं उठाया तया वेळ आली ॥ ४२ ॥
रघूनायका लागिं जागर्ति जाली । कपी-वृक्ष-माथ्यावरी दृष्टि गेली ॥

---

१४. क्षत्रास=क्षत्रियांना. १५. लक्ष=निशाण. १६. दिनोद्धारणें=रामानें.

सुवर्णें कसी कांस वीराजताहे । सुमित्रा म्हणे राम आश्चर्य पाहें ।। ४३ ।।
हनूमंत ऐकूनि विस्मीत ठेला । वदे अंजनी तो चि हा स्वामि आला ।।
मनामाजि वीचारिलें आदरेंशीं । नमस्कार सांष्टांग केला प्रभूसी ।। ४४ ।।
पदीं मस्तकू ठेविला शीघ्र भावें । वरू दीधला स्वामि-देवाधिदेवें ।।
कृपाळूपणें राम बोले तयासी । कपी वज्रदेही चिरंजीव होसी ।। ४५ ।।
महा मस्तकीं हस्त सीतापतीचा । जयाच्या वरा यत्न नाहीं विधीचा ।।
शशी सूर्य तारा-गणू सृष्टि आहे । चिरंजीव केलें सदा वज्रदेहें ।। ४६ ।।
कपी-मानसीं सूख ऊदंड जालें । दया-सागरें राघवें थोर केलें ।।
बहूसाल आनंदला राम तोषें । कपी लाधला भाव त्याचा विशेषें ।। ४७ ।।
पुढें मारुती स्तूति ऊदंड बोले । म्हणे धन्य कीं भाग्य हें दीन आलें ।।
परी हीन जे दीन त्यां उद्धरीलें । रघूनायका ब्रीद साचार केलें ।। ४८ ।।
दयाळा तुझीये दयेवीण कांहीं । महायत्न केले तुझी भेट नाहीं ।।
परी स्वप्नसें भासतें या मनाला । नसे पुण्य कीं सौख्य जालें दिनाला ।। ४९ ।।
प्रभू अंजनीला पुसे लागवेगें । पुढें अंजनी सर्व ही खूण सांगे ।।
तुझी कास जाणेल तो स्वामि तूझा । तयारंभि ऊतावळा प्राण माझा ।। ५० ।।
गिरी-शीखरें थोरथोरें अपारें । वनें भूवनें पावनें सौख्यकारें ।।
बहू हिंडलों धुंडिलें वोळखाया । परी दीससी तूं न गा देवराया ।। ५१ ।।
बहू आवडी तांतडी लोचनाला । वदें कार्य कांहीं कळेना जनाला ।।
अवस्था मनीं आसतां प्राप्ति नाहीं । न वाटे समर्था प्रभू गोड कांहीं ।। ५२ ।।
अकस्मात ते मात कित्येक काळीं । प्रभू राम आला ऋषी-राज-मेळीं ।।
अहल्या पदीं दिव्य होऊनि गेली । समर्थां बहू कीर्ति विख्यात जाली ।। ५३ ।।
अहा सत्य हें वाटलें सौख्य जीवा । उभा राहुं पाहें अतां पूर्व ठेवा ।।
परी अंतरीं धीर केल्या धरेना । बहूसाल वीयोग पापी सरेना ।। ५४ ।।
पहाया समर्था बहू यत्न केला । नव्हे साध्यता सर्व ही व्यर्थ गेला ।।
अतां पूर आला कृपेचा दयाळा । तरी प्राण हा सर्व ही तृप्त झाला ।। ५५ ।।
यथार्थें चि वाक्या वदे तो वनारी । कृपा- उत्तरें सौख्य दे रावणारी ।।
बहू गोड वाणी समाधान केलें । प्रसंगीं कपीला सुधा-पान* झालें ।। ५६ ।।
पुढें शेष-पायांवरी शीघ्र माथा । त्वरें ठेवितां ऊठवी राम-भ्राता ।।
बहूतां परी उत्तरें गौरवीला । कपी-मानसीं हर्ष ऊदंड जाला ।। ५७ ।।
पुढें राघवालागिं सौमित्र सांगे । कपी-सुग्रिवाचा गिरी पैल शृंगें ।।
तयें धाडिलें यासि शुद्धीस आहे । पुसाया तया लागिं तो राम बाहे ।। ५८ ।।

१७. सुवर्ण=भरजरी पीतांबर. * 'क्षुधापान' पा० भे०.

कसा गा कपी तो कपी-राज कोठें । कसा शीघ्र आम्हांसि येऊनि भेटे ॥
सिता ठाउकी कीं तया लागिं नाहीं । प्रतीउत्तरू बोलतो भीम-देही ॥ ५९ ॥
हनूमंत बोले पुसावें तयाला । श्रुता ती मला नाहिं वार्ता दयाळा ॥
परी वर्तमानासि तो दीनबंधू । म्हणे काय रे काय रे सौख्य-सिंधू ॥ ६० ॥
महाभीम बोले रघूनायकासी । करा सौख्य तें आदरें सुग्रिवासी ॥
करी सर्व ही साह्यता तो स्वभावें । परी साह्य आधीं तयाचें करावें ॥ ६१ ॥
त्वरें जाय घेऊनि ये त्यासि आतां । भयाभीत होऊं नको सोडिं चिंता ॥
म्हणावें तुझें ऊसणें सर्व घेतों । पुढें राज्य कांता तुझी तूज देतों ॥ ६२ ॥
उडाला कपी साक्षपें भीम-रूपी । त्वरें सुग्रिवा सर्व वार्ता समर्पी ॥
बरा काळ आला तुझा भोग गेला । भलें सांगतों भेट त्या राघवाला ॥ ६३ ॥
महावीर हे धीर मोठे प्रतापी । रणीं भीडतां दीसती काळरूपी ॥
तयाचे पुढें वाळि तो काय कीती । तुला साह्य होती पहावी प्रचीती ॥ ६४ ॥
महा विक्रमू सांगसी थोर त्यांचा । नसे अल्प ही लेश तो दूरिताचा ॥
तरी त्यांसि येथें चि घेऊनि यावें । मनांतील दीसेल सर्व स्वभावें ॥ ६५ ॥
पुन्हा अंजनी-सूत येऊनि पाहे । रघूनाथ लक्षूमणू बैसलाहे ॥
समर्था दिना लागिं ह्या थोर कीजे । उदासीन त्या सुग्रिवाला न कीजे ॥ ६६ ॥
दयाळू म्हणे गा बरें जाउं आतां । त्वरें चालिला त्या गुहाच्यानि पंथा ॥
हनूमंत जाऊनि साकल्य सांगे । त्वरें बाहिरी येतसे लागवेगें ॥ ६७ ॥
अलंकार भांगार[१८] त्या जानकीचा । बहू रम्य लावण्य नाना परीचा ॥
दशग्रीव लंकेसि नेते प्रसंगीं । जगन्माउली भूषणें सर्व त्यागी ॥ ६८ ॥
अकस्मात ते सुग्रिवा प्राप्त झाले । गुहामाजि पेटींत घालूनि ठेले ॥
प्रसंगीं रघूनाथ-भेटी निघाले । अलंकार घेऊनि सन्मूख आले ॥ ६९ ॥
अती आदरें भेटला राघवासी । नमस्कार साष्टांग केला प्रभूसी ॥
कृपाळूपणें राघवें ऊठवीला । सुमित्रा-सुतेंही बहू गौरवीला ॥ ७० ॥
पुढें बैसले सर्व ही स्वस्थ झाले । अती आदरें राम मंजूळ बोले ॥
तुला आणि वाळीस वीरोध जाला । कशा कारणें काय अन्याय केला ॥ ७१ ॥
कृपाळूपणें ऐक तूं रामराजा । कपीराज बोले यथार्थेंचि बोजा ॥
बहू राक्षसू थोर मायावि आला । तयें वाळिशीं थोर संग्राम केला ॥ ७२ ॥
बहू झुंजतां झुंजतां तो पळाला । महा एक गूहे मध्यें शीघ्र गेला ॥
तया पाठिशीं धांवला शीघ्र वाळी । मला ठेविलें रक्षणा तेचि काळीं ॥ ७३ ॥
पुढें युद्ध दोघांसि ऊदंड झालें । बहू रक्त तें मांस बाहेर आलें ॥

---

१८. भांगार=सोनें ( हा कानडी भाषेंत शब्द प्रसिद्ध आहे )

प्रसंगीं तये घोष अद्भुत जाला । मला भासलें इंद्र-सूतू[१९] निमाला ॥ ७४ ॥
तया ऊपरी कर्म म्यां सांग केलें । पुरी माजि सर्वांस हें जाणवीलें ॥
प्रधानीं समस्तीं मला राय केला । पुढें येक संवत्सरें वाळि आला ॥ ७५ ॥
तयें देखिलें राज्यधारी प्रसंगें । बहू क्षोभला धांवला लागवेगें ॥
मला शीघ्र ताडिल्लें थोर हातें । पळालों त्वरें चालवेना जिवित्वें ॥ ७६ ॥
कृपाळूपणें पूसिलें राघवानें । तुला ये स्थळीं सोडिलें कां तयानें ॥
रवी-सूत[२०] साकल्य सांगे प्रभूला । वरी ना च रे तो ऋषी-शाप जाला ॥ ७७ ॥
ऋषी कोण तो कां तयें शापियेलें । कपीसुग्रिवातें रघूराज बोले ॥
प्रसंगीं कथा मूळपासूनि सांगे । दिनानाथ साकल्य पूसे प्रसंगें ॥ ७८ ॥
महा स्थूळ अद्भूत राक्षेस होता । बहू थोर म्हैसा सदा रूप-धर्ता ॥
तया दुंदुभी नाम तें देव-राया । नसे तूळितां दूसरा त्या तुळाया ॥ ७९ ॥
अती मातला गर्व पोटीं न साहे । समुद्रासि जाऊनि युद्धासि वाहे ॥
भयें भूलला सिंधु बाहेर आला । बहू रत्न देऊनि संतोषवीला ॥ ८० ॥
म्हणों लागला सागरू पैल पाहें । महाचंड युद्धासि तो थोर आहे ॥
तुं पाहीं वहू मानसीं गर्व केला । तेथें लौकरी जाय झुंजेल तूला ॥ ८१ ॥
पुढें दुंदुभी पर्वतालागिं सांगे । महा थोर पाषाण लोटीत वेगें ॥
गिरी ही तया लीन होऊनि आला । बहू स्तूति बोलोनि आनंदवीला ॥ ८२ ॥
महापर्वतू राक्षसा लागिं सांगे । बळी वाळि प्रख्यात हो पैल वागे ॥
समक्षा तुझी तो चि तो पूरवीता । तेथें जाय तूं जाय गा शीघ्र आतां ॥ ८३ ॥
पुढें वीर किंष्किंध-पूरास आला । समाचार वीदीत जाला कपीला ॥
रणा दारुणा माजि दोघे बळाचे । महा प्रौढ युद्धू तये दुंदुभीचें ॥ ८४ ॥
बळें भांडतां भांडतां थोर म्हैसा । तया लाथ मारी कपी काळ जैसा ॥
पदें हाणतां देह तो चूर जाला । अकस्मात ऊडोनि येथें चि आला ॥ ८५ ॥
तपस्वी मुनी बैसला ध्यानकर्ता । तदां येक नेमें चि सामर्थ्य धर्ता ॥
तयें देखिला पर्वतू रक्तमेदा । मतंगू[२१] मनीं पावला थोर खेदा ॥ ८६ ॥
असा तो कसा कोण तो मातलाहे । तया लागिं हा शाप माझा चि आहे ॥
ऋषी-पर्वतीं येत वेळे तयाला । क्षयो प्राप्त होईल नेमस्त त्याला ॥ ८७ ॥
ह्मणोनी समर्था तया येववेना । किती जाहलें ची तरी मारवेना ॥
कृपाळूपणें साह्य माझें करावें । दयासागरा दीन तें उद्धरावें ॥ ८८ ॥
निराधार आधार कांहीं च नाहीं । बहू गांजलों पीडलों थोर कांहीं ॥
नये बोलतां काय सांगूनि कोणा । वदों काय मूखें अती दैन्यवाणा ॥ ८९ ॥

---

१९. इंद्रसुत=वाळी. २०. रविसुत=सुग्रीव. २१. मतंगू=मातंगऋषि.

जया सांगणें तो तया भीत आहे । महा क्रूर कोणी च तो ही न राहे ॥
प्रसंगें मला जोडले पाय तूझे । + + + + + + + ॥ ९०* ॥
तुझा पार आपार कोणा कळेना । कसा मीं स्तवूं बुद्धि माझी वळेना ॥
तरी सर्व जाणूनियां अंतरींचें । मनीं चिंतिलें पूरवावें दिनाचें ॥ ९१ ॥
दया-सागरें राघवें धीर दीला । परी सर्वथा धीर येना कपीला ॥
कपीचें महा थोर सामर्थ्य आहे । तयाचे पुढें काळ ऊभा न राहे ॥ ९२ ॥
तया दुंदुभीचें मढें पैल पाहें । समर्था गिरीतुल्य तें दीसताहे ॥
असें झोंकि किष्किंधेहुनी च लातें । दुजा कोण द्याया तया साम्यतेतें ॥ ९३ ॥
दिसे कोटि-कंदर्प-लावण्य साजे । पुढें देखतां सौख्य ऊदंड माजे ॥
जुना घोर कर्कोट[२२] तो वाळि आहे । तयालागिं जिंकावया कोण आहे ॥ ९४ ॥
पुढें राघवें दुंदुभीच्या मढ्याला । पदें ताडिलें धाडिलें सागराला ॥
तयें जाहलें सौख्य तें सुग्रिवासीं । वदे आदरें मागुतें या प्रभूसी ॥ ९५ ॥
तधीं रक्त मांसें बहू स्थूळ होतें । अतां सूक्ष्मता प्राप्त झाली तयातें ॥
अशानें कदा वाळि तो जिंकवेना । समर्था प्रभू मानसीं धीर येना ॥ ९६ ॥
प्रभू ताड हे सप्त वीतंड आहें । तया येक बाणेंचि भेदूनि पाहें ॥
जरी भेदिले छेदिले ते प्रसंगीं । समर्था तरी वाळिसी जिंकिसी कीं ॥ ९७ ॥
पुढें ते कडी बीकडी ताड आहे । रघूनाथ लक्षूमणा लागिं बाहे ॥
पदें वाम अंगुष्ट तो रेटियेला । तेणें सप्त मेळा बरा नीट जाला ॥ ९८ ॥
पुढें राघवें शीघ्र चंद्रार्ध-बाणें । बळें छेदिला ताड मांडूनि ठाणें ॥
गिरी-शृंग भेदूनि पृथ्वींत गेला । पुरे धांव पूरूनि भौंता निघाला ॥ ९९ ॥
रवी-सूत आनंदला हो मनाला । अती निश्चयो वाटला त्या कपीला ॥
कृपाळूपणें राम बोले तयासी । अतां जायगा झुंज तूं त्या कपीशीं ॥ १०० ॥
पुढें वीर सुग्रीव युद्धासि गेला । कडाडीत तो ज्येष्ठ बाहेर आला ॥
तुला काय कोठूनि सामर्थ्य आलें । परी पावसी मृत्यु वाईट केलें ॥ १०१ ॥
अतां साह्य बोले विरें थाप मारी । तयालागिं सुग्रीव नेटें धिकारी ॥
गिरी थोरला टाकिला वाळिमायां । तयें वारिला शीघ्र हाणूनि लाता ॥ १०२ ॥
पुढें पाडिला भूतळीं सुग्रिवासी । कठोरें करें ताडिलें बांधवासी ॥
रवीसूत खालीं वरी वाळि आहे । रघूराज दूरूनि लक्षीत आहे ॥ १०३ ॥
कळेना रिपू कोण त्याला वधावें । दिसे सारिखा सारिखा त्यासि भावें ॥
रघूनंदनें धीर केला प्रसंगीं । विरू सुग्रिवू तो पळे लागवेगीं ॥ १०४ ॥
वदे राघवालागिं हे काय केलें । दयासागरें कां मला मोकलीलें ॥

---

* ' प्रभो पूरवावें तुवां कोड माझें ' ! २२. कर्कोट=सर्प.

तुम्हांलागीं सांगीतलें सर्व होतें । तुम्हां देखतां ताडिलें मुष्टिघातें ॥ १०५ ॥
वदे रामराजा विरा ऐक वोजा । कळेना चि तो कोण शत्रू चि तूझा ॥
अकस्मात तूला चि लागेल जेव्हां । न चाले पुढें सर्वथा यत्न तेव्हां ॥ १०६ ॥
तया कारणें धीर ऊदंड केला । रघूनायकें हार त्या लागिं दीला ॥
गळां हार त्याला कपी खूण जाली । कपी जाय गा मागुता धांव घाली ॥ १०७ ॥
बहूतां परी धाडिलें सुग्रिवासी । गिरिशृंग घेऊनि धांवे त्वरेशीं ॥
उठे शक्रसूतू तयालागिं तारा । न जावें ह्मणे येत नाहीं विचारा ॥ १०८ ॥
प्रितीपात्र हा अंगदू सांगताहे । कपीलागिं तो जाहला राम साहे ॥
समर्था तरी कासया लागिं जावें । असें जालिया येश नाहीं स्वभावें ॥ १०९ ॥
रघूनाथ हा थोर माहाप्रतापी । अनाथासि देखूनि कृपा समर्पी ॥
तयाशीं कदां झुंजतां पूरवेना । पुढें देखतां धीर पोटीं धरेना ॥ ११० ॥
न माने तया सांगतां गर्व केला । बहूसाल वाळीस तो क्रोध आला ॥
ह्मणे ऐकतों रे दशग्रीव आला । तयें चोरिलें कीं प्रिये जानकीला ॥ १११ ॥
वधू कारणें सुग्रिवा मेळवीतो । तयाचे शरें आमुचा प्राण जातो ॥
असें हें घडों पाहतें ते चि काळीं । गिरिशृंग ते राहती अंतराळीं ॥ ११२ ॥
अशी तूं कशी सांगसी या भयाला । कसा कोण मी दीसतो वाळि तूला ॥
बळें पालथें या भुगोळास घालीं । करें पोकळीमाजि ब्रह्मांड झेलीं ॥ ११३ ॥
निघाला बळी दीधली हाक मोठी । दिशा दिग्गजां जाहली थोर आटी ॥
महा पुच्छ ऊभारिलें सव्य बाहो । बहूसाल कोपिन्नला तप्त देहो ॥ ११४ ॥
अकस्मात तो वाळि सुग्रीव ताडी । बहू कोपला थोर पोटीं कडाडी ॥
गळां हार तो मार वेगीं चुकावी । तया शेष देखोनि माथा तुकावी ॥ ११५ ॥
बहू कोपला तापला थोर तापा । पुन्हा मागुता ताडिला वज्रथापा ॥
तळीं घातलें शीघ्र त्या सुग्रीवासी । रघूराज दूरूनि लक्षी तयासी ॥ ११६ ॥
पुढें सज्जिलें चाप चंद्रार्धबाणें । भलें लक्षिलें वक्ष तें वज्रठाणें ॥
तया वाळिला मूर्छना थोर आली । निचेष्टीत भूमीवरी आंग घाली ॥ ११७ ॥
बहूसाल त्या सुग्रिवें शोक केला । सुकूमार कूमार तो शीघ्र आला ॥
पुढें शीघ्र वार्ता पुरी माजि गेली । अकस्मात तारा भुमी अंग घाली ॥ ११८ ॥
नव्हे धीर डोळा बहू नीर लोटे । पिटी भाल हो आजि कल्पांत वाटे ॥
त्वरें धांव नारायणा मासि पाहें । महावीर तो वाळि मुर्छीत आहे ॥ ११९ ॥
समर्था मला कासया मोकलीलें । बहू सूख मागील तें आठवीलें ॥
अहारे अहा असें काय झालें । कसें पूर्व संचीत टाकूनि आलें ॥ १२० ॥

---

२३. तारा=वाळीच्या स्त्रीचें नांव.

शिराखालिं घालोनिया वाम जानू । ह्मणे गूण तूझे किती काय वर्णूं ॥
बळी तूं बळाचा दुजा स्वामि कैंचा । वदे विक्रमू सत्य जो सत्यवाचा ॥ १२१ ॥
तरी अंगदें सूचना सर्व केली । यथार्थे तरी मीं बहू जाणवीली ॥
रघूनाथ विख्यात पुरूषार्थ ज्याचा । मरीचीसि तो घाय वारा जयाचा ॥ १२२ ॥
सुबाहू रणीं पाडिला एक बाणें । अर्धी ताटिका मारिली थोर त्राणें ॥
शिवें चाप दीलें तया भार्गवाला । बळें भग्न केलें महा दर्प ज्याला ॥ १२३ ॥
असा राम जो साह्य त्या सुग्रिवासी । बळें ताड छेदूनि छेदी गिरीसी ॥
कशी वेळ आली अशा वाळिला हे । इया ऊपरी काळ तो क्षीण आहे ॥ १२४ ॥
किती बोलिल्या कांहिं केल्या न राहे । वदे मागुता मागुता घोर आहे ॥
तुजेलागिं त्या राघवें मुक्त केलें । परी भाग्य सौभाग्य माझेंचि गेलें ॥ १२५ ॥
बहू ताप संताप ऊदंड केला । रघूराज तो सन्मुखी देखियेला ॥
प्रभूशीं तशी बोलती शीघ्र जाली । असंभाव्य ते स्तूति ऊदंड केली ॥ १२६ ॥
दिनोद्धारणा कारणा भक्त-पाळा । रघूनायका दीन-कारूण्य-लीळा ॥
तुझें नाम विश्राम लोकत्रयासी । निजध्यास विश्वास मोठा शिवासी ॥ १२७ ॥
नव्हे न्याय अन्याय दीसूनि आला । कसा साह्य जालासि त्या सुग्रिवाला ॥
तया रावणालागिं बांधोनि घाली । तशा वाळिशीं मैत्रिकी कां न केली ॥ १२८ ॥
अयोध्येसि तो भरतू राज्यकारी । सिता रावणें चोरिली दिव्य नारी ॥
तुझा शत्रु जो सोडिलें कां तयाला । कपी वाळिनें काय अन्याय केला ॥ १२९ ॥
पुढें वाळिची मूर्छना शांत जाली । रवी-सूत ऊभा वरी दृष्टि गेली ॥
बहुतां परी सुग्रिवा हीत सांगे । झळंबे मनीं लोभ तेणें प्रसंगें ॥ १३० ॥
जगंनाथ हा राम कारूण्य-सिंधू । कृपाळूपणें भेटला दीनबंधू ॥
महासूकृतें जोडले पाय तूझे । बहूतां परी आदरें साह्य कीजे ॥ १३१ ॥
कपी सर्व घेऊनि जा त्रीकुटासी । रघूनाथ मारील त्या रावणासी ॥
सिते विश्वमातेसि आणूनि देईं । तयाऊपरी तूं पुरीमाजि जाईं ॥ १३२ ॥
पुढें सर्वदां सख्य त्याशीं करावें । कदां ही अणूमात्र रीती नसावें ॥
तुला थोर आधार हा जाण भावें । पुरीमाजि त्वां राज्य सूखें करावें ॥ १३३ ॥
महा थोर हें राज्य किष्किंधपूरी । असावें बहू विक्रमें नामधारी ॥
परी पाहतां सर्व ही तूज आहे । परी युक्तिनें बुद्धिनें नीति राहे ॥ १३४ ॥
अरे पद ते मंत्रिया अंगदाला । जसा मी तसा तूं चि आहेसि त्याला ॥
किती सांगणें तूं भला दक्ष आहे । बरी कीर्ति जे ते चि ते ऊरताहे ॥ १३५ ॥
अती मीरवूं मी तुला काय कीं तें । असे मृत्यु त्याची तुवां पाळिजेतें ॥
प्रवृत्तीजनामाजि हे गोष्ट आहे । परी सांगतों जीव माझा न राहे ॥ १३६ ॥

पुढें अंगदा देखतां कंठ दाटे । बहूसाल नेत्रोदकें पूर लोटे ॥
प्रसंगीं महा मोह आला कपीसी । रुदे बोलतां अंगदा कूमरासी ॥ १३७ ॥
अरे अंगदा अंतरीं फार होतें । मजे देखतां राज्य देईन तूतें ॥
परी कल्पिलें हें कदा ही घडेना । विधीसूत्र निर्माण हें लोटवेना ॥ १३८ ॥
बहूतां परी बोलिलों सुग्रिवासी । मशीं साम्य रे मानि तूं आदरेंशीं ॥
महा सूकृतें जोडली रामसेवा । अखंडीत हा भाव पायीं असावा ॥ १३९ ॥
बहू शीकवीलें तया अंगदाला । पुढें लक्षिता जाहला राघवाला ॥
म्हणे धन्य हें भाग्य ती भेटि जाली । करूणा स्वरें स्तूति ऊदंड केली ॥ १४० ॥
किती सावनें साधिती योगधारी । गिरीकंदरीं उग्रता पूर्णहारी ॥
तयालागिं तूं किंचिती भेट देसी । नसे तूळणा आमुच्या सूकृतासी ॥ १४१ ॥
महा पातकी घातकी थोर वाली । किती ब्रह्महत्या वदे कोण त्याला ॥
असंख्यात नामें तया भेटलासी । नसे तूळणा आमुच्या सूकृतासी ॥ १४२ ॥
अहल्या शिळा कष्टली त्या वनांतीं । सदा सर्वदा तूज चिंतीत होती ॥
बहूतां दिना दीन तूं उद्धरीसी । नसे तूळणा आमुच्या सूकृतासी ॥ १४३ ॥
वनामाजि भिल्ली महा भक्त होती । अखंडीत ते मानसीं पाय चिंती ॥
उचिष्टें तरी सेविसी त्या फळांसी । नसे तूळणा आमुच्या सूकृतासी ॥ १४४ ॥
कळेना लिला राहिले वेद चारी । बहू शीणला वर्णितां सृष्टिधारी[२४] ॥
अकस्मात पायींच धाऊनि येसी । नसे तूळणा आमुच्या सूकृतासी ॥ १४५ ॥
नसे अल्प ही स्वल्प ही पुण्य कांहीं । बहू चंड ऊदंड पाखंड देहीं ॥
महा सूख अद्भूत वालीस देसी । नसे तूळणा आमुच्या सूकृतासी ॥ १४६ ॥
तुझें नाम हें [ ची ] महा पुण्य भासे । तुझे दर्शनें हेतु तो सर्व नासे ॥
करें बाण या हृदयीं स्पर्शलासी । नसे तूळणा आमुच्या सूकृतासी ॥ १४७ ॥
परी अल्प ही होय देहासि वेथा । कृपासागरा सोडवावें समर्था ॥
तुझा बाण निर्वाण जाला न सोडी । दयाळा तुझा तूं चि येऊनि काढीं ॥ १४८ ॥
प्रसंगें वदे वाळि हा दैन्यवाणा । कृपाळूपणें ऊठिला रामराणा ॥
उरीं पाय देऊनियां बाण काढी । मुखीं रामनामें चि तो प्राण सोडी ॥ १४९ ॥
सुरांचा नभीं सर्व मेळा मिळाला । बहू तोष तो पुष्पवर्षाव केला ॥
अनंदें बहू गर्जना रामनामें । बळें वाजली टाळिलें विघ्न रामें ॥ १५० ॥
पुढें सर्व गंधर्व तेथें मिळाले । अकस्मात स्वर्गांगना[२५]नृत्य केलें ॥
मनोरम्य आरंभिलें गायनासी । अलापें चि तो रोध सिंधूजळासी[२६] ॥ १५१ ॥

---

२४. सृष्टिधारी=शेष. २५. स्वर्गांगना=अप्सरा. २६. सिंधुजळासी रोध आला=समुद्राचें पाणी (गाणें सुस्वर ऐकून) स्तब्ध झालें.

दमामे बहू रंगसंगीतरंगें । फँणी तो भ्रमें ऊर्ध्वे धांवे प्रसंगें ॥
स्वरांच्या स्वयें कोंधल्या देवकोटी । झणी जाणते त्या कळे स्वर्गलोटी ॥ १५२ ॥
पुढें नारदादीक कीतेक आले । समस्ता मनें सूख ऊदंड जालें ॥
कथाभाग तो पाहिजे चालवीला । प्रसंगें तया वाळिला मृत्यु आला ॥ १५३ ॥
अती लोळ कल्लोळ कोल्हाळ जाला । महाशब्द नानापरी घोष जाला ॥
बहू दुःख जालें तया सुग्रिवाला । कृपाळूपणें राम बोले तयाला ॥ १५४ ॥
उभा राम निष्काम लावण्यखाणी । मुनी देव गंधर्व गाती पुराणीं ॥
धनुष्यासि टेंकोनियां वाम बाहे । कृपाळूपणें सुग्रिवालागिं बाहे ॥ १५५ ॥
विचारें अवीचार कां प्राप्त जाला । उजेडासि अंधार जिंकोनि आला ॥
महाज्ञानिया तो भवीं बूडवीला । असें दीसतें भासतें या मनाला ॥ १५६ ॥
सुबुद्धा तुवां शीघ्र आतां उठावें । विधीयुक्त तें कर्म सर्वै करावें ॥
बहू शोक केल्या पुढें काय आहे । जनीं जाणता तूं विचारूनि पाहें ॥ १५७ ॥
असंभाव्य दुःखानळें प्राण फूटे । प्रभू बोलतां वीर तात्काळ ऊठे ॥
रविप्रीयाँच्या बोलिले हृदयासी । विधीयुक्त आरंभिलें या विधीसी ॥ १५८ ॥
महा पाप त्या नाम घेतां न राहे । असा राम विश्राम दृष्टीस पाहे ॥
दहेवेशघातासि संपादियेलें । यथासांग जें कर्म तें सांग केलें ॥ १५९ ॥
पुढें राम भेटी कपीराज गेले । उभे हात जोडूनि ऊदीत ठेले ॥
रघूनायकें सुग्रिवा बैसवीलें । प्रधानाप्रती आदरें वाक्य बोले ॥ १६० ॥
तुम्हीं सर्व तात्काळ पूरीसि जावें । कपीलागिं भँद्रासनीं बैसवावें ॥
प्रधानीं तिहीं राम आज्ञे प्रमाणें । महावीर सुग्रीव नेला स्फुराणें ॥ १६१ ॥
समस्तीं विधयुक्त तो पँट्ट दीला । कपीराज भद्रासनीं बैसवीला ॥
रघूनाथनामें चि निर्घोष केला । निशाणीं बहू वाद्य कल्लोळ जाला ॥ १६२ ॥
कपीं अंगदा लागिं प्राधान्य दीलें । समस्तां मनीं सूख ऊदंड जालें ॥
पुरी सर्व शृंगारमंडीत केली । रघूनाथनामें गुढी ऊभवीली ॥ १६३ ॥
प्रधानासि घेऊनि ये राम भेटी । त्वरें चालिला जाहली थोर दाटी ॥
पुढें राम संनीध येऊनि ऊभा । वदे राम लक्षूनि कँदर्पगाभा ॥ १६४ ॥
समर्था तुवां दीन उद्धार केले । तयेंची प्रमाणें कृतकृत्य जाले ॥
मनीं वाटतें हें जरी भक्ति भावें । दयाळा यथायुक्ति तूला पुजावें ॥ १६५ ॥
अनूपम्य तो राम मंजूळ वाणी । कृपाळूपणें बोलिला चाँपपाणी ॥
व्रतस्थी अम्हीं पँट्टणातें न यावें । सदा दंडकारण्यवासी फिरावें ॥ १६६ ॥

---

२७. फणी=शेष. २८. भद्रासन=सिंहासन. २९. पट्ट=मुकुट. कंदर्पगाभा=मदनाचा पुतळा. ३१. चापपाणी=धनुष्य आहे हातीं ज्याच्या असा. ३२. पट्टण=शहर.

कपींद्रा तुवां शीघ्र पूरीस जावें । चतुर्मास पर्यंत सूखीं क्रमावें ॥
अह्मी या ऋषीपर्वतीं निश्चयेशीं । प्रज्यन्यासि जातां चि यावें त्वरेशीं ॥ १६७ ॥
रघूनायका सव्य घेऊनि वेगीं । नमस्कार साष्टांग केला प्रसंगीं ॥
कपीराज गेला निरोपें पुरीसी । रघूराज सौमित्र आरण्यवासी ॥ १६८ ॥
बहू सूख जालें तया सुग्रिवासी । पुरी आणि तारा दिली आपणासी ॥
प्रभू थोर सामर्थ्य याचें कळेना । श्रुती भांडती त्यां कदां आकळेना ॥ १६९ ॥
चतुर्मास गेल्या कपी रीस येती । शिळासेतु बांधोनि लंकेस जाती ॥
दशग्रीव मारूनि तेतीस कोडी । रघूराज हा आदरें देव सोडी ॥ १७० ॥
दिनानाथ हा दीन चिंता पहातो । जनीं भाक्तिभावार्थ हा ही पहा तो ॥
मनीं दृढता भक्ति केली जयानें । स्वयें घेतले जन्म सर्वोत्तमानें ॥ १७१ ॥
दहा ही बरे वेशै सर्वोत्तमाचे । पहील्या प्रसंगींच शंखासुराचे ॥
दुजा कूर्मरूपें धरी भारधरी । तिजा ही तसा दाढ देऊनि वारी ॥ १७२ ॥
चतुर्थां मधें भक्त प्रल्हाद पाहे । धरी खूजटू पंचमा माजि देहे ॥
पुढें साहव्या माजि क्षत्री च नाहीं । दिलें राज्य विप्रासि सर्वत्र कांहीं ॥ १७३ ॥
बळें सप्तमामाजि तो देव सोडी । पुढें अष्टमा कंस झाडूनि पाडी ॥
प्रसंगीं असे बौद्ध मौनावतारी । कलंकी मलेंच्छासि होतां चि मारी ॥ १७४ ॥
दहा सार अव्तार सर्वोत्तमाचे । तयांमाजि दोनी च प्रसिद्ध साचे ॥
क्रिडा आठव्यामाजि गोपाळपाळीं । रघूराज हा वानरीं रीसमेळीं ॥ १७५ ॥
असे भिन्न नामें परी भक्त त्याचा । चिरंजीव हा दास विख्यात ज्याचा ॥
कळेना मला अल्प ही बुद्धि नाहीं । दयाळा कृपाळा कृपादृष्टि पाहीं ॥ १७६ ॥
बहूसाल विस्तारली कीर्ति तूझी । कळेना बळें आकळे वाणि माझी ॥
परी राहवेना चि मी दीन तूझें । किजे हो क्षमा अल्प अन्याय माझे ॥ १७७ ॥
किती पीडिलें वाळिनें सुग्रिवासी । बहूतां परी राज्य दीलें तयासी ॥
कृपाळूपणें पावला राम तेथें । दीलें राज्य कांता तयाची तयातें ॥ १७८ ॥
अशी हे कथा ऐकतां सर्व भावें । तयाला रघूनाथ तात्काळ पावे ॥
पुढें ही कदा दुःख होणार नाहीं । सदा छंद आनंद ऊदंड देहीं ॥ १७९ ॥
बहू पापतापासि हें नाम वारी । हरामानसीं गूज जें सौख्यकारी ॥
म्हणोनी कथा राघवाची करावी । सदा सर्वदा सृष्टि सूखीं भरावी ॥ १८० ॥
सदा सर्वदा येकयेका चि श्लोकीं । अरे ऐकतां होइजे धन्य लोकीं ॥
नसे हो नसे जन्ममाळा तयाला । पुढें संतसंगें चि तो मुक्त जाला ॥ १८१ ॥

॥ इति श्रीरामदासकृत किष्किंधाकांड समाप्त ॥

---

३३. वेश=अवतार.

श्रीरामदासकृत

## भीमरूपि-स्तोत्रें.[1]

१.

भीमरूपी महारुद्रा । वज्रहनुमान मारुती ॥
वनारी[2] अंजनी-सूता । रामदूता प्रभंजना[3] ॥ १ ॥
महाबली प्राणदाता । सकळां ऊठवी बळें ॥
सौख्यकारी शोक-हर्ता । धूर्त वैष्णव गायका ॥ २ ॥
दिनानाथा हरीरूपा[4] । सुंदरा जगदंतरा ॥
पाताल-देवता-हंता । भव्य-शेंदूर-लेपना ॥ ३ ॥

---

१. रामदासस्वामींनीं एकंदर बारा मारुती स्थापिले असें पुढील लेखांत महिपती ह्मणतोः—

समर्थें आपुल्या हातें निश्चिती । बारा हनुमंत स्थापिले असती ॥
पहिला टाकळीस असे मारुती । तो मागें संतीं ऐकिला ॥ २२ ॥

संतविजय अ० १६

मागिले अध्यायीं निरूपण । अकरा हनुमंत समर्थानें ॥
आपुल्या हातें मूर्ति करून । केलें स्थापन तयांचें ॥ ७ ॥
त्यांचीं स्थानें कोणकोणतीं । तीं मागें श्रवण केलीं संतीं ॥
विसर पडला असेल चित्तीं । तरी सांगतों पुढती ऐका ॥ ८ ॥
नासिकासन्निध टाकळीस । मूर्ति स्थापिली रामदासें ॥
तें पहिलें चरित्र अति सुरस । ऐकिलें सावकाश सज्जनीं ॥ ९ ॥
या विरहित कृष्णा-तीरीं निश्चिती । समर्थें स्थापिले अकरा मारुती ॥
चांफळ-खोऱ्यांत दोन मूर्ति । जागृत असती देदीप्यमान ॥ १० ॥
सिंगणपुरासि एक जाण । तिसरें मसुरेंत अधिष्टान ॥
शहापुरांत चवथा हनुमान । आणि उमरजेंत स्थान पांचवें ॥ ११ ॥
साहावा मारुती निश्चित । स्थापिला बत्तीसशिराळ्यांत ॥
सातवी मूर्ति जरंडयांत । आणि टेंभीस म्हणत आठवा ॥ १२ ॥
नववा गांवडोंगरांत । तेथें नववा मारुती असत ॥
दहावें स्थान ऊर्णबाहु ह्मणत । चरित्र अद्भुत तयाचें ॥ १३ ॥
हीं दहा स्थानें ऐशा रीति । परी चांफळ खोऱ्यांत दोन मूर्ति ॥
यास्तव हे अकरा मारुती । संप्रदायी जाणती सकळ ॥ १४ ॥

संतविजय अ० १७वा.

या मारुतींस उद्देशून च हीं स्तोत्रें रचिलीं असावीं असें दिसतें. २. वनारी=रावणाचें अशोकवन मोडणारा. ३. प्रभंजन=वायु (वायुपुत्र). ४. हरी=वानर.

लोकनाथा जगंनाथा । प्राण-नाथा पुरातना ॥
पुण्यवंता पुण्यशीला । पावना परतोषका ॥ ४ ॥
ध्वजांगें उचली बाहो । आवेशें लोटला पुढें ॥
कालाग्नी कालरुद्राग्नी । देखतां कांपती भयें ॥ ५ ॥
ब्रह्मांडें माईल नेणों । आवळे दंत-पंगती ॥
नेत्राग्नी चालिल्या ज्वाळा । भ्रुकूटी ताटिल्या बळें ॥ ६ ॥
पुच्छ तें मुरडिलें माथां । किरीटी-कुंडलें वरी ॥
सुवर्ण-घटि कासोटी । घंटा किंकिणि नागरा ॥ ७ ॥
ठकारे पर्वता ऐसा । नेटका सडपातळू ॥
चपलांग पाहतां मोठें । महाविद्युल्लते परी ॥ ८ ॥
कोटिच्या कोटि उड्डाणें । झेंपावे उत्तरेकडे ॥
मंद्राद्री सारिखा द्रोणू । क्रोधें उत्पाटिला बळें ॥ ९ ॥
आणिला मागुती नेला । आला गेला मनोगती ॥
मनासी टाकिलें मागें । गतीशीं तुळणा नसे ॥ १० ॥
अणूपासूनि ब्रह्मांडा । एवढा होत नातसे ॥
ब्रंह्मांडाभोंवते वेढे । वज्रपुच्छ घालवूं सके ॥ ११ ॥
तयाशीं तुळणा कोठें । मेरु-मंदार धाकुटे ॥
तयाशीं तुळणा कैशी । ब्रह्मांडीं पाहतां नसे ॥ १२ ॥
आरक्त देखिलें डोळां । गिळीलें सूर्य-मंडळा ॥
वाढतां वाढतां वाढे । भेदिलें शून्य-मंडळा ॥ १३ ॥
भूत-प्रेत-समन्धादी । रोगव्याधी समस्त ही ॥
नासती तुटती चिंता । आनंदें भीमदर्शनें ॥ १४ ॥
हे धरा पंधरा-श्लोकी । लाभली शोभली भली ॥
दृढ देहो निसंदेहो । संख्या चंद्रकळा गुणें ॥ १५ ॥
रामदासी अग्रगणू । कपिकूळासि मंडणू ॥
रामरूपें अंतरात्मा । दर्शनें दोष नासती ॥ १६ ॥
इति श्री भीमरूपि स्तोत्र संपूर्ण ॥ १ ॥

२.

जनीं ते अंजनी माता । जन्मली ईश्वरीतनू ॥
तनूमनू तो पवनू । एक ची पाहतां दिसे ॥ १ ॥
त्रैलोक्यीं पाहतां बाळें । ऐसें तो पाहतां नसे ॥

५. नागरा=सुंदर. ६. शून्यमंडळ=आकाशमंडळ.

अतुल तुलना नाहीं । मारुती वात-नंदनू ॥ २ ॥
चळे तें चंचळे नटे । बाळ मोवाळ साजिरें ॥
चळवळी चळताहे । बाळ लेवाळ गोजिरें ॥ ३ ॥
हात कीं पाय कीं सांगों । नखें बोटें परोपरी ॥
दृष्टिचें देखणें मोठें । लांगूळ लळ्ळलळीतसे ॥ ४ ॥
खडीखाडी दडे तैसा । पीळ पेंच परोपरी ॥
उड्डाण पाहतां मोठें । झेंपावे रवि-मंडळा ॥ ५ ॥
बाळानें गिळिला बाळू । स्वभावें खेळतां पहा ॥
आरक्त पीत वाटोळें । देखिलें धरणीवरी ॥ ६ ॥
पूर्वेसि देखतां तेथें । उडालें पावलें बळें ॥
पाहिलें देखिलें हातीं । गीळिलें जाळिलें बहू ॥ ७ ॥
थुंकोनी टाकितां तेथें । युद्ध जालें परोपरी ॥
उपरी ताडिला तेणें । एक नाम चि पावला ॥ ८ ॥
हा गिरी तो गिरी पाहे । गुप्त राहे तरूवरी ॥
मागुता प्रगटे धांवे । झेंपावे गगनोदरीं ॥ ९ ॥
पळ ही राहिना कोठें । बळें ची घालितो झडा ॥
कडाडां मोडती झाडें । वाडवाडे उलंडती ॥ १० ॥
पवना सारिखा धांवे । वावरे विवरे बहू ॥
अपूर्व बाळ-लीला हे । रामदास्य करी पुढें ॥ ११ ॥
इति श्रीभीमरूपिस्तोत्र संपूर्ण ॥ २ ॥

## ३.

कोपला रुद्र जे काळीं । ते काळीं पाहवे चि ना ॥
बोलणें चालणें कैचें । ब्रह्म-कल्पांत मांडला ॥ १ ॥
ब्रह्मांडाहून जो मोठा । स्थूळ उंच भयानकू ॥
पुच्छ तें मुरडिलें माथां । पाऊल शून्य-मंडळा ॥ २ ॥
त्याहून उंच वज्राचा । सव्य बाहो उभारिला ॥
त्या पुढें दुसरा कैचा । अद्भूत तुळणा नसे ॥ ३ ॥
मार्तंड-मंडळा ऐसे । दोन्ही पिंगाक्ष ताविले ॥
कर्करा घर्डिल्या दाढा । उभे रोमांच ऊठिले ॥ ४ ॥
अद्भूत गर्जना केली । मेघ ची वोळले भुमी ॥
तुटले गिरिचे गाभे । फुटले सिंधु आटले ॥ ५ ॥

---

७. लांगूल=शेंपूट. ८. मार्तंड=सूर्य. ९. सिंधु=समुद्र.

अद्भुत वेश आवेशें । कोपला रण-कर्कशू ॥
धर्म-संस्थापनेसाठीं । दास तो ऊठिला बळें ॥ ६ ॥
इति श्री भीमरूपी-स्तोत्र संपूर्ण ॥ ३ ॥

४.

अंजनी-सुत प्रचंड । वज्रपुच्छ कालदंड ॥
शक्ति पाहतां वितंड । दैत्य मारिले उदंड ॥ १ ॥
धगधगी तसी कळा । वितंड शक्ति चंचळा ॥
चळचळीतसे लिळा । प्रचंड भीम आगळा ॥ २ ॥
उदंड वाढला असे । विराट धाकुटा दिसे ॥
त्यजून सूर्य-मंडळा । नभांत भीम आगळा ॥ ३ ॥
लुलीत बाळकी लिळा । गिळोनि सूर्य-मंडळा ॥
बहूत पोळतां क्षणीं । थुंकिला तो ततक्षणीं ॥ ४ ॥
धगधगीत बूबुळा । प्रत्यक्ष सूर्य-मंडळा ॥
कराळ काळ मूख तो । रिपूकुळासि दुःख तो ॥ ५ ॥
रूपें कपी अचाट हा । सुवर्ण कट्ट कासतो ॥
फिरे उदास दास तो । × × × ॥ ६ ॥
झळक झळक दामिनी । वितंड काळ-कामिनी ॥
तयापरी झळाझळी । लुलित रोमजावळी ॥ ७ ॥
समस्त-प्राण-नाथ रे । करी जना सनाथ रे ॥
अतूळ तूळणा नसे । अतूळशक्ति वीलसे ॥ ८ ॥
रूपें रसाळ बाळकू । समस्त-चित्त-चाळकू ॥
कपी परंतु ईश्वरू । विशेष लाधला वरू ॥ ९ ॥
स्वरुद्र क्षोभल्यावरी । तयासि कोण सांवरी ॥
गुणागळा परोपरी । सतेजरूप ईश्वरी ॥ १० ॥
समर्थ दास हा भला । कपी-कुळांत शोभला ॥
सुरारि-काळ क्षोभला । त्रिकूट जिंकिला भला ॥ ११ ॥
इति श्री भीमरूपी स्तोत्र संपूर्ण ॥ ४ ॥

५.

हनुमंता रामदूता । वायुपुत्रा महाबला ॥
ब्रह्मचारी कपी-नाथा । विश्वंभरा जगत्पते ॥ १ ॥
दानवारी कामांतका । शोकहारी दया-निधे ॥
महारुद्रा मुख्य प्राणा । मूळमूर्ती पुरातना ॥ २ ॥

वज्रदेही सौख्यकारी । भीमरूपा प्रभंजना ॥
पंचभूतां मूळ माया । तूंचि कर्ता सकळ ही ॥ ३ ॥
स्थितीरूपें तूंचि विष्णू । संहारका पशूपते ॥
परात्परा स्वयंज्योती । नामरूपा गुणातिता ॥ ४ ॥
सांगतां वर्णितां येना । वेदशास्त्रा पेड ठका ॥
शेष तो शिणला भारी । 'नेति नेति' परा श्रुती ॥ ५ ॥
धन्य अवतार कैसा हा । भक्तां लागिं परोपरी ॥
रामकार्जीं उतावेळा । भक्तां रक्षक सारथी ॥ ६ ॥
वारितो दुर्घटें मोठीं । संकटीं धांवतो त्वरें ॥
दयाळ हा पूर्ण दाता । नाम घेतां च पावतो ॥ ७ ॥
धीर वीर कपी मोठा । मागें नव्हे चि सर्वथा ॥
उड्डाण अद्भूत ज्याचें । लंघिलें समुद्राजळा ॥ ८ ॥
देउनी लिखितं[१०] हातीं । नमस्कारी सितावरा ॥
वाचितां सौमित्र अंगें । राम सुखे सुखावला ॥ ९ ॥
गर्जती स्वानंद मेळीं ! ब्रह्मानंदें सकळ ही ॥
अपार महिमा मोठा । ब्रह्मादिकांसी नाकळे ॥ १० ॥
अद्भूत पुच्छ तें कैसें । भोंवंडी नभ-पोकळी ॥
फांकलें तेज तें भारी । झांकिलें सूर्य-मंडळा ॥ ११ ॥
देखतां रूप पैं ज्याचें । उड्डाण अद्भूत शोभलें ॥
ध्वजांग उर्ध्व तो बाहू । वामहस्त कटावरी ॥ १२ ॥
कसिली हेम[११]-कासोटी । घंटा किंकिणि भोंवत्या ॥
मेखळे[१२] जडलीं मुक्तें । दिव्य रत्नें परोपरी ॥ १३ ॥
माथां मुगुट तो कैसा । कोटि चंद्रार्क लोपले ॥
कुंडलें दिव्य तीं कानीं । मुक्त-माला विराजते ॥ १४ ॥
केशर रेखिलें भाळीं । मुख सुहास्य चांगलें ॥
मुद्रिका शोभती बोटीं । कंकणें कर मंडित ॥ १५ ॥
चरणींचे वाजती अंदु[१३] । पदीं तोडर[१४] गर्जती ॥
कैवारी नाथ दीनाचा । स्वामि कैवल्य[१५]-दायकू ॥ १६ ॥
स्मरतां पाविजे मुक्ती । जन्म-मृत्यूसि वारितो ॥
कांपती दैत्य तेजासी । भुभुःकार देतां बळें ॥ १७ ॥

---

१०. लिखित=पत्र. ११. हेम=सोनें. १२. मेखला=कडदोरा. १३. अंदु=सांखळ्या पायांतल्या. १४. तोडर=तोरड्या. १५. कैवल्य=मोक्ष.

पाडितो राक्षसू नेटें । आपटी महिमंडळा ॥
सौमित्र-प्राण-दाताची । कपी-कुळांत मंडणू ॥ १८ ॥
दंडिली पाताळ-शक्ती । अही महा निर्दाळिले ॥
सोडिले रामचंद्राला । कीर्ति हे भुवनत्रयीं ॥ १९ ॥
विख्यात ब्रीद तें कैसें । मोक्ष-दाता चिरंजिवी ॥
कल्याण त्याचेनि नामें । भूत पिशाच कांपती ॥ २० ॥
सर्प वृश्चिक पश्वादी । विष शीत निवारण ॥
आवडी स्मरतां भावें । काळ कृतांत धाकतो ॥ २१ ॥
संकटें बंधनें बाधा । दुःख दारिद्र्य-नाशका ॥
ब्रह्म-ग्रह-पिडा-व्याधी । ब्रह्म-हत्यादि पातकें ॥ २२ ॥
पुर्वितो सकळ ही आशा । भक्त-काम-कल्पतरू ॥
त्रिकाळीं पठतां स्तोत्र । इच्छिलें पावसी जनीं ॥ २३ ॥
परंतु पाहिजे भक्ती । संधी कांहीं धरूं नका ॥
रामदासा साहाकारी । सांभाळी तो परोपरी ॥ २४ ॥

इति श्री हनुमंत स्तोत्र संपूर्ण ॥ ५ ॥

६.

कपि विर उठला तो वेग अद्भुत केला
त्रिभुवन-जन-लोकीं कीर्तिचा घोष केला ॥
रघुपति उपकारें दाटले थोर भावें
परम धिर उदारें रक्षिलें सौख्य-कारें ॥ १ ॥
सबळ दळ मिळालें युद्ध ऊदंड झालें
कपि-कटक निमालें पाहतां येश गेलें ॥
पर-दळ-शर-घातें कोटिच्या कोटि प्रेतें
अभिनव रण-पातें दुःख बीभीषणातें ॥ २ ॥
कपि-रिस-घनदाटी जाहली थोर आटी
म्हणउनि जग-जेठी धांवणें चार कोटी ॥
मृत्युविरल ठेविले मोकळे सिद्ध झाले
सकळ जन निवाले धन्य सामर्थ्य चाले ॥ ३ ॥
बहु प्रिय रघुनाथा मुख्य तूं प्राण-नाथा
उठवि मज अनाथा दूर सांडूनि वेथा ॥
झडकरिं भिमराया तूं करीं दृढ काया
रघुविर-भजना या लाग वेगें चि जाया ॥ ४ ॥

तुजविण मज पाहें पाहतां कोण आहे
ह्मणउनि मन माझें रे तुझी वाट पाहे ॥
मज तुज निरवीलें पाहिलें आठवीलें
सकळिक निज-दासालागिं सांभाळवीलें ॥ ५ ॥
उचित हित करावें उद्धरावें धरावें
अनहित न करावें त्वां जनीं येश घ्यावें ॥
अघटित घडवावें सेवका सोडवावें
हरि-भजन घडावें दुःख तें वीघडावें ॥ ६ ॥
प्रभुवर विर-राया जाहली दृढ काया
पर-दळ निवटाया दैत्य-कूळें कुटाया ॥
गिरिवर उगटाया रम्य-वेषें नटाया
तुजचि अलगटाया ठेविलें मुख्य ठाया ॥ ७ ॥
बहुत सबळ सांठा मागतों अल्प वांटा
न करित हित कांटा थोर होईल ताठा ॥
कृपण-पण नसावें भव्य लोकीं दिसावें
अनुदिन करूणेचें चिन्ह पोटीं वसावें ॥ ८ ॥
जळधर करूणेचा अंतरा माजि राहे
तरि तुज करूणा हे कां न ये सांग पां हे ॥
कठिण हृदय झालें काय कारूण्य गेलें
न पवसि मज कां रे म्यां तुझें काय केलें ॥ ९ ॥
वडिलपण करावें सेवका सांवरावें
अनहित न करावें तूर्त हातीं धरावें ॥
निपट चि हटवादें प्रार्थिला शब्द-भेदें
कपि घन करूणेचा वोळला राम-वेधें ॥ १० ॥
बहुत चि करुणा या लोटली देवराया
सहज चि कपि-केतें[१६] जाहली दृढ काया ॥
परम सुख विलासें सर्वदां सानुदासें
पवन-तनुज तोषें वंदिले सावकाशें ॥ ११ ॥
॥ इति श्री भीमरूपि-स्तोत्र संपूर्ण ॥ ६ ॥

७.

रुद्र हा समुद्र देखतां क्षणीं उठावला

१६. कपिकेत ( कपिकेतु )=वानरश्रेष्ठ.

शिरोणिचें किराण सज्य त्रीकुटास पावला ॥
वात जातसे तसाचि स्थूळ देह राहिला
वावरोनि वीवरोनि तो त्रिकूट पाहिला ॥ १ ॥
हीन देव दीन रूप देखतांचि पावला
गड्गडीत घड्घडीत कड्कडीत कोपला ॥
लाटि कूटि पाडि फोडि झोडि झोलि झोडला
दैत्य तोकें येक हाक सर्व गर्व मोडिला ॥ २ ॥
सानरूप पुच्छ तें स्वरूप गुप्त बैसला
कपीकेत शोध घेत त्रीकूटांत बैसला ॥
गड्गडी दिसेचि ना बुझेल कोण कैसला
वळावळी चळाचळी विशाळ ज्वाळ जैसला ॥ ३ ॥
काळदंडसे प्रचंड ते वितंड जातसे
भारभार राजभार पुच्छमार होतसे ॥
पाडिले पछाडिले रुधीर-पूर व्हातसे
दैत्य बोलती बळें पळोन काय घ्यातसे ॥ ४ ॥
कोळ-कूट तें त्रिकूट धूट धूट ऊठिलें
दाट थाट लाट लाट कूट कूट कूटिलें ॥
घोर मार ते सुमार लूट लूट लूटिले
चिर्डिले चि घर्डिले चि फूट फूट फूटले ॥ ५ ॥
दाट थाट आट घाट तें कपाट घातलें
सर्व रोध ते निरोध थोर दुःख पावले ॥
सैन्य कष्ट त्यासि कष्ट कर्करून बांधिले
थोर घात त्यास पात चर्फडीत चेंदले ॥ ६ ॥
वज्र पुच्छ त्यासि तुच्छ मानिलें निशाचरीं
सर्व ही खणाखणाट ऊठिले घरोघरीं
फुटे चि ना तुटे चि ना समस्त भागले करीं
लट्लटीत कांपती बहूत धाक अंतरीं ॥ ७ ॥
थोर थोर दूर दूर दाट दाट दाटले
कोट मस्त तंग बस्त थाट थाट थाटले ॥
मंदिरीं घरोघरीं अचाट पुच्छ वाटलें

---

१७. शिराणीचें किरण=आवडीचें उड्डाण. १८ तोक=बालक. १९ रुधिर=रक्त. २०. काळकूट=विष. २१. निशाचर=राक्षस.

दैत्य नासतो घसा सकाट काट काटले ॥ ८ ॥
हात पाय मान मौंज वोढितें पछाडितें
अडचणींत अड्कऊनि पीळ पेंच काढितें ॥
लोहदंडसें अखंड राक्षसांसि ताडितें
मूळ जाळ व्यैाळ जाळ दैत्य-कूळ नाडितें ॥ ९ ॥
थोर धाक येक हाक त्रीकुटांत पावले
घरोघरीं वळ्वळी पुढें उदंड ऊरलें ॥
बैसले उदंड दैत्य तें सभेत घूसले
सभा विटंबिली बळें चि कोणसे न सूचलें ॥ १० ॥
देहमात्र येक सूत्र थोर यंत्र हाललें
पुरोनि ऊरले बळें सभेमध्यें चि चालिले ॥
रत्नदीप तेल-दीप तेज सर्व काढिलें
लाटि कूटि धामधूम पाडिले पछाडिले ॥ ११ ॥
गुप्तरूप मारुती दशाननाकडे भरे ।
मुगूट पाडिला शिरीं कठोर वज्र ठासरे ॥
सभा विटंबिली बळें चि गर्गरीत वावरे ।
बलाढ्य दैत्य मारिले कठीण पुच्छ नावरे ॥ १२ ॥
हस्तमार दैत्यमार दंडमार होतसे ।
लंडसे कलंडले उलंडिले चि भंडसे ॥
येत येत पुच्छकेत दैत्य सर्व बोलती ।
गळीत बैसले भुमी न बोलती न चालती ॥ १३ ॥
स्वप्नहेत सौख्य देत दैत्य-घात भावला ।
रुद्र हा उठावला कुडावयासि पावला ॥
जाळिलें त्रिकूट नीट आपटून रावणी ।
राक्षसांसि थोर दुःख ऊसनें ततक्षणीं ॥ १४ ॥
दीनरूप देव सर्व हें स्वरूप पाहिलें ।
कळवळून अंतरीं रघूत्तमासि बाहिलें ॥
एक वीर तोष धीर थोर धीर ऊठला ।
तोष तोष तो विशेष अंतरींच दाटला ॥ १५ ॥
उदंड देव आटिले तयासि भीम आटितो ।

---

२२. माज=कंबर ( सं० मध्य. ) २३. व्याळ=साप. २४. पुच्छकेत=पुच्छध्वज. २५ रावणी=रावणपुत्र अक्ष ( अखया ).

रामदूत वात-सूत लाटि लाटि लाठितो ॥
ऊठ आमुचे समस्त कूट कूट कूटितो ।
धूट धूट दैत्य त्यास लूट लूट लूटितो ॥ १६ ॥
समस्त दैत्य आळितो बळें त्रिकूट जाळितो ।
पुरांत गोपुरें बरीं निशाचरांसि वाळितो ॥
उदंड अग्नि लाविला बहू बळें उठावला ।
कडाडिला तडाडिला भडाडिला धडाडिला ॥ १७ ॥
उदंड जाळिलीं घरें कितेक भार खेचरें ।
किलाल धांवती भरें सुरांस वाटलें बरें ॥
उदंड दैत्य धोवडी तयांत पुच्छ भोवडी ।
कडाकडी खडाखडी गडागडी धडाधडी ॥ १८ ॥
बळें चपेट मारिला उदंड दैत्य हारिला ।
तरारिला थरारिला भयंकरू भरारिला ॥
गद्‌गदी तनू वितंड सागरीं सरारिला ।
जानकीस भेटला प्रभूकडे सरारिला ॥ १९ ॥
काळसे विशाळ दैत्य त्यांत एकला भरे ।
थोर धाक एक हाक काळ-चक्र वावरे ॥
शक्ति शोधिली बळें चि भव्य देखिले धुरे ।
वानरांसहीत रामदास भेटला त्वरे ॥ २० ॥
इतिश्री भीमरूपि-स्तोत्र संपूर्ण ॥ ७ ॥

८

भुवन-दहन-काळीं काळ विकाळ जैसा ।
सकळ गिळित ऊभा भासला भीम तैसा ॥
दुपट कपिंत झोंके झोंकिली मेदिनी हे ।
तळवट धरि धाकें धोकली नाउं पाहे ॥ १ ॥
गिरिवरुनि उडाला तो गिरी गुप्त झाला ।
घसरत दश गांवें[२६] भूमिके माजि गेला ॥
उडति झडझडाटें वृक्ष हे नेट-पाटें ।
पडति कडकडाटें अंग वातें धुदाटे ॥ २ ॥
थरथरित थरारी वज्र लांगूल जेव्हां ।
गरगरित गरारी सप्त पाताळ तेव्हां ॥

---

२६ गांव=योजन.

फणिवँर कँमठाचे पृष्ठिशीं आंग घाली ।
तगटित पवनाची झेंप लंकेसि गेली ॥ ३ ॥
थरकत धरणी हे हाणतां वज्र-पुच्छें ।
रगडित रणरंगीं राक्षसें तृण तुच्छें ॥
सहज रिपु दळाचा थोर संहार केला ।
अवघड गड लंका शीघ्र जाळून आला ॥ ४ ॥
सहज करतळें जो मेरु-मंदार पाडी ।
दशवदन रिपू हे कोण कीती बराडी ॥
अगणित गणवेना शक्ति काळासि हारी ।
पवन-तनुज पहा पूर्ण रुद्रावतारी ॥ ५ ॥
इतिश्री भीमरूपिस्तोत्र संपूर्ण ॥ ८ ॥

९

रुघूशी परी मूर्ति हे हाटकाची । करावी तथा मारुता-नाटकाची ॥
असावी सदां ताइता माजि दंडी । समारंगणीं पाठ दीजे उदंडी ॥ १ ॥
ठसा हेमधातू वरी वायु-सूतू । तथा ताइताचे परी रौप्य-धातू ॥
तयाची पुजा मंदवारीं करावी । बरी आवडी आर्त पोटीं धरावी ॥ २ ॥
स्वधामासि जातां प्रभू रामराजा । हनूमंत तो ठेविला या चि काजा ॥
सदां सर्वदा रामदासासि पावे । खळीं गांजितां ध्यान सोडून धांवे ॥ ३ ॥
इतिश्री भीमरूपि-स्तोत्र संपूर्ण ॥ ९ ॥

१०

चपळ ठाण विराजतसे बरें । परम सुंदर तें रुप साजिरें ॥
धगधगीत बरी उटि सिंदुरें । निकट दास कपी विर हें खरें ॥ १ ॥
कपी वीर जेठी उडे चारि कोटी । गिरी द्रोण दाटी तळहातें उपाटी ॥
झपेटा लपेटी करी पुँच्छवेटी । त्रिकूटाचळीं ऊठवा वीर कोटी ॥ २ ॥
रघुविरा सँमिरात्मज भेटला । हरिजना भजनांकुर फूटला ॥
कपिकुळें सकळें मिनलीं बळें । रिपुदळें विकळे वडवानळें ॥ ३ ॥
कपीवीर तो लीन तल्लीन झाला । प्रसंगे चि पाहोनि सन्मूख आला ॥
हनूमंत हें पावला नाम तेथें । महीमंडळीं चालिले सर्व तेथें ॥ ४ ॥
नव्हे सौख्य हा भीम पूर्ण-प्रतापी । देहो आचळातुल्य हा काळरूपी ॥
पुढें देखतां दैत्य-कूळें दरारा । भुतें कांपती नाम घेतां थरारा ॥ ५ ॥

२७ फणिवर=शेष सर्प. २८ कमठ=कूर्म (कांसव). २९ हाटक=सोनें. ३० पुच्छवेटी =पुच्छाचा वेढा. ३१ समीर=वायु.

सिमा सांडिली भीमराजें विशाळें । बळें रेंटिलें दैत्य कृतांत-काळें ॥
गजामस्तकीं केसरीचा चपेटा । महावीर तैसा विभांडी त्रिकूटा ॥ ६ ॥

इतिश्री भीमरूपि-स्तोत्र संपूर्ण ॥ १० ॥

११

नमन गा तुज हें भिमराया । निज मती मज दे मज गाया ॥
तडाकितां तडकी तडकाया । भडकितां भडकी भडकाया ॥ १ ॥
हरुषला हर हा वरदानीं । प्रगटला नटला मज मानी ॥
वदविता वदनीं वदवीतो । पुरवितो सदनीं पदवीतो ॥ २ ॥
अवचितां चढला गड लंका । पळभरी न धरी मनिं शंका ॥
तडकितां तडकी तडकीतो । भडाकितां भडकी भडकीतो ॥ ३ ॥
खवळले रजनीचरभारे । भडाकितां तडके भडमारे ॥
अवचितां गरजे भुभुकारें । रगडिले मग कां दळ सारें ॥ ४ ॥
कितियका खरडी खुरडीतो । कितियका नरडी मुरडीतो ॥
कितियका चिरडी चिरडीतो । कितियका अरडी दरडीतो ॥ ५ ॥
महाबळी रजनीचर आले । भिम भयानकसे चि मिळाले ॥
रपटितां रपटी रपटेना । अपटितां अपटी अपटेना ॥ ६ ॥
खिजवितां खिजवी खिजवेना । झिझवितां झिजवी झिजवेना ॥
रिझवितां रिझवी रिझवेना । विझवितां विझवी विझवेना ॥ ७ ॥
झिडकितां झिडकी झिडकेना । तडाकितां तडकी तडकेना ॥
फडकितां फडकी फडकेना । कडकितां कडकी कडकेना ॥ ८ ॥
दपटितां दपटी दपटेना । झपटितां झपटी झपटेना ॥
लपटितां लपटी लपटेना । चपटितां चपटी चपटेना ॥ ९ ॥
दवडितां दवडी दवडेना । घडवितां घडवी घडवेना ॥
बडवितां बडवी बडवेना । रडवितां रडवी रडवेना ॥ १० ॥
कळवितां कळवी कळवेना । खवळितां खवळी खवळेना ॥
जवळितां जवळी जवळेना । मवळितां मवळी मवळेना ॥ ११ ॥
चढवितां चढवी चढवेना । झडवितां झडवी झडवेना ॥
तडवितां तडवी तडवेना । गडवितां गडवी गडवेना ॥ १२ ॥
तगटितां तगटी तगटेना । झगटितां झगटी झगटेना ॥
लगटितां लगटी लगटेना । झकटितां झकटी झकटेना ॥ १३ ॥
टणकितां टणकी टणकेना । ठणकितां ठणकी ठणकेना ॥
दणागितां दणगी दणगेना । फुणगितां फुणगी फुणगेना ॥ १४ ॥

चळवितां चळवी चळवेना । छळवितां छळवी छळवेना ॥
जळवितां जळवी जळवेना । टळवितां टळवी टळवेना ॥ १५ ॥
घसरितां घसरी घसरेना । विसरितां विसरी विसरेना ॥
मरवितां मरवी मरवेना । हरवितां हरवी हरवेना ॥ १६ ॥
उलथितां उलथी उलथेना । कलथितां कलथी कलथेना ॥
उडवितां उडवी उडवेना । बुडवितां बुडवी बुडवेना ॥ १७ ॥
बुकलितां बुकली बुकलेना । धुमसितां धुमसी धुमसेना ॥
धरवितां धरवी धरवेना । सरवितां सरवी सरवेना ॥ १८ ॥
झडपितां झडपी झडपेना । दडपितां दडपी दडपेना ॥
तटवितां तटवी तटवेना । फटवितां फटवी फटवेना ॥ १९ ॥
वळवितां वळवी वळवेना । पळवितां पळवी पळवेना ॥
ढळवितां ढळवी वळवेना । लळवितां लळवी लळवेना ॥ २० ॥
घुरकितां घुरकी घुरकावी । थरकितां थरकी थरकावी ॥
भरकितां भरकी भरकावी । झरकितां झरकी झरकावी ॥ २१ ॥
परम दास हटी हटवादी । लगटला उतटी तटवादी ॥
शिकवितां शिकवी शिकलावी । दपटितां दपटून दटावी ॥ २२ ॥
इतिश्री भीमरूपिस्तोत्र संपूर्ण ॥ ११ ॥

१२

भिम भयानक तो शिक लावी । भडकला सकळां भडकावी ॥
वरतरू वरता तडकावी । बळकटां सकळां धडकावी ॥ १ ॥
सकळ ते रजनी-चर-भारे । सकट बांधत पुच्छ उभारे ॥
रडत बोलति वीर च सारे । नदिसतां चि बळें भुभुकारे ॥ २ ॥
जळतसे त्रिकुटाचळ लंका । धरितसे रजनी-चर शंका ॥
उमजती उमजेवर घाला । अवचितां बुडवी सकळांला ॥ ३ ॥
कठिण मार विरांस न साहे । रुधिर-पूर महीवरि वाहे ॥
बहुत भूत भुतावळि आली । रणभुमीवरि येउनि घाली ॥ ४ ॥
अमर ते म्हणती विर आला । नवल हें पुरलें सकळाला ॥
उदित काळ बरा दिसताहे । विधि-विधान विधी मग पाहे ॥ ५ ॥
इतिश्रीभीमरूपि-स्तोत्र संपूर्ण ॥ १२ ॥

१३

बळें सर्व संहारिलें रावणाला । दिलें अक्षयी राज्य बीभीषणाला ॥
रघूनायकें देव ते मुक्त केले । अयोध्यापुरा जावया सिद्ध झाले ॥ १ ॥

पथा माजि कृष्णातिरीं रामराया । घडे राहणें स्नानसंध्या कराया ॥
सिता राहिली शीरटें गांव जेथें । रघूराज तो पश्चमेचे नि पंथें ॥ २ ॥
जप ध्यान पूजा करी रामराजा । तयाचे परी वीर सौमित्र वोजा ॥
स्मरेना देहीं चित्त ध्यानस्थ झालें । अकस्मात तें तोय अद्भूत आलें॥३॥
बळें चालिला ओघ नेटें भडाडां । नभीं धांवती लोट लाटा धडाडां ॥
नदी चालली राम ध्यानस्थ जेथें । बळें विक्रमें पावला भीम तेथें ॥ ४ ॥
उभा राहिला भीमरूपी स्वभावें । बळें तुंब तो तुंबिला दोन गांवें ॥
नदी एक वीभागली दोन्हि बाहें । ह्मणोनी तया नांव हें ऊर्णबाहे ॥५॥
सुखें लोटती देखतां रामलिंगा । बळें चालिली भोंवती कृष्ण गंगा ॥
परी पाहतां भीम तेथें दिसेना । उदासीन हें चित्त कोठें वसेना ॥ ६ ॥
हनूमंत पहावयालागिं आलों । दिसेना सखा थोर विस्मीत झालों ॥
तयावीण देवालय तें उदासें । जळांतून बोभाइलें रामदासें ॥ ७ ॥
मनांतील जाणोनि केला कुडावा । दिले भेटिचा जाहला थोर धावा ॥
बळें हांक देतां चि तैसा गडाडी । महामेघ जैसा गभीरू घडाडी ॥ ८ ॥
रघुराज वैकुंठ-धामासि गेले । तर्धी मारुती दास हे नीरवीले ॥
रघूनाथ ऊपासकाला प्रसंगे । सख्या मारुती पाव रे लागवेगें ॥ ९ ॥
प्रभूचें महा वाक्य त्वां साच केलें । ह्मणे दास हें प्रत्यया सत्य आलें ॥
जनामाजि हें सांगतां पूरवेना । अवस्था मनीं लागली हे सरेना ॥ १० ॥
इतिश्री भीमरूपि-स्तोत्र संपूर्ण ॥ १२ ॥

त्रयोदश स्तोत्रें समाप्त.

## पद रामदासकृत

सावधान सावधान । वाचे स्मरा नारायण ॥ ध्रु० ॥
दहा वर्षे बाळपण । वीस वर्षे तारुण्य ॥
अंगीं चढे मदन । तेव्हां कैचें साधन ॥ साव० ॥ १ ॥
तिसांची आली भर्ती । दारापुत्रां लागीं प्रीति ॥
तेथून उपजे भ्रांती । तेव्हां कैची स्वरूप प्राप्ती ॥ सा० ॥ २ ॥
चाळीस वर्षे झालीं । डोळां चाळशी आली ॥
नेत्रांस भुली पडली । जवळ असतां दिसेना ॥ सा० ॥ ३ ॥
पन्नास वर्षे झालीं । हलति दंताच्या पंगती ॥

१२ संत विजयांत हें स्तोत्र महिपतीनें ऊर्ण बाहु मारुतीचें म्हणून दिलें आहे.

श्यामवर्ण शुभ्र होती । त्याला म्हातारा म्हणती ।। सा० ।। ४ ।।
साठींत बुद्धि नाठी । हातीं घेउनी काठी ।।
बसवसुनी लागे पाठी । त्याला हांसती कारटीं ।। सा० ।। ५ ।।
सत्तरीची हे रचना । उठतां बैसवेना ।।
बैसतां उठवेना । दिसतसे दैन्यवाणा।। सा० ।। ६ ।।
चार विसा मिळुनि ऐशी । मग तो झाला अपेशी ।।
जिव करी कासाविशी । जिवनावीण मासोळी जैशी ।। सा० ।। ७ ।।
वर्षें झालीं नव्वद । बोलवेना एक शब्द ।।
अस्तुरी दारा प्रसिद्ध । देवा तोंडि यांचा संबंध ।। सा० ।। ८ ।।
शतमान पुरुष झाला । झाला परी वायां गेला ।।
रामदास याच्या बोला । वेगीं सावध जाहला ।।
सावधान सावधान । वाचे स्मरा नारायण ।। ९ ।।

## रामदासकृत-अष्टकें.[1]

### करुणाष्टक.

अनुदिनि अनुतापें तापलों रामराया ।
परम दिन दयाळा नीरसीं मोह-माया ।।
अचपळ मन माझें नावरे आंवरीतां ।
तुजविण शिण होतो धांवरे धांव आतां ।। १ ।।
भजन रहित रामा सर्व ही जन्म गेला ।
स्वजन-जन-धनाचा व्यर्थ म्यां स्वार्थ केला ।।
रघुपति मति माझी आपुलीशी करावी ।
सकळ त्यजुनि भावें कांस तूझी धरावी ।। २ ।।
विषय-जनित सूखें सूख होणार नाहीं ।
तुजविण रघुनाथा ओखटें सर्व कांहीं ।।
रघुकुळ-टिळकारे हीत माझें करावें ।

---

१. रामदासकृत श्लोकबद्ध-अष्टकांचा उल्लेख पुढील लेखांत महिपतीनें केला आहे:—
गद्य-पद्य बोलिले फार । श्लोक अष्टकें प्रकार ।।
कृष्ण चरित्रें गाइलीं सार । प्रेमासि पार असेना ।। १७ ।।
संतविजय—अ० २२ वा.

दुरितें दुरि रहावें म्यां स्वरूपीं भरावें ॥ ३ ॥
तन-मन-धन माझें राघवा ! रूप तूझें ।
तुजविण मज वाटे सर्व संसार बोझें ॥
प्रचलित न करावी सर्वथा बुद्धि माझी ।
अचल भजन लीला लागली आस तूझी ॥ ४ ॥
चपल-पण मनाचें मोडितां मोडवेना ।
सकळ-स्वजन-माया तोडितां तोडवेना ॥
घडि घडि विघडे हा निश्चयो अंतरींचा ।
ह्मणवुनि करुणा हे बोलतों दीन वाचा ॥ ५ ॥
जळत हृदय माझें जन्म कोटयानु कोटी ।
मजवरि करुणेचा राघवा पूर लोटीं ॥
तळमळ निवर्वी रे राम कारुण्य-सिंधू ।
षड्रिपु-कुळ माझें तोडिं याचा समंधू ॥ ६ ॥
तुजविण करुणा हे कोण जाणेल माझी ।
शिणत शिणत पोटीं पाहिली वाट तूझी ॥
झडकरि झड घालीं धांव पंचानना रे ।
तुजविण मज नेती जंबुकी वासना रे ॥ ७ ॥
सबळ जनक माझा राम लावण्य-पेटी ।
ह्मणवुनि मज पोटीं लागली आस मोठी ॥
दिवस गणित बोटीं प्राण ठेवोनि कंठीं ।
अवचट मन भेटी होत घालीन मीठी ॥ ८ ॥
जननि-जनक-माया लेंकरूं काय जाणे ।
पय न लगत मुखें हाणितां वत्स नेणें ॥
जलधर-कण-आशा लागली चातकासी ।
हिमकर अवलोकी पक्षिया भूमि-वासी ॥ ९ ॥
तुजविण मज तैसें जाहलें रामराया ।
विलग विषम काळीं सांडिती सर्व माया ॥
सकळ-जन-सखा तूं स्वामि आणीक नाहीं ।
विषय वमनें जैसें त्यागिलें सर्व कांहीं ॥ १० ॥

---

२. दुरित=पाप. ३. षड्रिपु=काम, क्रोध, मद, मत्सर, लोभ, अहंकार. ४. पंचानन=सिंह.
५. जंबुकी=कोल्ही. ६. जलधर=मेघे. ७. हिमकर=चंद्र. ८. पक्षि=चकोरपक्षी. ९ वमन=ओक.

स्वजन-जन-धनाचा कोण संतोष आहे ।
रघुपति-विण आतां चित्त कोठें न राहे ॥
जिवलग जिव घेती प्रेत सांडोनि देती ।
विषय सकळ नेती मागुता जन्म देती ॥ ११ ॥
सकळ-जन भवाचें आथिलें वैभवाचें ।
जिवलग मज कैचे चालती हें च साचें ॥
विलग विषम काळीं सांडिती सर्व माळी ।
रघुविर सुख-दाता सोडवी अंतकाळीं ॥ १२ ॥
सुख सुख ह्मणतां तें दुःख ठाकोनि आलें ।
भजन सकळ गेलें चित्त दुश्चित्त झालें ॥
भ्रमित मन कळेना हीत तें आकळेना ।
परम कठिण देहो देह-बुद्धी गळेना ॥ १३ ॥
उपरति मज रामीं जाहली पूर्ण-कामीं ।
सकळ-जन-विरामीं राम-विश्राम-धामीं ॥
घडि घडि मन आतां राम-रूपीं भरावें ।
रघुकुळटिळका[१०] रे आपुलेंसें करावें ॥ १४ ॥
जळचर जळ-वासी नेणती त्या जळासी ।
निशिदिनिं तुजपाशीं चूकलों गूणराशी ॥
भुमिधर[११]-निगमांसी[१२] वर्णवेना तयांशीं ।
सकळ-भुवन-वासी भेटि दे रामदासीं ॥ १५ ॥

अष्टक २.

असंख्यात ते भक्त होऊनि गेले । तिहीं साधनांचे बहू कष्ट केले ॥
नव्हे कार्य-कर्ता भुमी भार झालों । तुझा दास मीं व्यर्थ जन्मास आलों ॥ १ ॥
बहू दीस ते तापसी तीर्थ-वासी । गिरी-कंदरीं भेटि नाहीं जनासी ॥
स्थिती ऐकतां थोर विस्मीत झालों । तुझा दास मीं व्यर्थ जन्मास आलों ॥२॥
सदा प्रेमळासी तया भेटलासी । तुझ्या दर्शनें स्पर्शनें पुण्यराशी ॥
अहंता-मदें शब्द-ज्ञानें बुडालों । तुझा दास मीं व्यर्थ जन्मास आलों ॥ ३ ॥
तुझ्या प्रीतिचे दास जन्मास आले । असंख्यात ते कीर्ति बोलोनि गेले ॥
बहू धारणा थोर चक्कीत झालों । तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलों ॥ ४ ॥
बहूसाल देवालयें हाटकाचीं[१३] । रसाळा कळा लाघवें नाटकाचीं ॥
पुजा देखतां जड जीवीं गळालों । तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलों ॥ ५ ॥

---

१०. रघुकुळ-टिळक=रघु-वंश-श्रेष्ठ ११. भुमिधर=शेष. १२. निगम=वेद. १३. हाटक=सोनें.

कितीकीं देहे त्यागिले तूज लागीं । पुढें जहालें संगतीचा विभागी ॥
देहे दुःख होतां चि वेगें पळालों । तुझा दास मीं व्यर्थ जन्मास आलों ॥ ६ ॥
किती योग-मूर्ति किती पुण्यमूर्ती । किती धर्मसंस्थापना अन्न-शांती ॥
परस्तावलों कावलों तप्त झालों । तुझा दास मीं व्यर्थ जन्मास आलों ॥ ७ ॥
सदां सर्वदां राम सोडोनि कामीं । समर्था तुझे दास आम्ही निकामी ॥
बहु स्वार्थ-बुद्धी नुरे कष्टवालों । तुझा दास मीं व्यर्थ जन्मास आलों ॥ ८ ॥

अष्टक ३.

नसे भक्ति ना ज्ञान ना ध्यान कांहीं । नसे प्रेम हें राम-विश्राम नाहीं ॥
असा दीन अज्ञान मी दास तूझा । समर्था जनीं घेतला भार माझा ॥ १ ॥
रघूनायका जन्म-जन्मांतरींचा । अहंभाव छेदोनि टाकीं दिनाचा ॥
जनीं बोलती दास या राघवाचा । परी अंतरीं लेश नाहीं तयाचा ॥ २ ॥
रघूनायका दीन हातीं धरावें । अहंभाव छेदोनियां उद्धरावें ॥
अगूणी तयालागिं गूणी करावें । समर्थें भवसागरीं ऊतरावें ॥ ३ ॥
किती भार घालूं रघूनायकाला । मज कारणें शीण होतील त्याला ॥
दिना-नाथ हा संकटीं धाव घाली । तयाचेनि योगें सर्व काया निवाली ॥ ४ ॥
मनें कूवसा राम कैवल्यदाता । तयाचेनि हे फीटली सर्व चिंता ॥
समर्था तया काय उत्तीर्ण व्हावें । सदां सर्वदां नाम वाचे वदावें ॥ ५ ॥
दिनाचें उणें दीसतां लाज कोणा । जगीं दास दीसे तुझा दैन्य-वाणा ॥
शिरीं स्वामि तूं राम पूर्ण-प्रतापी । तुझा दास पाहीं सदा शीघ्र कोपी ॥ ६ ॥

अष्टक ४.

उदासीन हे वृत्ति जीवीं धरावी । अती आदरें सर्व सेवा करावी ॥
सदा प्रीति नामीं तुझे गूण गातां । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ १ ॥
तुझें रूप हें लोचनीं म्यां पहावें । तुझे गूण गातां मनाशीं रहावें ॥
उठो आवडी भक्ति-पंथें चि जातां । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ २ ॥
मनीं वासना भक्ति तूझी करावी । कृपाळू-पणें राघवें पूरवावी ॥
वसावें मदीयांतरीं नाम घेतां । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ ३ ॥
सदां सर्वदां योग तूझा घडावा । तुझे कारणीं देह माझा पडावा ।
उपेक्षूं नको गूणवंता अनंता । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ ४ ॥
भवें तापलों प्रीति-छाया करावी । कृपासागरा सर्व चिंता हरावी ॥
मला संकटीं सोडवावें समर्था । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ ५ ॥
नको द्रव्य दारा नको वेरझारा । नको मानसीं ज्ञान-गर्वें फुगारा ॥
सगूणीं मला लावि रे भक्ति-पंथा । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ ६ ॥

मनीं कामना कल्पना ते नसावी । कुबुद्धी कुडी वासना नीरसावी ॥
न संशयो तोडिं संसार चिंता । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ ७ ॥
समर्था-पुढें काय मागूं कळेना । दुराशा मनीं बैसली हे ढळेना ॥
पुढें संशयो नीरसीं सर्व चिंता । रघूनायका मागणें हें चि आतां ॥ ८ ॥
ब्रिदा-कारणें दीन हातीं धरावें । म्हणे दास भक्तांसि रे उद्धरावें ॥
तुटे ब्रीद आम्हासि सोडोनि जातां । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ ९ ॥

अष्टक ५.

युक्ति नाहीं बुद्धि नाहीं । विद्या नाहीं विवेकिता ॥
नेणता भक्त मीं तूझा । बुद्धि दे रघुनायका ॥ १ ॥
बोलतां चालतां येना । कार्य-भाग कळे चि ना ॥
बहूत पीडिलों लोकीं । बुद्धि दे रघुनायका ॥ २ ॥
तुझा मीं टोणपा झालों । कष्टलों बहुतां परी ॥
सौख्य तें पाहतां नाहीं । बुद्धि दे रघुनायका ॥ ३ ॥
नेटकें लिहितां येना । वाचितां चुकतों सदां ॥
अर्थ तो सांगतां येना । बुद्धि दे रघुनायका ॥ ४ ॥
प्रसंग वेळ तर्केना । सुचेना दीर्घ सूचना ॥
मैत्रिकी राखितां येना ॥ बुद्धि दे रघुनायका ॥ ५ ॥
संसार नेटका नाहीं । उद्वेगो वाटतो जिवीं ॥
परमार्थू कळेना कीं । बुद्धि दे रघुनायका ॥ ६ ॥
उदास वाटतें जीवीं । आतां जावें कुणीकडे ॥
तूं भक्त-वत्सला रामा । बुद्धि दे रघुनायका ॥ ७ ॥
काया-वाचा-मनो-भावें । तुझा मी म्हणवीतसें ॥
हे लाज तुजला माझी । बुद्धि दे रघुनायका ॥ ८ ॥
सोडवील्या देव-कोटी । भूभार फेडिला बळें ॥
भक्तांसि आश्रयो मोठा । बुद्धि दे रघुनायका ॥ ९ ॥
भक्त ऊदंड तुम्हाला । आम्हाला कोण पूसतें ॥
ब्रीद हें राखणें आधीं । बुद्धि दे रघुनायका ॥ १० ॥
आशा हे लागली मोठी । दयाळू वा दया करीं ॥
आणखी नलगे कांहीं । बुद्धि दे रघुनायका ॥ ११ ॥
उदंड ऐकिली कीर्ति । पतीत-पावना प्रभो ॥
मी एक रंक[१४] दुर्बुद्धि । बुद्धि दे रघुनायका ॥ १२ ॥

---

१४. रंक=भिकारी.

रामदास म्हणे माझा । संसार तुज लागला ॥
संशयो लागतो पोटीं । बुद्धि दे रघुनायका ॥ १३ ॥

अष्टक ६.

समाधान साधू-जनाचेनि योगें । परी मागुतें दुःख होतें वियोगें ॥
घडीनें घडी क्षीण अत्यंत वाटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ १ ॥
घरें सुंदरें सौख्य नाना-परीचें । परी कोण जाणेल हें अंतरीचें ॥
मनीं आठवीतां चि तो कंठ दाटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ २ ॥
बळें लावितां चित्त कोठें जडेना । समाधान तें कांहिं केल्या पडेना ॥
न ये धीर नेत्रीं सदां नीरें लोटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ ३ ॥
अवस्था मनीं लागली काय सांगों । गुणीं गुंतला हेत कोणासी सांगों ॥
बहूसाल भेटावया प्राण फूटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ ४ ॥
कृपाळू-पणें भेटि दे राम-राया । वियोगें तुझ्या सर्व व्याकूळ काया ॥
जनांमाजि लौकीक हा ही न सूटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥५॥
अहा रे विधी त्वां असें काय केलें । पराधीनता पाप माझें उदेलें ॥
बहूतां-मध्यें तूकतां तूक तूटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ ६ ॥
समार्था मनीं सांडि माझी नसावी । सदां सर्वदां भक्तचिंता असावी ॥
घडेना तुझा योग हा प्राप्त कोठें । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ ७ ॥
अखंडीत हे सांग सेवा घडावी । न होतां तुझी भेटि काया पडावी ॥
दिसंदीस आयुष्य हें व्यर्थ लोटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ ८ ॥
भजों काय सर्वा परी हीन देवा । करूं काय रे सर्व माझा चि ठेवा ॥
म्हणों काय मीं कर्मरेखा न लोटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ ९ ॥
म्हणे दास मीं वाट पाहें दयाळा । सदा सर्वदा भक्त-पाळा भुपाळा ॥
पहावें तुला हें जिवीं आर्त मोठें । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥१०॥
तुझा भाट मी वर्णितों रामराया । सदा सर्वदा गाय ब्रीदें-सवाया ॥
महाराज दे अंगिचें वस्त्र आतां । बहू जीर्ण झाली देहे-बुद्धि-कंथा ॥११॥

आरती.

नाना देवीं देव एक वीराजे । नाना-नाटक-लीला-सुंदर रूप साजे ॥
तीर्थीं क्षेत्रीं अभिनव गति माजे । अगाध महिमा पिंडीं ब्रह्मांडीं गाजे ॥
जयदेव जयदेव जय आत्मारामा । निगमागम शोधीतां न कळे गुण-सीमा ॥ १ ॥
बहु रूपी बहुगूणी बहुतां काळाचा । हरिहरब्रह्मादीक देव सकळांचा ॥
युगानुयूगीं आत्माराम आमुचा । दास म्हणे महिमा न बोलवे वाचा ॥
॥ जय देव जय० ॥ २ ॥

---

१५. नीर=पाणी ( अश्रु ).

## श्रीरामदासस्वामीकृत

# पंचीकरण.

---

**ओव्या.**

मूळीं ब्रह्म निर्विकार[1] । निर्गुण अनंत अव्यय[2] अपार ॥
जैसें गगन घटमठादिअंतर[3] । व्यापोनि असे अलिप्त ॥ १ ॥
तेथें अहं[4] असें स्फुरण झालें । त्यास माया ऐसें नांव पडिलें ॥
रूप शोधूनियां पाहिलें । तों चंचल वायुस्वरूपी ॥ २ ॥
तेथें भेद दोन्ही असती । एक वायू दुसरी जाणीव जगज्ज्योती ॥
वायूस म्हणावें प्रकृती । सूक्ष्मजडत्व म्हणोनी ॥ ३ ॥
जाणीव म्हणजे जाणणें ज्ञान । त्यास ईश्वरत्व अभिधान[5] ॥
एवं प्रकृतिपुरुष[6][7]ओळखण । जाणीजे ऐशी ॥ ४ ॥
त्यासी च म्हणावें षड्गुणेश्वर । प्रकृतीपुरुषाचा विचार ॥
अर्धनारीनटेश्वर । शिवशक्ती ॥ ५ ॥
एवं मूळ माया अवघी जाण । सकळ सृष्टीचें कारण ॥
बीजरूपें ओळखण । अष्टधा[8] प्रकृती ॥ ६ ॥
पंचभूतें तीन गुण । सूक्ष्मरूपें असती जाण ॥
जैसा बीजीं वृक्ष संपूर्ण । तैशी अष्टधा मूळ माया ॥ ७ ॥
मग ते चि गुणां प्रसवली । म्हणोनि क्षोभिनी बोलिली ॥
ॐकाराची रचना झाली । तेथूनियां ॥ ८ ॥
अकार उकार मकार । अर्धमात्रा तो ईश्वर ॥
एवं सूक्ष्माचा विचार । विवेकानुभवें[9] जाणावा ॥ ९ ॥
पिंड कार्य ब्रह्मांड कारण । उभयांस मूळ माया अष्टधा जाण ॥
तेथें शिवशक्तींचें लक्षण । पिंडावरून जाणीजे ॥ १० ॥
नरनारी दोन्ही भेद । पिंडीं दिसती प्रसिद्ध ॥
मूळीं नसतां विशद[10] । होतील कैसीं ॥ ११ ॥
एवं बीजरूप मूळ माया । तेथून झाली गुणमाया ॥
सत्वगुण विष्णुदेह धरूनियां । पालन करी सृष्टीचें ॥ १२ ॥

---

१ विकार=बदल, फेरफार. २ व्यय=नाश. ३ घटमठादिअंतर=मडकें व घर यांच्या आंतील पोकळी. ४ अहं=मी. ५ अभिधान=नांव. ६ प्रकृति=माया (फसवणूक). ७ पुरुष=परमात्मा. ८ अष्टधा=आठ प्रकारची. ९ विवेक=विचार. १० विशद=स्पष्ट.

रजोगुणीं ब्रह्मा उत्पत्ति करी ॥ तमोगुणी शंकर संहारी ॥
हीं त्रिगुणतत्वें शास्त्रीं । सूक्ष्मरूपें निरूपिलीं ॥ १३ ॥
सत्वगुणीं अतःकरणपंचक । रजीं ज्ञानेंद्रियकर्मेंद्रियप्राणपंचक ॥
तमोगुणीं विषयपंचक । तो ही विस्तार ऐका ॥ १४ ॥
पृथ्वीपासून झाला गंध ॥ एवं पंच भूतें तमोगुणापासून प्रसिद्ध ॥
जडत्व पावलीं विविध । तें निरूपण ऐका ॥ १५ ॥
आकाश म्हणिजे अंतरात्मा जाण । वायूचें चंचळ लक्षण ॥
तेज जाणावें उष्ण । आप ओलें जाणावें ॥ १६ ॥
आप आळोन झाली पृथ्वी । ते नाना बीजरूप जाणावी ॥
पुढें चारी खाणी ब्रह्मदवीं । निर्माण केल्या ॥ १७ ॥
पृथ्वीपासून ओषधी निर्माण । ओषधीपासून अन्न जाण ॥
अन्ना पासूनि रेत प्रमाण । रेता पासूनि प्राणी ॥ १८ ॥
मूळीं बीजरूपी अष्टधा प्रकृती । ते पिंडीं प्रत्यक्ष दिसती ॥
नरनारीभेद श्रोतीं । अनुभवें जाणावा ॥ १९ ॥
पिंडीं जाणीव प्राण । एक चि परि भासती भिन्न ॥
तैसें मूळ मायेचें लक्षण । पिंडावरून जाणिजे ॥ २० ॥
ते पिंडीं देह चारी जाण । स्थूळ सूक्ष्म कारण महाकारण ॥
ब्रह्मांडीं विराट हिरण्य । अव्याकृत मूळ माया ॥ २१ ॥
यावरी अन्वय जाणावा । व्यतिरेक साक्षित्वें निरसावा ॥
दोहिंचा विचार अनुभवें पहावा । श्रोते जनीं ॥ २२ ॥
देह अवस्था अभिमान स्थान । तमो मात्रा गुणशक्ती जाण ॥
पिंडास संज्ञा बत्तीस जाण । ब्रह्मांडीं ही यासमतुल्य खुणे ॥ २३ ॥

रथोद्धता वृत्त.

कर्म प्राण विषयेंद्रियपंचक । पंच भूत गुण पांच पंचक ॥
पिंड देहद्वय तत्व बोलिलें । ब्रह्मकोश सम तुल्य चालिलें ॥ २४ ॥

ओंव्या.

पिंडीं सूक्ष्म लिंग शरीर । बीजरूप तेथूनि स्थूळाचा विकार ॥
प्रथम लिंगदेहाचा विस्तार । बोलिजेल ॥ २३ ॥

वाक्य.

पंचीकृत अन्वय पांच पंचक; स्थूळ अपंचीकृत;
भूतां पासून विषय; तेथून पांच पंचकें झालीं;
तीं विषयीं मिळोन भूतीं सांठविलीं; सूक्ष्म देह कर्दम.

आकाश, वायु, तेज, आप, पृथ्वी.

आकाशः—अंतःकरण, मन, बुद्धि, चित्त, अहंकार.

वायुः—व्यान, प्राण, उदान, समान, अपान.

तेजः—श्रोत्र, त्वचा, चक्षु, जिव्हा, घ्राण.

आपः—वाचा, पाणी, पाद, शिश्न, गुद.

पृथ्वीः—शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध.

॥ क्रिया ॥ लिंग देह १, अवस्था स्वप्न २, तैजस अभिमान ३, कंठ स्थान ४, भोग प्रविक्त ५, मात्रा उकार ६, सत्व गुण ७, इच्छा शक्ति ८.

ऐसे हे सूक्ष्म देह जाणावे । ते तों आपण नव्हे स्वभावें ॥
साक्षित्वें निरसितां व्हावें । आपण भिन्न ॥ २४ ॥

**स्थूळ देह.**

आकाशः—काम, क्रोध, शोक, मोह, भय.

वायुः—चलन, वलन, प्रसरण, आकुंचन, निरोधन.

तेजः—क्षुधा, तृषा, आलस्य, निद्रा, मैथुन.

आपः—शुक्र, शोणित, लाळ, मूत्र, स्वेद.

पृथ्वीः—अस्थि, मांस, त्वचा, नाडी, रोम.

देह स्थूळ १, अवस्था जागृती २, विश्वात्मा साभिमान ३, नेत्र स्थान ४, स्थूळ भोग ५, मात्रा अकार ६, रजोगुण ७, क्रिया शक्ति ८.

ऐसें हें स्थूळ शरीर । येथें असती षड्विकार ॥
पंच भूतांचे गुणप्रकार । प्रत्यक्ष दिसती ॥ २५ ॥
पिंडीं षट्चक्रें असती । तीं ऐका शास्त्र संमतीं ॥
अनुक्रमें सांगिजेती । तीं ओळखून सांडावीं ॥ २६ ॥
प्रथम चक्र आधार । गुदस्थानीं बिढार[1] ॥
चतुर्दळ रक्तवर्ण ऋषी ईश्वर । देव गणपती बोलिजे ॥ २७ ॥
तेथें डाकिनी शक्ति । चारि अंगुल उन्नती ॥
चारी अक्षर वासांती जाणीजेती । अजपाजप शत सहा ॥ २८ ॥
आतां चक्र स्वाधिष्ठान । तयाचें लिंग स्थान ॥
तो वर्ण संकोचन । ऋषी सूर्य ॥ २९ ॥
ब्रह्मा देव सावित्री शक्ति । षड्दल अक्षर वाल परिमिती ॥
साहा अंगुल उन्नती । अजपाजप सहस्र साहा ॥ ३० ॥
आतां तिसरें चक्र मणिपुर । तयाचें नाभिस्थानीं बिढार ॥

---

[1] बिढार=स्थान, जागा.

तें नीळवर्ण दशदळ देव रमावर । लक्ष्मी शक्ति ॥ ३१ ॥
ऋषी तेथींचा पवन । दाहा अक्षर डफ जाण ॥
दशांगुळ उंची जयाची खूण । अजपाजप साहा सहस्र ॥ ३२ ॥
चौथें हृदयस्थानीं चक्र अनुहत । अग्निवर्ण देव उमाकांत ॥
उमा शक्ति ऋषी अमरनाथ[१२] । द्वादशदळ द्वादशाक्षर कंठ जाणिजे॥ ३३॥
अजपाजप साहा सहस्र । आतां पांचवें विशुद्ध चक्र ॥
तयाचें कंठ स्थान वर्ण शुभ्र । जीव लिंग देव ॥ ३४ ॥
अग्नि ऋषी अविद्या शक्ती । षोडशदल कंठ अक्षरें सोळा असती ॥
अजपाजप सहस्र एक म्हणती । आतां अग्नि साहवें ॥ ३५ ॥
भ्रूस्थानीं विद्युल्लता वर्ण । दोन दळें इडा पिंगळा शुषुम्ना नाडी जाण ॥
गुरु परमहंस देव हंस ऋषी खुण । दोन्ही अक्षरें हक्ष ॥ ३६ ॥
अजपाजप सहस्र एक । फळ भोग मोक्षदायक ॥
हें षड्चक्राचें कौतुक । संकेतें बोलिलें ॥ ३७ ॥
आतां षड्चक्राचें मूळ अगोचर[१३] । अनंत प्रभार्णव मस्तक शिखर ॥
ब्रह्मांड तयापासून शरीर । चाल तेथें प्रेम देव ॥ ३८ ॥
ज्ञान शक्ती ज्ञान देव ऋषी । सहस्र एक जप अजपेसी ॥
अक्षरें दोन्ही सोऽहं तयासी । स्वयंज्योती म्हणती ॥ ३९ ॥
ऐशीं सप्त चक्रें मिळोन । एकवीस सहस्र साहशें जप जाण ॥
परंतु मुख्य प्रचीत श्वासोश्वासीं खुण । जाणीजे श्रोतीं ॥ ४० ॥
ऐसा स्थूळ देह जाणतां । आपण भिन्न तत्वतां ॥
जैसा धणी घरीं असतां । तो धणी गृह नव्हे ॥ ४१ ॥
या परी भिन्नपणें पहावें । साक्षित्वें अनुक्रमें निरसावें ॥
आतां या परी पहावें । कारण देह ॥ ४२ ॥
स्थूळ सूक्ष्म जीव बोलिला । तो कारण मिश्रित झाला ॥
अज्ञानयोगें जीव भूलला । जन्ममरण भोगी ॥ ४३ ॥

कारण देह १, अवस्था सुषुप्ति २, प्रज्ञाभिमान ३, हृदय स्थान ४, आनंद भोग ५, मकार मात्रा ६, तमोगुण ७, द्रव्यशक्ति ८.

ऐसा देह कारण । याचा जाणता आपण ॥
याची अनुभवाची खुण । प्रत्यक्ष सांगे ॥ ४४ ॥
सांगतां तो भिन्न झाला । साक्षित्वें कारण देह निरसिला ॥
आतां महा कारण बोलिला । जो देहत्रयास जाणता ॥ ४५ ॥

---

१२ अमरनाथ=इंद्र. १३ अगोचर=अगम्य.

महाकारण म्हणजे ज्ञान । ज्ञानें ओळखावें अज्ञान ॥
देहत्रयास भिन्न । महाकारण जाणिजे ॥ ४६ ॥

महाकारण १, अवस्था तूर्या २, प्रत्यगात्मा अभिमान ३, मूर्धिनस्थान ४, आनंदावभास भोग ५, अर्ध मात्रा ६, शुद्ध सत्वगुण ७, ज्ञान शक्ति ८.

ऐसा देह महा कारण । याचा जाणता आपण ॥
साक्षित्वें निरसितां जाण ।भिन्न झाला ॥ ४७ ॥

ब्रह्मांडींचे देह चार; विराट स्थूळ देह.

| तत्वें ५ | | वायु ५ | |
|---|---|---|---|
| काम | आकाश | चळन | स्वस्थ कोठें |
| क्रोध | सृष्टिइच्छा | वलन | वावटळ कोठें |
| शोक | संहार | प्रसरण | अष्ट दिक् |
| मोह | जनपीडा | निरोधन | समान |
| भय | काळ | आकुंचन | स्थिरत्व |

| तेजें ५ | | आप् ५ | |
|---|---|---|---|
| क्षुधा | काळ दुष्काळ | शुक्लित | मेघवृष्टि |
| तृषा | जळ शोष | शोणित | भूगर्भीं च |
| आळस | जगद्विराम | लाळ | पाझर |
| निद्रा | मृत्यु | मूत्र | क्षारसिंधु |
| मैथुन | उत्पाति | स्वेद | द्रव |

अस्थि धोंडे १, मांस माती २, त्वचा वायु ३, नाडी नद्या ४, रोम द्रुमलता ५.

पिंडीं स्थूळ देह, ब्रह्मांडीं विराट देह १, अवस्था उत्पत्ति २, ब्रह्माभिमानी ३, सत्य लोक स्थान ४, शक्ति सावित्री ५, भोग मात्रा गुण ६. पिंडीं ब्रह्मांडीं एकच, मात्रा अकार ७, रजो गुण ८.

ऐसा हा देह जाणावा॥ जाणोनि साक्षित्वें निरसावा ।
पुढें हिरण्यगर्भ ओळखावा ॥ शास्त्र दृष्टी ॥ ४८ ॥

पिंडीं लिंग देह. ब्रह्मांडीं हिरण्यगर्भ देवतामय; सूक्ष्म देह; प्राणपंचक पिंडीं पिंडींचें ब्रह्मांडीं ऐक्य जाणावें; स्थूळ पिंडीं आणि वायु हिरण्यगर्भ देवतामय.

## सूक्ष्मदेह.

| आकाशपंचक. | तेजःपंचक. | आप् पचक. |
|---|---|---|
| १. अंतःकरण - विष्णु. | श्रोत्र–दिशा. | वाचा वन्हि. |
| २. मन–चंद्रमा. | त्वचा - वायु. | पाणी–इंद्र. |
| ३. बुद्धि–ब्रह्मा. | चक्षु – सूर्य. | पाद–उपेंद्र. |
| ४. चित्त - नारायण. | जिव्हा - वरुण. | शिश्न–विधि, |
| ५. अहंकार– रुद्र. | प्राण–अश्विनीदेव. | गुद– नैर्ऋत्य. |

पृथ्वी, पंचविषय, तन्मात्रा, पिंडब्रह्मांड -ऐक्य; ब्रह्मांडींचा लिंगदेह १; अवस्था स्थिति २; अभिमानी विष्णु ३; विष्णुभुवन स्थान ४; शक्ति लक्ष्मी ५; भोग प्रविक्त ६; मात्रा उकार ७; सत्व गुण ८;

पिंडीं सूक्ष्म लिंग देह । विराटीं हिरण्यगर्भ देवतामय ॥
यातें जाणूनि राहें । साक्षित्वें भिन्न ॥ ४९ ॥

पिंडीं देह कारण, ब्रह्मांडीं अव्याकृति १, प्रळय अवस्था २, अभिमानी रुद्र ३, कैलास स्थान ४, शक्ति पार्वती ५, भोग आनंद ६, मात्रा मकार ७, तमोगुण ८,

ऐसे देह जाणावे । जाणोनि साक्षित्वें निरसावे ॥
आपण तों स्वभावें । भिन्न झाला ॥ ५० ॥

आतां पिंडीं महाकारण ब्रह्मांडीं मूळ प्रकृति १, सर्व साक्षी तूर्यावस्था २, सर्वेश्वर अभिमानी ३, निरालंब स्थान ४, ज्ञान शक्ति ५, भोग आनंदावभास ६, अर्ध मात्रा ७, शुद्ध सत्व गुण ८,

ऐसे पिंडीं ब्रह्मांडी अष्ट देह । सांगितले यथान्वयें ॥
निरसोनियां तूं राहें । साक्षित्वें ॥ ५१ ॥
यासी म्हणावें पंचीकरण । आतां महावाक्य[१४]विवरण ॥
सद्गुरुकृपा पूर्ण । तूं चि आत्मा ॥ ५२ ॥
तो मी कैसा पहावा अनुभव । तत्वासारिखा गेला मीपणभाव ॥
तेथें म्हणावया तो ठाव । उरला चि नाहीं ॥ ५३ ॥
या नांव जाणिजे निवृत्ती । योगीयांची परम विश्रांती ॥
जन्ममरणाची भ्रांती । निरसून गेली ॥ ५४ ॥
रिघतां सद्गुरुसी शरण । मग कैचें भवबंधन ॥
पाविजे सायुज्यसदन । स्वानुभवें करूनि ॥ ५५ ॥

---

१४ महावाक्य विवरण–तत् त्वं असि ह्म० तें ब्रह्म तूं आहेस या मुख्य वाक्याचें स्पष्टीकरण.

बद्धता आणि मुक्तता । दोन्ही माये च करितां ॥
शुद्ध स्वरूप लक्षिता । आपण मिथ्या ॥ ५६ ॥
वाच्यांश आणि लक्ष्यांश । हे दोन पूर्व पक्ष ॥
जाणती ज्ञानी दक्ष । अनिर्वाच्य वस्तु ॥ ५७ ॥

| | षड् ऊर्मि | षड्विकार | भूमिका ४ |
|---|---|---|---|
| देह धर्म | १ जरा | १ जायते | १ विक्षेपता |
| | २ मरण | २ आस्ते | २ गतायाता |
| प्राण धर्म | ३ क्षुधा | ३ विवर्धते | ३ सुश्लिष्टता |
| | ४ तृषा | ४ विपरिणमते | ४ सुलीनता |
| मनो धर्म | ५ शोक | ५ अपेक्षते | |
| | ६ मोह | ६ विनाशयते | |

| मुक्ति ४ | वाणी ४ | खाणी ४ | प्रळय ५ |
|---|---|---|---|
| १ सलोकता | १ परा | १ अंडज | २ पिंडीं |
| २ समीपता | २ पश्यंती | २ जारज | १ निद्रा |
| ३ सरूपता | ३ मध्यमा | ३ स्वेदज | १ मरण |
| ४ सायुज्यता | ४ वैखरी | ४ उद्भिज | २ ब्रह्मांडीं |
| | | | १ ब्रह्मनिद्रा |
| | | | १ ब्रह्ममरण |
| | | | १ विवेक प्रळय |
| | | | ५ |

| ८४ लक्ष योनि | ५ उपवायु |
|---|---|
| ४ लक्ष मनुष्य योनि | १ नाग तालूंत राहे |
| ११ लक्ष कृमि ,, | २ कूर्म नयनीं त्राहटे |
| १० लक्ष खेचर ,, | ३ कर्कश उचकी करी |
| ३० लक्ष पशु ,, | ४ देवदत्ताचा जांभई |
| ९ लक्ष जलचर ,, | ५ शिंकेंत धनंजय |
| २० लक्ष स्थावर ,, | |
| ८४ | |

इति श्रीरामदासस्वामीकृत पंचीकरण समाप्त.

## भुपाळी.

उठा प्रातःकाळ झाला । आपण राम पाहूं चला ॥
हा समयो टळला । मग अंतरा श्रीराम ॥ १ ॥
अवघे वानर मिळोनी । राम शोभे सिंहासनीं ॥
सभा घनवटली विमानीं । अवनी[1] अंबर[2] दाटलें ॥ २ ॥
माया जानकी विघडली । हातीं प्रारब्धें चूकलीं ॥
ते ची देहबुद्धी नाळली । मग आपंगिली श्रीरामें ॥ ३ ॥
सद्भाव भरताची भेटी । आम्हा राम हा जगजेठी ॥
उतावेळ होऊनी कंठीं । धांवुनी मिठी घातली ॥ ४ ॥
जे जे संसारीं गांजीले । ते ते राम पाहूं आले ॥
तेणें आपणा ऐसें केलें । रामदासें दातारें ॥ ५ ॥

### अभंग.

कोण कोठील आहेसी । आह्मा सांगें निश्चयेशीं ॥ १ ॥
स्थूळ सूक्ष्म कारण । सांग तुझें कोण स्थान ॥ २ ॥
पिंड ब्रह्मांड रचना । अष्ट देहीं विवेचना ॥ ३ ॥
पिंड ब्रह्मांड तुझें स्थूळ । किंवा तत्वांचा पाल्हाळ ॥ ४ ॥
सांग मायेचें अरण्य । किंवा तुझें ब्रह्मारण्य ॥ ५ ॥
रामी रामदास म्हणे । आतां बोलावें स्मरणें ॥ ६ ॥

१.

चहूं निगमांचें[3] बिज । कोणी सांगितलें सहज ॥ १ ॥
तेणें प्राणी उमजला । पाहे विचार आपुला ॥ २ ॥
नित्यानित्य विचार । केला एक साचार ॥ ३ ॥
दास म्हणे निरूपणीं । केली भूतांची झडपणी ॥ ४ ॥

२.

त्याचे पाय हो नमावे । त्याचें कीर्तन हो ऐकावें ॥ १ ॥
दुजीयासी सांगे कथा । आपण वर्ते त्याची पथा ॥ २ ॥
कीर्तनाचें न करी मोल । बैसे अमृताचे बोल ॥ ३ ॥
सन्मानीतां नाहीं सुख । अपमानितां नाहीं दुःख ॥ ४ ॥
किंचित दिलें दातयानें । तें ही घेत असे आनंदानें ॥ ५ ॥
ऐसा असे हरिदास । लटकें न वदे रामदास ॥ ६ ॥

---

१ अवनी=पृथ्वी. २ अंबर=आकाश. ३ निगम=वेद.

३.

वाणी शुद्ध करी नामीं । चित्त शुद्ध होय प्रेमीं ॥ १ ॥
नित्य शुद्ध होय नामीं । वसतां ही कामीं [4]धामीं ॥ २ ॥
कर्ण शुद्ध करी कीर्तन । प्राण शुद्ध करी [5]सुमन ॥ ३ ॥
[6]त्वचा शुद्ध करी [7]रज । मस्तक नमितां पदां[8]बुज ॥ ४ ॥
करशुद्धी राम पूजितां । पादशुद्धी देऊळीं जातां ॥ ५ ॥
नेमें लिंग करी शुद्ध । अंतर निर्मळ करी गुद ॥ ६ ॥
रामपायीं रहातां बुद्धी । रामदासा सकळ शुद्धी ॥ ७ ॥

४.

माझें सर्व जावें देवानें रहावें । देवासी पहावें भक्तपणें ॥ १ ॥
भक्तपणें मज देव ची जोडला । अभ्यास मोडला सर्व कांहीं ॥ २ ॥
सर्व कांहीं जो वा एक देव राहो । माझा आर्तभाव ऐसा आहे ॥ ३ ॥
जो हेत अंतरीं देव तैसा झाला । हा दीन पाहिला कोणी एक ॥ ४ ॥
कोणी एक पुण्य नें होतें संचलें । दास ह्मणे झालें समाधान ॥ ५ ॥

५.

दिनाचा दयाळु कीर्ति ऐकियेली । म्हणूनी पाहिली वाट तुझी ॥ १ ॥
अनाथाचा नाथ होशील कैवारी । म्हणोनियां हरी बो[9]भाईलें ॥ २ ॥
तुजविण कोण जाणें हें अंतर । कोणासी जोजार घालूं माझा ॥ ३ ॥
दास म्हणे आम्ही दीनाहुनी दीन । करावें पालन दुर्बळाचें ॥ ४ ॥

६.

आम्हा [10]पतितांची [11]सांड केली जरी । आमचा कैवारी कोण आहे ॥ १ ॥
आम्हीं भरंवसा कवणाचा धरावा । सांगावें केशवा दयानिधी ॥ २ ॥
तुजविण आह्मा नाहीं त्रिभूवनीं । धांवें चक्रपाणी दीनबंधु ॥ ३ ॥
पतितपा[12]वनें ब्री[13]द हें बांधिलें । तारावें [14]वहिलें दासालागीं ॥ ४ ॥

७.

पळशी तूं तरी नाम कोठें नेशी । आम्ही [15]अहर्निशी नाम घोकूं ॥ १ ॥
आम्हापासोनियां जातां नये तुज । तें हें वर्म बीज नाम जपूं ॥ २ ॥
देवा आम्हां तुझें नाम हो पाहिजे । मग भेटी सहज देणें लागे ॥ ३ ॥
भोळे भक्त आम्हीं चुकलों चि कर्म । सांपडलें वर्म रामदासा ॥ ४ ॥

---

४ धाम=घर. ५ सुमन=निष्कपट सरळ मन. ६ त्वचा=कातडी. ७ रज=धूळ. (पायां-ची). ८ अंबुज=कमल. ९ बोभाईलें=हाक मारिली. १० पतित=पापी. ११ सांड=हेळसांड. १२ पावन=पवित्र करणारा. १३ ब्रीद=चिन्ह, निशाणी. १४ वहिलें=तात्काळ. १५ अहर्निशि=रात्रंदिवस.

८.

गजेंद्र सावज पडला पानवडी । रामें तेथें उडी टाकियेली ॥ १ ॥
प्रल्हाद गांजीतां कोण साहाकारी । स्वयेंची [16]मुरारी प्रगटला ॥ २ ॥
[17]क्षत्रियें ब्राह्मणें गांजिलीं बापुडीं । [18]रामें तेथें उडी घातीयेली ॥ ३ ॥
तेहतीस कोडी देव पडीले [19]बांदोडी । [20]रामें तेथें उडी टाकियेली ॥ ४ ॥
दासापायीं पडली देहबुद्धी बेडी । रामें तेथें उडी टाकियेली ॥ ५ ॥
रामदास म्हणे नका करूं शीण । रामें भक्त कोण उपेक्षिले ॥ ६ ॥

९.

तुजविण देव मज कोणी नाहीं । माझी चिंता कांहीं असों द्यावी ॥ १ ॥
वैराग्यें कनिष्ठ अभावें वरिष्ठ । माझे मनीं नष्ट संदेहता ॥ २ ॥
विवेकें सांडिलें ज्ञानें ओसंडिलें । चित्त हें लागलें तुझे पायीं । ३ ॥
तुझें नाम वाचे उच्चारीत असें । अंतरीं विश्वास धरीयेला ॥ ४ ॥
रामदास ह्मणे मी तुझें [21]अज्ञान । माझें समाधान करीं देवा ॥ ५ ॥

१०.

[22]श्वानाचिया पुत्रें कल्होळ मांडिला । कल्हो लागला एकसरा ॥ १ ॥
भुंकितां गुरगुरी वासितो चि तोंड । वरती थोबाड करूनीयां ॥ २ ॥
एक ते भुंकती एक ते रडती । दास म्हणे गती निंदकांची ॥ ३ ॥

११.

मेरूचीया माथां ठेवुनीयां पाव । जात असे राव कैलासींचा ॥ १ ॥
कैलासींचा राव एक देव क्षोभला । देशधडी केला लंकानाथ ॥ २ ॥
लंकेच्या [23]चोहटीं मांडियेला खेळ । अग्नीचा कल्होळ घरोघरीं ॥ ३ ॥
जाळीयेलीं घरें सुंदर मंदिरें । पावला कैवारें जानकीच्या ॥ ४ ॥
जानकीचा शोक दुरी दुराविला । यशवंत झाला रामदास ॥ ५ ॥

१२.

जाणावा तो नर देव ची साचार। वाचे निरंतर राम राम ॥ १ ॥
सगुणीं सद्भाव नाहीं ज्ञानगर्व । तयालागीं सर्व सारीखेची ॥ २ ॥
निंदका वंदका सगट सांभाळी । मन सर्व काळीं पालटेना ॥ ३ ॥
पालटेना मन परस्त्रीकां[24]चनीं । निववी वचनीं पुढील्यासी ॥ ४ ॥
पुढिल्यासि तो सुख देत आहे । उपकारीं देह लावीतसे ॥ ५ ॥

---

१६ मुरारी=मुर नामक दैत्याचा शत्रु (मुर+अरि). १७ क्षत्रिय=कार्तवीर्य सहस्रार्जुन. १८ राम=परशुराम. १९ बांदोडी=बंदीखाना. २० राम=दाशरथी राम. २१ अज्ञान=मूढ बालक. २२ श्वान=कुत्रा. २३ चोहटीं=चवाठयावर. २४ कांचन=सोनें.

लावीतसे देह रामभजनास । रामीरामदास हरिभक्त ॥ ६ ॥

१३.

भक्तपणें रामनामाचा अव्हेर । करी तो गव्हार मुक्त नव्हे ॥ १ ॥
मुक्त नव्हे काय स्वयें शूलपाणी । रामनाम वाणी उच्चारीतो ॥ २ ॥
राम म्हणे शीव तेथें किती देव । बापुडे मानव देहधारी ॥ ३ ॥
देहधारी नर धन्य ते संसारीं । वाचे निरंतरी रामनाम ॥ ४ ॥
रामनाम वाचे स्वरूप अभ्यंतरीं । धन्य तो संसारीं दास म्हणे ॥ ५ ॥

१४.

मी खरा पतित तूं खरा पावन । आतां अनमान करूं नको ॥ १ ॥
आतां कांहीं मज चिंता ती ही नसे । तुझें नाम कैसें वाचे येई ॥ २ ॥
समर्थें घेतला नामासाठीं भार । मज उपकार कासयाचा ॥ ३ ॥
रामदास म्हणे तुझें तुज ऊणें । सोयरे पिशून हांसतील ॥ ४ ॥

१५.

पतितपावना जानकीजीवना । वेगीं माझ्या मना पालटावें ॥ १ ॥
मिथ्या शब्दज्ञानें तुज अंतरलों । संदेहीं पडलों मीपणाच्या ॥ २ ॥
सदा खळखळ निर्गुणाची घडे । सगुण नातुडे ज्ञानी गर्वे ॥ ३ ॥
रामदास म्हणे ऐसा मी पतित । मीपणें अनंत आतुडेना ॥ ४ ॥

१६.

टाळ धरूं कथा करूं । रामा लागीं हाका मारूं ॥ १ ॥
ये रे रामा ये रे रामा । तुझी आवडी लागो आम्हा ॥ २ ॥
तुजविण गाईल कोण । ऊठ सांडिलें मीतूंपण ॥ ३ ॥
रामदास पाहे वास । भेटी द्यावी सावकाश ॥ ४ ॥

१७.

रामभक्तिवीण आन नाहीं सार । साराचें हें सार राम एक ॥ १ ॥
कल्पनाविस्तारू होत असे सत्वरू । आम्हा कल्पतरू चाड नाही ॥ २ ॥
कामने लागोन विटलेंसे मन । तेथें चाड कोण कामधेनू ॥ ३ ॥
चिंता नाहीं मनीं राम गातां गुणी । तेथें चिंतामणी कोण पुसे ॥ ४ ॥
कदा नाहीं नाश स्वरूप सुंदर । तेथें आम्हां हिरे चाड नाहीं ॥ ५ ॥
रामदास म्हणे रामभक्तीवीण । जाणावें तें ऊणें सर्व कांहीं ॥ ६ ॥

१८.

सीतापती राम पतितपावन । गाती भक्तजन आवडीनें ॥ १ ॥

---

२५ चिंतामणी=मनांत इच्छिलेली वस्तु देणारें रत्न.

राघवाच्या गुणा न दिसे तुळणा । कैलासीचा राणा लांचावला ॥ २ ॥
देवाचें मंडण भक्ताचें भूषण । धर्मसंरक्षण राम एक ॥ ३ ॥
रामदास म्हणे धन्य त्याचें जीणें । कथानिरूपणें जन्म गेला ॥ ४ ॥

१९.

आम्हीं देखिला विठोबा । आनंदे विठेवरी उभा ॥ १ ॥
तेथे दृश्याची जे दाटी । ते ची रुक्मिणी गोमटी ॥ २ ॥
रामीरामदास म्हणे । जो ओळखे तो ची धन्य ॥ ३ ॥

२०.

लांचावोनी भक्ति लोभा । वाळवंटी असे उभा ॥ १ ॥
पदकीं इंद्रनीलशोभा । प्रभेनें शोभा उजळती ॥ २ ॥
भक्त पुंडलिकें गोंविला । जाऊं नेदी भांबाविला ॥ ३ ॥
विटे नीट असे ठाकला । भीमातीरवाळुवंटीं ॥ ४ ॥
भाग्य पुंडलिकाचें । उभें दैवत त्रिलोकींचें ॥ ५ ॥
कीं जें तारूं भवसागरीं । भीमातीरीं विनटलें ॥ ६ ॥
एके पुंडलिकें करूनी जोडी । आम्हासी दिधली कल्पकोडी ॥ ७ ॥
तुटली संसारसांकडी । रामदास म्हणतसे ॥ ८ ॥

२१.

जीवन्मुक्त प्राणी होऊनियां गेले । तेणें पंथें चाले तो ची धन्य ॥ १ ॥
जाणावा तो ज्ञानी पूर्ण समाधानीं । निःसंदेह मनीं सर्व काळ ॥ २ ॥
मिथ्या देहभान प्रारब्ध आधीन । राखे पूर्णपण समाधानीं ॥ ३ ॥
आवडीनें करी कर्म उपासना । सर्व काळ ध्यानारूढ मन ॥ ४ ॥
पदार्थाची हाणी हाता नये कोणी । जयाची करणी बोला ऐशी ॥ ५ ॥
धन्य पैं ते दास संसारीं उदास । तयां रामदास नमस्कारी ॥ ६ ॥

२२.

संसार देखीला तरी पाहें सार । वायां येरझार पाडूं नको ॥ १ ॥
पाडूं नको दुःखसागरीं आपणा । म्हणे नारायणा ओळखावें ॥ २ ॥
ओळखावें वेगीं आपआपणाशी । संसारीं सुटशी दास म्हणे ॥ ३ ॥

२३.

विचारें संसार होतो देशधडी । सोनियाची घडी जात असे ॥ १ ॥
डावा तास गेला मोक्षपंथा जातां । विवेकें तत्वतां याशी नांवें ॥ २ ॥
सदा श्रीरामाचें भजन करितां । दास म्हणे चिंता दूर होय ॥ ३ ॥

कायावाचामनें रामरूपीं मिळणें । तरी च श्लाघ्यवाणें रामदास्य ॥ ४ ॥
परस्त्री नपुंसक होणें परद्रव्य न पाहणें । तरी च श्लाघ्यवाणें रामदास्य ॥५॥
जैसें मुखें बोलणें तैशी च क्रिया करणें । रामदास ह्मणे आवडी सगुणभजनें ॥६॥

२४

हरिभक्ति करी धन्य तो संसारी । तयाचा कैवारी देवराणा ॥ १ ॥
देवराणा सदा सर्वदा मस्तकीं । तयासी लौकीकीं चाड नाहीं ॥ २ ॥
चाड नाहीं जनीं राघवाच्या दासा । सार्थक वयसा दास म्हणे ॥ ३ ॥

२५

भोंवता डोंगराचा फेर मध्यें देवाचें शिखर । पुढें मंडप सुंदर नव खणांचा ॥ १ ॥
चहूं खांबावरी रचना वरत्या चोविस कमाना । काम कढाऊ नयना समाधान ॥२॥
नाना तरू आंबे वर दोहींकडे वृंदावन । वृंदावनीं जगज्जीवनें वस्ती केली ॥ ३ ॥
पुढें गंगा वाहे दर्शनमात्रें दोष जाय । सकळ तीर्थांशीं तो ठाय विश्रांतीचा ॥ ४ ॥
रामदासाचे भेटी येई अयोध्यानिवासी । भक्तिमहिमा चहूंदेशीं वाढाया ॥ ५ ॥

२६

महापापी लोक पूर्वीं ही असती । ते ही पालटती जयाचेनि ॥ १ ॥
जयाचेनि योगें होत असे उपाय । तुटती अपाय नानाविध ॥ २ ॥
नानाविध जन सुबुद्धीचे होती । साधुचे संगती दास म्हणे ॥ ३ ॥

२७

साराचें ही सार सांगतों तुम्हासी । ह्मणा अहर्निशी राम राम ॥ १ ॥
सगुणमूर्तीचें करावें अर्चन । भुकेल्यासि अन्न यथा शक्ति ॥ २ ॥
सज्जनाची सेवा कीर्तनाची प्रीती । होईल विश्रांति दास म्हणे ॥ ३ ॥

२८

आज्ञेप्रमाणें परमार्थ । केला असे जे समर्थ ॥ १ ॥
आतां देहाचा कंटाळा । आला असे जे दयाळा ॥ २ ॥
आतां हेंचि मागणें । कृपा करूनियां देणें ॥ ३ ॥
ज्याची दर्शनाची इच्छा । त्याची पुरवावी आशा ॥ ४ ॥
ऐकें सखया वचन । त्यासी देईन दर्शन ॥ ५ ॥
तेराअक्षरीमंत्राचा । जप करील जो साचा ॥ ६ ॥
त्याची संख्या तेरा कोटी । होतां भेटेन मी जगजेठी ॥ ७ ॥
भय न धरावें मनीं । बहु बोलिलों म्हणोनी ॥ ८ ॥
नलगे आसनीं बैसावें । नलगे अन्न ही त्यजावें ॥ ९ ॥

येतां जातां धंदा करितां । नामसंख्या मात्र धरितां ॥ १० ॥
ऐसा वर देतां जाण । दास झाला सुप्रसन्न ॥ ११ ॥
समाप्त.

---

## अथाज्ञानबालबोध.
### रामदासकृत.

बरें सत्य बोला यथातथ्य चाला । बहू मानिती लोक येणें तुम्हांला ॥
धरा बुद्धि पोटीं विवेकी मुलें हो । बरा गूण तो अंतरामाजि राहो ॥१॥
बरे दांत घांसूनियां तोंड ध्यावें । कळाहीन ते शूद्रमूखी नसावें ॥
सदा सर्वदा यत्न सांडूं नये रे । बहूसाल हा खेळ कामा नये रे ॥ २ ॥
दिसामाजि कांहीं तरी तें लिहावें । प्रसंगीं अखंडीत वाचीत जावें ॥
गुणें श्रेष्ठ ऊपास्य त्याचें करावें । बरें बोलणें सत्य जीवीं धरावें ॥ ३ ॥
बहू खेळ सोटा सदा लक्ष खोटा । समस्तांसि भांडेल तो ची करंटा ॥
बहूता जना लागिं जीवीं झिजावें । भले सांगती न्याय तेथें भरावें ॥ ४ ॥
हिशेबीं सदा न्याय सांडूं नये रे । कदाचीत अन्याय होतां धका रे ॥
जनीं सांडितां न्याय रे दुःख होतें । महासूख तें ही अकस्मात जातें ॥५॥
प्रचीती विणें बोलणें व्यर्थ वायां । विवेकाविणे सर्व ही दंभ जाया ॥
बहू सज्जना नेटका साज केला । विचाराविणा सर्व ही व्यर्थ गेला ॥ ६ ॥
वरी चांगला अंतरीं गोड नाहीं । तया मानवाचें जिणें व्यर्थ पाहीं ॥
वरी चांगला अंतरीं गोड आहे । तयालागिं कोणी तरी शोधिताहे ॥ ७ ॥
सदां अंतरीं गोडसें सोडवेना । कदां अंतरीं वोखटें देखवेना ॥
म्हणूनी बरा ग्रूण आधीं धरावा । महा घोर संसार हा नीरसावा ॥ ८ ॥
भला रे भला बोलती तें करावें । बहूतां जनाचे मुखें येश घ्यावें ॥
परी शेवटीं सर्व सांडूनि द्यावें । मरावें परी कीर्तिरूपें उरावें ॥ ९ ॥
बरा वोखटा सर्व संसार झाला । अकस्मात येईल रे येमघाला ॥
म्हणोनी भले सांगती सत्य चाला । जनीं दास तो शीकवीतो मुलांला १०
इति रामदासकृत अज्ञानबालबोध समाप्त.

---

### पद

पाहुं चला मुकुंद पाहुं चला मुकुंद पाहुं चला मुकुंद ॥ ध्रु० ॥
बाई धरि आपुला छंद, मुरलि वाजवितो मंद, गीत गातो गोविंद ॥ १ ॥
पांवा वाजवितो गोपाळ, गळां शोभे वनमाळ,

कोटीतरणीतेजाळ, कृष्ण देवकीचा बाळ, वेगीं दावा हो ॥ २ ॥
करीं स्वतांचें काज, न धरीं लौकिकाची लाज,
देह विडंबिलें आज, पाहुं चला यदुराज ॥ ३ ॥
सांडीं शरीराचा रंग, चित्त झालेंसे भंग,
धरा कृष्णजीचा संग, पाहुं चला श्रीरंग ॥ ४ ॥
रामदासाचि आस, जीव नाहला उदास,
धरूं मी कवणाची कास, सहज प्रकाश प्रगटला हो ॥ पाहुं० ॥ ५ ॥

## पद.

तूं भज रे भज रे भज रे मानवा या रघुवीरा ॥ ध्रु० ॥
नरदेहीं आलिया प्राणी । जो राम वदे ना वाणी ॥
जेव्हां यम पाडील धरणी । सोडविता नाहीं कोणी ॥ १ ॥
पळ पळ हें आयुष्य जातें । नरदेह नये मागुतें ॥
तूं शरण जाय संतांतें । ते निजपद दावितिल तूतें ॥ २ ॥
रामदास विनंती करी । गुरुकृपा आम्हांवरी ॥
सबाह्य अभ्यंतरीं । व्यापक हरी चराचरीं ॥ ३ ॥

## पद.

श्रीगुरूचें चरणकमल हृदयीं स्मरावे ॥ ध्रु० ॥
नरतनु दृढनावेसी बुडवुनि अति मूढपणें दुष्ट नष्ट कुकर शुकर तनु कां फिरावें ॥ १ ॥
निगमा निखिल साधारण सुलभाहुनी सुलभ बहु इतर योग याग पथीं उगी कां फिरावें ॥ २ ॥
रामदास सांगे तुज अझुनी तरी समज उमज विषयविष घेउनियां फुकट कां मरावें ॥ ३ ॥

## भुपाळी.

नित्य निरंतर गावे । देवभक्त आठवावे । तेणें भक्तपद पावे । देव पावे चिंतितां ॥ ध्रु० ॥
राम सीता लक्ष्मण । भरत आणि शत्रुघ्न । जांबुवंत बिभीषण । सुग्रीव अंगद मारुती ॥ १ ॥
राम कृष्ण आणि यादव । गरुड उद्धव गोपी सर्व । भीष्म कर्णादि पांडव । कुंती द्रौपदी यशोदा ॥ २ ॥
अत्रि वशिष्ठ आणि कौशिक । गौतम विश्वामित्रादिक । व्यास जमदग्नी वाल्मिक । ऐशीं अनेक ऋषीकुळें ॥ ३ ॥

चंद्र सूर्य आणि बृहस्पती । कुबेर वायु प्रजापती । कमळापती
आणि सुरपती । भूतळपती परमात्मा ॥ ४ ॥
बारा आदित्य बारा लिंगें । दश अवतार भक्त रंगे । नाना दैवतलीला
संगे । अनंत माया वैष्णवी ॥ ५ ॥
गंगा गौरी पंचानन । वीरभद्र षडानन । गण गंधर्व गजानन ।
निज वाहन नंदी तो ॥ ६ ॥
सिद्ध साधु महामुनी । ब्रह्मवृंद ब्रह्मज्ञानी । भक्त आणिक समाधानी ।
दास वर्णी त्यांलागीं ॥ ७ ॥

## आरती पांडुरंगाची.

निर्जर स्मरहरधर भीमातिरवासी । पीतांबर जघनीं कर दुस्तरभव नाशी ॥
शरणागतवत्सल पाळक भक्तांसी । चाळक गोपी जनमनमोहन सुखराशी ।
जय देव जय देव जय पांडुरंगा । निरसीं मम संगा निःसंगा भवभंगा ॥ १ ॥
अणिमा गरिमा लघिमा नेणें तव महिमा । नीलोत्पलदलविमलघननीलतनुश्यामा ।
कंटकभंजन साधु मुनिजन विश्रामा । राघवदासा विगलितकामा निष्कामा ॥ २ ॥

समाप्त.

# रामदासस्वामीकृत रामायणाचें शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| चरित्र पृ. १ | १६ | सवधारी | सर्वधारी |
| ,, १ | १९ | वावरदेर | वावरदेवं |
| ,, ५ | २६ | संस्थाच्या | संस्थानच्या |
| कविता पृ. १ | ३१ | platean | plateau |
| २ | ११ | तयालागि | तयालागीं |
| ,, | २५ | नभी | नभीं |
| ३ | ३ | बदांदा | बदादां |
| ,, | १८ | वेंटाळितांहे | वेंटाळिलाहे |
| ,, | २२ | सर्पकीं | सर्प कीं |
| ,, | २९ | तया | तयां |
| ४ | ३५ | वनामाजिं | वनामाजि |
| ,, | ३१ | पाहतां | पहातां |
| ५ | ३२ | गलोल= गोफण | गलोल=खडे मारण्याचें धनुष्य |
| ६ | २३ | लंबीत | लोंबत |
| ,, | ३० | त्यासिं | त्यांसि |
| ७ | ६ | दरि | दूरि |
| ,, | १५ | सतेजकि | सतेजीक |
| ,, | २८ | कपीरासि | कपीरीस |
| ,, | २९ | रघुनायकें | रघूनायकें |
| १० | ३२ | खडडां | खडाडां |
| ,, | ३३ | ५३ C वाइली | ५३ C वाइलीं |
| ,, | २५ | फळे | फळें |
| ११ | २५ | दोघे | दोघ |
| १३ | १५ | पाहें | पाहा |
| ,, | २७ | समस्ताकडे | समस्तांकडे |
| १५ | ८ | अनुचीत | अनूचीत |
| ,, | १५ | सांगपां | सांग पां |
| ,, | २६ | आलात | आलांत |
| १६ | ५ | सांडुनियां | सेवूनियां |
| ,, | १४ | समद्रू | समुद्रू |
| ,, | २१ | निळें | निळे |
| ,, | २८ | नभी | नभीं |
| १७ | १६ | ८८ रिसावानरांशीं | ८८ रिसांवानरांसी |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १८ | २ | जिवासीं | जिवासीं |
| ,, | ६ | सांगितली | सांगीतली |
| २० | ८ | पाहे | पाहें |
| ,, | २३ | पाहे | पाहें |
| २१ | ८ | भीस | रीस |
| ,, | २९ | माने | मानें |
| २३ | २३ | भेटरे | भेट रे |
| २३ | २४ | वदे | वंदे |
| २५ | १० | चालिल | चालिलें |
| ,, | २५ | वनारीं | वानरीं |
| ,, | ३० | सुखेणें | सुषेणें |
| २६ | ८ | मातलें ते | मातला तो |
| ,, | १९ | धांवती | धांवतें |
| ,, | ३३ | व्याल=साप | व्यालें=प्रसवलें |
| २९ | १२ | करी तो | करीतो |
| ३० | ३ | ४१ मत्स्येC | ४१ मत्स्यC |
| ,, | ६ | त्याशिं | त्यासि |
| ,, | ११ | ज्यासीं | ज्यासी |
| ,, | १४ | समस्तांशि | समस्तांसि |
| ,, | १७ | धाडिले | धाडिलें |
| ,, | १९ | मेघवर्णू | मेघवर्णू |
| ३१ | ४ | कसें | कैसें |
| ,, | ११ | कुंभकर्णांशि | कुंभकर्णासि |
| ,, | १७ | मेघवर्ण | मेघवर्णे |
| ३२ | २० | मेघवर्णू | मेघवर्णू |
| ,, | २१ | त्याशिं | त्यासि |
| ,, | २२ | युद्धासिं | युद्धासि |
| ,, | २८ | हि | ही |
| ३३ | ६ | नरां-अंतकू | नरा-अंतकू |
| ३४ | ३ | बाणिली | बाणली |
| ,, | ५ | मुहूर्ते | मूहूर्ते |
| ,, | ८ | शरांचें | शरांचे |
| ३६ | १५ | जाणहा | जाण हा |
| ३८ | ३ | धन्य | धन्य तुं |
| ,, | ४ | उपकारें | ऊपकारें |
| ,, | ७ | कृपें वीण | कृपेवीण |
| ,, | ११ | कपीचीं | कपींचीं |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ३८ | १७ | तर्रे शीघ्र | तरी शीघ्र |
| ३९ | ३ | भडाडा | भडाडां |
| ,, | १८ | [४७] केणी-दुकानें | [४७] केणी-दुकानें |
| ,, | २७ | तया | तयें |
| ,, | ३३ | रडती | रडणें |
| ४० | १ | झुंझार | झुंजार |
| ,, | १३ | टाकिता | टाकितो |
| ,, | १४ | [५५] साऽह्या | [५५] साह्या |
| ,, | ३१ | साऽह्या | साह्या |
| ४१ | २ | मैंदा | मैंदा |
| ,, | ४ | ,, | ,, |
| ,, | ६ | द्विवीदाशिं | द्विवीदासि |
| ,, | २३ | सुताशी | सुतांसी |
| ,, | २४ | रवरातें | खरातें |
| ,, | २७ | बंडगें | बडगें |
| ४२ | १० | महा | माहा |
| ,, | १४ | त्याशि | त्यासि |
| ४३ | ११ | मोकळी | मोकली |
| ,, | १७ | राघवाशीं | राघवासी |
| ,, | २६ | [७९] परीघाशी | [७९] परीघासि |
| ,, | २७ | [८०] ऋषभा | [८०] ऋषभा |
| ४४ | १६ | केलें | केले |
| ४५ | ३५ | तयांशीं | तयांसी |
| ,, | ३० | पित्याशीं | पित्यासी |
| ,, | ,, | वैरियांशीं | वैरियांसी |
| ,, | ३३ | मारिसी | मारिले |
| ४६ | ६ | दळेशीं वळें | दळेंशीं बळें |
| ,, | १० | धडाडा | धडाडो |
| ,, | १२ | नभोमंडळी | नभोमंडळीं |
| ,, | ३२ | तिये | तये |
| ४७ | ३ | आठविलें | आठवीलें |
| ,, | १६ | पाठविलें | पाठवीलें |
| ,, | १९ | इंद्रजीतासी | इंद्रजीतासि |
| ,, | २५ | समस्ताशीं | समस्तांसि |
| ,, | ३० | नभोमंडळी | नभोमंडळीं |
| ४८ | ३ | जया | जयो |
| ,, | ३ | बीभिषणू | बीभीषणू |
| ,, | २१ | सांबरे | सांबरें |
| ४८ | २५ | घोळती लाळ ती | घोंटिती लाळ तीं |
| ,, | २७ | पर्वताशीं | पर्वतासि. |
| ४९ | २२ | ऋषभू | ऋषभ |
| ५० | ३० | होशी | होसी |
| ,, | ३२ | पढें | पुढें |
| ,, | ३३ | पाहशी | पाहसी |
| ५१ | ४ | दुर्जनासी | दुर्जनांसी |
| ५२ | ६ | [५३] वाड | [५३] वाड |
| ,, | २१ | छेदिता जाहला वोष्ट दंती | चाविता जाहला वोष्ठ दंतीं. |
| ५२ | २८ | काळीं भूगोल | काळीं झाले ल्या शोधांवरून भूगोल |
| ,, | ३० | घन | घनफळ |
| ५३ | ५ | कल्पांतिचे | कल्पांतिचे |
| ,, | ७ | [६६] प्रहा | [६६] प्रहो |
| ,, | ३१ | पच | पांच |
| ५४ | १५ | भडाडा | भडाडो |
| ,, | ६२ | जळों लागली—वळे जाळिलीं | जळों लागलीं —वळें जाळिलीं (पाठभेद) |
| ५५ | ७ | ज्वाळी | ज्वाळीं |
| ,, | ११ | वारवेना | बोलवेना |
| ,, | १६ | वाचवीलें | वांचवीलें |
| ५६ | ९ | [८६] निर्वाणिचे | [८६] निर्वाणिंचे |
| ,, | १० | काळकांपे | काळ कांपे |
| ,, | २२ | सुरालागिं | सुरांलागिं |
| ५७ | १७ | जाशी | जासी |
| ,, | १४ | शरीरीं | शरिरीं (पाठभेद) |
| ५८ | ५ | दोघे | दोघ |
| ,, | १० | गृह | ग्रह |
| ,, | १२ | म्हणोनि | म्हणोनी |
| ,, | १३ | रघुनायकें तोषविली | रघूनायकें तोषवीली |
| ,, | २० | आश्चर्यें | आश्चर्य |
| ,, | २५ | रघूनायक | रघूनायकें |
| ,, | २६ | चालिलींते | चालिली ते |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ५८ | २७ | घालूनिया | घालूनियां |
| ,, | १० | समस्ती | समस्ती |
| ५९ | १ | हेतु | हेतू |
| ,, | १ | चालविली | चालवीली |
| ,, | ८ | इंद्रजितू | इंद्रजीतू |
| ,, | ११ | ,, | ,, |
| ,, | १० | ऊठविली | ऊठवीली |
| ,, | १० | अक्षवानें | अक्षवाणें |
| ६० | १० | भिडती | भीडती |
| ,, | ११ | रहातां | राहतां |
| ,, | ११ | बाळ जाळें | बाणजाळें |
| ,, | १४ | रणामंडळी | रणामंडळीं |
| ,, | १७ | फिराविती | फीराविती |
| ,, | २० | लोहर्गळा | लाहार्गळा |
| ,, | २२ | किती येक शूळ | कितीयेक ते शूळ |
| ६० | २८ | लोहर्गळा | लोहार्गळा |
| ६१ | ११ | साहरे | साह रे |
| ,, | १६ | रिपूचें | रिपूचे |
| ,, | १० | दुसरी | दूसरी |
| ,, | ,, | महा | माहा |
| ६२ | १ | उठला | ऊठला |
| ,, | ,, | हांकिलें | हाणिलें |
| ,, | ७ | येकमेका | येकमेकां |
| ,, | १७ | सांवारिली | सांवरीली |
| ,, | २० | गर्जती | गर्जतीं |
| ६३ | १६ | घालुनि | घालूनि |
| ,, | १७ | मृत्यूपंथें | मृत्युपंथें |
| ,, | २० | तुरंगमातें | तुरंगमांतें |
| ,, | २२ | ब्राम्ही | ब्राह्मी |
| ,, | २९ | ब्रम्हांड | ब्रह्मांड |
| ६४ | ५ | हाहाकार | हहाकार |
| ,, | ६ | भोंवर्ती | भोंवतीं |
| ,, | ११ | ब्रम्हचारी | ब्रह्मचारी |
| ६५ | ६ | अतां आणाव्या | आतां अणाव्या |
| ,, | ८ | पाहिले | पाहिलें |
| ,, | ,, | जहाले सर्व माने | जाहलें सर्व मानें |
| ,, | १३ | कपींतं | कपितें |

| पृष्ठ | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ६५ | १८ | सेऊनि | सेवूनि |
| ,, | ३१ | छेदिला | क्षेलिला |
| ६६ | १२ | कदांहि | कदांही |
| ६७ | २ | पाविजे तें | पाविजेतें |
| ,, | १४ | तयाशी | तयाशीं |
| ,, | १५ | कोटें | कोठें |
| ६८ | ३ | ऊसने | ऊसनें |
| ,, | १४ | भूवनामाजी | भूवनामाजि |
| ,, | १७ | धावती | धांवती |
| ,, | १९ | टोकेत | टाकितें |
| ,, | ३१ | राक्षस, व | राक्षस; |
| ६९ | ४ | द्विचळी | द्वीचळी |
| ,, | १३ | सोडिली | सोडिलीं |
| ,, | १४ | धावले | धांवले |
| ,, | १७ | ते | तें |
| ७० | ६ | दिल्हें | दिलें |
| ,, | १६ | वोष्ट्र | वोष्ठ |
| ,, | २७ | विंधिले | विंधिलें |
| ,, | २८ | ऊसने | ऊसनें |
| ७१ | ९ | रथी | रथीं |
| ,, | ,, | बहु | बहू |
| ७२ | २० | परीचीं | परीचीं |
| ,, | २१ | ब्रम्हांड | ब्रह्मांड |
| ,, | ३३ | द्विजातीं | द्विजाती |
| ७४ | ३ | पाठविलें | पाठवीलें |
| ,, | ७ | भयातुर | भयातूर |
| ,, | ,, | चळाळा | चळाळां |
| ,, | १८ | समस्तांसिं | समस्तांसि |
| ,, | २२ | समस्तीजणीं | समस्तीजणी |
| ७५ | ५ | तातडी | तांतडी |
| ,, | ,, | मिळालीं | मिळाली |
| ,, | १७ | सभामंडपी | सभामंडपा |
| ,, | १९ | वोध | वोघ |
| ,, | ,, | पाटजाती | पाट जाती |
| ,, | २७ | बरी | बरीं |
| ७६ | २ | विधायेक्त | विधीयुक्त |
| ,, | ८ | लंकापुरीते | लंकापुरी ते |
| ,, | १२ | सांगे | सांगें |
| ,, | १६ | तेणे | तेणें |
| ,, | १७ | दूरी | दूरि |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध | शुद्ध. | पृष्ठ | ओळ. | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७६ | २१ | जाऊनी | जाउनी | ९५ | २ | हांसल्या | हांसत्या |
| ,, | २२ | फुलेंले | फुलेलें | ,, | २३ | लघु | लघू |
| ,, | २६ | सुरांशी | सुरांशीं | ,, | ३१ | त्या | या |
| ,, | २९ | तयालागि | तयालागिं | ९६ | १३ | महा | माहा |
| ७७ | २ | घेऊनिया | घेऊनियां | ९७ | ५ | सानंद | सु आनंद |
| ,, | ५ | होऊनिया | होऊनियां | ,, | ९ | उन्मते | उन्मुखे |
| ,, | ९ | शुळपाणी | शूळपाणी | ,, | २० | वार्ती | होती |
| ,, | १५ | उत्पती | उत्पत्ति | ,, | २४ | थेंवे | थोवे |
| ,, | २१ | ब्रम्हयानें | ब्रह्मयानें | ,, | १२ | शुक्र ५५ | शुक्र |
| ७८ | २२ | पाठविलीं | पाठवीलीं | ,, | १३ | द्रुताळी | ५५ द्रुताळी |
| ,, | ३२ | गुणांसीं | गुणांसी | ,, | ,, | तिताळी | तिताळीं |
| ७९ | २ | शक्रते | शक्र ते | ९८ | २३ | ब्राह्मणा | ब्राह्मणां |
| ,, | ३० | तया | तथा | ,, | २५ | द्विजा | द्विजां |
| ८२ | १४ | कष्टविलें | कष्टवीलें | ,, | ,, | केले | केलें |
| ,, | १६ | धावणी | धांवणी | ,, | २६ | ऋषी | ऋषीं |
| ८३ | १३ | दळामाजि | दळांमाजि | ,, | ३० | मैद | मैंद |
| ,, | १९ | ते देव तोषें | तो देव तोषे | ९९ | ४ | जेऊनि | जेवूनि |
| ,, | २२ | गुरु | गुरू | ,, | २९ | ची रें | चीरें |
| ,, | ३३ | ब्रम्हादिकांची | ब्रह्मादिकांची | ,, | ३१ | पिकलेली | पिकलेलीं |
| ८४ | ३० | तयें | तये | ,, | ३२ | विडयाची | विढ्याचीं |
| ८५ | १४ | म्हणें | म्हणे | १०० | ७ | जिवीं | जिवें |
| ८६ | ४ | ब्रह्मादिकाला | ब्रह्मादिकांला | १०१ | ४ | मने | मनें |
| ,, | ८ | मानिले | मानिलें | ,, | ५ | जनी | जनीं |
| ,, | ९ | पाठविलें | पाठवीलें | ,, | ११ | प्रमे | प्रेम |
| ,, | १० | जाणविलें | जाणवीलें | ,, | २९ | पहातां | पाहतां |
| ८७ | ७ | तया | तयां | १०२ | ९ | बोलिले | बोलिलें |
| ,, | १६ | जांबुवंतां | जांबुवंता | ,, | ,, | गद्य | पद्य |
| ,, | १७ | स्नेहे | स्नहो | ,, | १४ | वृतियीं | वृतीयीं |
| ८९ | ११ | तयाचे | तयांचे | ,, | २५ | भेदूनिया | भेदूनियां |
| ,, | ३३ | ती | तीं | १०३ | १४ | अष्टपंची शर्ती | अष्टपंचीं शर्तीं |
| ९१ | ४ | विराज | विराजे | ,, | २० | पंचकरण | पंचीकरण |
| ,, | ९ | सुगंधें | सुगंधी | १०६ | १२ | मूर्ति | मुर्ती |
| ९२ | ३५ | ते शुद्ध मुक्ताफळाचे | तें शुद्ध मुक्ताफळांचें | ,, | १४ | कासयारे | कासया रे |
| ९३ | २१ | विभागीं | विभागी | १०७ | २० | पुन्हा | पून्हा |
| ,, | ३३ | कळवांतणींचें | कळवांतिणींचे | १०८ | १५ | अंजेना | अंजना |
| ९४ | ६ | ४५ खणाचीं | ४५ खणांचीं | १०९ | ३१ | मायावि | मायावि |
| ,, | १० | गृहे | गृहां | १११ | ९ | किष्किंधेहुनी | किष्किंधहूनी |
| ,, | ,, | ऊपरा | ऊपऱ्या | ११२ | २९ | डोळा | डोळां |
| ,, | ३३ | खणांची | खणांचीं | ,, | ३२ | अहारे | अहा रे |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ११३ | २ | घालोनिया | घालोनियां |
| ,, | ५ | पुरुषार्थ | पुर्षार्थ |
| ११४ | १९ | धाऊनि | धांवूनि |
| ११५ | १ | क्रोधल्या | कोंडल्या |
| ,, | ४ | मनें | मनीं |
| ,, | २१ | विधायुक्ति | विधीयुक्त |
| ,, | ३१ | कंदर्पगाभा | ३०कंदर्पगाभा |
| १२१ | ६ | पेढ | पडे |
| ,, | १५ | सुखे | सुखें |
| १२४ | १२ | किरण | किराण |
| ,, | ,, | तोफ | तोक |
| १२७ | ११ | पहा | पाहा |
| ,, | १३ | हाटकाची | २९ हाटकाची |
| १२९ | २२ | नादिसतां | न दिसतां |
| १३१ | २६ | टिळकारे | टिळका रे |
| १३२ | २४ | नेणें | नेणे |
| १३३ | ३३ | श्रेष्ट | श्रेष्ठ |
| १३४ | २ | जहालों | जाहला |
| ,, | ४ | मूर्ति | मूर्ती |
| १३५ | ३ | न संशयो | नको संशयो |
| १३६ | ११ | कोणासी | कोणासि |
| १३८ | २ | रजोगुणीं | रजोगुणी |
| १४१ | २० | उत्पति | उत्पत्ति |
| १४३ | ८ | आस्ते | अस्ति |
| ,, | ११ | अपेक्षते | अपक्षीयते |
| ,, | १२ | विनाशयते | विनश्यति |
| ,, | १७ | उद्भिज | उद्भिज्ज |
| ,, | २४ | कर्कश उचकी करी | कृकर शिंक करी |
| ,, | २६ | शिंकेंत | सर्वव्यापी |
| १४५ | १६ | जाणें | जाणे |

११३ वे पृष्ठांतील भूमिका व उपवायू यांविषयीं संस्कृत श्लोकः—

उद्गारे नाग आख्यातः कूर्म उन्मीलने स्मृतः ।
कृकरः क्षुत्कृतो ज्ञेयो देवदत्तो विजृंभणे ॥ १ ॥
न जहाति मृतं चापि सर्वव्यापी धनंजयः ।
ज्ञानभूमिः शुभेच्छाख्या प्रथमा समुदाहृता ।
विचारणा द्वितीया स्यात् तृतीया तनुगा स्मृता ॥ १ ॥
सत्वापत्तिश्चतुर्थी स्यात् ततो संसक्तिनामिका ।
पदार्थभावना षष्ठी सप्तमी तुर्यगा स्मृता ॥ २ ॥

**समाप्त.**